04-04-2006 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A

SKK/ 10:30

04-04-2006 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A-1

SKK/ KGS/ MAP/ पूर्वी श्री.सरफरे..... 10:30

(**सभापतीस्थानी माननीय उपसभापती**)

पृ.शी. : मराठवाडा,विदर्भ, खानदेश, कोकण या भागात अवेळी व अचानक झालेल्या गारपिटीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे झालेले नुकसान.

मु.शी. : मराठवाडा,विदर्भ, खानदेश, कोकण या भागात अवेळी व अचानक झालेल्या गारपिटीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे झालेले नुकसान, या विषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर,दिवाकर रावते, नितीन गडकरी, अनंत तरे, श्रीकांत जोशी, सुरेश जेथलिया, यशवंतराव गडाख, उल्हास पवार, शरद पाटील, गुरुनाथ कुलकर्णी, श्रीमती सुधा जोशी, श्रीमती मंदा म्हात्रे, प्रा.जोगेंद्र कवाडे, सर्वश्री रणजितसिंह मोहिते-पाटील, जयंत पाटील, विलासराव शिंदे, धोंडीराम राठोड, सुधाकर गणगणे, सुधीर सावंत, प्रा.फौजिया खान, सर्वश्री विनायकराव मेटे, डॉ.एन.पी.हिराणी, सर्वश्री नतिकोद्दीन खतिब, संजय दत्त,वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

उपसभापती : या अल्पकालीन चर्चेसेबंधी औपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाही. या चर्चेसाठी अडीच तासाची वेळ दिलेली आहे. सूचना देणारे माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी आपली सूचना वाचतील आणि भाषण करतील.

श्री.पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : महोदय, मी नियम 97 अन्वये आपल्या अनुमतीने पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो :-

"राज्याच्या मराठवाडा, विदर्भ, खानदेश, कोकण भागात दिनांक 2 ते 10 मार्च 2006 या कालावधीत झालेल्या गारपिटीमुळे द्राक्ष, ज्वारी, कांदा आणि भाजीपाला यांचे प्रचंड नुकसान झालेले आहे, द्राक्ष बागांतील द्राक्षांचे घड तुटून पडणे, आंब्याचा मोहोर झडून जाणे, काढणी सुरु असलेल्या ज्वारीची कणसे भिजून जाणे, नागपूर, यवतमाळ व अमरावती जिल्ह्यामधील संत्रा बागायतदारांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होणे, अवेळी व अचानक झालेल्या गारपिटीमुळे शेतकऱ्यांचे हाताशी आलेले पीक वाया जाणे, वीज अंगावर पडल्यामुळे आतापर्यन्त 15 ते 20 जणांचा मृत्यू होणे, त्यामुळे हलाखीच्या अवस्थेत सापडलेला शेतकरी वर्ग, शासनाने तात्काळ

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नुकसानीचा आढावा घेऊन मदत देण्याची व तातडीने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

04-04-2006 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A-2

SKK/ KGS/ MAP/

श्री.पांडुरग फुंडकर (पुढे सुरु...

सभापती महोदय, राज्यात दिनांक 26 जुलै 2005 रोजी अस्मानीसुलतानी संकट आले, प्रचंड अतिवृष्टी या राज्यामध्ये झाली. गेल्या 50 वर्षामध्ये इतका पाऊस पडला नव्हता इतका पडला. त्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले. प्रचंड महापूर आला. या महापुरामध्ये शेतकऱ्यांची घरेच उद्ध्वस्त झाली नाहीत, तर शेतकऱ्यांची लाखो हेक्टर जमीन 26 जुलैच्या महापूरात उद्ध्वस्त झाली. एका संकटातून सावरतो न सावरतो, तोच खरीपाचे पीक त्यावेळेला गेले, नद्यांच्या पुरामुळे शेती खरडून गेली, त्याबाबतही पुरेशी मदत मिळाली नाही. खरडून गेलेल्या शेतजमिनीचा पुरेसा मोबदला मिळाला नाही. हे सुरु असतानाच शेतकऱ्याचे खरीपाचे पीक गेले, त्यानंतर पुढील आशेने तो रब्बीचे पीक घेण्याच्या तयारीत होता. शेतकऱ्याने रब्बीचेचे पीक लावले. गहू, हरबरा, ज्वारी, सूर्यफूल, कांदा त्याचबरोबर फळबाग असलेली द्राक्षे, संत्रा, लिंबू अशी पिके घेतली आणि अचानकपणे पिकाचा मोसम सुरु झालेला असताना दिनांक 2 मार्चपासून 10 मार्चपर्यन्त पुन्हा नैसर्गिक संकट महाराष्ट्रामध्ये आले.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ....

अवकाळी पाऊस, प्रचंड गारपीट आणि अतिवृष्टी झाली. हे सर्व अचानक झाले. सुरुवातीला 2 तारखेला पाऊस झाला आणि त्यानंतर धो धो गारांचा पाऊस पडला. तीन तीन फूट गारांचा थर अनेक जिल्ह्यांमध्ये साचला होता. गारांचा थर साचून शेतकऱ्यांच्या शेतीतील पीके तर उद्ध्वस्त झालीच परंतु या अवकाळी पावसामुळे प्रचंड प्रमाणात घरे नादुरुस्त झाली. घरे पडली, झाडे पडली तसेच जनावरे मेली. या महाराष्ट्रातील मोठ्या प्रमाणावर पशुधन नष्ट झाले. हजारो हेक्टर शेतीतील पिके उद्ध्वस्त झाली. हा अवकाळी पाऊस झाला त्यावेळी या राज्याचे सन्माननीय मुख्यमंत्री विदर्भामध्ये आले होते. आमच्या बुलढाणा जिल्ह्यामध्ये कुस्तीच्या दंगलीचे उद्घाटन करण्यासाठी माननीय मुख्यमंत्री आले होते. तो काळ गारपिटीचा होता. त्यावेळी माननीय मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांनी पत्रकार परिषदेमध्ये असे जाहीर केले की, राज्यात अवेळी झालेला पाऊस आणि गारपिटीमुळे पिकांचे मोठया प्रमाणावर नुकसान झाले. पूरग्रस्तांप्रमाणेच अवेळी झालेला पाऊस आणि गारपिटीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत दिली जाईल. 26 जुलैला झालेल्या अतिवृष्टी आणि पुरामध्ये आपदग्रस्तांना ज्याप्रमाणे मदत देण्यात आली होती त्याच पध्दतीने शेतकऱ्यांना मदत देण्यात येईल असे माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते. 2 मार्च ते 10 मार्च हा कालावधी गेला. शेतकरी सैराबैरा झाले. शेतकऱ्यांच्या शेतीचे पंचनामे झाले. घरांचे पंचनामे झाले. घरांच्या पंचनाम्यानुसार तातडीची जी मदत द्यावयास पाहिजे होती तेवढी मदत शासनाकडून दिली गेली. या पावसाने महाराष्ट्रामध्ये जवळपास 20 जणांचे बळी घेतले. 26 जुलैच्या पावसाने बळी घेतले आणि आता अवकाळी पावसामध्ये 20 लोकांचे बळी गेले. अवकाळी पावसामुळे विदर्भ, मराठवाडा आणि खानदेशमध्ये जवळपास 20 लोकांचा मृत्यू झाला. त्यामध्ये विदर्भातील सर्वात जास्त 8 लोक होते. मराठवाड्यात 7 आणि खानदेशमध्ये 5 लोकंचे बळी गेलेले आहेत. सुमारे 57 हजार हेक्टर जमिनीवरील पिकांचे नुकसान झाले. विदर्भामध्ये एकही जिल्हा असा राहिला नाही की, ज्या ठिकाणी पिकांचे नुकसान झाले नाही. सन्माननीय मंत्रिमहोदय ज्या जिल्ह्यामध्ये राहतात त्या बुलढाणा जिल्ह्यामध्ये खामगाव, शेगाव, चिखली, बुलढाणा, मलकापूर या सर्व तालुक्यांमध्ये प्रचंड प्रमाणात गारांचा पाऊस झाला. अनेक तालुक्यांमध्ये माननीय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

मंत्रिमहोदयांनी दौरा केला. त्यांनी त्या वेळची स्थिती पाहिली. त्याचबरोबर अकोला जिल्ह्यामध्ये परतूर, आकोट आणि तेल्हारा तालुक्यांमध्ये प्रचंड प्रमाणात गारपीट झाली. आकोट तालुक्यामध्ये एकाच गावामध्ये जवळपास 500 ते 600 शेळ्या-मेंढ्या गारपिटीमुळे मृत्यूमुखी पडल्या. परतूर तालुक्यामध्ये गहू, कांदा इत्यादी पिके नष्ट झाली तसेच संत्रा, लिंबू यांचे नुकसान झाले. खामगाव तालुक्यामध्ये सुध्दा तीच अवस्था निर्माण झाली. बुलढाणा तालुक्यातील चिंचपूर, हरणखेड येथील अजय वाकोडे आणि प्रवीण निकम ही दोन मुले वीज पडल्यामुळे जागीच ठार झाले. बुलढाणा तालुक्यातील जनोना येथील पंकज राजपूत हा 22 वर्षीय तरुण वीज कोसळल्यामुळे जागच्या जागीच ठार झाला. रिसोड तालुक्यामध्ये मोहजा - इंगोले रस्त्याचे काम करणाऱ्या एका मजुराच्या झोपडीवर वीज पडून तानाजी ठोके आणि अर्चना ठोके हे 20-22 वर्षाचे भाऊ बहीण जागच्या जागीच ठार झाले. ही झाली बुलढाणा जिल्ह्याची परिस्थिती. अकोला जिल्ह्यामध्ये सुध्दा गहू, हरभरा ही पिके नष्ट झाली तसेच फळबागाही नष्ट झाल्या.

यानंतर श्री. शिगम .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पांडुरंग फुंडकर....)

अमरावती जिल्ह्यातील अचलपूर, अंजनगांव, परतवाडा या परिसरामध्ये देखील तुफान गारपीट होऊन त्या परिसरातील संपूर्ण शेती उद्ध्वस्त झाली. शेतक-यांचे उभे पीक त्या गारपीटीमध्ये नष्ट झाले. नागपूर, यवतमाळ, वर्धा या जिल्ह्यामध्ये देखील अशीच परिस्थिती निर्माण झाली. नागपूर जिल्ह्यामध्ये संत्र्याचे पीक फार मोठ्या प्रमाणावर येते. या गारपीटीमध्ये नागपूर जिल्ह्यातील संपूर्ण संत्र्याचे पीक गळून पडले. नष्ट झालेल्या पिकाचे पंचनामे झाले. परंतु शेतक-यांना कोणत्याही प्रकारची अद्याप मदत मिळालेली नाही. नागपूर जिल्ह्यातील नरखेड, काटोल, कळमेश्वर तालुक्यातील संत्रा पिकाबरोबरच गहू, तूर हरभरा कापूस या पिकांचे अतोनात नुकसान झाले. अमरावती कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवरातील जवळपास 11 हजार क्विंटल उडीद, 12 हजार क्विंटल हरभरा, 2 हजार क्विंटल गहू, 700 क्विंटल सोयाबीन पावसामध्ये संपूर्णपणे भिजून नष्ट झाले. शेतक-याला संत्रा पिकाच्या नुकसानीबाबत फक्त 500 रु. मदत दिली गेली. संत्र्यांच्या बागा कशा पध्दतीने विकल्या जातात हे माननीय मंत्री महोदयांना माहीत आहे. संत्र्याचे पीक तोडण्यापूर्वीच संत्र्याच्या बागा विकल्या जातात आणि शेतक-यांना पैसे दिले जातात. परंतु संत्र्यांचे पीक गारपीटीमध्ये उद्ध्वस्त झाल्यामुळे व्यापारी शेतक-यांना नडले आणि बागा घेत नाही असे सांगितले. विदर्भात ही अशी स्थिती निर्माण झाली. मराठवाड्यात देखील याच पध्दतीने गारपीटीमुळे नुकसान झाले. मराठवाड्यातील बीड, उस्मानाबाद, हिंगोली, परभणी, नांदेड या जिल्ह्यामध्ये 2 तारखेला सुरु झालेला पाऊस शुक्रवारच्या रात्री पर्यन्त सुरु होता. नांदेड जिल्ह्यातील कंधार तालुक्यामध्ये 24 तासात 50 मि.मी. पाऊस झाला. या पावसामुळे मराठवाड्यातील गहू, हरभरा, करडई या पिकाचे फार मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. या पावसामुळे ज्वारी काळी पडली तर गहू पांढरा झाला. ब-याच ठिकाणी गव्हाचे पीक हे कापणीच्या स्थितीला असताना पाऊस झाल्यामुळे ते गव्हाचे पीक पूर्णपणे भिजून गेले. या पावसाने विदर्भ, मराठवाड्या बरोबरच पश्चिम महाराष्ट्राला देखील सोडले नाही. पश्चिम महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यातील उभ्या पिकांचे या पावसामध्ये प्रचंड नुकसान झाले. नाशिक जिल्ह्यात देखील प्रचंड प्रमाणावर पाऊस झाला. खानदेशामध्ये द्राक्षाचे आणि कांद्याचे उत्पादन फार मोठ्या प्रमाणावर होते. कांद्याच्या पिकाला आधीच भाव नाहीत. हे कांद्याचे पिक 15 दिवसांनी काढायला येणार होते. अशा कांद्याच्या पिकावर गारपीट झाल्यामुळे तो

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री.पांडुरंग फुंडकर....)

कांदा जमिनीतच सडून गेला. आंबेगाव, राजगुरुनगर. लासलगाव या तालुक्यातील शेतक-यांनी कांदा साठवून ठेवलेला होता. पंरतु अचानक झालेल्या पावसामुळे तोही कांदा भिजून नष्ट झाला. 26 जुलैच्या अतिवृष्टीचा फटका राज्यातील 14 जिल्हयांना बसला. परंतु गारपीटीने तर महाराष्ट्रातील एकही विभाग सोडला नाही. कोकणामध्ये देखील तीच स्थिती निर्माण झाली. कोकणामध्ये काही मिनिटांचेच चक्रीवादळ झाले आणि त्या चक्रीवादळात घरांची मोठ्या प्रमाणावर पडझड झाली. तसेच आंबा आणि काजू पिकाचे प्रचंड प्रमाणावर नुकसान झाले. राज्यातील इतर पिकांप्रमाणेच कोकणतील आंबा आणि काजू यांचे हाताशी आलेले पीक वाया गेले. नैसर्गिक आणि तांत्रिक कारणांमुळे कोकणातील शेतक-यांच्या संकटात भर पडली. महसूल खात्याच्या निकषाप्रमाणे गाव तलाठी पंचनामे करुन नुकसानीचा अंदाज घेतात. खरे म्हणजे काजू आणि आंबा या पिकांच्या नुकसानीची व्याप्ती ठरविण्यासाठी सहायक कृषी अधिका-यांनी जायला हवे होते. पण त्यावेळी त्यांचा कुठे पत्ताच नव्हता.

.....नंतर श्री. कानडे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ...

ते नसल्यामुळे तलाठयांनी आंबा,काजू या झाडांच्या नुकसानीचा अंदाज घेतला. माझी माहिती अशी आहे की कृषी अधिकाऱ्यांना गेल्या जवळपास 4-5 वर्षापासून टीए-डीए चा भत्ता मिळालेला नाही त्यामुळे कृषी अधिकारी पंचनामे करायला गेले नाहीत. सभापती महोदय, गारपीटग्रस्त भागाचा दौरा करण्यासाठी कृषी अधिकारी गेले नाहीत. 4-5 कोटी रुपयांची प्रवासभत्त्याची बिले थकीत असल्यामुळे हे अधिकारी गारपीटग्रस्त भागाला भेट देण्यासाठी गेले नाहीत अशा बातम्या आल्या आहेत. विदर्भ,मराठवाडयामध्ये पाऊस झाला त्या भागामध्ये सरकारने तात्काळ सर्वेक्षण करणे आवश्यक होते परंतु पटवाऱ्यासोबत कृषी अधिकारी फिरु शकले नाहीत. एका बाजूला कृषी अधिकाऱ्यांचे भत्ते मिळत नाहीत. 4-5 कोटी रुपये भत्त्यापोटी थकीत राहतात. अस्मानी-सुलतानी संकट येऊन सुध्दा भत्ते न मिळाल्यामुळे कृषी अधिकारी शेतकऱ्यांच्या नुकसानीचे पंचनामे करु शकले नाहीत. अशी अवेळी गारपीट याच वर्षी झाली असे नाही तर यापूर्वीही राज्यात अशा प्रकारे अनेक वेळा गारपीट झालेली आहे. परंतु शासकीय यंत्रणा अतिशय धीम्या गतीने मदत करताना दिसून येते. एका महिन्यात पंचनामे तयार होऊन जिल्हाधिकाऱ्यांचे रिपोर्ट तयार आहेत. परंतु मुख्यमंत्री महोदयांनी घोषणा करुन सुध्दा शासनाला मदत देणे शक्य झालेले नाही आणि कोणतीही मदत आतापर्यंत मिळाली नाही. गारपीट झाली त्यासंदर्भात मी दोन वेळा प्रश्न देखील उपस्थित केला होता परंतु त्याचे उत्तर शासनाने दिलेले नाही. गारपीट झालेल्या जिल्हयांमध्ये शासकीय यंत्रणा कशा प्रकारे मदत करीत आहे हे मी सांगण्याचा प्रयत्न करणार आहे. बुलढाणा जिल्हया मध्ये 25389 हेक्टर शेती 50 टक्केपेक्षा जास्त उद्ध्वस्त झाली. 1202 हेक्टर शेती 50 टक्के पेक्षा कमी उद्ध्वस्त झाली. 735 घरांचे पूर्णत: नुकसान झालेले आहे. 3578 घरांचे अंशत: नुकसान झालेले आहे परंतु अद्यापपर्यंत नुकसानीसंबंधी मदत पुरविण्याबाबतचे आदेश प्राप्त झालेले नाहीत. जालना जिल्हयामध्ये 28717 हेक्टर शेतीचे 50 टक्केपेक्षा जास्त नुकसान झालेले आहे. अजूनही कोणतीही मदत मिळालेली नाही. वाशिम जिल्हयामध्ये फक्त 2 लाख रुपयांची मदत दिली गेली आहे. जळगांव जिल्हयामध्ये कोणत्याही प्रकारची मदत मिळाली नाही. औरंगाबाद जिल्हयामध्ये सुध्दा कोणत्याही प्रकारची मदत मिळाली नाही. बऱ्याच जिल्हयांमध्ये तर अजून सर्वेक्षण देखील झालेले नाही. मदत मिळालेली नाही आणि शासनाचे कोणतेही आदेश नाहीत अशा प्रकारची परिस्थिती आहे. खरे पाहता मुख्यमंत्री महोदयांनी जाहीर केल्यानंतर या विषयावर चर्चाच

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडरंग फुंडकर ...

व्हावयाला नको होती. गारपिटीमुळे शेतकरी उध्वस्त झाला म्हणून त्याला तातडीची मदत करावयाला पाहिजे होती. माणशी एक हजार रुपयांची मदत करीत असताना सुध्दा शिंगणे साहेब आपल्या जिल्हयात राजकारण करण्यात आले. आपल्या जिल्हयात राजकारण कशा पध्दतीने चालते हे आपल्याला माहीत आहे. एका गावाचे उदाहरण मी देतो. खामगांव तालुक्यातील बोथाकाझी या गावामध्ये काँग्रेसचे एक मोठे पुढारी राहतात. त्या गावामध्ये ज्यांची घरे उध्वस्त झाली त्यांना मदत दिली जाणे आवश्यक होते. ज्यांची घरे संपूर्णपणे जमीनदोस्त झाली त्यांना मदत मिळाली नाही. परंतु ज्यांचे गुरांचे गोठे होते आणि त्यात जनावरे देखील बांधत नव्हते त्यांना मदत दिली गेली. माणसे उघडयावर आहेत त्यांना मदत मिळाली नाही. सत्ताधारी पक्षाचा कार्यकर्ता असेल तर गुरांच्या गोठयाला सुध्दा मदत मिळाते. गोठयात गुरे देखील बांधली जात नाहीत. मी स्वत: याठिकाणी भेट दिली आहे. बोथाकाझी गावामध्ये दलित समाजाचे मोठे नुकसान झालेले आहे. गावात राहणाऱ्या लोकांनी सांगितले की गुरांचे गोठे होते त्यांना मदत मिळाली आणि त्या गोठयामध्ये गुरे देखील बांधली जात नाहीत तर पत्ते खेळले जातात. त्याठिकाणी पत्ते सापडले होते. अशा लोकांना मदत दिली गेली. जो खरा संकटात सापडलेला शेतकरी आहे त्याला मदत दिली गेली नाही.

यानंतर श्री. खर्चे पी.

अशुधारित प्रत / शीघ्रलेखापी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

म्हणून माझी माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे की, खामगांव तालुक्यातील कांचनपूर, बोथा काजी आणि आंबेटाकळी या तिन्ही गावांचे सर्वेक्षण झालेले आहे, पंचनामे झालेले आहेत परंतु ते पंचनामे संबंधित उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदारांवर दबाव आणून खोटया स्वरुपाचे करण्यात आले आहेत व मदत देखील खोटया लोकांना मिळाली. खरोखरच ज्यांना तडाखा बसला, जे तडाख्यात सापडले त्यांना मदत मिळाली नाही, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी पुन्हा करावी. प्रेताच्या टाळूवरील लोणी खाण्याचा प्रकार ज्या अधिकाऱ्यांनी केला असेल त्यांच्यावर ताबडतोबीने कारवाई करावी. अशा प्रकारे कोण्या लोकप्रतिनिधींच्या सांगण्यावरुन जर पंचनामे होत असतील आणि खरोखरच संकटात सापडलेल्या दलित माणसाला वंचित ठेवण्याचा प्रयत्न होत असेल तर हे योग्य नाही याचा विचार मंत्री महोदयांनी करावा. त्याचबरोबर मी माननीय महसूल राज्यमंत्र्यांचे अभिनंदन करणार आहे कारण त्यांनी बुलढाणा जिल्हयातील कोराळा या गावाला निकष बदलून तातडीने मदत केली. या परिसरात कोराळा या एकटयाच गावाला फक्त चारच मिनिटात चक्रीवादळाने पूर्णपणे उद्ध्वस्त केले. लोकांना जाणीव नव्हती की, अशा प्रकारचे वादळ येईल. हे चक्रीवादळ केवळ त्याच गावापुरते मर्यादित होते, शेजारच्या 2 किलोमीटरवरच्या गावाला या चक्रीवादळाचा धक्का देखील लागलेला नाही अशा प्रकारे फक्त चार मिनिटात संपूर्ण गाव उद्ध्वस्त झाले व गावातील 550 घरांचे नुकसान झाले. हे वादळ आल्यानंतर मानवतेच्या दृष्टीकोनातून अनेक स्वयंसेवी संस्थांनी या गावाला मदत केली, माननीय पालकमंत्री व जिल्हाधिकारी तसेच पालकमंत्र्यांनीही भेट दिली आणि सर्व निकष बाजूला करुन माननीय महसूल राज्यमंत्र्यांनी या गावासाठी मदत जाहीर केली त्याबद्दल त्यांचे मी पुन्हा अभिनंदन करतो. ज्याप्रमाणे या गावाच्या बाबतीत मंत्री महोदयांनी निर्णय घेतला तसेच काम बुलढाणा व अकोला जिल्हयातील ज्या ज्या तालुक्यातील घरांची पडझड झाली, त्यांना अजूनही मदत मिळाली नाही. एका बाजूला घरे उद्ध्वस्त झाली, दुसऱ्या बाजूला शेती उद्ध्वस्त झालेली आहे, शेतीच्या मदतीसंबंधी अद्यापही शासनाने कुठलेही आदेश दिलेले नाहीत. बुलढाणा जिल्हयातील चिखली तालुक्यात कांदयाच्या बियाण्याचे उत्पादन मोठया प्रमाणात होते. कांदयाचे बी शासनाच्या निकषांमध्ये बसत नाही परंतु या भागात लाखो रुपयाचे कांदयाचे बी तयार होते. या कांदयाच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

बियाण्याचे मळेच्या मळे या गारपिटीमुळे उद्ध्वस्त झालेले आहेत परंतु हे शासनाच्या कुठल्याच निकषात बसत नसल्यामुळे त्यासाठी मदत देता येणार नाही, म्हणून यासंदर्भात शासनाने सहानुभूतीने विचार करावा व या कांदयाच्या बियाण्याचे मळे उद्ध्वस्त झालेले आहेत त्याचा समावेश मदतीमध्ये करावा.

सभापती महोदय, यानंतर मला असे निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, बुलढाणा जिल्हयातून पूर्णा नदी वाहते व जळगांव जिल्हयातील तापी नदीला ती जाऊन मिळते. या तापी-पूर्णा नदीच्या पात्रामध्ये भोई समाजाचे लोक शासनाच्या परवानगीने कलिंगडाचे बगीचे मोठया प्रमाणात लावत असतात. परंतु अवेळी पावसामुळे हे कलिंगड आणि खरबुजाचे मळे संपूर्णपणे उद्ध्वस्त झालेले आहेत, संपूर्ण मळे या नदीला आलेल्या महापुरामुळे वाहून गेलेले आहेत. या भोई समाजाला शासनाकडून लीजवर हे नदीचे पात्र या कलिंगडाच्या लागवडीसाठी दिलेले आहे. परंतु या अतिवृष्टीमुळे हा समाज उद्ध्वस्त झालेला आहे, या नैसर्गिक संकटात सापडला आहे. या राज्यावर आघाडी सरकार आल्यापासून सतत तीन वर्षांपासून नैसर्गिक संकट येत आहे. जणू काही या राज्याचेच ग्रह फिरले की काय हे आम्हाला समजत नाही. मागच्या कालखंडात म्हणजेच गेल्या पाच वर्षांमध्ये जवळपास लागोपाठ तीन वर्षे राज्यात दुष्काळ पडला. महाराष्ट्र राज्याच्या मुख्यमंत्र्यांचा पायगुण चांगला नसेल म्हणून मुख्यमंत्री बदलण्यात आले व त्यानंतर श्री. सुशीलकुमार शिंदे आपल्या राज्याचे मुख्यमंत्री झाले. त्यांनी दोन वर्षे कारभार केला व त्यानंतर पुन्हा विलासराव देशमुख मुख्यमंत्री झाले. कदाचित त्यांचे तरी ग्रह नीट असतील परंतु मुख्यमंत्री बदलून देखील ग्रह नीट झाले नाहीत. थोडक्यात या आघाडी सरकारचेच ग्रह चांगले नाहीत असे आम्हाला आता वाटू लागले आहे. कारण गेल्या वर्षी 26 जुलै रोजी अतिवृष्टीमुळे मुंबईत हाहा:कार उडाला. आम्हाला असे वाटले होते की, आता राज्याचा गाडा काही तरी नीट चालेल परंतु हे राहू-केतू नांवाची जी ग्रहदशा या आघाडी सरकारला लागली ती सोडायलाच तयार नाही. या जुलैच्या संकटातून सावरतो न सावरतो तोच मार्च महिन्यात मोठया प्रमाणात गारपिट झाली व तिने संपूर्ण महाराष्ट्रालाच उद्ध्वस्त केले.

यानंतर श्री. भारवि .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर

अस्मानी सुलतानी संकट आले. या संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांसाठी कोणीही वाली नाही. शेतकऱ्यांच्या पिकाला विमा नसतो. आज महाराष्ट्रामध्ये जवळपापस 85 टक्के शेती ही कोरडवाहू आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना निसर्गाच्या भरवशावर शेती करावे लागते. अवेळी पाऊस पडणे, अतिवृष्टी, दुष्काळ, इत्यादीसह मावा,लाल्या या पिकांवरील रोगराईचा सामना शेतकऱ्याला करावा लागतो. विदर्भातील कापसावर लाल्या रोगाचा प्रादुर्भाव झाल्यामुळे कापूस उत्पादक शेतकरी उद्ध्वस्त झाले आहेत. अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होते. मी सन्माननीय मंत्री श्री.पतंगराव कदम यांना सांगू इच्छितो की, आपल्या सरकारचा पायगुण चांगला नाही. आज राज्यातील शेतकऱ्यांना अतिवृष्टी, गारपीट इत्यादी संकटांना सामोरे जावे लागत आहे. अशा संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना कुठल्याही प्रकारचे संरक्षण नाही. पीक विम्याचे संरक्षण नाही. निसार्गाच्या भरवशावर शेतकरी शेती करीत असतो. गारपीट, महापूर, अवर्षण, पिकांवरील रोगराई इत्यादींचा फटका शेतकऱ्यांना बसतो. त्यामुळे शेतीचे पीक उद्ध्वस्त होते. अशा प्रकारांमुळेच आज शेतकरी आत्महत्या करण्यास उद्युक्त होत आहेत. आज शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारचे कर्ज दिले जात नाही. आज शेतकरी आत्महत्या का करीत आहेत ? शेतकरी महागडी बियाणे घेतो, खत घेतो. त्यातून तो पीक काढतो. त्याच्या शेतात पीक आल्यानंतर ऐनवेळी गारपीट होते. त्यामुळे त्याला असलेला आधारच शिल्लक रहात नाही. त्याचे पीक उद्धवस्त झाल्यामुळे तो आपल्या कुटुंबियांचे पालनपोषण करू शकत नसल्यामुळे आत्महत्येशिवाय दुसरा पर्याय त्याच्या समोर रहात नाही. अशा संकटात सापडलेल्या शेतकऱ्याला शासन मदत करीत नाही. गारपीट होऊन एक महिना झालेला आहे. पण या संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना शासनातर्फे कुठलिही मदत केली जात नाही. एवढेच नव्हे तर जिल्हाधिकाऱ्यांनासुध्दा आदेश दिले जात नाहीत. शासनाने फक्त जुजबी मदत केली आहे. फक्त एक हजार रुपयांची मदत केली आहे. विदर्भ, मराठवाडा, खान्देश, पश्चिम महाराष्ट्र कोकण इत्यादी भागातील शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. कोकणात आंबा उत्पादकांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. मागच्या वर्षी सन्माननीय मंत्री श्री.विनय कोरे यांनी हेक्टरी दहा हजार रुपये आंबा उत्पादक शेतकऱ्यांसाठी मदत देण्यात येईल

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

अशी घोषणा केली होती. परंतु, सिंधुदुर्ग जिल्हयातील आंबा उत्पादक शेतकऱ्यांना सदर मदत अद्यापपावेतो मिळालेली नाही. 26 जुलैच्या महापूरात सापडलेल्यांना मदत करण्यासाठी जे निकष लावले होते तेच निकष अतिवृष्टी, गारपीटमध्ये सापडलेल्या शेतकऱ्यांसाठी लावण्यात येतील अशी घोषणा माननीय मुख्यमंत्र्यांनी एक महिन्यापूर्वी केली होती. पण ही घोषणा फक्त कागदावरच राहिली. अजून पर्यंत संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांसाठी कुठलीही मदत शासनाने केलेली नाही. गारपिटीमुळे, अवकाळी पावसामुळे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे कोटयवधी रुपयांचे नुकसान झाले आहे. या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यास शासन असमर्थ ठरले आहे. या अतिवृष्टी व अवकाळी पावसामध्ये सापडलेल्या संत्रा, केळी, मोसंब, लिंबू, आंबा तसेच गहू, हरभरा वगैरे उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांना शासनाने मदत दिली पाहिजे. जे फळबागायतदार आहेत त्यांना हेक्टरी 25 हजार रुपये आणि जे कोरडवाहू शेतकरी आहेत त्यांना हेक्टरी रुपये 10 हजार इतकी मदत शासनाने जाहीर करावी व सदर मदत ही आठ दिवसात देण्यात यावी अशाप्रकारची मागणी मी या निमित्ताने करतो आणि माझे दोन शब्द पूर्ण करतो.

....

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.गुरूनाथ कुलकर्णी)

यानंतर श्री.कांबळे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, एका दुर्दैवी फेऱ्यामध्ये सापडलेल्या शेतकऱ्याची ही दुर्दैवी कहाणी आहे. " आनंदी आनंद गडे, जिकडे तिकडे चोहीकडे " अशा मुडमध्ये माननीय मंत्रीमहोदय श्री. पतंगरावजी कदम सभागृहात अवतरले आहेत. आम्ही व जनता वाट पाहत आहोत की, कधी ते महाराष्ट्राची सूत्रे हाती घेतात आणि सर्वसामान्य, गोरगरीब जनतेला सुखी करतात. सभापती महोदय, त्यांचीही निराशा होत आहे आणि आमचीही निराशा होत आहे. तरी, आजच्या चर्चेकडे माननीय मंत्रीमहोदयांनी गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी माझी विनंती आहे. सभापती महोदय, एकाच आठवड्याने शेतकऱ्यांचा आणि आघाडी सरकारचा घात केला आहे आणि तो आठवडा म्हणजे मार्च महिन्याचा पहिला आठवडा. अधिवेशनाच्या अगोदरच काही दिवस होळी होती. परंतु त्यापूर्वीच ग्रामीण भागातील जनतेसाठी निसर्गकोपाने बोंब मारण्याची पाळी येण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली. त्या महिन्याच्या 1 ते 10 तारखेपर्यंत तीन वेळा अवकाळी पाऊस पडला. रस्त्यामध्ये आणि वनामध्ये प्रचंड गारा पडल्या, वादळाचे थैमान सुरु झाले, विजेचा जीवघेणा प्रपात घडला अशाप्रकारे निसर्गाने अख्ख्या मुंबईसह महाराष्ट्राला झोडपून काढले. आघाडी सरकारच्या लफंग्या वृत्तीने शेतकऱ्याला आत्महत्येस सामोरे जावे लागत आहे आणि त्याच शेतकऱ्यांचे व त्यांच्या कुटुंबियांचे शाप या आघाडी सरकारला लागत आहेत, म्हणूनच सातत्याने सरकारवर अशी संकटे येत आहे, असे मी नम्रपणे सांगतो. सभापती महोदय, काही क्षणामध्ये ही भीषण परिस्थिती निर्माण झाली. वादळामध्ये किती किलोमिटर्स दूरीवर घरांचे पत्रे उडाले हे माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंगजी फुंडकर यांनी आपल्याला सांगितलेच आहे. सभापती महोदय, अमरावतीमध्ये पिकांचे 95 कोटी रुपयांचे नुकसान झाले, मेळघाटामध्ये 65 गावांमध्ये तुफान गारपीट झाली, हजारो आदिवासी बेघर झाले, धान्य ओले झाले. त्याचप्रमाणे नागपूरमध्ये नरखेड तालुक्यातील पिके सपशेल उध्वस्त झाली. तेथे दोन बळी गेले. अकोल्यामध्ये महिलेसह तिघांचा मृत्यू झाला, दीड हजार पशु मृत्यूमुखी पडले, बुलढाण्यामध्ये एक वीज बळी गेला, घरांची छपरे उडाली. तसेच वाशिममध्ये आंब्याचा मोहोर 80 टक्के गळला, यवतमाळमध्ये 48 तासांमध्ये सतत साडे चार हजार हेक्टरमध्ये पिकांचा फटका बसला, वर्धा जिल्ह्यातील आठही तालुक्यांना पावसाने झोडपले. चंद्रपूरमध्ये साडे तीन हजार हेक्टरमधील पिकांचे नुकसान झाले, भंडाऱ्यामध्ये 35 लाखांचे

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

नुकसान झाले. गोंदियामध्ये मिर्चीचे दोन लाखांचे नुकसान झाले. या सर्व बातम्या ज्यावेळी " सकाळ " या वर्तमानपत्रामध्ये आल्या, त्याच्या दुसऱ्याच दिवशी सरकारचा अधिवेशनाच्या पूर्वसंध्येस चहापानाचा कार्यक्रम होता. आम्ही टाकलेल्या बहिष्कारासंदर्भात कारणमीमांसा देऊ शकतो. पण सभापती महोदय, किमान सरकारने या उद्ध्वस्त शेतकऱ्यांच्या जाणीवेपोटी त्या दिवसाचा तरी चहापान कार्यक्रम रद्द केला असता तर शेतकऱ्यांच्या मनात सरकारविषयी चांगला समज निर्माण झाला असता. सभापती महोदय, शेतकरी सरकारकडे अपेक्षेने पाहत आहे. सभापती महोदय, त्याला कुठेतरी असे वाटत असते की, हे मायबाप सरकार आपले आहे. पण नाही. तेवढ्या जाणीवाच तुमच्यामध्ये नाहीत हेच दुर्दैव आहे. सभापती महोदय, मी आता सर्व विदर्भातील जिल्ह्यांविषयी वाचले. त्याचप्रमाणे अंजनगाव परिसरामध्ये पावसाच्या कहरामुळे पिकांचे आणि घरांचे नुकसान झले. वीज पडून घरांचेही नुकसान झाले. दर्यापूरात एक कोटी रुपयांची हानी झाली. धामनगावात देखील नुकसान झाले. हिरापूर परिसरामध्ये पाचशे मेंढ्या दगावल्या. तिवसा तालुक्यात हरभऱ्याचे नुकसान झाले. अशाप्रकारे काही क्षणामध्ये शेतकरी उध्वस्त झाला. सभापती महोदय, विदर्भात महापूरामध्ये खरीप पीक गेले होते. आता हातातोंडाशी आलेले रब्बी पीक गेले आहे. सभापती महोदय, फक्त पाच, दहा मिनिटे गारांचा पाऊस झाला आणि असे झाले. ज्वारी, गहू, हरभरा, तूर, करडी ही नगदी पिके देखील गेली. रोखीतला भाजीपाला देखील गेला. सभापती महोदय, रोखीतला भाजीपाला म्हणजे रोज भरायचा आणि पैसे घ्यायचे. त्याचप्रमाणे संत्रा, द्राक्षे, आंबा, टरबूज, केळी या फळांचे नुकसान झाले. बागायत अक्षरश: उद्ध्वस्त झाली. त्याचप्रमाणे आर्थिक फायदा देणाऱ्या फळबागाही उध्वस्त झाल्या.

(यानंतर श्री. वि. खर्चे ..

अशुधारित प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

फळबागांचा विषय, ज्वारी बाजरीचा विषय, भाजीपाल्याचा विषय, हे विषय नुकसान भरपाईमध्ये वेगळया स्तरावर मोजले जावेत म्हणून ते मी येथे मुद्दाम मांडलेले आहेत. उद्ध्वस्त शेतकऱ्याला कर्जातून बाहेर काढावे, कोटयावधी कृषी संपत्तीची झालेली हानी भरुन काढण्यासाठी सरकारला पुन्हा एकदा मदतीच्या कसोटीला उतरावे लागणार आहे. या अवकाळी पावसाने व गारपीटीने विचित्र अशी परिस्थिती निर्माण केलेली आहे. एकटया यवतमाळ जिल्हयामध्ये वादळी पावसाने उमरगा तालुक्यातील पिटरगांव परिसरात प्रचंड गारपीट झालेली आहे. 600 हेक्टर जमिनीवरील गहू, हरभरा, संत्रा या पिकांचे नुकसान झाले, 70 घरांची पडझड झाली. म्हशी व वन्य पशू, कोंबडया मृत्यूमुखी पडल्या, त्यामुळे या भागातील नुकसान 1 कोटी रुपयांच्यावर जाण्याची शक्यता वर्तमान पत्रातून वर्तविण्यात आलेली आहे. त्याच प्रमाणे यवतमाळ जिल्हयातील दारव्हा तालुक्यातील अनेक गांवाना या गारपिटीचा व वादळाचा फटका बसलेला आहे. अमरावती जिल्हयामध्ये मोर्शी व वरुड तालुक्यातील अनेक गावांमध्ये गारपीट व वादळासह मुसळधार पाऊस दुसऱ्या दिवशी दुपारपर्यंत कायम होता. या गारपीटीने चारही संत्रा उत्पादक तालुक्यामध्ये सुमारे 5 हजार हेक्टरवरील हातातोंडाशी आलेले संत्र्यांचे पीक उद्ध्वस्त झालेले आहे. शासकीय किंमतीनुसार एक हेक्टर जमिनीवर 1 लाख रुपयांचे संत्रा पिकाचे उत्पन्न होते, याप्रमाणे जिल्हयामध्ये 50 कोटी रुपयांच्या संत्रा पिकांची नासाडी झालेली आहे. त्याच सुमारास ईटीव्हीवर बातमी पाहतांना लक्षात आले की, मार्केटमध्ये दररोज 5 हजार ट्रक संत्र्याचे येत होते आता त्या ठिकाणी 350 ते 400 ट्रकांची आवक आहे. संत्र्यांच्या नुकसानीचा हा आकडा इतका बोलका आहे, उद्ध्वस्त संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना आपण कसे काय सावरणार ? कारण त्यांच्यावर एका वर्षामध्ये ही तिसरी पाळी आलेली आहे. अमरावती जिल्हयामध्ये गारपीटीमुळे सर्वात मोठा तडाखा चिखलदरा तालुक्याला दिलेला आहे. रस्त्यांवर जवळ-जवळ तीन-तीन फुटांच्या गारा पडल्या होत्या, त्यांचे फोटो आहेत, काश्मिर बघावे असे फोटो वर्तमानपत्रामध्ये छापून आलेले आहेत. त्याच चिखलदऱ्यामध्ये श्रीरधाळ माळ, चिलाटी, कालापानी,मडकी, बदनापूर, पार्लिंगा, उमरखेड, सुलगणा, तेलखाडा, धोरखेडा व धोरखेडा बाजार, नागपूर मधील रामटेक, निम्नबर्डी, बियाली, टोमनफाटा, पोहाना, मोथा, या 18 गावांमध्ये सुमारे हजारे रुपयांचे नुकसान झालेले आहेत ही सर्व

.....2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

आदिवासी गावे आहेत म्हणून मी त्यांची येथे नोंद घेतलेली आहे. 500 घरे पूर्ण उदघ्वस्त झालेली आहेत, 2000 लोकांना उघडयावर येण्याची पाळी आलेली आहे. यामध्ये कौतुकाचा भाग एवढाच आहे की, सन्माननीय मंत्री श्री. पतंगराव कदम आपण म्हणालात की, आम्ही तेथे जाऊन बैठक घेतली, मी तुम्हाला धन्यवाद देतो, तेथे जाण्यासाठी महसूल मंत्र्यांना वेळ मिळालेला नाही काय ? आपण गेलात मी तुम्हाला धन्यवाद देतो. येथील जिल्हाधिकारी श्री. रविंद्र जाधव आहेत त्यांनी त्या ठिकाणी अपार अशी मेहनत केलेली आहे, त्यांचे खास कौतुक करावयास पाहिजे. ते चिखलदरा येथे बरेच दिवस होते. अप्पर जिल्हाधिकारी श्री. अरुण डोंगरे होते, तसेच श्री. जितेंद्र वाघ होते, तहसिलदार यांच्यासह विविध शासकीय अधिकारी तेथे पाहणी करण्यासाठी तळ ठोकून बसले होते. आदिवासी व इतर शेतकरी यांच्या मध्ये जमीन अस्मानचा फरक असतो, आदिवासीचे छप्पर म्हणजे साधे असते, ते एका मिनिटात उदघ्वस्त होणारे असते, तेथे या प्रशासकीय यंत्रणेने पूर्ण मेहनत घेतली व युध्दपातळीवर चिखलदारा येथे काम केले. प्रशासनातर्फे अशा जिल्हाधिकाऱ्यांची नोंद घेतली पाहिजे, हे मी येथे आवर्जुन सांगतो. वीज कोसळण्याने तर कहरच केलेला आहे. जीवघेणी वीज जमिनीवर येतांना बुलढाणा येथे 3, वाशिममध्ये 2, वर्धामध्ये 1, विदर्भामध्ये एकूण 7 व मराठवाडयामध्ये संभाजीनगर 3, जालना 1, बीड 2, धाराशिव 2, हिंगोली 1, नांदेड 1, परभणी 2 असे मराठवाडयामध्ये 14 जणांचे बळी गेलेले आहेत. तसेच वादळवारा व गारपीटीने एकूण 23 शेतकऱ्यांचे बळी घेतलेले आहेत. अशत: 2400 घरे पडलेली आहेत. 4800 घरे पूर्णपणे पडलेली आहेत. हा आकडा प्राथमिक सर्वेक्षणात प्राप्त झालेला आहे. घरांबरोबरच काही ठिकाणी शाळा खोल्या पडलेल्या आहेत. आपण जी.आर काढला त्यामध्ये काही गोष्टी नमूद केलेल्या असतांत पण इतर बाबी त्यामध्ये घेत नाहीत. नरसिंग फाटयाजवळ गौरीशिवारामध्ये वीज पडून दोन जण मृत्यू मुखी पडले त्याचा उल्लेख येथे आलेला आहे. मुसळधार पावसामुळे, पुष्पा शंकर नगर येथील संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाच्या 6 वर्ग खोल्या कोसळल्या आहेत.

यानंतर श्री. सुंबरे.....

अशुधारित प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

श्री. रावते ....

होटाळा, शंकरनगर, बडूर, डोणगाव, अजनी या भागामध्ये वादळी पावसाने घरांबरोबरच शाळांची देखील पडझड झालेली आहे. त्यांना आपल्या या जी.आर.मधून मदत मिळणार नाही. सभापती महोदय, या छोट्या छोट्या गोष्टी आहेत पण मुद्दाम मी त्या आपल्या निदर्शनास आणून देत आहे जेणे करून या छोट्या गोष्टी असल्याने आपल्या जी.आर.मधून त्याबाबत भरपाई वा मदत मिळू शकणार नाही पण ती मदत मिळणे त्या लोकांच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. घरांच्या नुकसानी बाबत आपल्या जीआर मध्ये उल्लेख केलेला आहे. परंतु अहमदपूर तालुक्यामध्ये बुधवारी रात्री 9 वाजेपासून वादळी पाऊस सुरू झाला. तालुक्यातील हडोळती, कुमठा, अंधोरी, रोकडा सावरगाव, किनगाव, शिरूर इत्यादी परिसरात तासभर गारांचा पाऊस पडला. हडोळती येथे तर 1970 साली बांधलेली पाणी पुरवठ्याची टाकी या पाऊस व वादळी वाऱ्यामुळे पूर्णपणे कोसळली. त्यामुळे गावांचा पाणीपुरवठा बंद झालेला आहे. आता तुमच्या जी.आर.मध्ये पाण्याची टाकी वादळी पावसाने कोसळली आणि गावाचा पाणीपुरवठा बंद पडला असेल तर त्यासाठी काहीही व्यवस्था वा तरतूद केलेली आहे काय ? नसेल तर आपल्याला ती आता करावी लागेल. अशा प्रकारच्या छोट्या छोट्या गोष्टी आहेत त्या मुद्दाम मी सदनाच्या माध्यमातून येथे मांडतो आहे. सभापती महोदय, या वादळ-वाऱ्यामुळे माणसे तर गारपिटीने पक्षी, जनावरे गारठून मृत्यूमुखी पडली आहेत. लोकांच्या पशुधनाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. अमरावती येथील कारळा कुक्कुट पालन केंद्रातील 300 कोंबड्या मृत्यूमुखी पडल्या असून 1430 जखमी झाल्या आहेत. सातेगाव, तालुका दर्यापूर, जिल्हा अमरावती येथील 25 गायी व 200 मेंढ्या मृत्यूमुखी पडल्या., चिंचोळी, रहीमपूर येथील 50 मेंढ्या, 3 म्हशी आणि 10 गायी., शिवनगर-सोमठाणा, ता.मानोरा,जि.वाशिम येथील 220 मेंढ्या मृत्यूमुखी पडल्या आहेत. सभापती महोदय, बर्ड फ्ल्यूमध्ये ज्याप्रमाणे आपण कोंबड्यांची नुकसान भरपाई देत आहात त्याप्रमाणे या पक्षांच्या, जनावरांच्या बाबतीत देखील आपण भरपाई दिली पाहिजे. जेणे करून या वादळी पावसामुळे उद्ध्वस्त झालेला गरीब आदिवासी शेतकरी काही प्रमाणात तरी उभा राहू शकेल. सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते माननीय श्री.फुंडकर साहेबांनी येथे खरबुजाच्या शेतीचा उल्लेख केला आहे. जे छोटे, खंडकरी शेतकरी आहेत ते नदीकाठी खरबुजाची शेती-बागायत करतात. त्यांची संख्या त्या मानाने कमी आहे. त्यामुळेच त्यांची नोंद तुमच्या जीआर मध्ये नसणार, ती येणे आवश्यक आहे. त्यासाठी मी हा

..... आय 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते ....

खास उल्लेख येथे करीत आहे. अमरावतीमध्ये खरबुज आणि नांदेड येथे केळ्यांची बाग या पावसाने उद्ध्वस्त झालेली आहे त्यांचाही उल्लेख आपल्या जी.आर.मध्ये आला पाहिजे. या अगोदरच्या आपल्या निर्णयानुसार झाडामागे 35 रूपये भरपाई देण्याचा आपला जीआर आहे, तोही आपल्याला बदलावा लागेल. कारण गेल्या दोन वर्षामधील हे चौथे संकट या शेतकऱ्यावर कोसळलेले आहे. या मध्ये आपण जी भरपाई वा मदत म्हणून झाडामागे केवळ 35 रूपये आपण देत आहात ती मदत फार अल्प आहे. त्यामुळेच सन्माननीय सदस्य श्री.नितीनभाऊ गडकरी यांनी तर आपली 1 हजार संत्राची झाडे तोडूनच टाकली. तेव्हा 35 रूपये झाड आणि अशीच जी अल्प मदत आपण देण्याचा निर्णय घेतला होता तो निर्णय आपल्याला आता बदलावा लागेल, त्याबाबतीत विचार आपणास करावा लागेल. सभापती महोदय, या पावसामुळे विदर्भात जे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे ते माननीय विरोधी पक्षनेत्यांनी येथे सविस्तर स्वरूपात मांडलेले आहे. त्यातील काही बाबी मांडण्याचा मी प्रयत्न केला. या सरकारवा शेतकऱ्यांचा आता विश्वास राहिलेला नाही. कारण मागील वेळस जे वाटप करण्यात आले त्यामध्ये त्या शेतकऱ्यांची सरकारने क्रूर थट्टा केली. कुणाला 25 रूपयाचा चेक, कुणाला 35 रूपयांचा, 52 रूपयांचा चेक आणि तोही क्रॉस चेक दिला गेला. अशा प्रकारे शेतकऱ्यांची थट्टा करणारे हे सरकार असल्याने माझ्याकडे जी दोन पत्रे आली आहेत ती मी या संदर्भात आपल्याला वाचून दाखविणार आहे. ती पत्रे मराठवाड्यातील पंचायत समितीच्या सभापतीने लिहिलेली आहेत. त्यातील केवळ सरकार संबंधीचा जो मजकूर आहे तोच मी येथे आपणास वाचून दाखवितो. श्री.येडे व्यंकोबा बळीराम, सदस्य,पंचायत समिती व कृषी उत्पन्न बाजार समिती,नांदेड यांनी मला 30 जुलै 2005 ला हे पत्र लिहिलेले आहे. त्यात त्याने म्हटले आहे की, गतवर्षी जून-जुलै 2004 मध्ये पाऊस उशीरा व अपुरा पडल्यामुळे राज्य शासनाच्या वतीने कोरडा दुष्काळ जाहीर केलेला होता. त्यामुळे केंद्रीय पथकाने या भागाची पाहणी करून शेतकऱ्यांना मदत करणे जरूरीचे आहे असा अहवाल राज्य शासनाकडे पाठविला होता. परंतु शासनाने शेतकऱ्यांना कसल्याही प्रकारची मदत केली नाही. ....

(यानंतर श्री. खंदारे ... जे 1 ..

अशोधित सत्य / शीघ्रलेखीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

तसेच रब्बी हंगामामध्ये 2004-05 मध्ये प्रचंड प्रमाणामध्ये गारपीट झाली होती. त्या भागामध्ये मी स्वत: जाऊन फिरलो आहे. त्यावेळीही राज्य शासनाच्यावतीने पाहणी करण्यात आली होती. शेतक-यांना मदत मिळावी अशाप्रकारचा स्थानिक प्रशासनाने राज्यशासनाला अहवाल सादर केला होता. त्या शेतक-यांना मदत मिळण्याऐवजी त्यांचा जाण्या-येण्यावर खर्च झाला होता. हे त्या पंचायत समितीच्या सर्व सदस्यांनी लिहिलेले पत्र आहे. या सरकारबद्दल ग्रामीण भागामध्ये काय बोलले जाते त्याचे हे बोलके पत्र आहे. सभापती महोदय, माझ्याजवळ आणखी एक तसेच पत्र आहे. गिर बाळगीर पंचमगीर हे जिल्हा परिषदेचे सदस्य असून ते मु.पो.धानेगाव, तालुका नांदेडचे आहेत. मागील 2004 सालातील गारपिटीमुळे तेथील गहू, टाळकी ज्वारी, बागायती केळी, ऊस, फळफळावळीचे अतोनात नुकसान झाले होते, त्याची पाहणी करुन सुध्दा या गावातील शेतक-यांना कसल्याही प्रकारची मदत मिळाली नाही. हे शेतकरी जागरुक आहेत. ते शासनाच्या आदेशाची वाट पहात आहेत, सर्व वर्तमानपत्रांनी शासनाने न केलेल्या कार्यवाहीबाबतच्या कहाण्या प्रसिध्द केल्या आहेत. तरी सुध्दा शासन काहीच मदत करीत नाही. अशाप्रकारची अनेक बोलकी पत्रे माझ्याजवळ आहेत. सभापती महोदय, निसर्गाच्या दोन्ही आपत्तीमुळे शेतकरी अडचणीत सापडला होता त्यावेळीही मदत करण्यात आली नाही हे मी याठिकाणी आवर्जजून सांगत आहे. मराठवाडयामध्ये बुधवार दिनांक 8 व गुरुवार, दिनांक 9 मार्च दोन वेळा अवेळी पावसाने हजेरी लावली. त्यामध्ये सूर्यफूल, ज्वारी, बाजरी, मका, द्राक्ष, केळी, संत्रा, पपई टरबूज या फळांचेही गारपिटीमुळे नुकसान झाले. आता या नुकसानीमध्ये सूर्यफूलाचाही समावेश झाला आहे. त्याचप्रमाणे औरंगाबाद जिल्हयातील सिल्लोड, सोयगाव तालुक्यात 512 हेक्टर क्षेत्रांवरील पिकांचे दोन कोटी 13 लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. जालना जिल्हयातील अंबड, धनसावंगी, भोकरदन या तालुक्यातील 3,142 हेक्टर क्षेत्रांवरील पिकांचे 1 कोटी रुपयावर नुकसान झाल्याचे सूत्रांनी सांगितले. परभणी जिल्हयात 8,500 हेक्टर क्षेत्रांवरील ज्वारीचे 2.15 कोटी रुपयांचे नुकसान झाले. हिंगोली जिल्हयातील हिंगोली आणि औंढा तालुक्यातील 300 हेक्टर क्षेत्रावरील सूर्यफूल, गहू या पिकांसह संत्रा, मोसंबी या फळांचे 13 लाखांवर नुकसान झाले आहे. नांदेड जिल्हयातील

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MAP/

श्री.दिवाकर रावते.....

लोहा, कंधार, उमरी, मुदखेड, भोकर, देगलूर या तालुक्यांना अवकाळी पावसाचा फटका बसला असून, सुमारे 5000 हेक्टर क्षेत्रांवरील पिकांचे सुमारे 50 कोटी रुपयांचे नुकसान झाले असल्याचा अंदाज वर्तमानपत्रामध्ये व्यक्त करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे या अतिवृष्टीच्या तडाख्यामुळे शेतकरी उद्ध्वस्त झाला आहे. सभापती महोदय, मराठवाडयातील "देशोन्नती" या वर्तमानपत्राने ही बातमी दिलेली आहे. त्यानुसार मराठवाडयातील औरंगाबाद जिल्हयातील 17,200 हेक्टरवरील पिकांचे 5 कोटीचे नुकसान झाले आहे, हिंगोली जिल्हयातील 7000 हेक्टरवरील पिकांचे 1 कोटी, जालना जिल्हयातील 15,600 हेक्टरवरील पिकांचे 2 कोटी, परभणी जिल्हयातील 16,300 हेक्टरवरील पिकांचे 4 कोटी, बीड जिल्हयातील 9,300 हेक्टरवरील पिकांचे 2,50 कोटी, धाराशिव जिल्हयातील 8,000 हेक्टरवरील पिकांचे 1.50 कोटी आणि लातूर जिल्हयातील 3,100 हेक्टरवरील पिकांचे 1 कोटीचे नुकसान झाले आहे. सभापती महोदय, या गारपिटीमुळे औरंगाबाद जिल्हयातील 3 जणांचा बळी घेतला होता. लातूर जिल्हयामध्ये सर्वाधिक फटका द्राक्ष बागा आणि आंब्याला बसला आहे. बीड जिल्हयामध्ये वीज पडून एक महिला मूत्यूमुखी पडली व चारजण जखमी झाले. विजेने एका म्हशीचाही बळी घेतला. माजलगाव, वडवणी, गेवराई तालुक्यातील कापूस उत्पादकांचे अवकाळी पावसाने मोठे नुकसान झाले. हिंगोली जिल्हयामध्ये बुधवारपासून सोसाटयाच्या वा-यासह काही ठिकाणी जोरदार पाऊस झाला. या दरम्यान वीज कोसळून सेनगाव तालुक्यातील आजेगाव येथील चंद्रकलाबाई गणपतराव अंभोरे या महिला मूत्यूमुखी पडल्या. वसमत येथील श्रीनिवास तोष्णीवाल यांच्या घरावर वीज कोसळल्याने तडे गेले. नांदेड जिल्हयात सलग तिस-या दिवशी बेमोसली पाऊस व गारपिटीमुळे दोन दिवसात झालेल्या नुकसानीचा शनिवारी आढावा घेण्याचे जिल्हाधिका-यांनी जाहीर केले आहे.

अशुधारित प्रत / शुद्धिपत्रासाठी नाही

नंतर श्री.किल्लेदार.....

श्री.दिवाकर रावते (पुढे सुरु....

सभापती महोदय, परभणी जिल्ह्यामध्ये सर्वात जास्त नुकसान झालेले आहे. "ढगाळ, कुंद वातावरणात अधूनमधून बरसणाऱ्या पावसाने कडक उन्हाळ्यातही पावसाळ्याची आठवण करुन दिली. हा प्रासंगिक पावसाळा शेतकऱ्यांना जिवघेणा ठरला आहे. आंब्याचा मोहोर तर पावसाने धुऊन नेलाच पण किमान वीस हजार हेक्टरावरील सात ते आठ कोटी रुपयांच्या पिकांचेही नुकसान केले आहे. जिल्ह्यातील पाच बळी या पावसाने आठ दिवसात घेतले आहेत. जालना जिल्हयात पाच मिनिटे गारांचा मारा आणि त्यानंतर पाचच मिनिटांमध्ये कडकडीत उन. निसर्गाचा असा चमत्कार आज जालन्यात अनुभवायला मिळाला. जाफराबाद तालुक्यातील भराडखेडा येथे अंगावर वीज पडल्याने एकाचा मूत्यू झाला. बदनापूर, राजूर, रामनगर मौजपुरी आदी भागातही जोराचा पाऊस झाला. गारांचा चार-पाच इंचाचा थरच साचला होता. परतूर, आष्टी परिसरात सायंकाळी जोरदार पाऊस झाला."

त्यानंतर उस्मानाबाद जिल्ह्याची बातमी अशी आहे की, " उस्मानाबाद जिल्ह्यात रात्री विजांच्या कडकडाटासह झालेल्या गारपिटीने पिकांचे, विशेषत: फळबागांचे कोट्यावधी रुपयांचे नुकसान झाले. वीज पडून दोघांचा मृत्यू झाला आणि तिघे जखमी झाले. उमरगा भागातील पानमळ्यांनाही या अवकाळी पावसाचा जबर फटका बसला. निर्यातक्षम द्राक्षांचे या पावसात प्रचंड नुकसान झाले." अशी मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांची परिस्थिती निर्माण झालेली आहे.

सभापती महोदय, नाशिकची द्राक्ष आणि कांद्याची आठवण होते. त्याचप्रमाणे " धाराशीव जिल्ह्यांमध्ये 600 हेक्टरच्या आसपास द्राक्षे घेतली जातात. या द्राक्ष बागायतदारांपैकी 150 हेक्टरवरील द्राक्ष निर्यातक्षम होते. जिल्ह्यातून साधारणत: 35 कंटेनर द्राक्षे यावर्षी निर्यात होतील, असा कृषी विभागाचा अंदाज होता. केवळ द्राक्ष पिकाचेच नुकसान कोट्यावधी रुपयांच्या घरात जाण्याची शक्यता आहे." फळबागांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना कोणत्याही स्वरुपाची आर्थिक मदत करण्याचे नियम नसल्यामुळे फळबाग उत्पादकांना मोठा फटका सहन करावा लागणार आहे. शेतकरी या आर्थिक परिस्थितीतून कसा सावणार आहे ? हा सर्वात मोठा प्रश्न आहे.

त्यानंतर नांदेड जिल्ह्यातील बिलोली आणि माहूर तालुका हा आदिवासी प्रवण तालुके आहेत. त्या संदर्भात बातमी अशी आहे की, "गुरुवारी सकाळी सहा वाजता माहूर, शहरासह मालवाडा, लांजी, शेकापूर, नेर,लिंबायत,लखमापूर, नखेगाव, हिवळणी, आष्टा, पापलवाडी, वडसा,पडसा, उमरा, उमरा तांडा, आसोली, साईनगर, पार्डी, वाई, मालकागुडा, रामनगर,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (पुढे सुरु....

अंजनखेड, वानोळा, कुपटी, हडसणी, मदनापूर, पालाईगुडा, चोरड,भोरड, वझरा, दउत्तमांजरी या ठिकाणी तुफान गारपीट झाली. गारही 50 ग्रॅम वजनाएवढी होती. गारपीट व तुफानी वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस पडल्याने हरभरा, गहू, भुईमूग,आंबा यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान इ ाले आहे. कमीत कमी 50 लाख रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे." सामान्य शेतकऱ्यांचा सरकारवर विश्वास नाही. मदतीचे चेक देण्यात आले. या संदर्भात लोकसत्तेमध्ये दिनांक 11-3-2006 रोजी एक बातमी आलेली आहे, त्याचा मी मुद्दाम उल्लेख करु इच्छितो. दुधाने आमचे तोंड पोळलेले आहे, 26 रुपयाचा चेक मिळालेला आहेत. "आम्हाला पाच-दहा हजार रुपयांची सरकारी मदत नको. नुकसानभरपाई पूर्ण द्या. आम्ही पूर्ण उद्ध्वस्त झालो आहोत. काहीच त्राण शिल्लक नाही" ही अचलपूर तालुक्यातील इसेगाव बोर्डी येथील गावकऱ्यांची प्रतिक्रिया आहे.

त्यानंतर दिनांक 12-3-2006 रोजी "सकाळ" या वर्तमानपत्रामध्ये आलेल्या बातमीचा उल्लेख करणे आवश्यक वाटते. त्या बातमीचे हेडींग "मराठवाड्यातील शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळणार नाही" असे दिलेले आहे. पुढे म्हटलेले आहे की, " गेल्या आठ दिवसात झालेला अवकाळी पाऊस व वादळी वाऱ्यांमुळे शेती व बागायतीचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना सरकारचे स्थायी आदेश लक्षात घेता नुकसान भरपाई मिळणार नाही. मराठवाड्यातील बहुतेक सर्व जिल्ह्यांत वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस झाला. बँका तसेच खाजगी सावकारांच्याकर्जातून मुक्तता होईल अशी शेतकरी वर्गात आशा निर्माण झाली होती, पण या अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे स्वप्न उधळून लावले आहे. अशा परिस्थितीत नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना सरकारची आर्थिक मदत मिळू शकते का ? या बाबत चौकशी केली असता "राज्य सरकारच्या महसूल व वन मंत्रालयाने 1982 मध्ये दिलेल्या स्थायी आदेशाप्रमाणे महापूर, भूकंप, गारपीट, दरडी कोसळणे, अतिवृष्टी (एका दिवसात 65 मिलिमीटरपेक्षा अधिक पाऊस) चक्रीवादळ आदी नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झाल्यावरच त्याचे पंचनामे करुन 50 टक्क्यांपेक्षा अधिक हानी झाली असल्यास नुकसान भरपाई म्हणून तातडीची आर्थिक मदत देण्याच्या सूचना आहेत. अशाप्रकारचा जी.आर. आहे. ज्यांची धरे उद्ध्वस्त झालेली आहेत त्यांना नुकसान भरपाई मिळणार नाही, अशाप्रकारची लोकांमध्ये धारणा निर्माण झालेली आहे. मी अत्यंत नम्रपणाने विनंती करतो की, या जी.आर.मध्ये आपण बदल करणार आहात काय ? हा महत्वाचा प्रश्न आहे. शेतकऱ्यांच्या नुकसानीचा सर्वंकष आढावा घेऊन

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (पुढे सुरु....

दोन वर्षामध्ये तीन-चार वेळेला उद्ध्वस्त झालेल्या शेतकऱ्यांकडे आपण पहाणार आहात की नाही ? हा महत्वाचा प्रश्न आहे. वीज पडून मृत झालेल्या व्यक्तीच्या कुटुंबियांना 50 हजार देण्यात येतात, त्यामध्ये बदल करुन 1 लाख रुपये तातडीने देण्याची व्यवस्था करावी. भिंतीखाली चिरडून मृत झालेल्या व्यक्तीच्या कुटुंबियांना 25 हजाराची मदत देण्यात येते, ती वाढवून किमान 1 लाख रुपये मदत देण्यात यावी.

यानंतर श्री.बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

माननीय विरोधी पक्षनेते म्हणाले की, प्रती हेक्टरी 25 हजार रुपये मदत द्यावी. शेतकऱ्यांवर आलेली ही तिसरी वेळ असल्यामुळे उद्ध्वस्त झालेल्या शेतकऱ्यांना किमान हेक्टरी 15 हजार रुपये तरी मदत द्यावी. बाधित शेतकऱ्यांचे व्याज माफ करावे. त्यांच्या कर्जाचे पुनर्वसन करावे. मी या ठिकाणी बाधित शेतकरी असा शब्द मुद्दाम वापरलेला आहे. काहीवेळा एका ठिकाणची शेती उद्ध्वस्त झालेली असते परंतु बाजूची शेती उद्ध्वस्त झालेली नसते म्हणून बाधित शेतकऱ्यांचे व्याज माफ करावे आणि कर्जाचे पुनर्वसन करावे. सन 2003-04 मधील दुष्काळ, 2004-05 मधील अतिवृष्टी आणि 2005-06 मध्ये झालेला अवकाळी पाऊस अशा तीन फेऱ्यांमध्ये नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना ही मदत मिळणे आवश्यक आहे. पशुधनाच्या बाबतीत शासनामर्फत नुकसानभरपाई देत असताना ज्यांची जनावरे बाधित झाली असतील त्यांना पैशाऐवजी जनावरेच द्यावीत. अशा प्रकारे या जी.आर.मध्ये बदल करावा अशी मी शासनाला विनंती करतो. सभापती महोदय, मी या ठिकाणी दोनच गोष्टींचा उल्लेख करणार आहे. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी असा उल्लेख केला की, कृषी अधिकाऱ्यांना भत्ता मिळत नसल्यामुळे ते पटवाऱ्यांबरोबर जाण्यास तयार नाहीत. शेतकरी संकटात आहेत. भत्ता आज ना उद्या मिळेल. माननीय गृहमंत्री असे म्हणाले होते की, सावकारांना चाबकाने फोडले पाहिजे. असा प्रकार जे लोक करतील त्यांना चाबकाने फोडा असे मी म्हणणार नाही परंतु त्यांच्या बाबतीत कारवाई केली पाहिजे. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी उल्लेख केला की, मागील तीन वर्षामध्ये दुष्काळ पडला होता. परंतु तो दुष्काळ पश्चिम महाराष्ट्रामध्ये पडला होता. त्याचे लाडक्या मुलासारखे कोडकौतुक करण्यात आले. त्याला आंगडे, टोपडे घातले गेले. त्यावेळी राज्य सरकारची निर्भत्सना करण्यात आली. केंद्र सरकारची निर्भत्सना करण्यात आली. दुष्काळाच्या नावाखाली विदर्भ, मराठवाड्यासारख्या अनुशेष असलेल्या भागाला वंचित ठेऊन विदर्भ आणि मराठवाड्याचे 1500 कोटी रुपये त्या भागामध्ये घेऊन गेले. सर्वात जास्त उद्ध्वस्त शेतकरी हे विदर्भ, मराठवाडा भागातील आहेत तसेच कोकणातील आंबा बागायतदार उद्ध्वस्त झालेले आहेत. यावेळेला शासन मोठ्या प्रमाणावर मदत करणार याची शेतकरी वाट पाहात आहेत. यावेळी जी.आर.मध्ये बदल करावा. कोणतीही तांत्रिक अडचण निर्माण न करता शेतकऱ्यांना मुक्त हस्ताने मदत करावी अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान (नाम-नियुक्त) : सभापति महोदय, मार्च के पहले सप्ताह में कुदरत ने फिर से एक बार अपना रंग दिखाया और राज्य के मराठवाडा, विदर्भ, खानदेश और कोंकण में रहने वाले लोगों का और विशेष रुप से किसानों के चेहरे का रंग उड़ गया. इस तरह की परिस्थिति निर्माण हो गई. इस दौरान भारी गारपीट और बारिश से जिन लोगों की जान गईं, मैं उनके प्रति सब से पहले अपनी श्रद्धांजलि अर्पित करना चाहती हूँ और उन पीड़ित परिवारों की जिन्दगी जल्दी से जल्दी पटरी पर आए, ऐसी कामना व्यक्त करती हूँ.

सभापति महोदय, केवल शाब्दिक सांत्वना देने से कुछ होने वाला नहीं है, इसलिए मैं सरकार का ध्यान इस ओर आकर्षित करना चाहती हूँ. इस नैसर्गिक आपत्ति से ज्यादातर ऐसे क्षेत्र प्रभावित हुए हैं, जिनकी गिनती पिछड़े क्षेत्रों में आती है और इसमें से मराठवाड़ा भी एक है. मैं अपना ज्यादातर भाषण परभणी तक सीमित रखना चाहती हूँ. परभणी जिले में गारपीट और बारिश के कारण 5 लोगों की, 12 जानवरों की और 6 बकरियों की मृत्यु हुई है. इस जीवित हानि के अलावा 8033 हेक्टेयर कृषि उत्पादक क्षेत्र में 50 प्रतिशत से ज्यादा नुकसान हुआ है और 3224 हेक्टेयर क्षेत्र में 50 प्रतिशत से कम नुकसान हुआ है. इसी प्रकार से फलबाग क्षेत्र में 150 हेक्टेयर में 50 प्रतिशत से ज्यादा नुकसान हुआ है और 70 हेक्टेयर क्षेत्र में 50 प्रतिशत से कम नुकसान हुआ है. प्राइमरी सर्वे के अनुसार अकेले परभणी जिले में 4 करोड़ 16 लाख रुपए का नुकसान हुआ है. जो लोग इस आपत्ति में मारे गए हैं, उनके परिवारजनों को शासन की ओर से 1 लाख रुपए की मदद दी गई है, लेकिन जिन किसानों का भारी मात्रा में नुकसान हुआ है, उनको एक फूटी कौड़ी भी नहीं मिली है. ये किसान आज आत्महत्या की कगार पर खड़े हुए हैं.

. . . . भाषण जारी (नंतर तालेवार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यह भी कड़वा सच है. तीन तीन बार इस प्रकार की विपत्ति आने के बाद किसान आत्महत्या नहीं करेगा तो क्या करेगा ? आज किसानों पर एक के बाद एक मुसीबत आ रही है. ऐसी परिस्थिति में यह कहा जाता है कि,

रंज का खूगर हो इन्सान, तो मिट जाता है रंज
मुश्किलें इतनी पड़ी मुझ पर, की आसाँ हो गई

आज हमारे किसानों की परिस्थिति इस प्रकार की हो गई है. पिछले साल भी जुलाई-अगस्त महीने में अतिवृष्टि हुई थी और उसके कारण किसानों को सहायता दी गई थी, जिसके कारण राज्य की तिजोरी पर भारी आर्थिक बोझ पड़ा था. लेकिन शासन ने ऐसे हालात का बड़े ही धैर्य से मुकाबला किया. शासन ने हर पीड़ित व्यक्ति को खड़ा करने का प्रयास किया है. मैं तो यह कहूंगी कि कुदरत शासन की एक तरह से परीक्षा ले रहा है. इस परीक्षा में भले ही शासन डिस्टिंक्शन् में उत्तीर्ण न हुआ हो लेकिन फर्स्ट क्लास में जरुर उत्तीर्ण हुआ है. लेकिन शासन को एक वर्ष के अन्दर दुबारा परीक्षा देनी पड़ रही है. इस परीक्षा में भी शासन को उत्तीर्ण होना होगा क्योंकि राज्य की जनता एटीकेटी की सुविधा नहीं रखती है. इसलिए कितना भी भारी अर्थिक बोझ शासन पर क्यों न पड़े, शासन को इस परीक्षा में उत्तीर्ण होना ही पड़ेगा. इसलिए शासन को मेरी आग्रहपूर्वक मांग है कि इन पीड़ितों को पर्याप्त मात्रा में मदद दी जाए और सहायता करते समय किसी फसल के साथ भेदभाव न किया जाए. क्योंकि शासन ने अलग अलग फसल के लिए अलग अलग प्रकार की मदद रखी है. इसमें 3500 रुपये से 10 हजार रुपये तक की मदद रखी गई है. इसलिए मेरी यह मांग है कि इस बार किसानों को तीन चार बार इस प्रकार की परेशानी का सामना करना पड़ा हैं इसलिए किसानों को जो सहायता दी जाएगी, उस सहायता राशि में 20 प्रतिशत वृध्दि की जाए. ऐसा कहा जाता है कि विपत्तियों का मुकाबला करना हो तो "One should always respect the unexpected". लेकिन ऐसा होता दिखता नहीं है. मार्च महीने में परभणी जिले में भारी मात्रा में गारपीट हुई और इसमें बहुत सारे लोग जख्मी हुए लेकिन जख्मी लोगों का प्राथमिक उपचार करने के लिए ग्रामीण रुग्णालय में प्राथमिक सुविधा नहीं पायी गई. अगर प्राथमिक सुविधा होती तो जीवित हानि कम होती. इसलिए मेरी यह मांग है कि इस स्थिति को देखते हुए और कुदरत के बदलते रंग को देखते हुए प्राथमिक चिकित्सा केन्द्रों में

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्राथमिक उपचार की पर्याप्त व्यवस्था करने के लिए आवश्यक कदम उठाए जाए. परभणी के अस्पतालों में प्राथमिक उपचार की व्यवस्था नहीं हुई थी, जब इस प्रकार की चर्चा फैलने लगी तो सीईओ ने परभणी स्थित अस्पतालों का दौरा किया तो उन्होंने भी पाया कि 10 मेडिकल ऑफिसर अस्पताल में मौजूद नहीं थे. बाद में उन मेडिकल ऑफिसरों को कार्य मुक्त कर दिया गया लेकिन उनको कार्य मुक्त करने से ग्रामीण जनता को परेशानियों से छुटकारा नहीं मिल जाता. इसलिए सरकार को इस तरफ ध्यान देना चाहिए.

सभापति महोदय, मैं सरकार से यह अनुरोध करना चाहती हूं कि सरकार आपदग्रस्त किसानों को जो सहायता राशि देने वाली है, वह सहायता राशि किसानों को डायरेक्ट दें. क्योंकि किसानों तक डायरेक्ट मदद नहीं पहुंचेगी और वह बैंकों के मार्फत दी जाएगी तो बैंकों द्वारा किसानों द्वारा लिए गए कर्ज को डिडक्ट करके किसानों को सहायता राशि दी जाएगी. इसलिए ऐसा न हो इसलिए किसानों को बैंकों के माध्यम से सहायता राशि न दे करके सीधे सहायता राशि दें और यह सहायता राशि जल्द से जल्द किसानों तक पहुंचायी जाए. इसी अवसर पर मैं एक और बात की ओर सरकार का ध्यान खींचना चाहती हूं. अहमदनगर,सांगली, सातारा और खास तौर से उस्मानाबाद में एक अलग प्रकार की परिस्थिति निर्माण हुई थी. उस्मानाबाद में तीन साल से दुष्काल पड़ रहा है और चौथे साल जब बरसात हुई तो इतनी बरसात हुई कि एक महीना लगातार बरसात होती रही. इस प्रकार की बरसात भले ही अतिवृष्टि में नहीं गिनी जाती हो क्योंकि एक दिन में 65 मि.मी. से ज्यादा बरसात नहीं हुई थी लेकिन लगातार बरसात होने की वजह से कृषि जमीन इतनी गीली हो गई कि जो बीज बोए गए थे वे खराब हो गए, जिसके कारण दो लाख हेक्टर जमीन पर बोई गई फसल का बड़े पैमाने पर नुकसान हुआ.

भाषण अपूर्ण, इसके बाद श्री शर्मा.

अशुधारित प्रत / शोधनीयसाठी नाही

. . . . श्रीमती फौजिया खान जारी

रेवेन्यू और एग्रीकल्चर डिपार्टमेंट ने उसका सर्वे किया है और 4-5 महीने पहले उसकी रिपोर्ट भेजी गयी है, लेकिन आज तक उन किसानों को कोई मदद नहीं दी गयी है. मैं शासन से मांग करती हूँ कि अतिवृष्टि के नियमों के हिसाब से खास बाब के रुप में इस क्षेत्र के किसानों को मदद दी जाए. प्रत्येक खड़ी हुई फसल को एक तरह की वागणुक देकर मदद देनी चाहिए. इसके अतिरिक्त मैं शासन से यह भी मांग करती हूँ कि क्रॉप इन्श्योरेन्स में कन्सेसन दिया जाए. जिन किसानों का नुकसान हुआ है, उनको खास बाब के रुप में अधिक से अधिक मदद दी जाए, ऐसी विनंती मैं सरकार से करती हूँ. मैं आपके सामने एक शेर पेश करना चाहती हूँ.

"जब जेब में पैसा और पेट में रोटी होती है,
उस वक्त में जर्रा हीरा है, उस वक्त में शबनम मोती है."

सभापति महोदय, किसानों के पेट में रोटी हो और जेब में पैसा हो, उनको शबनम और मोती नजर आएं, ऐसी परिस्थिति निर्माण करने की जरुरत है. इतना कहते हुए मैं अपना भाषण खत्म करती हूँ.

.....

. . . नंतर श्रीकांत जोशी
यांचे मराठी भाषण. N-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्रीमती फौजिया खान यांच्या हिंदी भाषणानंतर)

श्री. श्रीकांत जोशी (औरंगाबाद विभाग पदवीधर) : सभापती महोदय, गारपिटीमुळे मराठवाडयातील सगळे शेतकरीच उद्ध्वस्त झाले नाहीत तर इतर सुध्दा बरेच लोक उद्ध्वस्त झालेले आहेत. मला आश्चर्य एका गोष्टीचे वाटते की, माणूस पक्ष बदलल्याबरोबर इतका कसा काय बदलतो ? खरे म्हणजे 2 आणि 3 मार्च रोजी मराठवाडयाला गारपिटीने झोडपले. राज्याचे महसूल मंत्री श्री. नारायणराव राणे हे संभाजीनगरमध्ये त्या दिवशी राजकीय कार्यक्रमासाठी आले होते. जिल्हाधिकारी आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांमार्फत मी त्यांच्यापर्यंत जाण्याचा प्रयत्न केला परंतु शक्य झाले नाही. मला वाटले होते की त्यांनी एखादी बैठक घेऊन याबाबतची माहिती घ्यावी. त्यांनी राजकीय कार्यक्रमासाठी त्यांनी पूर्ण वेळ दिला पण मराठवाडयातील सगळे शेतकरी गारपिटीने झोडपले जात असताना दुर्देवाने महसूल मंत्र्यांनी कोणत्याही पध्दतीची बैठक घेण्यास वेळ दिला नाही. एका बाजूला गारपिटीमुळे नुकसान किती झाले याची हेक्टरमध्ये आणि कोटीमध्ये अशी ॲकॅडेमिक चर्चा केली जाते. परंतु गारपिटीमुळे शेकडो पोपटांना कसे जिवदान दिले गेले हे मी सांगू इच्छितो. श्री. भगवानराव मोरे हे तालुक्याचे भाजपाचे अध्यक्ष आहेत. त्यांच्या घराजवळ असलेल्या झाडावर रोज रात्री हजारो पोपट येतात. त्यादिवशी मध्यरात्री सव्वातीनच्या सुमारास जीवघेण्या गारपिटीमुळे झाडावरील पोपट बिथरले आणि गारांच्या जोरदार तडाख्यामुळे हजारो पोपट एक मिनिटात जखमी झाले. त्यातील काही शेकडो पोपटांना श्री. मोरे यांनी स्वत:च्या घरात नेले आणि त्यांना जीवदान दिले. श्री. भगवानराव मोरे यांनी पोपटांविषयी दाखविलेली माणुसकी महसूल मंत्र्यांनी मराठवाडयातील गारपीटग्रस्त जनतेविषयी दाखविली नाही. मराठवाडयामध्ये राजकीय कार्यक्रम घेण्यासाठी आमचा काहीही विरोध नाही. कालपर्यंत ते आमच्याबरोबर होते पण तुमच्याकडे गेल्यानंतर जे अचानक तुमच्यासारखे का वागायला लागले याचे मला अत्यंत दु:ख होते. एखादी बैठक नाही,सर्वेक्षण नाही आणि पंचनामे करण्याबाबत शासकीय अधिकाऱ्यांना सूचनाही दिल्या नाहीत. याचा परिणाम असाझाला की सकाळमध्ये बातमी आली की महसूल अधिकाऱ्यांनी सांगितले आहे की, सरकारचे गारपीटग्रस्तांना नुकसान भरपाई देण्याचे निकष इतके कडक आहेत की आम्हांला पंचनामे करुन नुकसान भरपाई देता येईल किंवा नाही याबद्दल शंका आहे.

यानंतर श्री. खर्चे पी.

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी .....

सभापती महोदय, या शासनाची संवेदनशीलताच संपलेली आहे की काय अशी मला शंका येते. कारण राज्यात झालेली आर्थिक नुकसानी किती असेल, त्यातून किती भरपाई देता येईल वगैरे आकडेवारीमध्ये मी जात नाही. परंतु अशी नुकसानी किती झालेली आहे त्याची व्याप्ती सरकार म्हणून शासन बघायलाच तयार नाही याचेच दु:ख वाटते. मला या ठिकाणी दु:खाने म्हणावेसे वाटते की, या नुकसानीची व्याप्ती कुठल्या क्षेत्रात किती झालेली आहे याचा शासनाने खरे तर विचार करण्याची गरज आहे. परभणी जिल्हयातील उदाहरण द्यावयाचे झाले तर या जिल्हयातील एका साखर कारखान्याचे गोडाऊनचे पावसाने पूर्णपणे नुकसान झालेले आहे, त्यातील साखर वाहून गेली आहे. त्याचप्रमाणे जिनींग प्रेसिंगचे देखील प्रचंड प्रमाणात नुकसान झालेले आहे. काही शेतकरी जिनींगच्या बाहेर माल घेऊन उभे होते, पण गारांच्या तडाख्यात ते सापडल्याने जबरदस्त फटका त्यांना बसला, त्यात काही जणांचे आर्थिक तर काही जणांचे शारिरीक नुकसान मोठया प्रमाणात झालेले आहे तर काहींच्या इंडस्ट्रीज उद्ध्वस्त झाल्या आहेत आणि यासंबंधीची छायाचित्रे मी दाखवू शकतो. त्याचबरोबर औरंगाबाद जिल्हयातील सोयगांव तालुक्यात 5.25 कोटीचे नुकसान 18 मार्च रोजीच्या अतिवृष्टी व गारपिटीने झालेले आहे. त्यात दोन लोकांचा मृत्यू झाला असून 12 घरे पूर्णत: पडलेली आहेत. यामध्ये केळवड, वेताळवाडी खडी या ठिकाणी 1.80 कोटीचे नुकसान झालेले आहे तर 10 मार्चच्या पावसामुळे 3.45 कोटीचे नुकसान झाल्याचे तहसीलदारांनी आपल्या अहवालात म्हटले आहे. तसा अहवाल जिल्हाधिकाऱ्यांकडून शासनाकडे सादर केला असता वरुन प्रेशर येते की, एवढया मोठया प्रमाणात नुकसानीचा अहवाल शासनाकडे पाठवून मदत कशी मागता ?, ते थोडे कमी करा. सोयगांव तालुक्यात 5 कोटीपेक्षा जास्त नुकसान झाले असेल त्यामध्ये आंबा, पपई, लिंबू, मूग, मोसंबी, सुर्यफूल, हरभरा, गहू आणि कांदा या पिकांचे नुकसान झालेले आहे. कांदयाच्या बियाण्याच्या शेतीचे तर मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे. एका बाजूला सोयगांव तर दुसऱ्या बाजूला किनवट तालुक्यामध्ये या पिकांबरोबरच वीट भटट्यांचे मोठया प्रमाणात नुकसान झालेले आहे. 24 तासाच्या पावसाने तेथील विटेचा धंदाच समाप्त झाला आहे. वास्तविक सोयगांव आणि किनवट या दोन तालुक्यांमधील अंतर 500 किलोमीटर इतके आहे परंतु न भुतो न भविष्यती असा फटका या दोन्ही तालुक्यांना या अवेळी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी .....

पावसामुळे बसलेला आहे. त्यानंतर माननीय पुनर्वसन मंत्री डॉ. पतंगराव कदम साहेब पुनर्वसन सचिवांना ओरंगाबाद विभागीय आयुक्तांच्या कार्यालयात येऊन तेथे त्यांनी बैठक घेतली आणि 33 कोटी नुकसानीची चर्चा केली परंतु आमच्या हाती त्यातील काहीच लागले नाही. तसेच या गारपिटीने जालना जिल्हयाचे सर्वात जास्त नुकसान झाले यात शंकाच नाही पण त्यात सर्वच प्रकारच्या पिकांचा समावेश आहे. जालना जिल्हयातील जनावरांचे नुकसान जे झालेले आहे त्याची आकडेवारी शासनाकडे पाठविलेल्या अहवालात कमी दाखविण्यात आली आहे. या सर्व गोष्टींमध्ये सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे दोन तीन मार्चला झालेल्या नुकसानीचे पंचनामे जास्तीत जास्त 10 मार्चपर्यंत व्हायला पाहिजे होते. कारण गारपिटीमुळे झालेल्या नुकसानीचा अंदाज जास्तीत जास्त दोन दिवसच करता येऊ शकतो परंतु 10 तारखेच्या नंतर रिपोर्ट का आले व त्यासाठी जे कोणी जबाबदार असतील त्यांच्यावर कोणती कारवाई करणार आहात ? मग यामध्ये महसूल मंत्र्यांवर कारवाई करणार, महसूल सचिवांवर कारवाई करणार, विभागीय आयुक्तांवर कारवाई करणार की जिल्हाधिकारी आणि तहसीलदारांवर कारवाई करणार याचा खुलासा उत्तराच्या भाषणातून मंत्री महोदयांनी करावा अशी माझी विनंती आहे. वास्तविक 10 मार्चपूर्वी नुकसानीच्या अंदाजासंबंधीचे अहवाल शासनाकडे प्राप्त होण्यामध्ये कोणत्या अडचणी होत्या ? आणि अशा प्रकारे उशिरा जर अहवाल सादर केले तर त्या ठिकाणी नुकसानीचा नेमका अंदाज कसा येणार आहे? नुकसान झाले तेथे काय शिल्लक राहणार आहे ? याचाही खुलासा होणे आवश्यक आहे. एवढया मोठया प्रमाणात, मोठया आकाराची गार पडली त्यामुळे झालेल्या नुकसानीबाबत खरे तर 48 तासाच्या आत त्याचे मूल्यमापन होणे आवश्यक होते, जास्तीत जास्त आठ दिवसांमध्ये शासनाकडे रिपोर्ट येणे आवश्यक होते, ते का आले नाही ? किमान लोकप्रतिनिधींना का सांगितले नाही हा माझा प्रश्न आहे व त्याचे स्पष्टीकरण उत्तराच्या माध्यमातून झाले पाहिजे अशी माझी विनंती आहे. वास्तविक ही नैसर्गिक आपत्ती आहे व त्याबाबत कुठल्याही पक्षीय अभिनिवेशाने न वागता लोकप्रतिनिधींची बैठक बोलावून यातून मार्ग काढणे आवश्यक होते. बुलढाणा जिल्हयाप्रमाणेच या जिल्हयाचेही सर्वात कमी दरडोई उत्पन्न आहे. अशा परकॅपिटा कमी उत्पन्न असलेल्या महसुली विभागाला गारपिटीचा फटका बसला, ज्या जिल्हयातील शेतकऱ्याचे वार्षिक उत्पन्न 9 हजारापेक्षा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी .....

जास्त नाही, जेमतेम वर्षभर खाण्यापुरतेच आहे अशा शेतकऱ्यांसाठी लगेच उपजिवीकेचे साधन उपलब्ध होण्याच्या दृष्टीने पावले उचलणे आवश्यक होते. त्यासाठी इजीएसची कामे काढायला पाहिजे होती, कॅम्प्स घेणे आवश्यक होते. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सांगितले की, पश्चिम महाराष्ट्रात दुष्काळ पडल्यानंतर त्याचे मोठया प्रमाणात कोड-कौतूक केले जाते .....

यानंतर श्री. भारवि .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर्नल सुधीर सावंत ....

सभापती महोदय, यावर्षी आंब्यास भरपूर मोहोर आला होता, परंतु थंडीची लाट आल्यामुळे आंब्याचे उत्पादन 60 टक्क्यांनी घटले आहे. मोहोर गळला आहे. राज्यात केवळ 40 टक्के उत्पादन झाले असताना, आलेल्या पावसामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे आणि आता पावसामुळे किटकनाशकांशी संबंधित फ्रुटलाईस या रोगाचा आंब्यावर प्रादुर्भाव झालेला आहे. त्यामध्ये जवळजवळ 5 टक्के आंब्याचे पीक नष्ट होणार आहे. सभापती महोदय, आंब्याविषयी अतिशय महत्वाचे असे दोन मुद्दे मला या ठिकाणी मांडावयाचे आहेत. सभापती महोदय, साधारणत: मुंबईच्या मार्केटमध्ये आंब्याला भाव मिळाल्यानंतर, सधन शेतकरी आंब्याचे उत्पादन करतो. सभापती महोदय, आंब्याला 150 ते 500 रुपये भाव आपल्याला पहायला मिळतो. परंतु खऱ्या अर्थाने हा भाव पुर्णपणे दलालांच्या निर्देशावर अवलंबून असतो. त्या भावातील मोठा भाग दलालाना जातो, शेतकऱ्यांना काहीही मिळत नाही. सभापती महोदय, यावर्षी तर अनेक मोठी संकटे आलेली आहेत. पाऊस आल्यामुळे, थंडीच्या लाटा आल्यामुळे आंब्याचे पीक धुसर झाले आहे. आंब्याचे जास्तीत जास्त उत्पादन मे महिन्यामध्ये येणार आहे. मे महिन्यामध्ये पाऊस लवकर आला तर मात्र सगळा माल कॅनिंगला टाकला जातो आणि त्यामुळे पाच ते दहा रुपये देखील दर मिळत नाहीत आणि त्यामुळे मुळातच 50 टक्के उत्पादन मार्केटमध्ये येत नाही. यामुळे होणारे नुकसान फार मोठ्या प्रमाणात होते, तरी या संदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी विचार करावा, अशी माझी त्यांना विनंती आहे. सभापती महोदय, या संदर्भातील बेसिक डेटा मी आपणास सांगतो. महाराष्ट्रामध्ये 30 हजार हेक्टर आंबा लागवड आहे. त्यातील 90 टक्के आंबा लागवड फक्त सिंधुदुर्गात होते तर कोकणात 1 लाख 40 हजार हेक्टरवर आंब्याची लागवड होते. सभापती महोदय, आपण साडे तीन मेट्रिक टन आंबा उत्पादन करतो. त्यातून ॲव्हरेजली अडीच हेक्टर टन प्रत्येक हेक्टरी आपल्याला मिळतो. सभापती महोदय, या फिगर्स लक्षात घेता, असे होत असेल तर, साधारण 28 रुपयांचे शंभर रुपयांच्या रेटने हेक्टरी मिळाले पाहिजेत. परंतु सभापती महोदय, गेल्या वर्षी झालेल्या नुकसानीसंदर्भात आपण फक्त 10 हजार रुपये हेक्टरी दिले आहेत. 2 लाखांच्या आंब्यांना फक्त 10 हजार रुपये हेक्टरी देण्यात आलेले आहेत. त्यामुळे मला या ठिकाणी मुद्दाम नमूद करावयाचे आहे की, जवळजवळ 80 टक्के शेतकरी हा एक

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर्नल सुधीर सावंत ....

हेक्टर किंवा दोन हेक्टर लँड होल्डींग आंबा उत्पादक आहे. गेल्या वर्षी 10 हजार रुपये प्रति हेक्टरी नुकसानभरपाई दिली. सभापती महोदय, ही नुकसानभरपाई उत्पादन कॉस्टच्या 10 टक्के सुध्दा दिलेली नाही. सभापती महोदय, साधारणत: एका झाडाला शंभर रुपये असे काही केलेले आहे, हे पूर्णपणे चुकीचे आहे आणि तेही बऱ्याचशा शेतकऱ्यांना मिळालेले नाही. म्हणून माझी माननीय मंत्रीमहोदयांना विनंती आहे की, ज्याप्रमाणे आपण पश्चिम महाराष्ट्रातील ऊसाच्या पिकाकडे लक्ष देता, कापसाच्या पिकाकडे लक्ष देता, त्याचप्रमाणे आंब्याच्या बाबतीत देखील काही वेगळे निकष करण्याची गरज आहे. आपण ज्याप्रमाणे इतर पिकांना नुकसानभरपाई देता, त्याप्रमाणे आंब्याच्या पिकाला नुकसानभरपाई दिली तर ते चुकीचे होणार आहे. तरी, पुन्हा एकदा आपण आंब्याच्या पिकाच्या शास्त्राचा अभ्यास करुन शेतकऱ्यांना योग्य ती नुकसानभरपाई देण्याबाबत पावले उचलावीत. सभापती महोदय, प्रति झाडाला तीनशे रुपये दिले तर साधारणत: 30 हजारांची इनपुट कॉस्ट आपल्याला कव्हर करता येईल. दुसरी एक गोष्ट अशी की, जो आंबा कॅनिंगला जातो, त्याला काही दर लावले जातात.

(यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर्नल सुधीर सावंत...

आंबा पिकावर पाऊस पडला की अनेक शेतकरी तो आंबा कॅनिंगला टाकतात, उर्वरित किती आंबा राहतो त्याचा हिशेब लागत नाही. आमची मागणी अशी आहे की, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयातील शेतकऱ्यांनी अशी मागणी केलेली आहे की, शेतकऱ्यांच्या इतर पिकांना जसा हमी भाव देण्यात येतो त्याच प्रमाणे कमीत कमी इतर आंब्यांना आम्हाला हमी भाव दिला नाही तरी चालेल परंतु ज्या आंब्यांसाठी कॅनिंग करण्यात येते त्या आब्यांना हमी भाव सरकारने दिला पाहिजे. तरच हा आंबा उत्पादक शेतकरी जगू शेकेल. आमच्या भागातील हे 80 टक्के शेतकरी छोटे शेतकरी आहेत, सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांच्या सारख्या मोठया शेतकऱ्यांना जर मदत मिळाली नाही तर त्यांचे काहीही फार मोठे नुकसान होऊ शकणार नाही, परंतु जे छोटे शेतकरी आहेत, सामान्य माणसे आहेत त्यांना शासनाकडून मदत मिळणे अत्यंत आवश्यक आहे. म्हणून या निमित्ताने माझी अशी मागणी आहे की, गारपीटीमुळे ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झालेले आहे त्यांना नुकसान भरपाई तातडीने कशी मिळेल याकडे शासनाने लक्ष द्यावे, एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

.....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश जेथलिया (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, पाडवा हा शेतकऱ्यांचा अत्यंत महत्वाचा सण असतो, आम्ही या गुढीपाडव्याला परमेश्वराकडे प्रार्थना केली की, पुढील वर्षी असे अस्मांनी संकट येऊ देऊ नये. गेल्या वर्षी 26 जुलैला अतिवृष्टी झाली त्या अतिवृष्टीमध्ये 14 जिल्हयांचे फार मोठया प्रमाणात नुकसान झाले. त्यानंतर अनेक शेतकऱ्यांचा कापूस पिकांवर मोठया प्रमाणात "लाल्या" नावाचा रोग पडला त्यामुळे कापूस उत्पादक शेतकरी संपूर्ण उदध्वस्त झाला. हे संकट संपत नाही तर संपूर्ण महाराष्ट्रामध्ये हातातोंडाशी आलेले पीक गारपीटीमुळे खराब झाले व रब्बी पिकांचे मोठया प्रमाणात नुकसान झालेले आहे. यासाठी शासनाने कितीही मदत दिली तरी ती अपूरीच पडणारी आहे. या गारपीटीमुळे विशेष करुन हातातोंडाशी आलेला गहू, हरभरा, ज्वारी, सोयाबीन हे सर्वसामान्य शेतकऱ्यांचे पीक मोठया प्रमाणात उदध्वस्त झालेले आहे. त्याचप्रमाणे फळबागांची मोठया प्रमाणात हानी झालेली आहे. या अशा नुकसानीमुळे सगळयांच विभागातील शेतकरी हवालदिल झालेले आहेत.. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना दिलासा देण्याची गरज आहे. जालना जिल्हयातील परतूर या गावचे उदाहरण मी देऊ इच्छितो 2मार्च व 3 मार्च च्या मध्यरात्री फार मोठया प्रमाणात वादळी वाऱ्यासह गारा पडलेल्या आहेत. या गारांचे फोटो काढलेले आहेत. तसेच या गावांतील एकाही घरांची काच राहिलेली नाही. सर्व घरांच्या काच्या तुटलेल्या आहेत. त्या ठिकाणी एकही पक्षी जिवंत राहिलेला नाही, तसेच परतूर, मंठा, नांदेड, औरंगाबाद या मराठवाडयातील भागामध्ये फार मोठया प्रमाणात अतिवृष्टी झाल्यामुळे सर्वांची हानी झालेली आहे. या सर्व प्रकारांबाबत अनेक सन्माननीय सदस्यांनी सविस्तर अशी माहिती दिलेली आहे, या अस्मानी संकटातून शेतकऱ्यांना वाचविण्यासाठी सरकारने त्यांना जास्तीत जास्त मदत द्यावी, अशी या निमित्ताने मागणी करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

यानंतर श्री. सुंबरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (श्री.गुरूनाथ कुलकर्णी) : मंत्री महोदयांना या चर्चेला उत्तर देण्यासाठी किती वेळ लागणार आहे?

डॉ.राजेंद्र शिंगणे : मला साधारणपणे अर्धा तास लागेल.

तालिका सभापती : ठीक आहे. ही अल्पकालीन चर्चा 12.30 पर्यंत चालेल आणि त्यानंतर मंत्र्यांचे उत्तराचे भाषण सुरू होईल. आता सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील हे भाषण करतील.

श्री. जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी या चर्चेमध्ये भाग घेताना केवळ दोन मुद्यांवर बोलणार आहे. कोकणामध्ये 10 व 11 मार्च रोजी जो मध्यम स्वरूपाचा पाऊस झाला त्यामुळे कोकणातील या कालावधीतील जी पिके असतात त्यांचे, विशेष करून वाल, कांदा आणि आंबा या पिकांचे अतोनात नुकसान झालेले आहे. अलिबागमध्ये पांढरा कांदा मोठ्या प्रमाणात होतो आणि या अवेळी पडलेल्या पावसामुळे हा सगळा कांदा नष्ट झालेला आहे. आंब्याला मोहोर आला होता., कोकणातील खालच्या सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी पेक्षा देखील अलिबागचा आंबा जानेवारी महिन्यातच बाजारात येऊ लागतो आणि देवगड-रत्नागिरी पेक्षाही आमच्या अलिबागचा आंब्याला या काळात मोठी मागणी असते आणि दोन डझनाची पेटी 5 हजार रूपये या प्रमाणे त्याला किंमत मिळत असते. हशीवरे, अलिबाग येथील आंबा हा अगदी सुरूवातीस मुंबईच्या बाजारात येत असतो. पण या अवेळी झालेल्या पावसामुळे आंब्याचे हे संपूर्ण पीक नष्ट झालेले आहे. मी या निमित्ताने येथे एकच मागणी करणार आहे. पाऊस, अतिवृष्टी या सारख्या निसर्ग निर्मित संकटामुळे जी हानी होते त्या हानीचे ताबडतोब पंचनामे करण्याची व्यवस्था कायम स्वरूपी आपण केली पाहिजे. तुम्ही त्या बाबतीत शेतकऱ्यांना मदत द्या अथवा देऊ नका, पण तुम्ही जी काही या बाबतीत पाहणी करणार आहात त्यामुळे त्या शेतकऱ्याला विम्यातून मिळणारा वा अन्य पर्यायातून मिळणारे जे फायदा आहेत किंवा सरकारवर त्या संदर्भात आणलेल्या दबावामुळे शासन नमते घेते आणि शेतकऱ्यांना त्याबाबतीत मदत करण्याचा निर्णय घेतला जातो. त्यावेळेस ती मदत योग्य माणसापर्यंत पोहोचत नाही, योग्य माणसाला मिळत नाही. ज्यांचे नुकसान झालेले नसते त्यांनाच सरकारी मदत वा भरपाई मिळते. म्हणून या निमित्ताने मी सरकारला विनंती करतो की, कोठलीही अशा प्रकारे हानी झाल्यावर त्याचे पंचनामे ताबडतोब करण्याचे आदेश आपण दिले पाहिजेत. गेल्या पुराच्या वेळी जी हानी झाली होती त्यामध्ये आपण संबंधित लोकांना नुकसान

..... एस 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

भरपाई देण्याचा निर्णय घेतला. त्यामध्ये ती भरपाई वा मदत ज्याची हानी झाली आहे त्या योग्य माणसाला मिळाली नाही. पेण तालुक्यामध्ये तर तहसिलदाराने 9 कोटी रूपये वाढले. त्यामध्ये मोठा घोटाळा झाला. मला या संदर्भात महसूल मंत्र्यांचे पत्र आले की, तुम्ही या बाबतीत सभागृहामध्ये जी चर्चा घडवून आणली आणि त्यामध्ये तुम्ही केलेली तक्रार योग्य आहे आणि त्याबाबत चौकशी होत आहे. सभापती महोदय, एका पेण तालुक्यामध्ये तहसिलदाराने एका व्यक्तीला 5 हजार रूपये या प्रमाणे मदत वाटप केली पण त्यातील अडीच हजार रूपयेच त्या माणसाला दिले गेले आणि अडीच हजार रूपये तहसिलदाराने घेतले. अशा प्रकारे त्या तहसिलदाराने एक कोटीची रक्कम कमावली. त्यामुळे जी काही अशा प्रकारे हानी होते त्याबाबतील पाहणी, मोजमाप वा पंचनामे महसूल खात्याने तातडीने केले पाहिजेत. सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी यांनी वीट भट्ट्यांच्या संदर्भात एक महत्त्वाचा मुद्दा मांडला. पुरामुळे आमच्या कोकणातील शेतकरी अगोदरच हवालदिल झाला असताना तो वीट भट्टी लावून काही तरी उद्योग करून पैसे कमाविण्याचा प्रयत्न करीत होता. पण 10-11 मार्च च्या पावसाने त्याचा हा वीट भट्ट्यांचा उद्योग संपूर्णपणे नष्ट झालेला आहे. ...

(यानंतर श्री. खंदारे .... टी 1 ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील.....

या अवकाळी पावसामुळे व गारपिटीमुळे संपूर्णपणे झालेली हानी लक्षात घेऊन नुकसानग्रस्त शेतक-यांना शासनाने भरघोस आर्थिक मदत द्यावी अशी या चर्चेच्या निमित्ताने शासनाकडे मागणी करतो आणि माझे भाषण संपवितो.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MHM/ SBT/

प्रा.जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मार्च महिन्यात गारपीट, अतिवृष्टी आणि मुसळधार पावसामुळे नुकसान झाले, त्यामुळे राज्यातील कोकण, खानदेश, मराठवाडा, विदर्भ या प्रदेशातील शेतक-यांचे प्रचंड नुकसान झाले, त्यामध्ये घरांचे, जनावरांचे, प्राण्याचे, जीविताचे नुकसान झालेले आहे. हे सर्व पाहिल्यानंतर असे वाटते की, महाराष्ट्रावर निसर्गाची झालेली अवकृपा आहे. परंतु या अवकृपेला राज्याला वारंवार तोंड द्यावे लागत आहे. मग कधी ती टंचाईच्या निमित्ताने, कधी दुष्काळाच्या निमित्ताने, कधी अतिवृष्टी तर कधी महापुराच्या निमित्ताने तर कधी गारपिटीमुळे सामोरे जावे लागत आहे. या नैसर्गिक आपत्तींमुळे राज्यातील संपूर्ण समाज मग तो बागायतदार शेतकरी असेल, जिराईत शेतकरी असेल, दलित, आदिवासी ग्रामीण भागातील मागासवर्गीय समाजातील शेतकरी असेल या सर्वांची प्रचंड हानी या मार्च महिन्याच्या कालावधीतील गारपिटीमुळे झाली आहे. सभापती महोदय, या आपत्तीत नुकसान किती कोटींचे झाले याच्या तपशीलामध्ये न जाता ज्यांचे नुकसान झाले आहे त्यांना तातडीने शासन मदत कशी देऊ शकते त्याची व्यवस्था शासनाच्या माध्यमातून होणे नितांत गरजेचे आहे. यादृष्टीकोनातून जी शासकीय यंत्रणा आहे ती शासकीय यंत्रणा त्वरीत गतीमान होणे आणि संकटात सापडलेल्या व्यक्तींपर्यंत, गावांपर्यंत लवकरात लवकर पोहोचवून त्यांना दिलासा देण्याच्यादृष्टीने प्रयत्न करणे हे अत्यंत आवश्यक आहे. ही जी गारपीट झाली, अकाली पाऊस झाला त्यामुळे शेतक-यांची पिके नष्ट झाली, कोकणातील आंबा हातचा गेला. कोकणा सोबतच या संपूर्ण प्रदेशातील ज्वारीचे पीक गेले, भाजीपाला नष्ट झाला. उपजीविकेचे साधन या म्हणून नदीच्या पात्राशेजारी टरबूज, खरबूजाचे पीक घेतले जाते ते वाहून गेले. आमच्या नाशिक जिल्हयातील ज्वारी, कांदा, द्राक्षाच्या पिकाचे नुकसान झाले. विदर्भातही अनेक प्रकारच्या पिकांचे नुकसान झाले. कोकणातील आंबा, काजूचे प्रचंड नुकसान झाले. इतकेच नव्हे तर ग्रामीण भागात कित्येक लोक मृत्यूमुखी पडले, जनावरे गतप्राण झाली अशी भयानक, विदारक परिस्थिती निर्माण झाली. या संपूर्ण आपत्तीमुळे या भागातील शेतक-यांचे नुकसान झालेले असल्यामुळे, जीवित हानी झाल्यामुळे शासनाच्यावतीने अशा शेतक-यांना 2 लाख रुपयांचे सानुग्रह अनुदान दिले पाहिजे, शासनाने उदार होऊन या आपत्तीग्रस्त शेतक-यांना मदत केली तर यापेक्षा दुसरी कोणती चांगली गोष्ट होऊ शकते ? ज्यांची जनावरे मृत्यूमुखी पडली त्यांना जनावरे देण्याची व्यवस्था झाली पाहिजे, द्राक्ष, आंबा, काजू या पिकांचे नुकसान झालेले आहे त्यांना सरकारने अग्रक्रमाने आर्थिक मदत दिली पाहिजे.

नंतर श्री.किल्लेदार....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे (पुढे सुरु..

सभापती महोदय,अतिवृष्टीमुळे लोकांचे नुकसान झालेले आहे. गारपिटीमुळे आणि अकाली पावसामुळे आमच्या हातातोंडाला आलेले रब्बीचे पीक उद्ध्वस्त झालेले आहे. घरांच्या पडझडीच्या संबंधात सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. फुंडकर साहेबांनी बुलढाणा जिल्ह्यातील मोथा गावामध्ये दलितांची मातीची घरे जमीनदोस्त झाल्याचे सांगितलेले आहे. प्रामुख्याने हे नुकसान ग्रामीण भागामध्ये झालेले आहे. ग्रामीण भागातील आदिवासी, दलित, मागासवर्गीय लोकांच्या मातीच्या घरांचे नुकसान झालेले आहे, त्यांना मदत देण्याच्या दृष्टीने काय करता येईल, याचा विचार त्वरेने करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर तालुक्यामध्ये शेतीमध्ये काम करणाऱ्या शेत मजूर महिलेच्या अंगावर वीज पडून ती मृत्युमुखी पडली. मला अमरावतीचे कलेक्टर महोदयांना धन्यवाद दिले पाहिजेत. आमच्या कार्यकर्त्यांनी त्यांना माहिती दिल्याबरोबर त्यांनी ताबडतोब पंचनाम करुन, त्या महिलेच्या कुटुंबियांना 1 लाख रुपयाची मदत दिलेली आहे. याबाबत तातडीने अमरावती जिल्ह्याचे जिल्हाधिकारी निर्णय घेऊ शकतात, तर जो काही अफेक्टेड प्रदेश आहे, त्यामध्ये काकण, मराठवाडा, खानदेश असेल, त्या ठिकाणच्या यंत्रणा गतीमान का होऊ शकत नाहीत ? असा माझ यासमोर प्रश्न पडतो.

सभापती महोदय, आपत्कालीन व्यवस्थापन यंत्रणा राज्यामध्ये आहे की नाही ? असा प्रश्न पडतो. आग लागल्यानंतर विहीर खोदण्याचा प्रयत्न केला जातो त्यामध्ये शहाणपण नसते. आपत्कालीन यंत्रणा सक्षम असली पाहिजे. कमीतकमी कसे नुकसान होईल या दृष्टीने त्यावर नियंत्रण करता येईल हे त्या यंत्रणेने पाहिले पाहिजे. महसूल विभागाकडे अशाप्रकारची व्यवस्था असली पाहिजे. राज्यामध्ये कोणत्याही प्रकारचे संकट येऊ शकते. या दृष्टीने वेग घेऊन ताबडतोबीने मदत पोहोचविण्याचे काम करणे गरजेचे आहे. परंतु नुकसान झाल्यानंतरही अनेक वेळा पहातो की, त्या ठिकाणी कोणत्याही यंत्रणेचा पत्ता नसतो, अधिकाऱ्यांचा पत्ता नसतो. ज्यांचे नुकसान झालेले आहे त्यांच्यापर्यन्त मदतही पोहोचत नाही. ही पुरोगामी राज्याला शोभणारी बाब नाही.

सभापती महोदय, पीक विम्याच्या संदर्भाने मला सांगावयाचे आहे. शेतकऱ्यांचे पीक नष्ट झाले असेल, मग तो बागायत शेतकरी असला तरी त्याला तातडीने पीक विम्याची मदत कशी मिळवून देता येईल, या दृष्टीने शासनाने प्रयत्न केला पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/

प्रा.जोगेंद्र कवाडे (पुढे सुरु....

साहेबांनी महत्वाचा मुद्दा मांडला. खऱ्या अर्थाने ज्यांचे नुकसान झालेले आहे, त्यांच्यापर्यनत मदत पोहोचत नाही. ज्यांचे काही नुकसान झालेले नसते, त्यांना मदत दिली जाते. यामध्ये कटाक्षाने लक्ष देण्याची गरज आहे. हे चित्र अतिवृष्टीमध्ये पूर आलेला होता,त्यावेळेस पाहायला मिळालेले आहे. ज्यांच्या घरामध्ये पाणी गेले नाही त्यांना मदत देण्यात आली. ज्यांची घरे नष्ट झाली, त्यांनी विनंती करुनही त्यांना मदत पोहोचली नाही. हे कोठेतरी थांबले पाहिजे. खऱ्या अर्थाने जे गरजू लोक आहेत, त्यांचे नुकसान झालेले आहे त्यांना मदत पोहोचविण्याचे काम झाले पाहिजे. अशाप्रकारचे चुकार कर्मचारी किंवा अधिकारी शोधून काढून त्यांना बडतर्फ केले पाहिजे. एका गोष्टीचा आनंद होतो की, या पुढच्या काळामध्ये आपत्ती व्यवस्थापन महसूल विभागामध्ये ठेवण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्याचबरोबर या यंत्रणेला गतीमान करण्याची आवश्यकता आहे. अद्यापपर्यन्त ज्यांच्यापर्यन्त मदत पोहोचलेली नाही, त्यांना दिलासा देण्यासाठी त्यांना पुरेशी आर्थिक मदत द्यावी. त्याचप्रमाणे त्यांच्यापर्यन्त सन्मानाने मदत करण्यासाठी काटेकोरपणे प्रयत्न करावा,अशाप्रकारची आग्रहाची विनंती करुन माझे भाषण संपवितो. जयहिंद.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, परवा मी कोकणात जाऊन आलो. या ठिकाणी सांगण्यास अत्यंत खेद होतो आणि दु:ख वाटते की, त्या ठिकाणी एकाही झाडावर कैरीचे फळ दिसले नाही. पुन्हा मोहोर येईल आणि आंबा मिळेल अशी आशा होती. सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्ह्याचे दोन पट्टे पडतात. एक म्हणजे सागरी किनारा आणि दुसरा पट्टा म्हणजे डोंगरी विभाग. सागरी पट्टयात पुन्हा मोहोर येईल असे म्हणतात. रायवळ आंबा हायवेला सुध्दा दिसत नाही अशी अवस्था आहे. या निमित्ताने एक गोष्ट मला शासनाच्या निदर्शनास आणून द्यावयाची आहे. निव्वळ आंब्याचेच नुकसान झाले असे नाही. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये वादळाने प्रचंड नुकसान झाले. आंब्याची, काजूची झाडे पडली. फळांचे नुकसान झाले. समुद्रात विजेच्या तारा लोंबकळल्याने एका होडीतील मच्छिमारांना शॉक लागल्याने ते जखमी झाले. या भागात "अहिस्ता अहिस्ता" या हिंदी चित्रपटाचे शुटींग चालू होते. कलाकारांना पहाटे किल्ल्यात नेण्यासाठी ते बोटीने गेले होते. विजेच्या तारा समुद्रात लोंबकळत होत्या. पहाटे त्याचा अंदाज आला नाही. बोटीतील सर्व लोक बेशुध्द पडले. दुसऱ्या होडीतील युवकाने त्यांना किनाऱ्यावर आणले. सभापती महोदय, त्या ठिकाणी काही लोकांची घरे पडली. वेंगुर्ले तालुक्यातील श्रीरामवाडी, निवती, मेढा भागात मुसळधार पाऊस झाला. वादळाने घरांची पडझड मोठया प्रमाणावर झाली. आंबा, काजू व फणसाची झाडे मोडून पडली. एक होडी उलटली. दोन्ही मच्छीमार होडीला धरुन राहिले व बचावले. कोचरे म्हापण येथे गारांचा पाऊस पडला. आनंद मेतर व मनोज खवणेकर हे धनवंती नावाची होडी घेऊन समुद्रात गेले हाते. वाऱ्याने होडी गरागरा फिरली. ते दोघे बाहेर फेकले गेले. होडीतील एक बॉक्स पाण्यावर तरंगला. त्याला धरुन ते सात तास राहिले. सकाळी मदतीला एक होडी आली. त्यांनी या दोघांना घरी आणले. त्यांची 80 हजार रुपयांची मासे पकडण्याची जाळी तुटून गेली. अशा बारीक बारीक गोष्टी दुर्लक्षित राहतात. त्याचा उल्लेख करणे आवश्यक आहे. होडीचे इंजिन निकामी झाले. आपण आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा निर्माण केली आहे. त्यांची कक्षा काय आहे हे त्यांना तरी कळले आहे काय ? आपत्ती म्हणजे काय ? याची व्याख्या करावी लागेल. पाऊस पडला, पूर आला, अतिवृष्टी झाली अशा पध्दतीचा नैसर्गिक हाहाक्कार ज्या ज्या वेळी समाजामध्ये येईल तेव्हा आपत्ती व्यवस्थापन करावे अशी अपेक्षा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ....

आहे. सभापती महोदय, कोचरे आगरवाडी येथील अवधूत रेगे यांचे कलमी बागेचे नुकसान झाले. भिमा गावडे यांच्या बागेतील आंबा कैरी पडून गेली. 25 पेट्या कैऱ्या पडल्या. समुद्राला लागून असलेल्या निवतीवाडी येथील भास्कर कोचरेकर यांचे घर जमीनदोस्त झाले. या जागी 30 ते 40 घरांची मोडतोड झाली. शेळप भोगवे येथे बागायतीचे नुकसान झाले. आगरवाडी येथे पत्राशेड पडली. त्यात बाळ मांजरेकर व संजय नंदोस्कर सापडले. लोकांनी पत्र काढून त्यांना बाहेर काढले. कणकवली तालुक्यात दरतळे, वेळणे, तिवरे भागात घरांचे, झांडाचे मोठे नुकसान झाले.

सभापती महोदय, मुंबईला लागून वसई तालुका आहे. राज्यात कांद्याचे पीक म्हटले की, निफाड तालुका, नाशिक जिल्हा डोळ्यासमोर येतो. मुंबई जवळ असलेल्या वसई तालुक्याचे मी एक उदाहरण माननीय मंत्रिमहोदयांसमोर मांडून माझे भाषण संपवणार आहे. वसई तालुक्यातील कळंब, भूईगाव, गारा, निर्मळ, सालोली या भागात 9 मार्चला प्रचंड पाऊस झाला. वसई तालुक्यातील 28 वर्षाच्या श्री. जोसेफ नावाच्या तरुण शेतकऱ्याने त्या भागामध्ये पांढरा कांदा लावला होता. त्यांना त्याच ठिकाणी मार्केट उपलब्ध आहे. त्याच्याकडे जेमतेम एक एकर जमीन आहे. इतर कोणाची तरी 2 एकर जमीन त्यांने खंडाने कसण्यासाठी घेतली. त्यावर त्यांने कांदा लावला. 9 मार्चला तुफान पाऊस पडला. दुसऱ्या दिवशी त्याने शेतावर जाऊन पाहिले. त्याच्या कांद्याच्या पिकाचे प्रचंड नुकसान झाले. 25 तारखेला त्याने विष घेतले. आपण कर्जातून बाहेर येणार नाही म्हणून त्या शेतकऱ्याने आत्महत्या केली. असे जे दुर्लक्षित लोक आहेत त्यांच्याकडे शासनाने लक्ष द्यावे. वसईतील या गरीब शेतकऱ्याला शासनाने मदत करावी अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM/

श्री. प्रकाश शेंडगे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, राज्यात जुलैमध्ये झालेली अतिवृष्टी आणि त्यानंतर आलेल्या महाप्रलयाने पुन्हा एकदा महाराष्ट्रातील मराठवाडा, विदर्भ, खान्देश, कोकण तसेच पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी तसेच मेंढपाळ यांच्यावर अस्मानी हल्ला झाला. 2 मार्च ते 10 मार्च या आठ दिवसात प्रचंड गारपीट आणि अवकाळी पाऊस याचा जबरदस्त तडाखा महाराष्ट्राला बसला. विजेच्या कडकडाटासह वादळी वारे आणि तुफानी पावसामुळे राज्यभरात जवळजवळ 20 जणांचा बळी गेला.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. प्रकाश शेंडगे....)

घरांची मोठया प्रमाणात पडझड झाली. या प्रचंड गारपिटीने हाहाकार तर उडवलाच पण हातातोंडांशी आलेली गहू, मका, द्राक्षे, ज्वारी आदी पिके साफ झोपली. नाशिक जिल्हयात बेमोसमी पावसाने द्राक्ष बागायतदारांचे खूप नुकसान झाले. कांद्याचे 40 ते 50 हजार हेक्टर क्षेत्र आणि द्राक्षाचे 14 हजार हेक्टर क्षेत्र या पावसामध्ये बाधित झाले. विदर्भातील बुलढाण्यापासून, अमरावती, वाशिम, अकोला या सर्व जिल्ह्यातील उभ्या पिकाचे मोठे नुकसान झाले. बुलढाणा आणि वाशिम जिल्हयात वीज पडून 7जणांचा मृत्यू झाला. पश्चिम महाराष्ट्रातील सांगली व सातारा जिल्हयालाही या गारपिटीचा फटका बसला. या गारपिटीमध्ये सातारा जिल्ह्यातील फलटण तालुक्यातील 400 हेक्टर वरील ऊस, कापूस, ज्वारी, हरभरा आदी पिके नष्ट झाली. शेतक-यांचे जवळपास 1 कोटी 6 लाखाचे या गारपिटीमध्ये नुकसान झाले. सभापती महोदय, मला या निमित्ताने एक विशेष उल्लेख करावासा वाटतो की, उस्मानाबाद, अहमदनगर, सातारा सांगली या जिल्हयातील 2 लाख 68 हजार हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे 50 टक्क्यापेक्षा जास्त नुकसान झालेले आहे. या नुकसानीचा सर्वे झालेला असून शेतक-यांना मदत देण्याच्या संदर्भात एक चकार शब्दही उच्चारला जात नाही. सभापती महोदय, या अतिवृष्टीमध्ये मेंढपाळांवर तर कु-हाडच कोसळली आहे. अकोला जिल्ह्यातील मेंढपाळांचे सर्वात जास्त नुकसान झालेले आहे. या जिल्हयातील मूर्तिजापूर. खामगाव, बालापूर. दानोरी, तेल्हारा या तालुक्यातील तसेच अन्वीमिर्झापूर शिवार येथील तसेच बोरगांव मंजू परिसरातील हजारो मेंढया व शेळया या गारपिटीमध्ये मृत्यूमुखी पडल्या आहेत. एकेका मेंढपाळाचे जवळ जवळ लाख दीडलाख रुपये नुकसान झालेले आहे. ही सर्व कुटुंबे उघड्यावर पडलेली आहेत. शासनाने केवळ पंचनामे करण्यापलीकडे दुसरी कोणतीही मदत केलेली नाही. अशा या अस्मानी संकटाच्या वेळी सरकारने केवळ पंचनाम्याची सहानुभूती न दाखवता शेतक-यांना ताबडतोबीने आर्थिक मदत करावी अशी मी या निमित्ताने मागणी करीत आहे. प्रत्येक मेंढपाळाला प्रत्येक शेळी व मेंढीमागे 1500 रु. मदत करावी किंवा माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सूचना केल्याप्रमाणे शेळीला शेळी आणि मेंढीला मेंढी या प्रमाणे तरी मदत करावी. शासन अलीकडेच बर्ड फ्लूच्या संकटाशी सामना करीत आहे. शासनाने एका कोंबडीमागे 40 रु. मदत केलेली आहे. कोंबडीला जर 40 रुपये मदत दिली जाते तर मग शेळी किंवा मेंढीला 125 रु.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. प्रकाश शेंडगे...)

इतकी अल्प मदत का दिली जाते असा माझा शासनाला सवाल आहे. शेळी किंवा मेंढी 125 रुपयात येत नाही हे सर्वांना माहीत आहे. तेव्हा शेळी व मेंढीच्या संदर्भातील मदतीचे निकष बदलून ज्या ज्या मेंढपाळाचे शेळया-मेंढयांचे नुकसान झालेले आहे अशा धनगर समाजाच्या लोकांना तातडीने भरीव असे अर्थ सहाय्य करावे अशी मी शासनाला विनंती करतो. तसेच जे लोक या अस्मानी संकटामध्ये मृत्यूमुखी पडले आहेत त्यांच्या कुटुंबीयांना दोन लाख रुपये मदत आठ दिवसात करावी अशी विनंती करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुधाकर गणगणे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मार्चच्या पहिल्या आठवडयात राज्यावर जे अस्मानी संकट ओढवले त्यामध्ये हजारो शेतकरी बाधित झाले. आजपर्यन्त शासनाकडून जी मदत अपेक्षित होती ती मदत देखील व्यवस्थित होऊ शकली नाही. याबाबतीत मी कालच आमच्या जिल्ह्याच्या जिल्हाधिका-यांशी बोललो.

...नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जवळजवळ 90-95 टक्के सर्व्हे पूर्ण झालेला आहे. परंतु सर्व्हे झाल्यानंतर जी तातडीची मदत शेतकऱ्यांना शासनाकडून मिळणे आवश्यक होते ती मदत शासन देऊ शकले नाही. या ठिकाणी आमच्या अनेक सहकाऱ्यांनी तसेच माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितले की शेतकरी सध्या किती अडचणीत सापडला आहे. शेतकरी अडचणीत सापडल्यानंतर मोठया शेतकऱ्याबरोबर लहान शेतकरी सुध्दा विशेषत: अल्पभूधारक शेतकरी अडचणीत सापडतो. त्याची परिस्थिती तर अत्यंत वाईट होते कारण त्याच्याजवळ कोणत्याही प्रकारचे आर्थिक प्रयोजन नसते. गेल्या वर्षी मुंबईमध्ये पूरपरिस्थिती निर्माण झाल्यानंतर जी तातडीची मदत देण्याचे काम शासनाने केले होते त्याचप्रमाणे शेतकऱ्यांना सुध्दा तातडीची मदत म्हणजे On the spot मदत मिळाली पाहिजे. यासंदर्भात अनेक माननीय सदस्यांनी सूचना केलेल्या आहेत. जे शेतकरी दुर्गम भागमध्ये राहतात त्यांच्यासाठी कायम स्वरुपी उपाययोजना शासनाने तयार केली पाहिजे जेणेकरुन या शेतकऱ्याचे नुकसान होत असेल तर तातडीने शासन त्याच्या दारापर्यंत पोहाचून त्याला मदत कशी मिळेल याचा विचार होऊ शकेल. आपत्कालीन व्यवस्थापन शासनाने निर्माण केले आहे पण माझ्या माहितीप्रमाणे त्याच्यामध्ये शेतकऱ्याला कोणतीही मदत देण्याची तरतूद नाही. माझी या निमित्ताने खास मागणी राहील की, या आपत्कालीन व्यवस्थापनामध्ये शेतकऱ्यांना देखील मदत देण्याचा समावेश करावा. आज शेतकरी आर्थिक अडचणीमध्ये सापडला आहे आणि त्याच्या जवळ आर्थिक प्रयोजन नाही म्हणून त्याला तातडीने मदत देण्याच्या दृष्टीने शासनाने योजना तयार केली पाहिजे. भविष्यामध्ये गारपीट किंवा इतर कोणतेही संकट आले तर 24 तासांच्या आत नुकसानग्रस्तांना मदत कशी मिळेल आणि शासन त्याला मदतीचा हात कसा देईल यादृष्टीने उपाययोजना करावी एवढीच या निमित्ताने सरकारला विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. एन.पी.हिराणी (यवतमाळ स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, गेल्या 3-4 वर्षांचा आपल्या भारतातील नैसर्गिक परिस्थितीचा आणि विशेष करुन महाराष्ट्रातील परिस्थितीचा आढावा घेतला तर असे दिसून येते की, सातत्याने निसर्ग आपल्यावर कोपलेला आहे. याच्या कारणांचा विचार केला तर या परिस्थितीला मनुष्यजातच कारणीभूत आहे असे दिसून येते. पर्यावरणाचा समतोलच बिघडवून टाकलेला आहे. कारखान्यांमधून प्रदुषण होत आहे. प्रदुषणामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडला आहे. आमच्या लहानपणी हिवाळयात थंडी असे,उन्हाळयात फक्त ऊन असे आणि पावसाळयात पाऊस होत असे. परंतु आजची परिस्थिती पाहिली तर कोणत्या सिझनमध्ये काय होईल याचा भरवंसा राहिलेला नाही. आजकाल केव्हाही काहीही होऊ शकते. अशा प्रकारचे वातावरण सध्या फक्त महाराष्ट्रातच नाही तर देशात आणि जगात तयार झालेले आहे.

यानंतर श्री. खर्चे पी.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. एन.पी.हिराणी .....

पुढच्या शतकामध्ये मुंबईसह जगातील मोठमोठी शहरे पाण्यात बुडणार आहेत असे शास्त्रज्ञांनी भाकित केलेले आहे म्हणून मी म्हणालो की अशा प्रकारच्या वातावरणामध्ये केंव्हाही काहीही घडू शकते. या अनुषंगाने शासनाला मी अशी विनंती करणार आहे की, शासनाने आपत्ती निवारण व्यवस्थापन यंत्रणा अत्यंत प्रभावीपणे तयार करणे आवश्यक असून ती केवळ शहरी भागापुरतीच मर्यादित न ठेवता ग्रामीण भागातील शेतकऱ्यासाठी त्यामध्ये एक स्वतंत्र कक्ष स्थापन करावा. कारण नागरी विभागाकडेच जास्तीत जास्त लक्ष केंद्रित झाल्याचे आता दिसून येते. त्याचे कारण म्हणजे शहरातील नागरिक सुशिक्षित असतात, त्यांचा आरडा-ओरडा जास्त असतो परंतु शेतकरी त्यामुळे दुर्लक्षिला जाऊ नये यासाठी शेतकऱ्यांचाही समावेश यामध्ये करावा. आज शहरी भागातील लोकांचे जे नुकसान होते त्यातून उभे राहण्यासाठी त्यांच्याकडे तरी काही अंशी ताकद असते परंतु शेतकऱ्याला एकदा जर मार बसला तर तो एकदम कोलमडून जातो, त्याला उठून उभे राहता येत नाही. या मार्च महिन्यात पडलेल्या अवेळी पावसामुळे विदर्भातील गहू, हरभरा, संत्रा, आणि कापसाचे मोठया प्रमाणात नुकसान झालेले आहे. कापसाच्या गाडया हजारोच्या संख्येने फेडरेशनसाठी लाईनमध्ये उभ्या असतांना हा पाऊस चार पाच दिवस पडला व त्यामुळे कापूस व्यापारी व फेडरेशनला देखील विकत घेता आला नाही, त्या कापसाला मोठया प्रमाणात कोंब फुटले आणि शेतकरी अक्षरश: कोलमडून गेला. लाखो रुपयाचा कापूस शेवटी शेतकऱ्याला कवडीमोल भावाने विकावा लागला. शेतकऱ्याच्या नुकसान झालेल्या पिकाचे पंचनामे करुन शेतकऱ्यांना आपण मदत देतो व त्यासंदर्भात माननीय राज्यमंत्र्यांनी अत्यंत चांगला निर्णय घेऊन तातडीची मदत वाटप केली त्याबद्दल त्यांचे मी अभिनंदन करतो. कारण बुलडाणा जिल्हयातील एका गावाला, जे गांव संपूर्ण नेस्तनाबूत झालेले होते त्या गावाला 1.75 कोटीची मदत दिलेली आहे. शुभ बोलावे असे म्हणतात पण पर्यावरणात जो बदल सध्याच्या परिस्थिती झालेला आहे त्यावरुन शास्त्रज्ञ सांगतात आणि त्यावरुनच असे प्रसंग वारंवार घडण्याची शक्यता आहे. म्हणून माझी विनंती आहे की, शासनाने डिझास्टर मॅनेजमेंट मजबूत करायला पाहिजे. त्याचबरोबर शेतकऱ्याला सुध्दा प्राधान्याने मदत करण्यासाठी तशा प्रकारचा सेल त्यात स्थापन करावा. कारण या ठिकाणी काही सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, शेतकऱ्यांपर्यंत शासनाची मदत पोहचत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. एन.पी.हिराणी .....

नाही व पटवाऱ्याला भ्रष्टाचाराने माखले की नुकसान झाले नसले तरी नुकसान झाल्याचे दाखविण्यात येते आणि मदत दिली जाते. अशा प्रकारे होऊ नये, सरसकट नुकसान झालेल्यांना मदत मिळालीच पाहिजे यासंदर्भात शासनाने लक्ष घालावे. काही ठिकाणी नुकसानीची पंचनामे करण्यामध्ये अक्षम्य दुर्लक्ष होते. अर्थात काही ठिकाणी चांगले काम देखील झालेले आहे. परंतु काही ठिकाणी दोन तीन वेळा पंचनामे करावे लागले असे प्रकार घडू नयेत याबाबतीत शासनाने लक्ष घालावे अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

यानंतर श्री. भारवि .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.राजेंद्र शिंगणे (महसूल राज्यमंत्री) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी नियम 293 अन्वये मराठवाडा, विदर्भ, खानदेश, कोकण विभागात दिनांक 2 ते 10 मार्च या कालावधीत झालेल्या गारपिटीमुळे विविध फळबांगांचे.....

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मला एक बाब आपल्या निदर्शनास आणावयाची आहे. माननीय महसूल राज्यमंत्र्यांनी मराठवाडा, विदर्भ, खानदेश, कोकण या विभागांचा उल्लेख केलेला आहे. त्याबद्दल मी त्यांना मनापासून धन्यवाद देतो. पण त्यांनी पश्चिम महाराष्ट्राचे कौतुक करू नये. याचे कारण असे की, सांगली जिल्हयामध्ये बेदाणे मोठया प्रमाणावर खराब झालेले आहेत. त्याची देखील शासनाने नोंद घ्यावी.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, पश्चिम महाराष्ट्रासह सर्व भागात चक्रीवादळ, सोसाटयाचा वारा, अतिवृष्टी, गारपीट यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाले आहे. त्याबद्दल शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्यासाठी, मदत मिळण्यासाठी सदर चर्चा सदनात उपस्थित करण्यात आली आहे. या चर्चेत अनेक सन्माननीय सदस्यांनी भाग घेऊन नैसर्गिक आपत्तीच्या संकटात सापडलेल्या विविध भागातील शेतकऱ्यांना मदत दिली पाहिजे अशी मागणी केलेली आहे. या चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते, श्रीमती फौझिया खान, सर्वश्री श्रीकांत जोशी, कर्नल सुधीर सावंत, सर्वश्री सुरेश जेथलिया, जयंत प्र.पाटील, प्रा.जोगेंद्र कवाडे, सर्वश्री अरविंद सावंत, प्रकाश शेंडगे, सुधाकरण गणगणे, डॉ.एन.पी.हिराणी यांनी घेतला असून अतिशय चांगल्या सूचना देखील केल्या आहेत. त्याबद्दल मी त्यांचे मनापासून आभार मानतो. गारपिटीमुळे शेतकऱ्यांचे फार मोठया प्रमाणावर नुकसान झाले आहे. गेल्या काही वर्षांपासून दुष्काळ, अतिवृष्टी, गारपीट, यासह अनेक नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांचे सातत्याने नुकसान होत आहे. त्यामुळे सरकारलासुध्दा शेतकऱ्यांना मदत देण्यासंबंधीचे काम सातत्याने 6-7 महिने करावे लागत आहे. दौऱ्या निमित्त राज्यतील कोणत्याही भागामध्ये गेलो असता तेथे सुध्दा शेतकरी गारपिटीमुळे, दुष्काळामुळे शेतीचे नुकसान झाले आहे, त्यासाठी शासनाने मदत करावी अशी मागणी करतात. नैसर्गिक आपत्तीमुळे आज राज्यातील विविध भागातील शेतकऱ्यांच्या शेतीचे नुकसान झालेले आहे. या निमित्ताने मी सर्व सन्माननीय सदस्यांचे मनापासून आभार मानतो की, त्यांनी कोणतेही राजकारण न करता चांगली भूमिका डोळयासमोर ठेवून शेतकऱ्यांना मदत करण्याच्या दृष्टीने येथे चर्चा घडवून आणलेली आहे. शेतकऱ्यांना मदत केली पाहिजे याबद्दल कुणाचेही दुमत असणार नाही.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मग तो विदर्भातील शेतकरी असेल, कापूस उत्पादक असेल, संत्रा उत्पादक असेल, मोसंबी उत्पादक असेल, जळगांवचा केळी उत्पादक असेल, पश्चिम महाराष्ट्र किंवा नाशिक भागातील द्राक्ष उत्पादक असेल अथवा कोकणातील आंबा आणि काजू उत्पादक शेतकरी असेल, या सर्वांना मदत देण्याचा शासनाकडून प्रयत्न राहील. मदत देण्याच्या बाबतीत कोणतेही दुमत असणार नाही. यावर्षी ज्यावेळी गारपीट झाली त्यावेळेस माननीय मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री महोदयांनी, अधिवेशनापूर्वीच गारपीट झालेल्या शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत निर्णय घेतला. गेल्या वर्षी 26 जुलैला आलेल्या महापूरामध्ये, नुकसान झालेल्यांना मदत देण्याच्या बाबतीत जे निकष लावण्यात आले होते, तसेच निकष गारपिटीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना लागू करण्यात येतील असे माननीय मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री महोदयांनी सांगितले आणि तशा प्रकारचा जी.आर. सुध्दा शासनाच्या वतीने काढण्यात आला आहे.

महोदय, हे खरे आहे की, या गारपिटीमुळे मोठया प्रमाणावर नुकसान झालेले आहे. माझ याकडे नुकसानीबाबतची जिल्हावार आणि विभागवार आकडेवारी आहे. अनेक सन्माननीय सदस्यांनी आपापल्या भाषणातून जिल्हयांची आणि परिसरातील आकडेवारी सांगितली. महोदय, या गारपिटीमुळे अमरावती विभागामध्ये 82,727 हेक्टर पिकांची हानी झाली, शिवाय 11 व्यक्ती मृत्युमूखी पडल्या. 11709 घरांची अंशत: आणि 741 घरांची पूर्णत: हानी झाली. नागपूर विभागामध्ये 30,924 हेक्टर पिकांचे नुकसान झाले, शिवाय 4 व्यक्ती मृत्युमूखी पडल्या आणि 5 व्यक्ती जखमी झाल्या. तसेच 2118 घरांची अंशत: आणि 2 घरांचे पूर्णत: नुकसान झाले. औरंगाबाद विभागात 1,23,185 हेक्टर पिकांचे नुकसान झाले आणि 15 व्यक्ती मृत्युमूखी पडल्या, तसेच 8 व्यक्ती जखमी झाल्या. नाशिक विभागामध्ये 4 हजार हेक्टर पिकांचे नुकसान होऊन, 6 व्यक्ती मृत्युमूखी पडल्या. पुणे विभागामध्ये 807 हेक्टर पिकांचे नुकसान होऊन, 1 व्यक्ती मृत्यू पावली आणि 3 व्यक्ती जखमी झाल्या. याच विभागात 14 घरांचे अंशत: नुकसान झाले. महोदय, एकंदर या गारपिटीमध्ये 1625 गुरे मृत्युमूखी पडली. तसेच 3054 लहान-लहान गुरे सुध्दा मृत्युमूखी पडली. महोदय, सर्वच सन्माननीय सदस्यांनी नुकसानीबाबतची आकडेवारी सांगत असताना सर्वांना मदत झाली पाहिजे अशा प्रकारच्या भावना व्यक्त केल्या.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.राजेंद्र शिंगणे....

महोदय, ज्यांचे नुकसान झाले त्यांना मदत देण्यासाठी शासनाने निकष बदलण्याबाबतचा निर्णय घेतलेला आहे. त्यानुसार झालेल्या नुकसानीचे पंचनामे पूर्ण झालेले आहेत. पंचनाम्यानुसार तातडीने मदत वितरित करण्याची प्रक्रिया सुरु करीत आहोत. पंचनामे करीत असताना अजूनही काही तक्रारी शासनाकडे येत आहेत. काही तक्रारी अशाही आलेल्या आहेत की, पटवाऱ्यांनी एकाच जागेवर बसून, पंचनामे केलेले आहेत. वास्तविक पाहता शासनाने सर्वांनाच सूचना दिल्या होत्या की, ज्या ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे त्या शेतकऱ्यांच्या शेतावर जाऊन, पंचनामे करण्यात यावेत. यामध्ये दोन-चार दिवसांचा कालावधी गेला तरी चालेल, परंतु प्रत्यक्ष शेतावर जाऊनच पंचनामे करावेत. जेणेकरुन, शेतकऱ्यांना सुध्दा, आपल्या शेतामध्ये पटवारी, कृषी अधिकारी किंवा संबंधित खात्याचा अधिकारी आला याचे समाधान मिळू शकेल. परंतु अनेक पटवाऱ्यांनी गावातील एका जागेवर बसून आणि सात-बाराचा उतारा समोर ठेऊन, पंचनामे केले असल्याच्या तक्रारी शासनाला प्राप्त झालेल्या आहेत. त्यामुळे या तक्रारींसंदर्भात आम्ही चौकशी करीत आहोत. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी काही सूचना आणि तक्रारी या ठिकाणी केल्या आहेत. त्यांनी असे निदर्शनास आणून दिले की, कोकणामध्ये विशेषत: कृषी अधिकाऱ्यांचा प्रवास भत्ता थकीत असल्यामुळे, पंचनाम्याच्या वेळी ते तलाठयांसोबत उपस्थित नव्हते. त्यांनी निदर्शनास आणून दिलेल्या बाबी संदर्भात मी ताबडतोबीने माननीय कृषी मंत्री महोदयांशी आणि संबंधित अधिकाऱ्यांशी बोलणार आहे. जर कृषी अधिकारी पंचनामे करीत असताना तेथे उपस्थित नसतील तर त्यांच्यावर कारवाई करण्याच्या दृष्टीने निश्चितपणाने सूचित केले जाईल.

नंतर श्री.कांबळे....

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

डॉ. राजेंद्र शिंगणे ....

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी खामगांव, कांचणपूर, आंबेरोकडी या भागामध्ये महसूल विभागाच्या काही अधिकाऱ्यांनी केलेल्या कामांचा उल्लेख केला. सभापती महोदय, ज्यांच्या घरांचे नुकसान झाले असेल त्यांना मदत न करता, जर एखाद्या राजकीय नेत्याच्या कोठ्याला मदत दिली असेल तर त्या संदर्भात ताबडतोबीने 3 दिवसांच्या आत माहिती घेतो. एखाद्या आमदाराची किंवा लोकप्रतिनिधींची या संदर्भात जर तक्रार असेल तर कितीही मोठा अधिकारी असो त्यावर निश्चितपणे कारवाई केली जाईल. सभापती महोदय, जर चुकीने पदाधिकाऱ्यांच्या कोठ्यांना पैसे दिले असतील तर त्या पैशांची रिकव्हरी करण्यासंदर्भात मी व्यक्तीश: लक्ष घालीन आणि संबंधितावर कायदेशीर कारवाई केली जाईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्रीमहोदय रिकव्हरी करण्यासंदर्भात म्हणत आहेत. परंतु जर काहींनी चुकीने पैसे घेतले असतील तर त्यांच्यावर फौजदारी खटला दाखल करणार का ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, या प्रकरणात फौजदारी खटला भरण्याइतपत जर काही आढळले तर निश्चितपणे खटला भरला जाईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, ज्या अधिकाऱ्याने मदत केली नसेल त्या अधिकाऱ्यावर कारवाई केली पाहिजे.

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, असे करण्यात आले असेल तर निश्चितपणे संबंधितांवर कारवाई केली जाईल. सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांनी सुध्दा अतिशय चांगल्या विधायक सूचना केलेल्या आहेत. यामध्ये काही शाळांचे नुकसान झालेले आहे. ज्याप्रमाणे घरांचे नुकसान झालेल्यांना नुकसानभरपाई देण्यात आली त्याचप्रमाणे शाळांच्या नुकसानीसंदर्भात देखील नुकसानभरपाई देण्यात येईल. नुकसान झालेल्यांमध्ये जिल्हा परिषदेच्या तसेच खाजगी शाळा देखील होत्या, असे माननीय विरोधी पक्षनेत्यांनी येथे सांगितले. सभापती महोदय, मी देखील स्वत: बोरी आजगांव येथे शाळा बांधली. परीक्षा केंद्रासाठीदेखील जागा नाही, अशी परिस्थिती आहे. तरी, जिल्हा परिषदेच्या माध्यमातून यांना मदत करता येईल का, हे देखील पाहिले जाईल आणि या संदर्भात जिल्हा परिषद शंभर टक्के सक्षम नसेल तर ....

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, काही खाजगी शाळांचे देखील नुकसान झाले आहे, त्यांना शासन काही मदत देणार आहे का ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, खाजगी शाळांना मदत करण्याच्या दृष्टीने स्थायी आदेशामध्ये तरतूद नाही. तरी देखील, या संदर्भात विचार करुन जास्तीत जास्त मदत कशी करता येईल, याबाबतीत शासनाच्या वतीने निर्णय घेतला जाईल. या ठिकाणी पाण्याच्या टाकीसंदर्भात देखील बोलण्यात आले. सभापती महोदय, शाळांच्या दृष्टीने पाण्याची टाकी महत्वाची असते. स्थायी निकषामध्ये जरुर याचा समावेश केला जाईल. पाण्याच्या टाकीला देखील मदत करण्याचा शासनाच्या वतीने प्रयत्न केला जाईल. त्याचप्रमाणे सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांनी मागील वर्षी काही शेतकऱ्यांना कमी पैशाचे चेक मिळाल्याची उदाहरणे दिली. ही गोष्ट खरी आहे की, अनेक शेतकऱ्यांना अतिशय कमी रकमेचे चेक मिळाले आहेत. त्यांना चेक मिळविण्यासाठी देखील खूप खर्च करावा लागला. जिल्हाधिकारी, तहसिलदार, एस.डी.ओ. यांच्या कार्यालयात चकरा माराव्या लागल्या आहेत आणि तरीही त्यांच्या हातामध्ये कमी रकमेचे चेक मिळाले. सभापती महोदय, त्यांना बँकेमध्येच खाते उघडून चेक वटवावे लागणार आहेत. कारण कॅशमध्ये रक्कम दिली तर अडचण निर्माण होते. मागील वर्षी कमी पैसे मिळाले कारण आपण मागील वर्षाच्या स्थायी आदेशामध्ये कमी रक्कमच दर्शविली होती. आपले ते आदेश आता बदलले आहेत.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आता 52 रुपयांचे चेक मदत म्हणून मिळतात. तरी, या संदर्भात किमान तीनशे रुपये, चारशे रुपये, पाचशे रुपये देऊ असे काहीतरी आपण करावे.

(यानंतर श्री. वि. खर्चे ..

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

डॉ. राजेद्र शिंगणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रावते साहेबांनी जी मागणी केली त्या मागणीस अनुसरुन मी असे सांगू इच्छितो की यापुढे कमीत कमी मदत ही 500 रुपये दिली जाईल. या संदर्भातील अंमलबजावणी पुढील काळात सरकार निश्चितपणे करील. यासंदर्भात जे निकष बदलेले आहेत त्याचा उल्लेख मी या ठिकाणी करणार आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी असा मुद्दा मांडला की, शेतकऱ्यांना नुकसान भरपाईचा पैसा मिळाल्यानंतर त्यामध्ये बँकेने कोणत्याही प्रकारची कपात करु नये. त्यांची सूचना विचारात घेऊन शेतकऱ्यांना मिळालेल्या मदतीच्या पैशातून कोणत्याही प्रकारच्या कर्जाची कपात केली जाऊ नये अशा प्रकारच्या सूचना संबधितांना दिल्या जातील.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, गारपीट ग्रस्त शेतकऱ्यांनी बँकाची कर्जे घेतलेले आहेत त्यावरील व्याज माफी शासन करणार आहे काय ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, गारपीट ग्रस्त शेतकऱ्यांच्या कर्जावरील व्याज माफीच्या संदर्भात विचार केला जाईल. त्याचप्रमाणे त्यांच्या कर्जाचे पुनर्गठन सुध्दा करण्यात येईल. कारण गारपीट ग्रस्त शेतकऱ्यांनी कर्ज घेतलेले असेल व गारपीटीच्या तडाख्यामुळे त्यांना उत्पादन होऊ न शकल्यामुळे ते बँकामध्ये कर्जाचा भरणा करु शकत नाहीत, म्हणून त्यांच्या कर्जाचे पुनर्गठन करण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री. श्रीकांत जोशी यांनी सायगांव तालुक्यातील गारपीटग्रस्त शेतकऱ्यांच्या संदर्भात पंचनामे चुकीचे केलेले आहेत, असा मुद्दा मांडलेला आहे, अशा शेतकऱ्यांचे परत पंचनामे करुन सदर शेतकऱ्यांना मदत देण्याचा निर्णय घेतला जाईल. यानंतर सन्मानीय सदस्य कर्नल सावंत व श्री. जयंत प्र. पाटील यांनी आंबा पिकाच्या संदर्भात झालेले नुकसान याबाबतचा मुद्दा मांडलेला आहे, तसेच श्री. जयंत पाटील यांनी वीट भट्टयांचे सुध्दा गारपीटीमुळे मोठया प्रमाणात नुकसान झालेले आहे. बुलढाणा जिल्हयामध्ये मी दौरा करीत असतांना तेथील वीट भट्टयांचे गारपीटीमुळे मोठया प्रमाणात नुकसान झालेले आहे. त्यावेळी मी त्यांना मदत करण्याचे आश्वासन दिलेले आहे, ज्या वीट भट्टया अधिकृत व शासनाच्या परवानगीने काढलेल्या असतील त्यांना जास्तीत जास्त मदत देण्याची कार्यवाही शासनाच्यावतीने करण्यात येईल. त्याच प्रमाणे सन्माननीय सदस्य प्रा. कवाडे व विरोधी पक्ष नेते यांनी टरबूज-खरबूज पिकांना नुकसान भरपाई देण्यात येईल काय ? असा मुद्दा उपस्थित केलेला आहे.

.....2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

या पिकांचा सुध्दा नुकसान भरपाईमध्ये समावेश करण्यात येईल व त्यांना मदत दिली जाईल. त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी वसई तालुक्यातील शेतकऱ्यांने आत्महत्या केलेली आहे त्यांना मदत देण्याचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. सदर शेतकऱ्यांस सुध्दा 1 लाख रुपयांची मदत शासनाच्यावतीने दिली जाईल. अनेक सन्माननीय सदस्यांनी निकष बदलण्याच्या संदर्भातील आपले विचार मांडलेले आहेत. संत्रापिकासाठी हेक्टरी 10 हजार रुपये मदत दिली जाते, तसेच इतर पिकांना हेक्टरी 5 हजार रुपये मदत दिली जाते. तसेचे अनेक सन्माननीय सदस्यांनी कांदा पिकाला मदत देण्यात यावी अशी मागणी केलेली आहे. आजपर्यंत सर्व पिकांना मदत देण्यात येत होती, पंरतु कांदा पिकाला मदत दिलेली नाही. कांदा पिकाला सुध्दा निश्चितपणे मदत दिली जाईल. फळबागांना हेक्टरी 10 हजार रुपये मदत देण्यात येते. इतर पिकांना सुध्दा आपण हेक्टरी 1 हजार रुपये 2 हेक्टर पर्यंत मदत दिलेली आहे. मृत्यू पावलेल्या जनावरांच्या मालकांना मदत देण्याचा मुद्दा उपस्थित झालेला आहे. मागील काळामध्ये सुध्दा आपण निकषाप्रमाणे जनावरांना मदत दिलेली आहे. विशेषत: पुरामध्ये जी जनावरे वाहून गेलेली आहेत अशांना आपण मदत दिलेली आहे.

यानंतर श्री. सुंबरे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. शिंगणे ....

परंतु सर्व सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन, मागील काळामध्ये आपण दोनच जनावरांपुरती मदत करीत होतो त्या ऐवजी आता शेतकऱ्यांची जेवढी जनावरे गारपिटीमुळे अथवा अतिवृष्टीमुळे मरण पावली असतील त्या सर्व जनावरांच्या बाबतीत मदत देण्याचा निर्णय आपण घेत आहोत. त्यानुसार मोठ्या जनावरांसाठी अडीच हजार रूपये अनुदान आणि साडेसात हजार रूपये कर्ज देणार आहोत आणि लहान जनावरांसाठी 250 रूपये अनुदान आणि अडीच हजार रूपये कर्ज देणार आहोत. ...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, आपण अनुदान देत आहात त्याबरोबर कर्ज देखील कशासाठी देत आहात ? त्यापेक्षा आपले जे शेळी-मेंढी महामंडळ आहे त्या मार्फत या गरीब लोकांना जनावरे घेऊनच दिली तर त्याचा जास्त फायदा लोकांना होऊ शकेल. म्हणजे जनावराच्या बदल्यात रक्कम न देता जनावराच्या बदली जनावर देण्याच्या दृष्टीने आपण विचार कराल का ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, जनावराच्या बदल्यात जनावर देण्याचा निर्णय या वेळी तरी मी येथे जाहीर करू शकत नाही. त्यासाठी आपल्याला मंत्रिमंडळापुढे जावे लागेल आणि सध्याच्या स्थायी आदेशामध्ये त्यादृष्टीने तरतूद नाही. मात्र सन्माननीय सदस्यांनी ही जी सूचना केली आहे ती चांगली आहे तिचा जरूर विचार करण्यात येईल. तसेच ...

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आम्ही जनावरामागे म्हणजे एका शेळी-मेंढी मागे दीड हजार रूपये मदत वा भरपाई मिळावी अशी मागणी केली होती, तेवढे नाही तर निदान 500 रूपये तरी आपण द्यावेत. ..

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, आपण 250 रूपये देऊन राहिलो आहोत. ...

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, एका बकऱ्याची वा बकरीची किंमतच मुळी 1500 रूपये आहे आणि आपण केवळ सव्वाशे ते अडीचशे रूपये देत आहात, बकऱ्याचे मटण सुद्धा दीडशे रूपये किलो भावाने मिळते आहे. आपण एवढे तरी लक्षात घ्यावे. ... एका शेळीसाठी 250 रूपये हा आपला निर्णय केव्हाचा आहे ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, झालेल्या नुकसानीबद्दल 100 टक्के मदत आपण कोठेही करू शकत नाही, देऊ शकत नाही. आपण ही जी मदत करतो आहोत ती त्या गरीब

..... डीडी 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. शिंगणे .....

माणसाला तात्काळ तात्पुरती मदत दिली पाहिजे म्हणून. त्यासाठीच आपण हे धोरण स्वीकारलेले आहे. तरीही या ठिकाणी सन्माननीय विरोधी पक्षनेते आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी ज्या सूचना केल्या आहेत त्यांचा निश्चितपणे या संदर्भात विचार केला जाईल इतकेच मी या प्रसंगी सांगू इच्छितो. मात्र आता यामध्ये वाढ होईल असे काही मी सांगू शकत नाही. सभापती महोदय, आपत्कालीन व्यवस्थेबद्दल देखील काही सन्माननीय सदस्यांनी येथे आपले विचार मांडले आहेत. या संदर्भात मी आपल्याला सांगू इच्छितो की, आपत्कालीन व्यवस्था उभी करण्याचा निर्णय आपण घेतलेलाच आहे आणि आता राज्य पातळीवर देखील अशा प्रकारे आपत्कालीन व्यवस्था उभी करण्याचा आपण निर्णय घेतला आहे. चक्री वादळ असेल, भूकंप असेल वा अतिवृष्टी असेल या सर्वच बाबतीत यंत्रणा उभी केली असून तिने ताबडतोब तेथे धावून गेले पाहिजे अशा प्रकारची व्यवस्था आपण केली आहे. ...

श्री. सुधाकर गणगणे : त्यात ॲग्रीकल्चर सेलची देखील व्यवस्था आपण करावी.

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, शेतकऱ्यांवर जेव्हा जेव्हा अशा प्रकारची संकटे येतात तेव्हा त्यांना तातडीची मदत मिळावी यासाठी जी आपत्कालीन व्यवस्था आपण निर्माण केली आहे त्यामध्ये ॲग्रीकल्चर सेलदेखील समाविष्ट असला पाहिजे या सन्माननीय सदस्यांच्या सूचनेचे मी स्वागत करतो आणि या व्यवस्थेमध्ये अशा प्रकारचा सेल समाविष्ट करून ही यंत्रणा चांगल्या प्रकारे कार्यान्वित करण्याचाही आपला प्रयत्न राहील. तसेच झालेल्या हानीचा आढावा घेण्याच्या दृष्टीने ताबडतोब पंचनामे करण्याचेही आदेश देण्यात आलेले आहेत तसेच या बाबतीत घरांना मदत देण्याचे काम येत्या 8 दिवसात पूर्ण केले जाईल आणि 15 दिवसात सर्वांनाच पैसे देण्याचे काम शासनाच्या वतीने आमच्या विभागाच्या माध्यमातून केले जाईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, ज्या गरीबांची घरे उद्ध्वस्त झालेली आहेत, संपूर्णपणे जमीनदोस्त झालेली आहेत., अगोदरच त्यांची घरे मातीची, कुडाची असतात, ती सारी जमीनदोस्त झालेली आहेत त्यांना मदत देण्यासंबंधात शेतकऱ्यांना हेक्टरी 1 हजार रूपये आपण देणार आहात म्हणजे एकराला 400 रूपये आपण देणार आहात. सभापती महोदय, एवढ्याशा तुटपुंजा मदतीमध्ये तो तेथे गहू, हरभरा यांचे बियाणेदेखील घेऊ शकत नाही. या बियाणाची किंमत देखील 400 रूपयाच्या वर आहे. तेव्हा ही मदत आपण वाढवून द्यावी अशी माझी येथे आग्रही

..... डीडी 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. फुंडकर ....

मागणी आहे. आपण येथे जी हेक्टरी मदत जाहीर केली आहे ती वाढविली पाहिजे. ती वाढविण्यासाठी शासन विचार करील काय ?

(यानंतर श्री. खंदारे ..... इइ 1 ..

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.राजेंद्र शिंगणे : अध्यक्ष महाराज, शासनाने मदत वाढविण्याचे सर्व स्थायी निकष बदलले आहेत. राज्यात गारपिटीमुळे ज्या शेतक-यांचे नुकसान झालेले आहे त्या शेतक-यांना मदत केली जाते, त्याबाबतचे निकष बदलले आहेत. त्यामुळे आपत्तीग्रस्त शेतक-यांना जास्तीत जास्त मदत देण्याच्यादृष्टीने शासन प्रयत्न करीत असून त्याप्रमाणे मदतीचे वाटप केले जात आहे. घरांच्या नुकसानीबाबत स्थायी निकष आहेत....

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, अतिवृष्टीच्या वेळी जशी मदत केली तशी यावेळीही मदत करु असे मंत्रिमहोदयांनी घोषित केले आहे. अतिवृष्टीमध्ये जी मदत जाहीर केली, आंब्याच्या नुकसानीबाबत मदत जाहीर केली त्यामध्ये 40 टक्के कपात करण्यात आली. तसे यावेळी होऊ नये.

तालिका सभापती (श्री.गुरुनाथ कुलकर्णी) : या चर्चेसाठी सभागृहाची 5 मिनिटे वाढविण्यात येत आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आंब्याच्या नुकसानीसाठी शासनाने 10 हजार रुपये मदत देण्याचे जाहीर केले होते, त्यावेळी 40 टक्के कपात करण्यात आली होती. अतिवृष्टीच्या मदतीलाही 40 टक्के कपात लावण्यात आली तशीच कपात या मदतीला लावली जाणार असेल तर तसे आताच सांगण्यात यावे.

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, शेतक-यांना देण्यात येणा-या मदतीमध्ये कोणत्याही प्रकारे कपात होणार नाही.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, या अतिवृष्टीमुळे कोळी बांधवांचे होडयांचे, जाळयांचे नुकसान झालेले आहे, एक जाळी 1 लाख रुपये किंमतीची असते. तसेच त्यांचे इंजिन बुडाले आहे, या नुकसानीबद्दल शासनाने कोळी बांधवांना मदत दिली पाहिजे ती मदत दिली जाईल काय ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनेप्रमाणे ज्यांच्या होडयांचे, जाळयांचे नुकसान झालेले असेल त्यांनाही मदत दिली जाईल.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, अमरावती जिल्हयाच्या जिल्हाधिका-यांनी अतिवृष्टीच्या काळामध्ये वेगळे काम केलेले आहे. स्वत:ला झोकून देऊन उत्कृष्ट काम करणा-या चांगल्या अधिका-यांची शासनाने नोंद घेणे आवश्यक असते, त्याबद्दल मंत्रिमहोदयांनी बोलणे आवश्यक आहे.

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, अधिका-यांनी काम करावे यासाठीच त्यांची नेमणूक केलेली असते. हे काम करीत असताना जे आपल्या क्षमतेपेक्षा अधिक चांगले काम करतात त्याची नोंद शासन घेत असते. अमरावती जिल्हयाच्या जिल्हाधिका-यांनी मेळघाट, चिखलदरा, अमरावती येथे चांगले काम केलेले आहे. मागील महापूराच्या वेळी देखील महसूल खात्याच्या, कृषी खात्याच्या अधिका-यांनी चांगले काम केलेले आहे, त्यामुळे अशा अधिका-यांच्या कामाची नोंद घेऊन त्यांना पत्र पाठवून त्यांचे अभिनंदन केले जाते. त्याप्रमाणे अमरावती जिल्हयाच्या जिल्हाधिका-यांच्या कामाचीही नोंद घेतली जाईल आणि त्यांचे सुध्दा निश्चित अभिनंदन केले जाईल.

तालिका सभापती : अल्पकालीन चर्चा आता संपली आहे.

सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत असून सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1.15 वाजता पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 1.03 ते 1.15 पर्यंत स्थगित झाली.)

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

<u>महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्येबाबत</u>.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मला आपल्याला माहिती द्यावयाची आहे की, श्री.दसरु गोमा अगाम, ता.दरी, जि.यवतमाळ, श्री.वसंत महादेव ठाकरे, ता.कळंब, जि.यवतमाळ या शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. आतापर्यन्त एकूण 417 शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत.

--

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/

औचित्याच्या मुद्याबाबत

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मला औचित्याचा मुद्दा उपस्थित करावयाचा आहे. सभापती महोदय, काल या सभागृहामध्ये कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या संबंधात औचित्याचा मुद्दा उपस्थित केलेला होता. काल आपण चेअरवरुन संध्याकाळपर्यन्त कांद्याच्या संदर्भात निवेदन करण्याबाबत शासनाला निर्देश दिलेले होते. परंतु काल संध्याकाळपर्यन्त शासनाकडून निवेदन करण्यात आलेले नाही. काल रात्री एका कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेली आहे. पणन मंत्र्यांनी काल निवेदन केले असते, तर कदाचित त्या शेतकऱ्याचा जीव वाचला असता. परंतु काल आपण दिलेला निर्देश सरकारने पाळलेला नाही. काल या संबंधाने कोणत्याही प्रकारचे निवेदन केले गेलेले नाही. कांद्याचा प्रश्न मोठयाप्रमाणावर वाढलेला आहे, गंभीर बनलेला आहे. केंद्रीय कृषी मंत्र्यांच्या सभेमध्ये कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी कांदे फेकून मारले, त्यांची सभा उधळली. इतका प्रकार झाल्यानंतरही कांद्याच्या संबंधात सरकार धोरण ठरविणार नसेल तर मग कांद्याचा प्रश्न प्रचंड प्रमाणात पेटणार आहे. माझा एवढाच मुद्दा आहे की, काल आपण सरकारला आदेश दिलेले आहेत, त्या आदेशाचे पालन सरकारने केलेले नाही. काल सरकारने निवेदन केले नाही तरी किमान हे सभागृहाचे कामकाज सुरु होण्याच्या प्रारंभी निदेश दिल्याप्रमाणे मंत्र्यांनी निवेदन करायला पाहिजे होते, असा माझा औचित्याचा मुद्दा आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, कांद्याचा विषय गंभीर बनलेला आहे. खालच्या सभागृहामध्ये कांद्याचा प्रश्न पणन मंत्र्यांनी अंगावर झेलला. या परिस्थितीमध्ये या सदनामध्ये सातत्याने गडबड न करता काल हा प्रश्न या ठिकाणी मांडण्यात आला. सभापती महोदय आपण स्वत: त्या संबंधाने काल निर्देश दिलेले आहेत की,आज संध्याकाळपर्यन्त पणन मंत्र्यांनी निवेदन करावे. परंतु कालचा संपूर्ण दिवसामध्ये या विषयावर निवेदन करण्यात आलेले नाही. या सभागृहामध्ये आम्हा सदस्यांनी गोंधळ घातला तरच शासन लक्ष देणार, नाही तर लक्ष देणार नाही,असे समजायचे काय ? सभापती महोदय आपण निर्देश दिला तरी काही होणार नसेल तर त्याचा विचार होणे आवश्यक आहे. यामुळे आपल्या निर्देशाला काही अर्थ रहात नाही. आपण आपल्या दृष्टीने निर्देश देता, त्याची सरकारने इज्जत राखली पाहिजे. सभागृहात आल्याबरोबर मंत्री महोदयांनी "मी निवेदन करतो",असे म्हणून निवेदन करायला पाहिजे होते. प्रश्नोत्तराच्या तास सुरु होण्यापूर्वी हा प्रश्न आम्हाला उपस्थित करावा लागतो आहे. कारण या विषयाकडे लक्ष दिले जात नाही ही गंभीर आहे, याबाबत शासनाला आपण समज द्यावी, अशी आपल्याला विनंती आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, यामध्ये दोन गोष्टी लपलेल्या आहेत. पहिली गोष्ट म्हणजे काल या विषयाच्या संबंधात सरकारने निवेदन करावे, अशाप्रकारचे आदेश दिले. त्यावर काल वित्तमंत्र्यांनी खालच्या सभागृहात काय झाले, ते सांगण्याचा प्रयत्न केला. कांद्याच्या विषयाच्या संबंधात सन्माननीय मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांनी निवेदन केल्याचे टी.व्ही.वरुन आम्हाला पहायला मिळाले. त्यांनी सभागृहामध्ये निवेदन न करता बाहेर टी.व्ही.वाहिनीला मुलाखत देताना त्यांनी निवेदन केलेले आहे. त्यांना सभागृहात अशाप्रकारचे निवेदन करण्याची आवश्यकता वाटली नाही. बाहेर टी.व्ही.वर, वर्तमानपत्रामध्ये वाचून आम्हाला हे कळलेले आहे. सभापती महोदय, प्रश्न आमचा नाही, तर प्रश्न हा सार्वभौम सभागृहाचा आहे. आपण ज्यावेळेला एखाद्या विषयावर तातडीने निवेदन करावे, असे आदेश दिल्यानंतर आणि त्यावर सन्माननीय मंत्र्यांनी निवेदन करतो असे सांगितल्यानंतर ते निवेदन झाले नाही. हा सरकारकडून आपला अपमान झालेला आहे, सभागृहाचा अपमान झालेला आहे. सन्माननीय मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांनी याबद्दल क्षमा मागितली पाहिजे, दिलगिरी व्यक्त केली पाहिजे, ही माझी पहिली मागणी आहे.

यानंतर श्री.बरवड.....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ....

माझी दुसरी मागणी अशी आहे की, आपण सांगितल्यानंतरही काल त्यांनी निवेदन केले नाही पण किमान आज त्यांनी या विषयावर ताबडतोब निवेदन केले पाहिजे. आपण जी वेळ द्याल त्यावेळी यासंदर्भात ताबडतोब निवेदन होण्याची आवश्यकता आहे. आपले आदेश पाळले जात नाहीत. सरकार ते लाईटली घेते ही गोष्ट चांगली नाही. याबद्दल मी माझ्या तीव्र भावना व्यक्त करतो. माननीय मंत्रिमहोदय श्री. हर्षवर्धन पाटील यांनी टी.व्ही. वर भाषण करताना सांगितले की, सभागृहामध्ये जे सन्माननीय सदस्य आरडाओरड करतात त्यांचे वेतन कापले पाहिजे. सन्माननीय सदस्यांचे वेतन कापावे असे त्यांनी मार्गदर्शन केले. तुम्ही जर जबाबदारीने वागत नसाल तर तुमचे काय कापावयाचे ? तुमच्यावर काय कारवाई करावयास पाहिजे ? यासंदर्भात माननीय मंत्रिमहोदय श्री. हर्षवर्धन पाटील यांनी खुलासा करावा अशी माझी मागणी आहे.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी बोलत असताना असा उल्लेख केला की, सन्माननीय मंत्रिमहोदय श्री. हर्षवर्धन पाटील यांनी विधानसभेत निवेदन केले. काल याच प्रश्नावर सभागृहात विषय उपस्थित केला असता या ठिकाणी माननीय मंत्रिमहोदय श्री. जयंत पाटील यांनी उत्तर देत असताना सांगितले होते की, विधानसभेमध्ये जेव्हा मंत्रिमहोदय निवेदन करतील तेव्हा या सभागृहातही निवेदन करण्यात येईल. त्यावेळी सन्माननीय सदस्यांनी असा उल्लेख केला की, खालच्या सभागृहात काय झाले ते या ठिकाणी सांगू नका. खालच्या सभागृहाचा उल्लेख या ठिकाणी करण्याचे काही कारण नाही इथपर्यंत बोलले. खालच्या सभागृहात काय झाले त्याचा या ठिकाणी संबंध नाही.....

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात)

सभापती : काल काय चर्चा झाली ते माझ्या लक्षात आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मला खेदाने नमूद करावेसे वाटते. आम्ही वेगवेगळ्या विषयावर वारंवार आपल्याला विनंती केल्यानंतर आपण विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन शासनाला आदेश देता. ते आदेश शासन पाळत नाही. एक आठवडा झाला तरी लॉटरीच्या संदर्भातील निवेदन आलेले नाही. आपण निदेश देऊनही कांद्याच्या बाबतीतील निवेदन आलेले नाही. आमची एवढीच अपेक्षा होती की, माननीय मंत्रिमहोदयांनी उठून सांगावयास पाहिजे की,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS/

श्री. दिवाकर रावते ....

आपण दिलेल्या निदेशाचा आदर करतो परंतु आज निवेदन करु शकत नाही, उद्या निवेदन करु. एवढे जरी सांगितले असते तरी पीठासीन अधिकाऱ्यांचा आणि या सार्भभौम सभागृहाचा मान राहिला असता. ते माननीय मंत्रिमहोदय करीत नाहीत. याकडे ते दुर्लक्ष करतात आणि सभागृहाचा व आपल्या निदेशाचा अवमान करतात हे मी खेदाने नमूद करीत आहे.

सभापती : काल सभागृहाचे कामकाज सुरु झाल्यानंतर या ठिकाणी कांद्याचा प्रश्न उपस्थित करण्यात आला. त्यावेळी या ठिकाणी संबंधित मंत्रिमहोदय उपस्थित नव्हते. ते विधानसभेमध्ये होते. त्यावेळी या ठिकाणी माननीय अर्थमंत्री उपस्थित होते. मी त्यांना सांगितले की, याबाबतीतील निवेदन आज संध्याकाळपर्यंत सभागृहात करावे. त्यांनी असे सांगितले की, माननीय पणन मंत्री विधानसभेमध्ये कामकाजात गुंतलेले आहेत. त्यावेळी मी असे सांगितले की, शेतकऱ्यांच्या जीवनाशी संबंधित असणाऱ्या या विषयाच्या बाबतीत कोणत्याही परिस्थितीमध्ये हे निवेदन करावे. या पध्दतीने काल मी या ठिकाणी सूचना दिलेली होती. याबाबत माननीय मंत्रिमहोदयांना काही सांगावयाचे असल्यास त्यांनी सांगावे.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, कांद्याच्या प्रश्नाच्या संदर्भात एक गोष्ट खरी आहे की, निवेदन करण्यासाठी आणि हा निर्णय जाहीर करण्यासाठी विलंब झाला. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी साहेबांनी असा मुद्दा उपस्थित केला की, काल पणन मंत्र्यांनी विधानसभेमध्ये निवेदन केले आणि दूरदर्शनवर, इलेक्ट्रॉनिक मिडियासमोर जाहीर निवेदन केले. मी यासंदर्भात काल सदनामध्ये कोणतेही निवेदन केलेले नाही. मी विधानसभेमध्ये एवढेच सांगितले की, यासंदर्भात माझ्या विभागामध्ये प्रस्ताव आम्ही तयार करीत आहोत आणि यामध्ये अनेक बाबींचा समावेश असल्यामुळे यामध्ये सरकारला किती आर्थिक भार उचलावा लागणार आहे, कशा पध्दतीने कांदा पिकवणाऱ्या शेतकऱ्यांना मदत करावी असा विस्ताराने अभ्यास करीत आहोत आणि आम्हाला मंत्रिमंडळासमोर जावे लागेल आणि मंत्रिमंडळाची मान्यता घेऊन मी यासंदर्भात निवेदन करीन. मी सदनाच्या माहितीकरिता सांगू इच्छितो. काल मला दूरदर्शनसमोर किंवा इलेक्ट्रॉनिक मिडियासमोर प्रश्न विचारण्यात आला की, याबाबतीमध्ये सरकारची भूमिका काय आहे ? सरकार कोणत्या स्वरुपामध्ये मदत करणार आहे ? तेव्हा मी सांगितले की, असा विचार सध्या चालू आहे.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. हर्षवर्धन पाटील पुढे सुरु....)

परंतु विरोधी पक्षनेते विविध पक्षाचे गटनेते, काही सन्माननीय सदस्य यांची मंत्रालयामध्ये जी बैठक झाली त्या बैठकीमध्ये विविध सूचना करण्यात आल्या. कोणी सांगितले 500 रुपये हमी भाव द्या, तर कोणी सांगितले 300 रुपये हमी भाव द्या. कोणी सांगितले एक्सपोर्टला सबसिडी दिली पाहिजे. या सर्व प्रश्नांच्या संदर्भात विभागाच्यावतीने एक प्रस्ताव तयार करण्यात येत आहे. यामुळे किती मोठा वित्तीय भार पडेल याचा विचार करुन या संदर्भातील निवेदन करु असे मी सांगितले. माननीय सभापतींनी निवेदन करावे असे काल निदेश दिले असल्याचे मला माननीय वित्त मंत्र्यांनी आणि माननीय सभापतींच्या कार्यालयातूनही सांगण्यात आले होते. काल मंत्रिमंडळाची बैठक होती आणि त्या बैठकीत या संदर्भातील चर्चा झाली. परंतु निर्णय होऊ शकला नाही. मी त्यानंतर माननीय सभापतींना देखील येऊन भेटलो होतो. परंतु तोपर्यन्त कामकाज संपलेले होते. माननीय सभापतींनी दिलेल्या निदेशाचे पालन करायचे नाही किंवा त्यांचा अवमान करायचा अशी कोणतीही भूमिका सरकारची नाही. मी या सदनामध्ये येण्यापूर्वी खालच्या सदनामध्ये यासंदर्भातील चर्चा झाली. कांद्याच्या प्रश्नाबाबत सरकारची सकारात्मक भूमिका आहे. याबाबतीत विलंब झालेला आहे. मागील अनेक वेळा अशा प्रकारची मदत दिली गेली असताना दुर्दैवाने ती मदत शेतक-यांपर्यन्त पोहोचली नाही. मधल्या दलालांनी त्यामध्ये गैरव्यवहार केला. तेव्हा शेतक-यांना थेट मदत कशी मिळेल याचाही विचार केलेला आहे. उद्या यासंदर्भातील निवेदन करावयाचे ठरविलेले आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा मुद्दा एवढाच आहे की, माननीय मंत्री महोदयांनी याबाबतीत आपणाला कमीत कमी एक पत्र द्यावयास पाहिजे होते.

सभापती : माननीय मंत्री महोदय मला काल येऊन भेटले होते. पण त्यावेळी सदनाचे कामकाज संपलेले होते. काल सदनाचे कामकाज अधिक वेळ चालण्याची शक्यता होती आणि त्या दरम्यान माननीय मंत्री महोदय मला भेटण्यास आले होते. काल त्यांना हे सांगता आले असते तर अधिक चांगले झाले असते.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आपण क्षमाशील वृत्तीचे असल्यामुळे मंत्री महोदयांना आपण माफ केलेत. परंतु या देशाचे कृषी मंत्री श्री. शरद पवार यांनी नाशिकला असे जाहीर केले होते की, सरकार याबाबतीत सोमवारी निवेदन करील. श्री. शरद पवार हे राष्ट्रवादी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. नितीन गडकरी पुढे सुरु...)

काँग्रेसचे अध्यक्ष आहेत आणि माननीय मंत्रीमहोदय हे अपक्ष असून त्यांचा कल इंदिरा काँग्रेसकडे आहे. राष्ट्रवादी काँगेसच्या अध्यक्षांनी सोमवारी निवेदन करण्यास सांगितले म्हणून ते निवेदन सोमवारी न करण्याचे ठरविलेले आहे की काय ?..

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, असे काही रेकॉर्डवर राहाणे इष्ट नाही. नाशिक येथील सभेला मी देखील हजर होतो.

सभापती : राज्य शासन आणि कांदा या संदर्भातील वक्तव्ये रेकॉर्डवर राहातील. अन्य वक्तव्ये कामकाजातून काढून टाकली जातील.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. कोणते शब्द संसदीय आणि कोणते शब्द असंसदीय आहेत यासंबंधीचे काही नियम तयार केलेले आहेत....

सभापती : मी संसदीय किंवा असंसदीय शब्द असे बोललो नाही. आता प्रश्नोत्तरे घेण्यात येतील.

...2...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे

सभापती : आता दिनांक 28 मार्च 2006 रोजी राखून ठेवलेला तारांकित प्रश्न क्रमांक 12807 घेण्यात येईल.

कोकणात झालेल्या अतिवृष्टीमुळे आंबा बागायतदारांचे झालेले नुकसान

(३) * १२८०७ श्री. विनोद तावडे , श्री. मधुकर चव्हाण , श्री. नितीन गडकरी , डॉ. अशोक मोडक

तारांकित प्रश्न क्रमांक ९५१८ ला दिनांक ५ डिसेंबर, २००५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :

सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माहे जुलै ते ऑक्टोंबर,२००५ या कालावधीत अतिवृष्टीमुळे झालेल्या आंबा बागायतदारांची नुकसान भरपाई देण्याची कार्यवाही पुर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास,सदर नुकसान भरपाई देतांना शेतकऱ्यांना अत्यंत तुटपुंज्या स्वरुपात मदत दिली हे खरे आहे काय,

(३) असल्यास, कमी नुकसान भरपाई देण्याची कारणे काय आहेत ?

श्री.विनय कोरे : (१) ९९ टक्यापेक्षा जास्त कार्यवाही पूर्ण झालेली आहे.

(२) नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. विनोद तावडे : कोणत्या जिल्हयामध्ये किती नुकसान झाले याबाबतची माहिती माननीय मंत्री महोदयांना देता न आल्यामुळे हा प्रश्न राखून ठेवण्यात आलेला होता. आता देखील तेच छापील उत्तर देण्यात आलेले आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये पंचनामे होऊन किती कोटीचे नुकसान झाल्याचा अंदाज आहे? अवेळी पावसामुळे झालेल्या नुकसानीबाबत किती नुकसान भरपाई देण्याचे ठरले होते आणि त्यापैकी किती नुकसान भरपाई देण्यात आली आहे ?

....नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 12807 पुढे सुरु...

श्री. विनय कोरे : सभापती महोदय, दोन प्रकारचे प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. अतिवृष्टीमुळे जी नुकसान भरपाई द्यावयाची आहे ती वेगळी आहे. ती 99 टक्के दिली गेली आहे. मागील वर्षी त्सुनामी लाटा,अवेळी पाऊस आणि अतिवृष्टी या तीन विषयांबाबत शासनाने विशेष बाब म्हणून नुकसान भरपाई दिली होती. त्यातील 50 टक्के वाटप पूर्ण झालेले आहे आणि 50 टक्के वाटप करणार आहोत. हे वाटप करीत असताना पंचनाम्यांचा आधार न घेता सरसकट उत्पादनक्षम शेतकऱ्याला मदतीचे वाटप करण्याचे धोरण शासनाने निश्चित केलेले आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, अवेळी पाऊस आधी झाला आणि अतिवृष्टी नंतर झालेली आहे. अतिवृष्टीमुळे झालेले नुकसान होते त्याचे पैसे दिले. परंतु अवेळी झालेल्या पावसामुळे जे नुकसान झाले त्यासाठीची मदत आधी दिली गेली असती तर शेतकऱ्यांना मदत झाली असती. शेतकऱ्यांना खते,बी-बियाणे खरेदी करता आले असते. म्हणून अवेळी पावसामुळे झालेल्या नुकसानीबाबत अजून तीन ते साडेतीन कोटी रुपयांची मदत देण्याचे शिल्लक राहिले आहे ती मदत शासन केव्हा देणार आहे ?

श्री. विनय कोरे : सभापती महोदय, मदत देण्याचे काम फलोत्पादन विभाग करीत असले तरी प्रत्यक्षपणाने ही मदत शासनाच्या मदत आणि पुनर्वसन विभागाकडून मिळत असते. मागीलवेळी अतिवृष्टी झाली ती मोठी होती. मुंबई सारख्या शहरात तर प्रचंड प्रमाणावर अतिवृष्टी झाली. त्या ठिकाणी मदतीचे वाटप झाले. परंतु त्यावेळी ही मदत वेळेवर देऊ शकलो नाही ही वस्तुस्थिती आहे. सर्व माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन अधिवेशन संपण्यापूर्वी मदत दिली जाईल.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, आंबा बागायतदारांना नुकसान भरपाई देण्यासाठी कोणते निकष लावले आहेत ?

श्री. विनय कोरे : सभापती महोदय, ही नुकसान भरपाई नाही. मदत म्हणून शासनाने पैसे दिलेले आहेत. विशेष बाब म्हणून 2 हेक्टर मर्यादेपर्यंत हेक्टरी 10 हजार रु. मदत दिलेली आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, संत्रा बागायतदारांना प्रत्येक झाडामागे किमान 35 रु. आणि कमाल 10 हजार रुपयापर्यंत मदत दिली गेली. त्याप्रमाणे आंबा बागायतदारांच्या बाबतीत कशा प्रकारे मदत करण्याचे शासनाचे धोरण आहे ते शासनाने स्पष्ट करावे.

श्री. विनय कोरे : सभापती महोदय, कमीत कमी 1000 रु. च्या आत कोणत्याही शेतकऱ्याला मदत दिलेली नाही. मदत देताना हेक्टरवर दिलेली आहे. झाडामागे दिलेली नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSK/ KGS/ MHM/ SBT/ MAP/ 13:30

ता.प्र.क्र. 12807 पुढे सुरु...

डॉ. दीपक सावंत :सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी उत्तरात सांगितले की दोन हेक्टरमागे दहा हजार रुपयांची मदत विशेष बाब म्हणून देण्यात येईल. देवगड तालुक्यात झालेल्या नुकसानीचा रिपोर्ट तहसीलदार,देवगड यांनी शासनाला दिला आहे काय ? आंब्याचे किती नुकसान झाले याची माहिती शासनाकडे आहे काय ? कारण मागील वेळी ही माहिती नसल्यामुळेच प्रश्न राखून ठेवण्यात आला होता. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, देवगड तहसीलदार यांनी आंबा बागायतदारांचे किती नुकसान झाले आहे याची माहिती शासनाकडे पाठविली आहे काय ?

श्री. विनय कोरे : सभापती महोदय, दोन प्रकारची नुकसान भरपाई दिली जाते हे मी सांगितले आहे. अवेळी झालेल्या पावसामुळे झालेल्या नुकसानीसाठी नुकसान भरपाई देण्याचे काम राहिलेले आहे. अवेळी झालेल्या पावसामुळे नुकसान भरपाई देताना सर्व्हेप्रमाणे न देता सरसकट सगळया शेतकऱ्यांना मदत द्यावी असे धोरण शासनाने मागील वर्षी स्वीकारलेले आहे. 14 कोटी 60 लक्ष रुपयांचे वाटप झालेले आहे. अजूनही 15 कोटी रुपयांची मागणी सगळया तहसीलदारांकडून शासनाकडे आलेली आहे. हे अधिवेशन संपण्यापूर्वी मदतीचे वाटप पूर्ण केले जाईल.

यानंतर श्री. खर्चे पी.

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

करडखेल (ता.उदगीर,जि.लातूर) येथील शेतकऱ्याने विजेचे कनेक्शन न मिळाल्याने केलेली आत्महत्या

(1) * 12820 **श्री. श्रीकांत जोशी , श्री. नितीन गडकरी , श्री. विनोद तावडे** : सन्माननीय **ऊर्जा (अपारंपारिक ऊर्जा वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) लातुर जिल्ह्यातील करडखेल ता.उदगीर येथील एका कर्जबाजारी शेतकऱ्याने दिनांक 20 डिसेंबर, 2005 रोजी वा त्या सुमारास विजेचे कनेक्शन न मिळाल्याने विषारी द्रव प्राशन करुन आत्महत्या केली हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर प्रकरणी शेतकऱ्याच्या नातेवाईकांना नुकसानभरपाई अदा करण्याच्या दृष्टीकोनातून शासनाने कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,

(3) मराठवाड्यातील किती शेतक-यांना विजेचे कनेक्शन देणे बाकी आहे,

(4) असल्यास,महाराष्ट्र राज्य विज मंडळाकडे मराठवाड्यासाठी ॲग्री पंप कनेक्शन देण्यासाठी नवीन कोणत्या योजना आहेत ?

श्री.दिलीप वळसे -पाटील : (1) करडखेल, तालुका उदगीर, जिल्हा लातूर येथील एका व्यक्तीने विषारी द्रव प्राशन करुन दिनांक 29-12-2005 रोजी आत्महत्या केली आहे. पोलीसांनी केलेल्या चौकशीअंती असा निष्कर्ष काढला आहे की, सततच्या भारनियमनामुळे रागात येऊन सदर व्यक्तीने आत्महत्या केली आहे. मात्र सदर व्यक्तीस वितरण कंपनीतर्फे विद्युत पुरवठा करण्यात येत नव्हता. मात्र मयत व्यक्तीच्या वडीलांनी शेती पंपासाठी नविन विद्युत जोडणी मिळण्यासाठी केलेला अर्ज जून 2005 पासून प्रलंबित असून प्रतिक्षा यादीतील जेष्ठता क्रमांकानुसार विद्युत पुरवठा करण्यात येईल.

प्रस्तुतच्या प्रकरणात पोलीसांनी वरीलप्रमाणे निष्कर्षाप्रत येण्यापूर्वी वितरण कंपनीकडे कोणत्याही प्रकारची विचारणा अथवा चौकशी केलेली नाही. तसेच मयत व्यक्तीस अथवा मयत व्यक्तीच्या वडिलांस वितरण कंपनीतर्फे विद्युत पुरवठा करण्यात येत नसल्यामुळे, सदर व्यक्तीने भार नियमनामुळे आत्महत्या केली आहे, असा निष्कर्ष काढणे संयुक्तिक नसल्यामुळे आत्महत्येच्या सदर घटनेची अधिक चौकशी करण्याबाबत पोलीसांना म.रा.विद्युत वितरण कंपनीतर्फे विनंती करण्यात आली आहे.

(2) शेतकऱ्यांना विजेचे कनेक्शन न मिळाल्याने आत्महत्या केली नसल्यामुळे वरील सदर प्रकरणी पोलीसांतर्फे अधिक चौकशी अपेक्षित असल्यामुळे सद्य:स्थितीत मयत व्यक्तीच्या वारसांना नुकसान भरपाई देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(3) मराठवाड्याअंतर्गत 31.1.2006 अखेर कृषीपंपास वीज कनेक्शन मिळण्यासाठी पैसे भरुन विद्युत चाचणी अहवाल सादर केलेल्या एकूण 26,987 शेतकऱ्यांना विजेचे कनेक्शन देणे बाकी आहे.

(4) मराठवाड्यासह महाराष्ट्रात शेती पंपास वीज कनेक्शन देण्यासाठी प्रामुख्याने एस.पी.ए. व विशेष घटक योजना कार्यरत आहेत. वितरण कंपनीने ठरविलेल्या वार्षिक उद्दिष्टानुसार तसेच निधीच्या उपलब्धतेनुसार जास्तीत जास्त कृषी पंपाचे विद्युतीकरण करण्याचे काम महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीकडून सतत चालू आहे. मराठवाड्यातील परभणी हिंगोली व बीड हे जिल्हे कृषीपंपाच्या विद्युतीकरणाबाबतीत अनुशेष असलेले जिल्हे असल्याने तेथे उद्दिष्टांची मर्यादी विचारात न घेता कृषीपंपाना वीज कनेक्शन देण्यात येते.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी उत्तर "छापल्याप्रमाणे" असे म्हटल्यामुळे उत्तरात काहीच दुरुस्ती करावयाची नाही असे मी समजतो. परिस्थिती अत्यंत गंभीर आहे आणि दुर्दैवाने उत्तर मात्र अत्यंत कॅज्युअल असे दिलेले आहे. येथे 26987 कनेक्शन्स बाकी असतांना विशिष्ट शेतकऱ्यांनीच आत्महत्त्या केल्या ही वस्तुस्थिती सांगण्यात येते. लातूर जिल्हयातील एका 27 वर्षाच्या लहिक इब्राहिम शेख नांवाच्या तरुणाने विजेचे कनेक्शन न मिळाल्यामुळे आत्महत्त्या केली आणि येथे उत्तर मात्र प्रस्तुतच्या प्रकरणात पोलिसांनी वरीलप्रमाणे निष्कर्षाप्रत येण्यापूर्वी वितरण कंपनीकडे कोणत्याही प्रकारची विचारणा अथवा चौकशी केलेली नाही असे दिले जाते आणि ही एक प्रकारे मृत तरुणाची व सभागृहाची चेष्टाच आहे असे मला वाटते. विजेचे कनेक्शन त्या तरुणाने कूपनलिकेसाठी घेतलेले होते व त्यासाठी जिल्हा सहकारी बँक, स्टेट बँक ऑफ इंडिया आणि वैजनाथ बँक अशा तीन बँकांकडून कर्ज घेतलेले होते. तसेच या कूप नलिकेतून त्याने तीन महिने आपल्या पिकाला पाणीपुरवठा सुध्दा केला होता. जून महिन्यात त्याने ऊसाची लागवड केली व त्यानंतर ते विजेचे कनेक्शन चालू रहावे म्हणून सातत्याने वीज मंडळाकडे चकरा मारत होता परंतु तरीही त्याला विजेचे कनेक्शन दिले नाही म्हणून त्याने आत्महत्त्या केली. माझा प्रन असा आहे की, वीज मंडळ यासंबंधीचा दोष कबूल करीत आहे काय ? असल्यास त्या तरुणाच्या कुटुंबाला आर्थिक मदत किंवा त्याच्या कुटुंबातील एकाला वितरण कंपनीमध्ये नोकरीबाबत शासन आदेश देणार काय ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : महोदय, मृत तरुणाने विद्युत मंडळाकडे कुठल्याही प्रकारचे कनेक्शन मिळावे म्हणून मागणी केलेली नव्हती. तथापि त्याच्या वडिलांनी वीज मंडळाकडे कनेक्शनची मागणी केली होती. तरी सुध्दा त्याच्या शेतामध्ये जे बोअर होते त्या बोअरला वीजपुरवठा अन्य ठिकाणाहून घेतलेला होता आणि तहसीलदाराच्या अहवालाप्रमाणे या शेतकऱ्याकडे जशी शेती आहे तसाच त्याचा हॉटेलचा व्यवसाय देखील आहे. तसेच या अहवालानुसार या शेतकऱ्याकडे कुठल्याही प्रकारचे कर्ज नव्हते अथवा कोणत्याही बँकेचा त्याच्याकडे कर्जाच्या मागणीचा तगादा नव्हता अशी माहिती लेखी स्वरुपात सादर झालेली आहे. म्हणून या तरुण

.....3

अशुद्धमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 12820 ..... श्री. दिलीप वळसे-पाटील .....

शेतकऱ्याने नक्की कुठल्या कारणास्तव आत्महत्त्या केली यासंबंधीचा पोलीस तपास सुरु आहे. याबाबत ज्यावेळी पंचनामा करण्यात आला त्यामध्ये विषारी औषध घेऊन त्याचा मृत्यू झाल्यासंबंधीचा रिपोर्ट आहे. परंतु एका बाजूला एफआयआरमध्ये सततच्या भारनियमनामुळे त्याने आत्महत्त्या केली असे त्याच्या घरातील लोकांनी म्हटलेले आहे आणि दुसऱ्या बाजूला सभागृहात मात्र या तरुणाला विजेचे कनेक्शन दिले नाही म्हणून त्याने आत्महत्त्या केल्याचे सांगण्यात येत आहे. म्हणून या संदर्भात गुन्हा रजिस्टर्ड झालेला आहे व त्याची चौकशी करण्यात येत आहे.

श्री. नितीन गडकरी : महोदय, या तरुणाला आत्महत्त्या करायला वेड लागलेले नव्हते. आत्महत्त्या झाल्यानंतर त्याचे कारण काय करायचे ? तहसीलदार आणि पोलिसांनी काय केले याची अनेक वेळा या ठिकाणी आपण चिरफाड केली आहे. परवा मुंबई हायकोर्टात हिरामण पाटील यांच्या पत्नीचा मृत्यू झाल्याबाबत केस हिअरिंगला होती. परंतु त्यांच्या पत्नीने दहा वर्षापूर्वी आत्महत्त्या केल्याचे निदर्शनास आले व कोर्टाने शासनाला कडक शब्दात समज दिली. विजेच्या पंपांसाठी एक तर कनेक्शन्स दिले जात नाहीत आणि कनेक्शन असेल तर लोडशेडिंगमुळे वीज नाही व त्यामुळे उभ्या पिकाचे नुकसान झाले. या तरुणाच्या बोअरवर यापूर्वी पंप चालू होता परंतु त्याचे कनेक्शन तोडण्यात आले ही वेगळीच माहिती, त्यातले सत्य मला माहिती नाही. पण माझी अशी विनंती आहे की, ही केस आत्महत्त्येची केस समजून शासन जी 1 लाखाची मदत देते ती त्याला देणार काय ? कारण विजेचे वारंवार लोडशेडींग व विजेच्या कनेक्शनबाबत त्याने केलेला अर्ज या सगळया बाबींना सरकार जबाबदार आहे. नापिकी व कर्जबाजारीपणामध्ये जसे जबाबदार असते त्याप्रमाणे येथेही शासनाची जबाबदारी असल्यामुळे शासन या तरुणाच्या कुटुंबियांना 1 लाख रुपयाची मदत देणार काय ? दुसरा प्रश्न म्हणजे एस.पी.ए. आणि विशेष घटक योजनेतून पंपाच्या कनेक्शनसाठी शासन पैसे खर्च करते. म्हणून माझी विनंती आहे की, हा प्रन सोडविण्यासाठी प्रभावी उपाययोजना म्हणून शासनाकडून विशेष निधी उपलब्ध करुन विजेच्या पंपांना कनेक्शन देण्याच्या संदर्भात सर्वंकष धोरण शासन आखणार आहे काय ?

यानंतर श्री. भारवि .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे पाटील : सभापती महोदय, वीज मंडळाच्या चुकीमुळे एखाद्याचा मृत्यू झाला असेल, किंवा अपंगत्व आले असेल तर संबंधितांच्या नातेवाईकांना त्याप्रमाणत नुकसान भरपाई दिली जाते. या प्रकरणात जी मृत व्यक्ती आहे, तिला विद्युत कनेक्शन वीज मंडळाने दिले नव्हते. त्यामुळे वीज मंडळ त्याची जबाबदारी स्वीकारण्याची शक्यता दिसत नाही. तरी सुध्दा या व्यक्तीने कोणत्या कारणामुळे आत्महत्या केली आहे यासंबंधी पोलीस तपास करीत आहे. या व्यक्तीची आत्महत्या ही शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या व्याख्येमध्ये येत असेल तर त्यासंबंधी महसूल विभागाला कळवून मदत करण्यासंबंधी कारवाई करण्याबाबत कळविण्यात येईल. तसेच ज्या पेड पेंडींगच्या केसेस आहेत, त्यासंबंधी राज्य सरकारने एक पाऊन निश्चितपणे पुढे टाकलेले आहे. SAP, TSP, OTSP सारखे जे कार्यक्रम आहेत त्यासाठी राज्य सरकारने मागच्या वर्षीप्रमाणे यंदाच्याही अर्थसंकल्पात भरीव अशी तरतूद केलेली आहे. किमान एक लाख कनेक्शन देण्यासंबंधीचा निर्णय राज्य सरकारने घेतलेला आहे. त्यासाठी आवश्यक असलेले ट्रान्सफॉर्मर, उप केंद्र इत्यादी सुविधा ठराविक वेळमध्ये पूर्ण करण्याबाबतचे 5 वर्षाचे नियोजन करण्यात आले आहे. हे नियोजन योग्य प्रकारे राबविण्यात येत आहे. वीज कनेक्शनसंबंधी ज्या प्रामुख्याने गोष्टी करणे आवश्यक आहेत त्या करण्यासंबंधीची कारवाई शासनातर्फे सुरू आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी सांगितले आहे की, सदर शेतकरी हा कर्जबाजारी नव्हता. आमच्याकडे अशी माहिती आहे की, लईक इब्राहीम शेख या 27 वर्षाच्या तरुणाने जिल्हा बँक, वैजनाथ बँक, भारतीय स्टेट बँक, इत्यादी बँकांकडून कूपनलिकेच्या कामासाठी कर्ज घेतले होते. त्याच्या कूपनलिकेला पाणी लागले होते.त्याने विद्युत पंपाला कनेक्शन मिळावे म्हणून अर्ज केला होता. एवढेच नव्हे तर त्याने आपल्य शेतामध्ये ऊसाची देखील लागवड केली होती. परंतु, वीज मंडळाकडे अर्ज-विनंत्या करून देखील त्याला कनेक्शन मिळत नव्हते म्हणून तो उदास झाला. त्यातून मग त्याने विष प्राशन करून आत्महत्या केली आहे, हे खरे आहे काय ? येथे मंत्रिमहोदयांनी सांगितले आहे की, भारनियमानामुळे शेतकऱ्याने आत्महत्या केली आहे. असे जर असते तर राज्यातील लाखो शेतकऱ्यांना आत्महत्या कराव्या लागल्या असत्या. तेव्हा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12820 ...

श्री.पांडुरंग फुंडकर...

माझा प्रश्न असा आहे की, या तरूण शेतकऱ्याने विविध बँकांकडून कर्ज काढून कूपनलिका घेतली होती व त्यास पंपासाठी विद्युत कनेक्शन न मिळाल्यामुळे आत्महत्या केली आहे हे खरे आहे काय ?

श्री.दिलीप वळसे पाटील : सभापती महोदय, लेखी उत्तर व्यवस्थित वाचले तर सगळे लक्षात येईल. लेखी उत्तरामध्ये नमूद केले आहे की, "सदर व्यक्तीने भार नियमनामुळे आत्महत्या केली आहे, असा निष्कर्ष काढणे सयुक्तिक नसल्यामुळे आत्महत्येच्या सदर घटनेची अधिक चौकशी करण्याबाबत पोलिसांना महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीतर्फे विनंती करण्यात आली आहे." याचा अर्थ भार नियमानामुळे आत्महत्या केली आहे, हे मान्य केलेले नाही. सभापती महोदय, येथे उत्तर देताना असे सांगितले आहे की, मृत व्यक्तीच्या नातेवाईकांनी भारनियमन सहन न झाल्यामुळे राग येऊन आत्महत्या केली असे FIR मध्ये नमूद केले आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय,"पोलिसांनी केलेल्या चौकशीअंती असा निष्कर्ष काढला आहे की, सततच्या भारनियमानामुळे रागात येऊन, सदर व्यक्तीने आत्महत्या केली आहे" असे नमूद केले आहे.

यानंतर श्री.बोर्डे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, या संदर्भात एफ.आय.आर. दाखल केला गेला. त्यानंतर कोणत्या कारणामुळे आत्महत्या झाली याबाबत निश्चितता झालेली नाही. पोलिसांनी या प्रकरणी जरी निष्कर्ष काढला असला तरी आम्ही स्पष्ट सांगितले आहे की, पोलिसांनी अशा निष्कर्षाप्रत येण्यापूर्वी वीज वितरण कंपनीशी संपर्क साधावयास पाहिजे होता. परंतु पोलिसांनी वीज वितरण कंपनीशी कसल्याही प्रकारचा संपर्क साधलेला नाही.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. शेतकऱ्याने आत्महत्या केली, विष प्राशन केले तर क्रिमीनल प्रोसिजर कोड अन्वये कारवाई होते. महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांना अशी चौकशी करण्याबाबत विधानमंडळाने कायदा करुन दिलेला आहे काय ? कारण चौकशी करण्याचे अधिकार गृह विभागाला आहेत. आपण उत्तरामध्ये स्पष्ट म्हटले आहे की, "करडखेल, ता.उद्गीर, जि.लातूर येथील एका व्यक्तीने विषारी द्रव प्राशन करुन, दिनांक 29/12/2005 रोजी आत्महत्या केली आहे. पोलिसांनी केलेल्या चौकशीअंती असा निष्कर्ष काढला आहे की, सततच्या भारनियमनामुळे रागात येऊन सदर व्यक्तीने आत्महत्या केली आहे." महोदय, असा निष्कर्ष काढण्याचा अधिकार कोणाला आहे ? माझ्या मते हा अधिकार पोलिसांनाच आहे. शिवाय वीज कंपनी तर या प्रकरणामध्ये पार्टी/गुन्हेगार आहे. पोलिसांनी या प्रकरणाबाबत निष्कर्ष काढलेला आहे आणि तो निष्कर्ष रेकॉर्डवर आलेला असल्यामुळे पुन्हा या ठिकाणी वेगळे मत नोंदविले जाणे म्हणजे, ती सभागृहाची दिशाभूलच होय. या प्रकरणासंदर्भात सन्माननीय विरोधी पक्षनेते, सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी आणि मी स्वत: जबाबदारीने सांगत आहोत की, कूपनलिकेसाठी या शेतकऱ्याने भू-विकास बँक, जिल्हा बँक, स्टेट बँक ऑफ इंडिया आणि वैजनाथ बँकेकडून कर्ज घेतले होते. आपल्या शेतामध्ये कूपनलिकेवर पंप बसविला जाणार म्हणून, त्याने ऊस लावला. कूपनलिकेवरील पंपासाठी आज वीज कनेक्शन मिळेल, उद्या मिळेल या आशेवर तो जगत होता. परंतु त्याला वीज कनेक्शन मिळाले नाही, म्हणून त्याने शेतामध्ये लावलेला ऊस वाळून गेला. महोदय, या प्रश्नाबाबत माननीय मंत्री महोदय जे उत्तर देत आहेत त्यामध्ये विसंगती आहे. माझी त्यांना विनंती आहे की, त्यांनी या प्रश्नाबाबत निश्चित माहिती घेऊन, सभागृहात उत्तर द्यावे. या ठिकाणी शब्दच्छल करुन, उत्तर पलटविणे योग्य होणार नाही.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12820....

श्री.नितीन गडकरी....

महोदय, लईक इब्राहीम शेख याने सततच्या भारनियमनामुळे रागात येऊन आत्महत्या केली आहे असा पोलिसांचा निष्कर्ष आहे. भारनियमन कोणाकडून केले जाते ? वीज वितरण कंपनीकडून भारनियमन केले जाते. शिवाय, ही कंपनी शासनाच्या अखत्यारित आहे. त्यामुळे या प्रकरणामध्ये शासनाचा संबंध येतो. ही आत्महत्या शासनाच्या निकषात बसून सुध्दा शासनाने मृत व्यक्तीच्या कुटुंबियाला 1 लाख रुपये आर्थिक मदत दिलेली नाही. त्यामुळे या प्रकरणाची पुन्हा चौकशी करुन, सभागृहात माहिती देणे आवश्यक आहे.

श्री.दिलीप वळसे-पाटील : महोदय, सन्माननीय सदस्यांनी उत्तरामधील केवळ एखादा परिच्छेद वाचणे आणि दुसऱ्या परिच्छेदांकडे सोयीस्कर दुर्लक्ष करणे योग्य नाही. महोदय, मी या ठिकाणी दिलेल्या उत्तरामध्ये विसंगती नाही. जी काही उत्तरे दिलेली आहेत, ती योग्य आहेत. एखाद्या शेतकऱ्याला किंवा मृताच्या नातेवाईकाला मदत देऊ नये अशा प्रकारची भूमिका माझी कदापिही नाही किंवा त्यांना न्याय नाकारण्याची सुध्दा नाही. परंतु मी सांगू इच्छितो की, पोलीस स्टेशनमध्ये एफ.आय.आर. दाखल केल्यानंतर प्राथमिक अंदाज व्यक्त केले जातात. डिटेल चौकशीअंती, त्या संदर्भातील गुन्हा फायनल करताना, अनेक वेळा सुरुवातीच्या कालावधीमध्ये आलेल्या मतामध्ये बदल सुध्दा होत असतो. परंतु मी सांगू इच्छितो की, ज्या दिवशी या व्यक्तीने आत्महत्या केली होती, त्या दिवसापर्यंत वीज कंपनीने त्या शेतकऱ्याला वीज कनेक्शन दिले नव्हते. त्याने लाईन कोठून घेतली होती ? ती अधिकृत होती की, अनधिकृत होती याबाबत...

श्री.नितीन गडकरी : मग त्याला काय कुत्रा चावला होता ?

श्री.दिलीप वळसे-पाटील : महोदय, त्याला कुत्रा चावला की, मांजर चावली ते आपण पहा.

नंतर श्री.कांबळे....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र 12820 ....

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य मोठ्याने बोलण्याचा प्रयत्न करत असतात.)

सभापती : माननीय मंत्रीमहोदय, शेतकऱ्याचा मृत्यूसंदर्भातील हा प्रश्न आहे. घडलेली घटना अशी आहे की, शेतकऱ्याने वीज कनेक्शनकरिता आपल्याकडे मागणी केली. परंतु माननीय मंत्रीमहोदय आपण उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, किमान 23-24 हजार पेंडपेन्डींग कनेक्शन्स आहेत आणि ही वस्तुस्थिती आहे. माननीय मंत्रीमहोदय या प्रकरणामध्ये शेतकऱ्याच्या मुलाची आत्महत्येची घटना घडलेली आहे. तरी, या अनुषंगाने सहानुभूतीपूर्वक आपण काही करु शकाल काय ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, या प्रश्नाचे उत्तर मी अगोदरच दिलेले आहे. आत्महत्यांसंदर्भात भरपाई देण्याचे शासनाचे जे काही निकष असतील, त्यामध्ये हे प्रकरण जर येत असेल तर डेफिनेटली संबंधित विभागाच्या माध्यमातून या मृताच्या कुटुंबियांना मदत देण्यात येईल.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, सदर शेतकऱ्याने आत्महत्या केली आहे. तसेच या प्रकरणी पोलिसांनी पंचनामाही केलेला आहे. सभापती महोदय, माननीय मंत्रीमहोदयांनी उत्तरामध्ये स्पष्ट लिहिले आहे की, " पोलिसांनी केलेल्या चौकशीअंती असा निष्कर्ष काढला आहे की, सततच्या भारनियमनामुळे रागात येऊन सदर व्यक्तीने आत्महत्या केली आहे". त्यानंतर पुढे असेही लिहिले आहे की, " सदर व्यक्तीने भारनियमनामुळे आत्महत्या केली आहे, असा निष्कर्ष काढणे संयुक्तिक नसल्यामुळे आत्महत्येच्या सदर घटनेची अधिक चौकशी करण्याबाबत पोलिसांना महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीतर्फे विनंती करण्यात आली आहे. " सभापती महोदय, यामध्ये एम.एस.ई.बी.ची फसवेगिरी आहे. शेतकऱ्याला न्याय मिळाला पाहिजे, त्याला नुकसानभरपाई दिली पाहिजे.

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत. या संदर्भात मी सभागृहामध्ये वारंवार सांगितले आहे की, मृताच्या नातेवाईकांनी जेव्हा एफ.आय.आर. दाखल केला, तेव्हा त्याने भारनियमनामुळे आत्महत्या केली, अशी तक्रार दिलेली आहे. ती तक्रार माझ्याकडे आहे. त्यामध्ये जरुर त्रुटी आहे. परंतु यामध्ये वीज मंडळ जबाबदार नाही कारण वीज मंडळाच्या माध्यमातून अधिकृत कनेक्शन त्या दिवसापर्यंत दिलेले नव्हते. म्हणून या

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील ....

संदर्भात वीज मंडळाच्या जबाबदारीचा प्रश्नच येत नाही. सभापती महोदय, अन्य आत्महत्यांप्रमाणे ही देखील आत्महत्या झालेली आहे. राज्य सरकारने इतर आत्महत्यांबाबत जे निकष लावले आहेत, तेच निकष लावून या प्रकरणामध्ये मृताच्या नातेवाईकाला मदत करण्यात येईल.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय मंत्रीमहोदय मघापासून एफ.आय.आर. एफ.आय.आर. म्हणत आहेत. सभापती महोदय, माननीय मंत्रीमहोदयांनी उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, " पोलिसांनी केलेल्या चौकशी अंती असा निष्कार्ष काढला आहे. " सभापती महोदय, हा एफ.आय.आर. आहे की चौकशी अंती केलेली माहिती आहे ? सभापती महोदय, ही घटना दिनांक 29.12.2005 ची आहे. त्या घटनेला आता जवळजवळ शंभर दिवस उलटले आहेत. शंभर दिवस उलटल्यानंतरही त्या संबंधिताचा मृत्यू कसा झालेला आहे हे यांना सांगता येत नाही. तरी, या संदर्भात माझा प्रश्न असा आहे की, या संदर्भात परत चौकशी करण्यासंदर्भात आपण कधी सांगितले ? आणि त्या शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना वीज कनेक्शन दिले आहे का ? आणि दिले असेल तर कशामुळे दिले आहे ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, या संदर्भातील एफ.आय.आर. कॉपी माझ्याजवळ आहे. मी तुम्हाला ती कॉपी वाचून दाखवितो. सभापती महोदय, प्राथमिक चौकशी, डिटेल चौकशी, अंतिम चौकशी, फायनल गुन्हा अशा वेगवेगळ्या कॅटेगरीज असतात.

(यानंतर श्री. वि. खर्चे ..

अशुधारित प्रत/ग्रंथसिद्धीसाठी नाही

सभापती : माननीय मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये एक बाब सांगितली आहे की, अन्य आत्महत्यामध्ये शासनाने ज्या प्रमाणे मदत केलेली आहे त्या पध्दतीने येथे आत्महत्या केलेल्या व्यक्तीला शासनातर्फे मदत करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात येईल. दुर्देवाची गोष्ट अशी आहे की, सदर शेतकऱ्यांने विजेचे कनेक्शन मिळण्यासाठी अर्ज केला होता. येथील परिस्थिती लक्षात घेऊन मानवतेच्या दृष्टीकोनातून विचार करुन सदर मृत मुलाच्या वडीलांना मदत देण्याची भूमिका शासनाने घ्यावी.

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, सदर शेतकऱ्यांने 2 जून 2005 रोजी विजेचे कनेक्शनसाठी अर्ज केलेला आहे. त्या जिल्हयात व सब डिव्हीजनमध्ये मार्च 2006 अखेरपर्यंत सर्व विजेचे कनेक्शन देण्यात आलेली आहेत. सदर शेतकऱ्यांने अल्पभूधारकाचे प्रमाणपत्र न दिल्यामुळे त्यांना कनेक्शन देण्यात आलेले नव्हते. त्यानंर त्यांनी अल्पभूधारकाचे प्रमाणपत्र सादर केल्यानंतर सदर शेतक-यास विजेचे कनेक्शन देण्यात आलेले आहे.

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य सभात्याग करतात)

<u>तारांकित प्रश्न क्रमांक 15844</u>

(माननीय सदस्य अनुपस्थित)

(सभात्याग केलेले माननीय सदस्य सदनामध्ये येतात)

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आम्ही सभागृहात नसतांना आमचा तारांकित प्रश्न पुकारण्यात आला होता. माननीय सदस्य श्री. सागर मेघे यांना न्याय देण्यासाठी हा प्रश्न घेण्यात यावा.

सभापती : ठीक आहे, हा प्रश्न शेवटच्या तीन मिनिटांमध्ये घेण्यात येईल.

.....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तारांकित प्रश्न क्रमांक 12963

सभापती : तारांकित प्रश्न क्रमांक 12963 मी पुढे ढकलेला आहे हा प्रश्न नंतर घेण्यात येईल.

शासनाच्या वतीने चित्रपटनिर्मितीसाठी अर्थसहाय्य वाढवून देण्यासंदर्भात असलेल्या अटींबाबत

(४) * १६३४६ श्री. मधुकर चव्हाण , श्री. विनोद तावडे : सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या वतीने चित्रपटनिर्मितीसाठी अर्थसहाय्य वाढवून देण्यासंदर्भात ११ ऑक्टोबर, २००५ रोजी काढलेल्या अध्यादेशात जाचक अटीचा समावेश असल्याने त्या शिथील करणेबाबतचे निवेदन मा. मुख्यमंत्री व सांस्कृतिक कार्यमंत्री यांना दिनांक १३ फेब्रुवारी, २००६ च्या सुमारास दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाच्या वतीने मराठी चित्रपट निर्मात्यांना दिले जाणारे अर्थसहाय्य त्वरित मिळाले नाही तर दिनांक २४ फेब्रुवारी, २००६ रोजी पासून मुंबईतील चित्रपटमहर्षी दादासाहेब फाळके यांच्या पुतळ्या जवळ सर्व निर्माते उपोषणास बसण्याचा इशाराही दिला, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या अध्यादेशातील जाचक अटी कोणत्या आहेत व त्या शिथील करण्याकरीता कोणती कार्यवाही केली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. अशोक चव्हाण : (१) होय.

(२) वृत्तपत्रामध्ये बातमी प्रसिध्द झाल्याचे आढळून येते.

(३) जाचक अट नसून योजनेच्या नियमावलीत आवश्यक असलेल्या अटी व शर्तीचा समावेश आहे.

तथापि चित्रपटांचे चित्रिकरण चित्रनगरी गोरेगांव, मुंबई व चित्रनगरी महामंडळ कोल्हापूर येथे झाले असेल त्यानांच वाढीव अनुदान अनुज्ञेय राहील या अटीच्या संदर्भात प्राप्त झालेल्या निवेदनाला अनुसरुन या दोन ठिकाणी किती चित्रीकरण करावयाचे याची सक्ती न ठेवता किमान काही प्रमाणात या दोन चित्रनगरीतील सोयी सुविधांचा वापर करावयाचे आहे असे स्पष्टीकरण दिनांक ८ मार्च, २००६ च्या पत्रान्वये महामंडळाला करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.....3.....

ता.प्र.क्र.16346..

श्री. मधूकर चव्हाण : सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाने चित्रपटनिर्मितीसाठी अर्थसहाय्य देतांना अनेक जाचक अटी घातलेल्या आहेत. चित्रपट निर्मितीसाठी अर्थसहाय्य देतांना ज्या अटी घातलेल्या आहेत त्यामध्ये चित्रपटाचे चित्रिकरण चित्रनगरी गोरेगाव, मुंबई व चित्रनगरी महामंडळ कोल्हापूर येथे झाले असेल तर त्यानांच वाढीव अनुदान देण्यात येईल अशी अट घातली गेलेली आहे. त्यानंतर 8 मार्च 2006 च्या पत्रान्वये या दोन ठिकाणी किती चित्रीकरण करावयाचे याची सक्ती न ठेवता किमान काही प्रमाणात या दोन चित्रनगरीतील सोयी सुविधांचा वापर करावयाचा आहे हे खरे आहे काय ? सुरुवातील ज्या अटी घातलेल्या आहेत त्या मध्ये आता वर्गवारी करण्यात आलेली आहे. पहिल्या वर्गाला 25 टक्के व दुसऱ्या वर्गाला 30 टक्के रुपये म्हणजे..

यानंतर श्री. सुंबरे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण (पुढे चालू...) ता.प्र.क्र.16346 ...

दुसऱ्या वर्गाला 20 लाख रूपये आणि तिसऱ्या वर्गाला म्हणजे क वर्गाला 15 लाख रूपये. तेव्हा माझा प्रश्न असा आहे की, ही जी समिती आहे त्या समितीने पाहणी केल्यानंतर एखाद्या चित्रपटाला तिने 'क' वर्ग दिल्यावर त्या चित्रपटला 5 लाख रूपयेच मिळणार आहेत. तेव्हा त्यांना पूर्वीप्रमाणे 15 लाख रूपये आपण देणार आहात का ? दुसरे म्हणजे कोल्हापूर आणि कोरेगावची जी चित्रनगरी आहे तेथे काहीही सुविधा नाहीत, असे असतानाही तेथे थोडे फार तरी चित्रीकरण केले पाहिजे तरच तुम्हाला शासनाची मदत मिळेल अशी जी अट आपण घातली आहे ती अन्यायकारक आहे असे आपणास वाटत नाही का ? तिसरे म्हणजे सहा महिन्यांच्या कालावधीमध्ये ही समिती जाहीर झाली त्यापूर्वीच्या काळामध्ये 25 चित्रपट तयार झालेले आहेत त्यांना काहीही मदत दिली जाणार नाही असे सांगण्यात आले आहे. तर त्या चित्रपटांचा देखील यासाठी विचार केला जाणार आहे काय ?

श्री. अशोक चव्हाण : सभापती महोदय, हे जे वर्गीकरण करण्यात आले होते त्यामागील आपली प्रमुख भूमिका ही होती की, दर्जेदार असे मराठी चित्रपट आपल्या राज्यामध्ये तयार व्हावेत. चांगले चित्रपट निर्माण केले गेले पाहिजेत अशी या मागे शासनाची भूमिका होती. दुसरे म्हणजे मुंबईतील चित्रनगरी जिला आपण दादासाहेब फाळके चित्रनगरी असे नाव दिले आहे ती किंवा कोल्हापूरची चित्रनगरी आहे तेथे थोडे तरी चित्रीकरण व्हावे अशी जी अट घातली आहे त्यामागे आपली अपेक्षा इतकीच होती की, ज्या सोयी-सुविधा त्या ठिकाणी राज्य सरकारने उपलब्ध करून दिल्या आहेत त्यांचा वापर व्हावा. आज खाजगी बंगल्यांमध्ये देखील चित्रीकरण होत असते. तेव्हा शासनाने एवढा पैसा खर्च करून या सुविधा तेथे निमाण करून दिल्या आहेत त्यांचा फायदा या मराठी चित्रपट निर्मात्यांनी घ्यावा. हिंदी व अन्य भाषांतील जे चित्रपट निर्माण होतात त्यांना तेथे चित्रीकरणासाठी वा अन्य सुविधांच्या वापरासाठी जे शुल्क लावले जाते त्यापेक्षा 50 टक्के कमी शुल्क आकारणी करून, सूट देऊन आपल्या मराठी चित्रपटांचे चित्रीकरण व्हावे ही त्यामागे अपेक्षा होती. परंतु या संदर्भात काही चित्रपट निर्मात्यांनी शासनाला भेटून सांगितले की, ही अट बदलण्याच्या दृष्टीने विचार व्हावा. तेव्हा त्यांना आम्ही सांगितले की, ठीक आहे, आम्ही तुमचे म्हणणे मान्य करतो. परंतु तेथे इतर ज्या चित्रपट निर्मितीतील गोष्टी आहेत उदा. डबिंग वगैरे यासाठी ज्या सोयी-सुविधा आपण निर्माण करून दिल्या आहेत त्यांचा तरी वापर तुम्ही करावा.

..... ओओ 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अशोक चव्हाण (पुढे चालू...) ता.प्र.क्र.16346 ...

आता या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी सांगितल्याप्रमाणे कोल्हापूरच्या चित्रनगरीमध्ये तेवढ्या सुविधा नाहीत आणि ती वस्तुस्थिती आहे. परंतु कोल्हापूर आणि मुंबई यातील कोठल्याही सुविधा आहेत त्यांचा फायदा चित्रपट निर्मात्यांनी घ्यावा अशी आपली भूमिका आहे. आणि म्हणूनच दोन्ही पैकी कोणत्याही ठिकाणच्या सुविधांचा फायदा त्यांनी घ्यावा अशी आपली अट आहे. सभापती महोदय, त्यानंतर मला मुद्दाम या ठिकाणी सांगितले पाहिजे की, काही चित्रपट निर्मात्यांना 31 मार्च रोजी 6 कोटी 20 लाख रूपये वितरित करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामध्ये 42 चित्रपट असे आहेत की, जे मध्यंतरीच्या काळामध्ये चित्रपट परीक्षण समिती गठित झालेली नव्हती त्या काळातील आहेत. त्यांचेकडूनर 6 कोटी 20 लाख दरूपये देण्याचा निर्णय आपण घेतलला आहे आणि 7 चित्रपट जे जानेवारी 2006 नंतर तयार झालेले आहेत त्यांचे परीक्षण करून त्यांचे बाबतीतही विचार केला जाईल. ...

श्री. नितीन गडकरी (बसून..) : आमदारांच्या भूमिका असलेल्या चित्रपटाला मदत करणार का ?

श्री. अशोक चव्हाण : त्यांचाही विचार करण्यात येईल.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, विविध चित्रपट महोत्सव, नाट्य परिषदेमध्ये विविध घोषणा माननीय मुख्यमंत्र्यांनी तसेच माननीय मंत्री महोदयांनी केलेल्या आहेत. आता चित्रनगरीच्या बाबतीत मला सांगितले पाहिजे की, मुंबईतील चित्रपटनगरीमध्ये मराठी चित्रपटांसाठी चित्रीकरणासाठीचे म्हणून जे भाडे आहे ते हिंदी सिनेमाच्या 50 टक्के इतके आकारले जाईल असे नामदार मंत्र्यांनी सांगितले. पण हिंदी सिनेमाचे बजेटच मुळी 100 कोटीचे असते आणि त्या मानाने विचार केला तर मराठी चित्रपटांचे बजेट हे 30 ते 50 लाखापर्यंत असते, जास्तीत जास्त एक कोटीचे असते. तेव्हा या बाबतीत हिंदी सिनेमाशी तुलना आपण कशासाठी करता ? आपल्याला मराठी चित्रपटांना खरोखरी मदत करावयाची असेल, कारण आज आपले मराठी चित्रपट चित्रीकरणासाठी आपल्या चित्रनगरीमध्ये जात नाहीत कारण त्यांना ते परवडत नाही म्हणून. आता तर आपण तेथे जवळपास उंच इमारती बांधण्यास परवानगी दिली असल्याने एक नवीनच अडचण उभी राहिलेली आहे. पण आपण स्वतंत्रपणे मराठी चित्रपटांसाठी दिवसाला अमुक इतके भाडे याप्रमाणे शुल्क आकारणी कराल का ?

(यानंतर श्री. खंदारे .... पीपी 1 ..

अशुद्धित प्रत / मुद्रणेसाठी नाही

आपण स्वतंत्रपणे मराठी चित्रपटासाठी दिवसासाठी इतके भाडे घ्या की, जे त्यांना परवडू शकते. त्यामुळे हिंदी भाषिक किंवा अन्य भाषेतील चित्रपटांची तुलना न करता मराठी चित्रपटासाठी त्याप्रमाणे दर लावला जाईल काय ?

श्री.अशोक चव्हाण : मराठी चित्रपटाची हिंदी भाषेतील किंवा अन्य भाषेतील चित्रपटांशी तुलना केलेली नाही. सर्वसाधारणपणे आज मार्केटमध्ये जे रेट लावले जातात ते पाहूनच मराठी चित्रपटांसाठी रेट लावलेले आहेत. त्याबाबत मराठी चित्रपट निर्मात्यांचा त्याबाबत आक्षेप असेल तर हे दर 50 टक्क्यांवरुन कमी करुन 25 टक्क्यापर्यंत आणण्याचा निर्णय घेतला जाईल.

श्री.विलास अवचट : सभापती महोदय, "अध्यादेशातील जाचक अटीचा समावेश असल्याने त्या शिथिल करण्याबाबतचे निवेदन माननीय मुख्यमंत्र्यांना दिले आहे, हे खरे आहे काय, या प्रश्नाला होय असे उत्तर दिलेले आहे. दुसरा प्रश्न असा होता की, "सर्व निर्मात्यांनी उपोषणास बसण्याचा इशारा दिला आहे, हे खरे आहे काय, या प्रश्नाला "वृत्तपत्रामध्ये बातमी प्रसिध्द झाल्याचे आढळून येते," असे म्हटले आहे. पहिल्या उत्तरात निवेदन दिल्याचे मान्य केले आहे, हे निवेदन संबंधितांनी वाचले नव्हते काय ? हा माझा पहिला प्रश्न आहे. तसेच वर्तमानपत्रामध्ये बातमी प्रसिध्द झाल्यावर शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली आहे ?

श्री.अशोक चव्हाण : यासंबंधी निवेदन प्राप्त झाले आहे काय ? असा प्रश्न विचारला होता त्याला "होय" असे उत्तर दिलेले आहे. सर्व निर्मात्यांनी उपोषणास बसण्याचा इशारा त्या निवेदनामध्ये दिला होता का हे पहावे लागेल. परंतु वर्तमानपत्रातील बातम्यांच्या आधारे माहिती मिळाली आहे. या सर्व चित्रपट निर्मात्यांची बैठक घेतल्यानंतर सध्याच्या अटींमध्ये बदल केला आहे.

श्री.प्रकाश शेंडगे : माननीय मंत्रिमहोदयांना माझा साधा प्रश्न आहे. ही चित्रपट परीक्षण समिती गठित होण्यासाठी शासनाने 2 वर्षांचा विलंब केला आहे. मध्यंतरीच्या काळामध्ये 35 चित्रपट निर्मात्यांना बँकेकडून जप्तीच्या नोटीसा आल्या आहेत. शासनाने ही समिती गठित केल्यानंतर 42 चित्रपट निर्मात्यांना अर्थसहाय्य वाढवून दिले आहे. परंतु शासनाच्या दिरंगाईमुळे ज्या निर्मात्यांनी बँकेकडून कर्ज घेतले होते त्यांना जप्तीच्या नोटीसा आल्या आहेत. त्यांच्या कर्जावरील व्याज माफ केले जाणार आहे काय ?

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अशोक चव्हाण : नवीन सरकार आल्यानंतर सर्व समित्या बरखास्त केल्या होत्या. त्यामुळे 6-7 महिने ही समिती अस्तित्वात नव्हती. त्यानंतर शासनाने 7.10.2005 रोजी ही समिती गठित केली आहे. त्यामुळे माननीय सदस्य म्हणतात त्याप्रमाणे कार्यवाही करता येणार नाही.

श्री.उल्हास पवार : अध्यक्ष महाराज, या प्रश्नाच्या अनुषंगाने मी शासनाला एक विचारु इच्छितो. मराठी चित्रपट, मराठी नाटक व लोककला यासंबंधी खास करुन , निमार्ते, दिग्दर्शन, कलावंत यांच्यासाठी भूमिका घेणारे हे पहिले सरकार आहे त्याबद्दल मी सरकारचे अभिनंदन करतो. माझा प्रश्न असा आहे की, मराठी चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष श्री.अजय सरपोतदार यांनी हा प्रश्न मांडला होता. मंत्रालयाच्या संपूर्ण कार्यपध्दतीच्या अटींमुळे, लालफितीमुळे सर्व निर्मात्यांची अडचण होत आहे. म्हणून हा मार्ग आणखी सुकर कसा होईल, जास्तीत जास्त सोपे कसे करता येईल, अनेक कागदपत्रे उपलब्ध करुन देण्यापेक्षा सोपे कसे करता येईल यादृष्टीने शासन प्रयत्न करील काय ? त्याचप्रमाणे श्री.अजय सरपोतदार यांनी शासनाच्या उत्कृष्ट योजनांबाबत जाहीर समारंभामध्ये अभिनंदन केले आहे हे खरे आहे काय ?

श्री.अशोक चव्हाण : सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार हे चित्रपट परीक्षण समितीचे सदस्य आहेत. अनुदानासंबंधीची शासनाची कार्यपध्दती आहे. ती अधिक सोपी करावी, सिंगल विंडोचा माननीय सदस्यांनी उल्लेख केला आहे. ही कार्यपध्दती सुटसुटीत करावी, लालफितीमध्ये योजना अडकून न राहता मार्गी कशी लावता येईल यासंबंधी माननीय सदस्यांच्या सूचना असतील तर त्यांनी जरुर कराव्यात, त्या सूचनांप्रमाणे बदल करण्याचे शासनाचे धोरण आहे. श्री.अजय सरपोतदार यांनी शासनाचे जाहीर अभिनंदन केल्याची बातमी वर्तमानपत्रामध्ये आली असावी, परंतु वर्तमानात्रामध्ये टीकात्मक बातमी लवकर येते, परंतु पॉझिटिव्ह बातमी लवकर येत नाही. पण श्री.अजय सरपोतदार यांचे मी शासनाच्यावतीने आभार मानतो.

नंतर श्री.किल्लेदार.....

अशुधारित प्रत / मुद्रणासाठी नाही

ता.प्र.क्र.16346 (पुढे सुरु....

श्रीमती कांता नलावडे : सभापती महोदय, दुसऱ्या उपप्रश्नाला उत्तर दिलेले आहे की, "वृत्तपत्रामध्ये बातमी प्रसिध्द झाल्याचे आढळून येते." परंतु त्यांनी निवेदनामध्ये मराठी चित्रपट निर्मात्यांना दिले जाणारे अर्थसहाय्य त्वरित मिळाले नाही, तर 24 फेब्रुवारीपासून सर्व निर्माते उपोषणास बसण्याचा इशारा दिलेला आहे हे खरे आहे काय ?

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, मी मधाशी स्पष्ट केलेले आहे की, निवेदनामध्ये ज्या गोष्टींचा उल्लेख आहे, त्याप्रमाणे ते उपोषणाला बसणार आहे की नाही, हे मला निश्चित सांगता येणार नाही. तशी वृत्तपत्रामध्ये बातमी प्रसिध्द झाल्याचे आढळून येते. त्यांचे निवेदन आता माझ्याकडे उपलब्ध नाही. महत्वाचे निर्णय झालेले आहेत. त्यांचे समाधान झालेले आहे.

श्री.प्रमोद नवलकर : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी कबूल केले की, कोल्हापूर चित्रनगरीचा दर्जा चांगला नाही. दर्जा चांगला नाही त्या ठिकाणी शुटिंग सक्तीचे करणे कितपत योग्य आहे ? दोन्हीपैकी एक असेही म्हटलेले नाही. दुसरा प्रश्न असा आहे की, मुंबई येथील चित्रनगरीचा ताबा टी.व्ही.सिरियलचे शुटींग करण्यासाठी घेतलेला आहे. त्यामुळे तेथील स्टुडिओ उपलब्ध होत नाहीत. त्या ठिकाणी आपल्या मराठी चित्रपटाच्या चित्रीकरणाला प्राधान्य देणार आहात काय ? तिसरा प्रश्न असा आहे की, मराठी चित्रपट निर्माण झाल्यानंतर त्या चित्रपटांना थिअटर उपलब्ध करुन देणार आहात काय ?

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, माजी सांस्कृतिक मंत्र्यांनी आपले अनुभवाचे बोल व्यक्त केलेले आहेत. मराठी चित्रपटांना थिअटर उपलब्ध व्हावीत, अशी महत्वाची बाब त्यांनी व्यक्त केलेली आहे. आता मल्टिप्लेक्स थिअटरना शासनाने परवानगी दिलेली आहे. शासनाच्या धोरणाप्रमाणे त्या ठिकाणी वर्षातील काही दिवस मराठी चित्रपट प्रदर्शित करावेत, अशी सक्ती केलेली आहे. याची अंमलबजावणी गृह विभाग करत असतो. ते पालन करत नसतील तर त्यांच्यावर गृह विभागाच्या वतीने ताबडतोबीने निश्चित कारवाई केली जाईल. या बाबतची सांस्कृतिक विभागाकडूनही दक्षता घेतली जाईल. सन्माननीय सदस्यांनी मराठी चित्रपटांना मुंबईतील स्टुडिओ उपलब्ध होत नाहीत, अशी खंत व्यक्त केलेली आहे. गोरेगाव येथील स्टुडिओंचा ताबा टीव्ही सिरियलच्या चित्रीकरणासाठी घेतलेला आहे. त्या ठिकाणी मराठी चित्रपटांच्या चित्रीकरणासाठी तेथील स्टुडिओ निश्चित उपलब्ध करुन दिला जाईल, यामध्ये काही अडचण नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अमरावती येथील सामान्य रुग्णालयामध्ये विशेषज्ञ सेवा सुरु करण्याबाबत

(5) * 13101 **प्रा. बी. टी. देशमुख , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , श्री. वसंतराव खोटरे , श्री. नानासाहेब बोरस्ते , श्री. जी. एल. अैनापूरे : तारांकित प्रश्न क्रमांक 9817 ला दिनांक 12 डिसेंबर, 2005 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) विभागीय स्तरावर विशेष सेवा (सुपर स्पेशालिटी) अमरावती येथे सुरु करण्याच्या दृष्टीने इमारतीच्या अंदाजे 6 कोटी 63 लक्ष रुपयांचा 23 ऑक्टोबर 2001 रोजीच्या शासन निर्णयाने प्रशासकीय मान्यता प्राप्त प्रकल्पाच्या बांधकामाची सद्यस्थिती काय आहे,

(2) आतापावेतो या प्रकल्पावर वर्षवार व एकूण किती निधी खर्च झालेला आहे,

(3) कार्यपूर्तीसाठी अजून किती निधीची आवश्यकता आहे ?

श्री.रणजित कांबळे,डॉ.विमल मुंदडा यांच्याकरिता : (1) संदर्भ सेवा रुग्णालय अमरावती या इमारतीची रंगरंगोटी व इतर किरकोळ कामे वगळता स्थापत्य काम जवळपास पूर्ण झाले आहे. विद्युत कामातील उद्वाहन व वातानुकूलीत यंत्रणेचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच विद्युत संच फिटींगचे काम बाकी आहे.

(2) सदर प्रस्तावावर आतापर्यंत खालीलप्रमाणे निधी खर्च झालेला आहे.

लाखात

वर्ष	**प्राप्त निधी**	**सदर प्रस्तावावर आतापर्यंत खालील प्रमाणे निधी खर्च झालेला आहे.**
2001-02	8.70	8.72
2002-03	43.48	43.48
2003-04	108.70	108.72
2004-05	206.53	206.53
2005-06	173.91+ 175.88	143.51 (2/06 पर्यंत)

(3) कार्यपूर्तीसाठी सन 2006-07 मध्ये आवश्यकते एवढी तरतूद करण्यात आली आहे.

अशुद्धित प्रत / शोधनीसाठी नाही

SKK/ SBT/ MHM/

ता.प्र.क्र.13101 (पुढे सुरु....

प्रा.बी.टी.देशमुख : तिसऱ्या उपप्रश्नाला कार्यपूर्तीसाठी सन 2006-07 मध्ये आवश्यकते एवढी तरतूद करण्यात आलेली आहे," असे म्हटलेले आहे, ही किती तरतूद केलेली आहे ? त्यापेक्षाही महत्वाचा प्रश्न असा आहे की, अमरावती जिल्हा हा मागासलेला जिल्हा आहे. काल आपण पाहिलेले आहे की, मध्यम प्रकल्प होता त्या ठिकाणी 10 वर्षांनी लघू प्रकल्प केला. तसाच प्रकार याही ठिकाणी केलेला आहे. पहिल्यांदा सहा सुपर स्पेशालिटीसाठी 13 कोटी 25 लाखाची तरतूद केली होती. त्यानंतर दुसरा शासन निर्णय काढून 6 कोटी 63 लक्ष रुपयाची तरतूद केलेली आहे. त्यापैकी ज्या कमी महत्वाच्या आहेत, अशा तीन सुपर स्पेशॅलिटीज झालेल्या आहेत. माझे म्हणणे असे आहे की, उर्वरित 3इस्पेशॅलिटीज पूर्ण करण्याच्यादृष्टीने शासन निर्णय एक महिन्यात काढला जाऊन त्यांचे काम सुरु होईल काय ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, दोन फेजमध्ये काम घेतलेले आहे. पहिल्या फेजमध्ये 6.63 लाख एवढा खर्च झालेला आहे. आतापर्यन्त सुपर स्पेशालिटीचे काम पूर्ण होत आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले त्याप्रमाणे दुसऱ्या फेजमध्ये तीन सुपर स्पेशालिटीजची सर्व्हीस देण्याच्याबाबतीत 1 महिन्यात जी.आर.काढला जाईल.

यानंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 13101 .....

प्रा. बी. टी. देशमुख : मी माननीय मंत्रिमहोदयांना धन्यवाद देऊ इच्छितो की, 13 कोटीचे काम 6 कोटीवर आणले आणि ते 6 कोटी रुपयांचे काम पूर्ण होत आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, एक महिन्यामध्ये उरलेल्या भागाच्या बाबतीत जी.आर. काढणार. मी त्याबाबत विचारु इच्छित नाही. या उत्तरामध्ये शेवटी असे म्हटले आहे की, कार्यपूर्तीसाठी सन 2006-07 मध्ये आवश्यकतेएवढी तरतूद करण्यात आली आहे. यामध्ये किती तरतूद करण्यात आली आहे ?

श्री. रणजित कांबळे : सन 2006-07 मध्ये आम्ही जवळपास 14.55 कोटी रुपयांची मागणी केलेली आहे. ही मागणी नाशिक आणि अमरावती या दोन्ही सुपर स्पेशालिटीसाठी आहे.

डॉ. दीपक सावंत : या उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, संदर्भ सेवा रुग्णालय, अमरावती या इमारतीची रंगरंगोटी व इतर किरकोळ कामे वगळता स्थापत्य काम जवळपास पूर्ण झाले आहे. म्हणजेच काही काम बाकी आहे. यामध्ये त्या ठिकाणी विशेषज्ञ संदर्भ सेवेसाठी लागणाऱ्या इन्स्ट्रूमेंटस्चा अंतर्भाव आहे काय ? त्यासाठी लागणाऱ्या निधीचा यामध्ये अंतर्भाव आहे काय ? ज्या सहा विशेषज्ञ सेवा त्या ठिकाणी सुरु करणार त्यासाठी आपल्याकडे स्टाफ आहे काय ? आपण डॉक्टर्सची नेमणूक केलेली आहे काय ?

श्री. रणजित कांबळे : यामध्ये दोन भाग आहेत. जवळपास 1 कोटी 80 लाख रुपयांची जी तरतूद केलेली आहे ती उर्वरित बांधकामासाठी आहे आणि 14 कोटी 55 लाख रुपयांची जी मागणी केलेली आहे ती इन्स्ट्रूमेंटस्साठी आहे. यामध्ये त्यांच्या पगाराचा सुध्दा समावेश आहे.

डॉ. दीपक सावंत : त्या ठिकाणी विशेषज्ञ डॉक्टर्स आहेत काय ?

श्री. रणजित कांबळे : वित्त विभागाकडे पद निर्मितीसाठी मागणी केलेली आहे. आम्हाला ऑगस्टपर्यंत त्यांची मान्यता मिळेल अशी अपेक्षा आहे.

सभापती : आज प्रश्नोत्तराच्या तासामध्ये 9 मिनिटांचा वेळ अन्य विषयाच्या चर्चेमध्ये गेला त्यामुळे तेवढा वेळ मी प्रश्नोत्तरासाठी वाढवून देत आहे. दररोज असे करणार नाही. ज्यावेळी आवश्यक असेल त्यावेळीच अशाप्रकारे प्रश्नोत्तराचा तास वाढवून देईन.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नागपूर येथील मेयो रुग्णालयातील वैद्यकिय अधिकाऱ्यांची अपुरी संख्या

(6) * 14230 श्री. नितीन गडकरी : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) नागपूर येथील मेयो रुग्णालयातील 15 ते 20 डॉक्टरांच्या दिनांक 22 डिसेंबर, 2005 रोजी राज्य शासनाने आदेश काढून बदल्या केल्या, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, मेयो रुग्णालयाच्या अधिष्ठाता नोव्हेंबर, 2005 पासून रजेवर आहेत, तसेच अनेक वरिष्ठ डॉक्टर्स दिनांक 31 डिसेंबर, 2005 पूर्वी निवृत्त झाले आहेत व आता झालेल्या 15 ते 20 डॉक्टरांच्या बदल्यामुळे या रुग्णालयाच्या वैद्यकीय सेवेवर गंभीर परिणाम झाला आहे व रुग्णाचे हाल होत आहेत, हे खरे आहे काय,

(3) असल्यास, सर्व रिक्त पदे भरण्यासाठी व रुग्णांना नियमित आरोग्य सेवा उपलब्ध करण्यासाठी कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे ?

श्री. सुरेश शेट्टी, श्री. दिलीप वळसे-पाटील यांच्याकरिता : (1) शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील सहयोगी प्राध्यापक व प्राध्यापक पदावर तदर्थ पदोन्नतीचे प्राधिकार संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना प्रदान करण्यात आले आहेत. त्यानुसार संचालनालयाच्या दि.15-12-2005 च्या आदेशान्वये इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय व संलग्न रुग्णालय, नागपूर येथील 12 अध्यापकांच्या तदर्थ पदोन्नतीसह बदलीचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

(2) इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर या संस्थेच्या अधिष्ठाता नोव्हेंबर,2005 पासून रजेवर असून त्यांचा कार्यभार संस्थेतील अन्य ज्येष्ठ अध्यापकांकडे सोपविण्यात आला आहे.

सन 2005 मध्ये सदर संस्थेतील एकही अध्यापक सेवानिवृत्त झालेला नाही. तत्पुर्वी वेळोवेळी सेवानिवृत्त झालेल्या अध्यापकांची रिक्त पदे तदर्थ पदोन्नतीने भरण्यात आली आहेत.

संचालनालयाच्या दि.15-12-2005 च्या आदेशान्वये 12 अध्यापकांची तदर्थ पदोन्नतीने बदली करण्यात आली असली तरी त्यापैकी फक्त 5 अध्यापकांनी पदोन्नती स्विकारली असून अन्य 7 अध्यापक अद्याप त्याच संस्थेत कार्यरत आहेत.

त्यामुळे तेथील रुग्णसेवा तसेच प्रशासकीय कामकाज यावर कोणताही गंभीर परीणाम झालेला नाही.

(3) उपरोक्त संसथेतील सहयोगी प्राध्यापक संवर्गातील काही रिक्त पदे तदर्थ पदोन्नतीने भरण्यात आली असून सहयोगी प्राध्यापक पदावर तदर्थ पदोन्नतीमुळे रिक्त झालेली काही पदे विभागीय निवड मंडळामार्फत तात्पुरत्या स्वरुपात भरण्यात आली आहेत. तसेच प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व अधिव्याख्याता संवर्गातील रिक्त पदे सरळसेवा प्रवेशाने नियमित स्वरुपात भरण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे मागणीपत्र पाठविण्यात आले आहे.

श्री. नितीन गडकरी : मेयो कॉलेजमध्ये सध्या डॉक्टरांची किती पदे रिक्त आहेत ? ती पदे भरण्याकरिता एमपीएससीकडे किती दिवसांपासून मागणी करीत आहात ? ही पदे किती दिवसांपासून रिक्त आहेत ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ SBT/

ता.प्र.क्र. 14230.....

श्री. सुरेश शेट्टी : इंदिरा गांधी मेडिकल कॉलेजमध्ये असोसिएटस् प्रोफेसर्सची 5 पदे रिक्त आहेत आणि लेक्चरर्सची 6 पदे रिक्त आहेत. 13 तारखेला आम्ही जाहिरात काढलेली आहे. 400 पदांसाठी जाहिरात काढलेली आहे.

श्री. नितीन गडकरी : ही पदे किती दिवसात भरणार ?

श्री. सुरेश शेट्टी : प्रोसेस सुरु झालेली आहे.

श्री. नितीन गडकरी : तीन महिन्यांच्या आत ही पदे भरली जाणार काय ?

श्री. सुरेश शेट्टी : सन्माननीय सदस्यांना माहीत आहे की, ही पदे आपण एमपीएससीमार्फत भरतो..

श्री. नितीन गडकरी : त्या ठिकाणी 10-11 पदे रिक्त आहेत. लोकांना त्या ठिकाणी सेवा मिळत नाही त्यामुळे गरीब लोकांना दुसऱ्या ठिकाणी जावे लागते. लोकांना सामोरे जाऊ शकत नाही म्हणून तेथील अधिष्ठाता रजेवर गेले आहेत. तेथील रिक्त जागा तीन महिन्याच्या आत भरल्या जातील काय ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : ही सगळी पदे क्लास वन आणि क्लास टू ची असल्यामुळे त्यांची रिक्रुटमेंट पब्लिक सर्व्हिस कमिशनच्या माध्यमातून करण्यात येते. राज्यामध्ये लेक्चरर्सची 508 पदे रिक्त आहेत त्यापैकी 409 पदे भरण्याच्या संदर्भात 3 तारखेला पब्लिक सर्व्हिस कमिशनने जाहिरात काढलेली आहे. त्यांच्या रिक्रुटमेंटची जबाबदारी पब्लिक सर्व्हिस कमिशनची असल्यामुळे त्यांच्या वेळापत्रकाप्रमाणे लवकरात लवकर ही पदे भरुन घेण्याबाबत विभाग आग्रही आहे. त्यांचाही सर्व राज्याचा रिक्रुटमेंट प्रोग्राम असतो.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MHM/ SBT/ 14:20

(ता.प्र.क्र. 14230.....) (श्री. दिलीप वळसे पाटील....

राज्यातील सगळया मेडिकल कॉलेजेसमध्ये लेक्चरर्स्ची 508पदे, असोसिएट प्रोफेसरची 87 पदे आणि प्रोफेसरची 73 पदे आणि डेण्टलची काही पदे रिक्त असून ही पदे भरण्याच्या संदर्भात पब्लिक सर्व्हिस कमिशनकडे राज्य सरकारने मागणी नोंदविलेली आहे. ही पदे लवकरात लवकर भरली जावीत असा आग्रह आम्ही पब्लिक सर्व्हिस कमिशनकडे धरीत आहोत.

डॉ. दीपक सावंत : महाराष्ट्रामध्ये एकूण किती पदे रिक्त आहेत आणि जी मागणी आपण नोंदविलेली आहे ती मागणी किती दिवसात पूर्ण होईल अशी आपणास अपेक्षा आहे ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : या प्रश्नाचे उत्तर मी दिलेले आहे. लेक्चरर्स्ची 508 पदे, असोसिएट प्रोफेसरची 87 पदे, प्रोफेसरची 73 पदे आणि डेण्टलमधील पदे रिक्त आहेत. लेक्चरर्स्ची पदे भरण्यासाठी एमपीएससीकडे दिनांक 15.2.2005 रोजी, असोसिएट प्रोफेसरची पदे भरण्यासाठी दिनांक 21 मार्च रोजी आणि प्रोफेसरची पदे भरण्यासाठी दिनांक 15 मार्च रोजी मागणी नोंदविलेली आहे. तसेच डेण्टलच्या पदांच्या बाबतीतही मागणी केलेली आहे. ह्या सर्व टिचिंग पोस्टस् तीन-चार महिन्याच्या आत भरल्या जाव्यात असा आम्ही एमपीएससीकडे आग्रह धरलेला आहे.

प्रा. जोगेंद्र कवाडे : नागपूरच्या इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालयामध्ये बदल्या व निवृत्तीमुळे डॉक्टरांच्या 15-20 जागा रिक्त झालेल्या आहेत. त्यामुळे गरीब रुग्णाचे हाल होत आहेत. याबाबतीत शासनाने पर्यायी व्यवस्था केलेली आहे काय ?

श्री. सुरेश शेट्टी : मी आधीच सांगितलेले आहे की, त्या ठिकाणी असोसिएट प्रोफेसरच्या 5 आणि लेक्चरर्सच्या 6 जागा रिक्त आहेत.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : मघाशी मी ता.प्र.क्र. 15844 हा शेवटच्या तीन मिनिटामध्ये घेण्यात येईल असे सांगितले होते. तो प्रश्न मी आता घेत आहे.

राज्यात विजेच्या विविध ग्राहकांकडे असलेली ८६०९ कोटी रुपयांची थकबाकी

(२) * १५८४४ श्री.सागर मेघे , श्री. नितीन गडकरी , श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. जगदिश गुप्ता : सन्माननीय **ऊर्जा (अपारंपारिक ऊर्जा वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विजेच्या विविध ग्राहकांकडे असलेली ८६०९ कोटी रुपयांच्या थकबाकी संदर्भात महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनीने वसुलीसाठी कोणत्या उपाययोजना केल्या आहेत,

(२) अद्यापपावेतो, म्हणजेच माहे फेब्रुवारी, २००६ पर्यंत किती वसुली करण्यात आली,

(३) थकबाकी वसुलीसाठी अद्याप कोणतीही उपाययोजना केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.दिलीप वळसे-पाटील : (१) व (२) राज्यातील वीज वितरण कंपनीच्या विविध वर्गवारीतील ग्राहकांकडे जानेवारी २००५ अखेर व जानेवारी २००६ अखेर खालीलप्रमाणे थकबाकी होती.

जानेवारी २००५ अखेर - रु.८६०९.३६ कोटी

जानेवारी २००६ अखेर - रु.९०३९.८३ कोटी

घरगुती, व्यापारी व औद्योगिक ग्राहकांकडील जानेवारी २००५ अखेर असणारी थकबाकी जानेवारी, २००६ अखेरपर्यंत रु.११३.५३ कोटीने कमी झाली आहे. मात्र या कालावधी दरम्यान कृषी, यंत्रमाग, सार्वजनिक पाणी पुरवठा व सार्वजनिक दिवाबत्ती या वर्गवारीतील ग्राहकांकडील थकबाकी रुपये ४५६.८४ कोटी वाढ झाली आहे.

वर्ष २००४ व वर्ष २००५ मध्ये (जानेवारी ते डिसेंबर) वितरण कंपनीने आकारणी केलेल्या व वसूल केलेल्या रक्कमेचा तपशील खालील प्रमाणे आहे.

वर्ष	आकारणी केलेली रक्कम/रु.कोटी.	वसूल केलेली रक्कम/रु. कोटी.	वसुलीची टक्केवारी
२००४	१३२३३.६१	११,५१७.८४	८७.०३
२००५	१३८४६.७९	१२६६९.८१	९१.५०

वरील तपशीलाप्रमाणे जानेवारी २००६ अखेर असणाऱ्या थकबाकीच्या तुलनेत वाढ झाल्याचे दिसून येत असले तरी वर्ष २००५ मध्ये वितरण कंपनीने वसूल केलेली रक्कम वर्ष २००४ मध्ये वसूल केलेल्या रक्कमेच्या तुलनेत अधिक आहे.

थकबाकी वसुलीसाठी वितरण कंपनीतर्फे खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(अ) रु.५,०००/- पेक्षा अधिक थकबाकी असणाऱ्या ग्राहकांचा विद्युत पुरवठा त्वरित खंडित करण्याबाबत सर्व संबंधिताना सूचना देण्यात आल्या आहेत. जानेवारी २००५ ते जानेवारी २००६ या कालावधी दरम्यान विविध वर्गवारीतील ७,१७,५९८ थकबाकीदार ग्राहकांचा विद्युत पुरवठा खंडित करण्यात आला होता आणि यापैकी ३,११,०२७ ग्राहकांकडून रुपये २१५.४६ कोटी वसूल करण्यात आले आहेत.

(ब) ज्या ग्राहकांचा विद्युत पुरवठा कायमस्वरुपी खंडित (परमनंट डिसकनेक्शन) करण्यात आला आहे. अश्या ग्राहकांकडील थकबाकी वसुलीसाठी नागपूर (शहर) व नागपूर (ग्रामीण), कल्याण, भांडूप व पुणे येथे परिमंडळ स्तरावर प्रादेशिक वसुली अधिकारी, जिल्हा वसुली अधिकारी व वसुली निरिक्षकांची नेमणूक करण्यात आली आहे. या मार्फत कायम स्वरुपी निद्युत पुरवठा खंडित केलेल्या ग्राहकांकडील थकबाकीपैकी अद्यापपर्यन्त रुपये ६.०७ कोटी इतक्या थकबाकीची वसूली झाली आहे.

(क) कृषी,यंत्रमाग व सार्वजनिक पाणी पुरवठा या तीन वर्गवारीतील ग्राहकांसाठी "संजीवनी'' योजना राबविण्यात आल्या होत्या. या योजनांच्या परिणामस्वरुप सदर वर्गवारीतील ग्राहकांकडील अनुक्रमे रुपये १३४५.२७ कोटी, रुपये ५४.४८ कोटी व रुपये ४१.७५ कोटी थकबाकी वसूल झाली आहे.

(ड) घरगुती, व्यापारी व लघुदाब औद्योगिक वर्गवारीतील कायमस्वरुपी विद्युत पुरवठा खंडित झालेल्य ग्राहकांना थकबाकी भरण्यास उत्तेजन मिळावे, या दृष्टीकोनातून व्याजाच्या आकारणीत ५०% पर्यंत सवलत देण्याविषयी एक योजना ऑक्टोबर २००५ पासून अंमलात आणण्यात आली असून या योजनेची मुदत मार्च २००६ पर्यन्त आहे. या योजनेस ३ महिने मुदतवाढ देण्याबाबतचा प्रस्ताव वितरण कंपनीच्या विचाराधीन आहे.

(३) थकबाकी वसुलीसाठी वितरण कंपनी प्रयत्नशील असून वर नमूद केल्याप्रमाणे उपाय योजना करण्यात येत आहेत.

श्री. सागर मेघे : सभापती महोदय, वीज कनेक्शन अभावी राज्यातील शेतकरी आत्महत्या करीत आहेत. एमएसईबीकडे जवळपास 9 हजार 39 कोटी रु.ची थकबाकी आहे. 2005मधील वसुलीची टक्केवारी 91 टक्के असल्याचे शासनाने सांगितलेले आहे. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, या थकबाकी पैकी चालू बिलाची थकबाकी किती आहे ? तसेच उद्योजक आणि राज्य शासनाचे विविध विभाग यांच्याकडून किती थकबाकी वसूल व्हावयाची आहे.

श्री. दिलीप वळसे पाटील : 31.1.2006 अखेर पर्यन्त पुढील प्रमाणे थकबाकी आहे. कृषी ग्राहक 208 कोटी रु., सार्वजनिक पाणी पुरवठा योजना 866 कोटी रु., यंत्रमाग 302 कोटी रु., घरगुती वापर 800 कोटी रु., इतर वापर 248 कोटी रु. , औद्योगिक वापर 396 कोटी रु. अशी

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

एकूण 1451 कोटी रु. थकबाकी आहे. मुळा प्रवराकडे 476 कोटी रु. आंतर्राज्यीय 75 कोटी रु., टाटाकडे 1 कोटी 86 लाख रु. अशी एकूण 9हजार 39 कोटी रु. थकबाकी आहे.

श्री. यशवंतराव गडाख : कृषी संजीवनी योजनेंतर्गत थकबाकीची वसुली झालेली असून महाराष्ट्रातील शेतक-यांनाही या योजनेचा फायदा झालेला आहे. तेव्हा ही कृषी संजीवनी योजना शासन पुनश्च चालू करणार काय ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : एक गोष्ट मला सभागृहामध्ये स्पष्ट केली पाहिजे की, एमईआरसीने जेव्हा टॅरिफ वाढवून दिले त्यावेळी 5 हॉर्स पॉवरला 2100 रु. टॅरिफ असताना राज्यामध्ये 5 हॉर्स पॉवरसाठी 700 रु. आणि 900 रु. अशा दोन कॅटेगरी केलेल्या होत्या.

...नंतर श्री. कानडे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 15844 पुढे सुरु...

श्री. दिलीप वळसे-पाटील...

तसेच 1400 कोटी रु. राज्य शासनाच्या वतीने शेतकऱ्यांच्या विजेची बिले भरण्यासाठी अशी गेल्या 5 वर्षात 5000 कोटी पेक्षा जास्त रक्कम राज्य शासनाने शेतकऱ्यांच्या विजेची बिले भरण्यासाठी मंडळाला दिलेली आहे. अशा वेळी दुष्काळात सापडलेल्या शेतकऱ्यांना मदत करण्याच्या दृष्टिकोनातून वीज बिल भरले जावे आणि वीज कनेक्शन तोडले जाणार नाही यासाठी यासाठी शासनाने कृषी संजीवनी योजना आणि नळपाणी पुरवठा योजनांसाठीची एक योजना राबविली होती. या योजनेनुसार काही आर्थिक भार वीज मंडळाने आणि काही आर्थिक भार राज्य शासनाने उचलायचा होता. ॲम्नेस्टी स्कीम एकदाच द्यावयाची असते. वारंवार अशा प्रकारची योजना शासन करावयाला लागले तर लोकांमध्ये अशा प्रकारची भावना निर्माण होईल की शासन काही ना काही सवलत देणार आहे आणि आर्थिक भार उचलणार आहे. याचा परिणाम वीज बिलांच्या वसूलीवर सुध्दा होईल. दिवसेंदिवस महाग वीज घेत असताना इफिशिअंट पध्दतीने रिकव्हरी करणे हाच मार्ग त्यामध्ये असू शकेल. अशा प्रकारची कृषी संजीवनी योजना पुन्हा राबविण्याचा निर्णय मंत्रिमंडळाला घ्यावा लागेल. त्याची घोषणा येथे करता येणार नाही. कारण यामध्ये वित्तीय भाराचा प्रश्न असल्यामुळे मंत्रिमंडळालाच याबाबत निर्णय घेता येईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापतीमहोदय, थकबाकीच्या वसूलीसाठी वीज वितरण कंपनी कोणती उपाययोजना करीत आहे याची माहिती उत्तरामध्ये दिलेली आहे. 2005-06 या कालावधीत विविध वर्गातील 7 लाख 17 हजार 598 ग्राहकांचा वीज पुरवठा खंडित करण्यात आला आहे. या ग्राहकांपैकी कृषी पंपधारक ग्राहक किती आहेत आणि उद्योजक किती आहेत ? त्याचप्रमाणे कृषी पंपधारकांकडील थकबाकी किती आहे आणि उद्योजकांकडील थकबाकी किती आहे ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, डिसेंबर 2005 अखेर औद्योगिक ग्राह 2146 असून त्यांच्याकडे 403 कोटी रुपयांची थकबाकी आहे. कृषी पंपधारकांची 2869 कोटी रुपयांची थकबाकी आहे.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, 2004 आणि 2005 या वर्षांमध्ये वीज बिलापोटी आकारणी केलेली रक्कम पाहिली तर 2004 च्या मानाने 2005 सालामध्ये भारनियमन जास्त असताना देखील जास्त रक्कम आकारणी केली आहे हे शासनाला मान्य आहे काय ? 2005 मध्ये

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 15844 पुढे सुरु...

ॲड.अनिल परब ...

वीज पुरवठा कमी झाला असेल तर आकारणी जास्त कशी करण्यात आली ? कारण या संपूर्ण वर्षात वीज दरात सुध्दा फरक पडलेला नाही. कमी सप्लाय असताना देखील जास्त आकारणी दाखविलेली आहे. तसेच थकबाकीमध्ये काही अधिकारी देखील सामील असतात. बऱ्याच वेळेला पैसे घेऊन वीज बिले आकारली जात नाहीत. अशा किती अधिकाऱ्यांवर आतापर्यंत कोणती कारवाई करण्यात आली ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, आकारणी जास्त होत आहे याचे कारण ग्रोथ होत असतो. नवीन कनेक्शन होत असतात आणि विजेचा वापर सुध्दा वाढत असतो त्याप्रमाणे बिलाच्या रकमेत वाढ होते. विजेची चोरी आणि बिलांची वसूली यासंदर्भात कायदा केलेला आहे. वीज अधिनियम 2003 मध्ये यासंबंधात विविध तरतुदी करण्यात आल्या आहेत. मागील आठवडयातच किती अधिकाऱ्यांवर याबाबत कारवाई केली याची माहिती सदनाला दिलेली आहे. याबाबतची माहिती आता माझ्याजवळ उपलब्ध नाही. आवश्यकता असेल तर ही माहिती पुन्हा सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपला.

यानंतर श्री. खर्चे पी.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

वाढदिवसाबद्दल अभिनंदन.

श्री. जितेंद्र आव्हाड : महोदय, आपल्या सभागृहाचे सन्माननीय सदस्य डॉ. वसंत पवार यांचा आज वाढदिवस असल्यामुळे सभागृहाच्या वतीने मी त्यांचे अभिष्टचिंतन करतो.

औचित्याच्या मुद्दयासंबंधी

श्रीमती कांता नलावडे : सभापती महोदय, औचित्याच्या मुद्दयाच्या माध्यमातून एका गंभीर घटनेकडे मी सभागृहाचे व शासनाचे लक्ष वेधू इच्छिते.

महोदय, महाराष्ट्र राज्यासारख्या प्रगतशील राज्यामध्ये निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना जातीवाचक शिव्या देऊन त्यांच्यावर बहिष्कार घालण्यात येतो ही शरमेची बाब आहे. ही घटना मुरबाड तालुक्यातील नांदिली गावांमध्ये घडली आहे. या गावात नाभिक समाजाचे तीन सदस्य ग्रामपंचायतीवर निवडून आलेले आहेत. या तिघांनाही गावातील इतर सर्व ग्रामपंचायतीच्या सदस्यांनी बहिष्कृत केलेले आहे, त्यांना ग्रामपंचायतीमध्ये येऊ देत नाही तसेच कामही करु देत नाहीत. त्या गावातील नाभिक समाजाचे अध्यक्ष काल माझ्याकडे आले होते व त्यांनी मला विचारले की, आम्ही यापुढे निवडणुकीसाठी उभे रहावयाचे की नाही ? आम्हाला लोकांनी निवडून दिलेले आहे तरी देखील अशा प्रकारे बहिष्कार घातला जातो. याबाबत अनेक तक्रारी करुन त्याची दखल घेतली जात नाही. म्हणून माझी शासनाला विनंती आहे की या लोकप्रतिनिधींना न्याय मिळाला पाहिजे. याच प्रकारचा तारांकित प्रन सुध्दा आजच्या यादीमध्ये आलेला आहे. अशा प्रकारच्या घटना या राज्यात घडत असतील तर त्याबाबत शासनाने गांभीर्याने लक्ष दिले पाहिजे.

सभापती : माननीय ग्रामविकास मंत्री सभागृहात उपस्थित आहेत, त्यांनी या बाबीची नोंद घ्यावी.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, राज्यातील खाजगी वैद्यकीय महाविद्यालयातील आरक्षण आणि त्यांच्या फी स्ट्रक्चरबाबत बाहेर चित्रविचित्र चर्चा सुरु आहे. साधरणपणे 7 लाख रुपये एवढी फी या महाविद्यालयांकडून आकारली जाणार आहे आणि यामध्ये शासनाने हस्तक्षेप करण्याची गरज आहे. मी या माध्यमातून एवढेच सांगू इच्छितो की, आज

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत .....

आपल्या राज्यात जी काही कॉलेजेस आहेत ती सर्व सत्ताधाऱ्यांची आहेत. कालच सभागृहात माननीय उर्जा मंत्री श्री. दिलीप वळसे-पाटील यांनी एस.सी./ एस.टी. तसेच मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या आरक्षणाबाबत अध्यादेश काढणार आहोत असे सांगितले. कारण त्यांना कायदयात बदल करण्यासाठी सध्या वेळ नाही. यासंदर्भातील निर्णय हा महाराष्ट्राच्या आरोग्याच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा ठरणार आहे. म्हणून माझी शासनाला अशी विनंती आहे की, या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना न्याय मिळणार काय आणि कॉलेजची फी शासन कमी करणार काय ?

श्री. दिलीप वळसे-पाटील : महोदय, मध्यंतरीच्या काळात सुप्रिम कोर्टाने खाजगी व्यावसायिक शिक्षण संस्थांमध्ये आरक्षणाच्या संदर्भात एक निर्णय दिलेला आहे. हा निर्णय दिल्यानंतर आा खाजगी व्यावसायिक शिक्षण संस्थांमध्ये आरक्षण ठेवावयाचे की नाही याबाबत चर्चा सुरु झाली. याबाबत केंद्रीय मानव संसाधन व विकास मंत्री माननीय श्री. अर्जुनसिंग यांनी सर्व राज्यांच्या शिक्षण मंत्र्यांची एक परिषद बोलावली होती. त्या परिषदेमध्ये आपल्या राज्याची बाजू लेखी स्वरुपात मांडलेली आहे. त्यानंतर अशी अपेक्षा होती की, केंद्रशासनानेच यासंबंधीचा सर्वंकष असा कायदा करावा व तो सर्वच राज्यांना लागू करावा.

यानंतर श्री. भारवि .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे पाटील...

संसदेमध्ये प्रश्न निर्माण झाला त्यावेळी केंद्र सरकारने कायदा करण्याऐवजी राज्य घटनेमध्ये बदल करून प्रत्येक राज्यांना या संदर्भातील स्वत:चा कायदा करण्यासंबंधी तरतूद केली आहे. प्रत्येक राज्यांना आपल्या गरजेप्रमाणे कायदा बनिवण्यासाठीचा अधिकार देण्यात आलेला आहे. अशाप्रकारचा कायदा करण्यासाठी राज्य सरकारने कार्यवाहीला सुरूवात केली आहे. ज्या वृत्तपत्रात बातमी आली त्या पत्रकाराला मी हेच सांगितले होते की, आता कायद्याचे प्रारूप जवळपास पूर्ण झालेले आहे. त्यामुळे हे विधेयक सभागृहापुढे चर्चेसाठी मांडण्यात येईल. समजा सभागृहामध्ये चर्चा होऊन देखील मंजूर होऊ शकले नाही तर मग आवश्यकता वाटल्यास वटहुकूम काढून विद्यार्थ्यांना संरक्षण देण्याचा प्रयत्न करू. सभागृहासमोर विधेयक न आणता मंत्री स्वत:च्या वेळेनुसार अध्यादेश काढणार आहेत अशाप्रकारचे जे विधान केले आहे, ते वेदना देणार आहे. या संदर्भात मी सांगू इच्छितो की, राज्य सरकारने कायद्याचे प्रारूप तयार केले असून ते लवकरात लवकर मंत्रिमंडळापुढे मान्यतेसाठी ठेवण्यात येईल. मंत्रिमंडळाची मान्यता घेतल्यानंतर ते सभागृहासमोर आणण्याचा आमचा प्रयत्न राहील.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, औचित्याच्या मुद्याद्वारे मी एका महत्त्वाच्या गोष्टीकडे शासनाचे लक्ष वेधत आहे. अनुदानपात्र ठरणाऱ्या शाळांची यादी 30 मार्च पूर्वी जाहीर करण्यात येईल असे उत्तर मंत्रिमहोदयांनी दिले होते. यासंबंधी सभापती महोदय आपण सुध्दा निदेश दिले होते. पण पाच दिवस होऊन गेल्यानंतर देखील शासनातर्फे अजून यादी जाहीर करण्यात आलेली नाही. माननीय मंत्रिमहोदय सभागृहात उपस्थित असल्याने त्यांनी आज किंवा उद्या शाळांची यादी जाहीर करावी अशी मी विनंती करीत आहे.

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, अजून काही शाळांचे मूल्यांकन होणे बाकी आहे. जेवढया शाळांचे मूल्यांकन झाले आहे, तेवढया शाळांची यादी जाहीर करण्यात येईल.

पृ.शी./मु.शी.: विधेयक मंजूर करून देण्याबाबत.

श्री.दिलीप वळसे पाटील : सभापती महोदय, विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या दृष्टिकोनातून जे विधेयक सभागृहात मांडण्यात येईल ते लवकरात लवकर मंजूर होण्यास आपलीसुध्दा मदत असावी.

सभापती : आपल्याला दोन्ही बाजूकडील सन्माननीय सदस्यांची मदत मिळेल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: औचित्याच्या मुद्यांसंबंधी...

प्रा.शरद पाटील : सभापती महोदय, औचित्त्याच्या मुद्याद्वारे मी आपल्या मार्फत शासनाचे एका महत्त्वाच्या प्रश्नाकडे लक्ष वेधत आहे. नर्मदा आंदोलनाच्या नेत्या श्रीमती मेधा पाटकर हया गेल्या सात दिवसांपासून दिल्लीमध्ये उपोषणाला बसल्या आहेत. नर्मदा सरोवराच्या धरणाची उंची वाढविण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे कळल्यावरून त्या उपोषणाला बसल्या आहेत. महाराष्ट्राने धरणाची उंची वाढविण्याच्या निर्णयाला मान्यता देऊ नये अशी विनंती श्रीमत मेधा पाटकर यांनी शासनाला केली आहे. त्यावेळी शासनाने यासंबंधी कॅबिनेटमध्ये निर्णय घेण्याचे आश्वासन दिले होते. तथापि, हा निर्णय पुढे रेटण्याचा प्रयत्न मध्यप्रदेश व गुजरात शासनाने चालविला आहे. हा निर्णय अंमलात आणला तर हजारो कुटुंब विस्थापित होणार आहेत. आतापर्यंत जे विस्थापित झाले आहेत, त्यांचे पुनर्वसन झालेले नसताना त्यात पुन्हा नवीन विस्थापितांची भर नवीन निर्णयामुळे होणार आहे. त्यामुळेच नर्मचा बचाल आंदोलनाच्या नेत्यांनी त्यास विरोध केला आहे. गेल्या सात दिवसांपासून श्रीमती मेधा पाटकर यांचे उपोषण सुरू आहे. त्यामुळे त्यांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे. अशा या गंभीर प्रश्नाकडे शासनाने लक्ष देऊन श्रीमती मेधा पाटकर यांना उपोषण मागे घेण्यास सांगावे. तसेच उंची वाढविण्यास महाराष्ट्र शासनाचा विरोध आहे हे संबंधित राज्य शासनाला आणि केंद्र शासनाला कळविण्यात यावा.

सभापती : शासनाने याची नोंद घ्यावी

श्री.विजयसिंह मोहिते पाटील : होय.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, बुलढाणा जिल्हयातील कैकाडी समाजातील अल्पवयीन मुलीवर बलात्कार केल्यासंदर्भात या सभागृहामध्ये नियम 93 अन्वये सूचना उपस्थित करण्यात आली होती. या सुचनेवरील निवेदनाला माननीय गृह राज्यमंत्री महोदयांनी उत्तर दिले होते. या बलात्कार घटनेमधील आरोपी श्री.संजय गायकवाड हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा बुलढाणा जिल्हयाचा उपाध्यक्ष आहे. त्याच्यावर खंडणी, अपहरण, जीवे मारण्याची धमकी देणे अशा प्रकारचे गुन्हे आहेत. शिवाय त्याला तडीपार सुध्दा करण्यात आले होते. महोदय, ही घटना 20 मार्च रोजी घडलेली आहे. आज 4 एप्रिल म्हणजे जवळजवळ 15 दिवस होत आलेले असताना सुध्दा, या घटनेतील एकाही आरोपीला अटक झालेली नाही. त्यामुळे दुर्दैवाने कैकाडी समाजातील 10-12 महिला उपोषणाला बसल्या आहेत. त्यामुळे माननीय गृहमंत्री महोदयांनी या ठिकाणी ठोस आश्वासन देऊन, त्या महिलांचे उपोषण सोडवावे. त्यांनी केवळ आश्वासितच करु नये तर या घटनेतील गुन्हेगारांना अटक करावी एवढेच या औचित्याच्या मुद्याद्वारे निदर्शनास आणून देऊन इच्छितो.

सभापती : माननीय गृह राज्यमंत्री महोदयांनी या संदर्भात योग्य ती कार्यवाही करावी.

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : होय.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

श्री.रणजित कांबळे (ग्रामविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यावरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल सन 2003-2004 व महाराष्ट्रातील जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांचे सन 1999-2000 व 2000-2001 चे एकत्रित वित्तीय व महसुली लेखे सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल तसेच एकत्रित वित्तीय व महसुली लेखे सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

श्री.अशोक चव्हाण (उद्योग व खनिकर्म मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचा सन 2002-2003 चा एकेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ मर्यादितचा सन 2004-2005 चा एकतिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

श्री.बाळासाहेब थोरात (कृषी मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाचा सन 2003-2004 चा बत्तीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: उपविधान समितीचा अहवाल सादर करणे.

श्री.शांताराम करमळकर (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने उपविधान समितीचा दुसरा अहवाल सभागृहास सादर करीत आहे.

महोदय, हा अहवाल सादर करीत असताना अहवालातील एका प्रमुख शिफारशीचा उल्लेख करणे आवश्यक आहे. ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या अखत्यारितील जिल्हा परिषदेमधील सहाय्यक कनिष्ठ अभियंता, मेस्त्री श्रेणी-1, मेस्त्री श्रेणी-2, रोड कारकून, मस्टर क्लार्क, समयपाल व अनुरेखक या सात संवर्गांचे एकत्रिकरण करुन, "स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक" हा एकच संवर्ग निर्माण करण्यात आल्याने या सहाय्यकांना इव्हॅल्युएशन व एम.बी.रेकॉर्ड करण्यासाठी किमान 50 हजार रुपयांपर्यंतचे आर्थिक अधिकार देण्यात यावेत अशी शिफारस अहवालात करण्यात आली आहे.

सभापती : उपविधान समितीचा अहवाल सादर करण्यात आला आहे.

नंतर श्री.कांबळे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. / मु.शी.: महिलांचे हक्क व कल्याण समितीचा नववा अहवाल सादर करणे.

श्रीमती सुधा जोशी (समिती सदस्य) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने महिलांचे हक्क व कल्याण समितीचा नववा अहवाल सभागृहाला सादर करते.

अध्यक्ष महोदय, नाशिक जिल्हापरिषदेच्या सेवेतील महिला अधिकारी / कर्मचारी यांची भरती, आरक्षण, अनुशेष व पदोन्नती तसेच त्यांच्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांबाबत तसेच महिला सुरक्षा पोलीस विशेष कक्ष, नाशिक, महिला कारागृह, नाशिक रोड व महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ, पैठण याबाबतच्या नवव्या अहवालात प्रामुख्याने खालील शिफारशी करण्यात आल्या आहेत.

नवीन बचत गट स्थापन करतानाच सध्या जे बचत गट आहेत, त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी त्या क्षेत्रात उपलब्ध असलेल्या कच्च्या मालावर आधारित छोटे छोटे उद्योगधंदे सुरु करण्यासाठी प्रशिक्षण देण्याची योजना आखण्यात यावी जेणेकरुन प्रत्येक बचत गटास दरमहा सरासरी रुपये 2000 मिळतील.

महाराष्ट्र शासनाने नाशिक येथे महिला सुरक्षा पोलीस विशेष कक्ष स्थापन करावे यासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात आले व त्यानुसार नाशिक येथील महिला सुरक्षा पोलीस विशेष कक्ष दिनांक 8 मार्च, 2005 रोजी स्थापन करण्यात आला व या सुरक्षा कक्षास मिळणारा चांगला प्रतिसाद लक्षात घेता शासनाने नाशिक येथील महिला सुरक्षा पोलीस विशेष कक्षाच्या आकृतीबंधाप्रमाणे राज्यात असे 45 कक्ष सुरु करण्याचा निर्णय घेऊन त्याकरिता 365 कर्मचाऱ्यांची पदे मंजूर केलेली आहेत ती मंजूर पदे त्वरित भरण्यात यावीत व या कक्षाचे काम लवकरात लवकर सुरु करण्यात यावे.

येवला येथे पैठणी साडी तयार करण्याचा उद्योग जास्त प्रमाणावर असल्याने येवला येथे पैठणी विणकाम प्रशिक्षण केंद्र सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव उद्योग विभागाने वित्त विभागास सादर करावा. धन्यवाद !

सभापती : महिलांचे हक्क व कल्याण समितीचा नववा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : लेखी उत्तरे

मु.शी.: दिनांक 8 एप्रिल, 2005 रोजीच्या माहितीच्या मुद्यांवरील अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, " शिवसेना कार्यकर्ते श्री. पंडित देशमुख, रा. मोहोळ, जि. सोलापूर यांच्या हत्येच्या तपासाबाबत " या विषयावरील सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी व इतर वि.प.स. यांनी उपस्थित केलेल्या माहितीच्या मुद्यावरील दिनांक 8 एप्रिल, 2005 रोजी चर्चेच्या वेळी सार्वजनिक बांधकाम मंत्री यांनी सभागृहात दिलेल्या आश्वासनाच्या पूर्ततेच्या दृष्टीने अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आली.

(प्रेस : येथे अधिक माहिती छापावी.)

..3

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नियम 93 अन्वये सूचना

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील, वि.प.स. यांनी " दिनांक 1 एप्रिल, 2006 च्या सुमारास घेरंड (तालुका अलिबाग, जिल्हा रायगड) येथील खाडीलगत काम चालू असताना ठेकेदाराच्या निष्काळजीपणामुळे उधाणाचे पाणी शेकडो एकर भात शेतीत घुसून झालेले नुकसान " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या प्रकरणासंदर्भात शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्या श्रीमती संजीवनी रायकर व इतर वि.प.स. यांनी " फेब्रुवारी-मार्च, 2006 मध्ये झालेल्या दहावी व बारावीच्या परीक्षांमध्ये झालेल्या असंख्य चुका व त्रुटी, दोन्ही परीक्षांच्या वेळी कॉपी प्रकारात झालेली वाढ " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या प्रकरणासंदर्भात शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. सुरेश जेथलिया व इतर वि.प.स. यांनी " मराठवाड्यातील बहुतांश भागात चिकन गुनिया रोगाची झालेली लागण, त्यामध्ये आनंदगाव (जिल्हा बीड) येथे एक महिला दगावणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या प्रकरणासंदर्भात शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत, वि.प.स. यांनी " दिनांक 3 एप्रिल, 2006 रोजीच्या सुमारास ब्राह्मणगाव विंचूर, ता. लासलगाव, जि.नाशिक येथील 19 वर्षीय शेतकऱ्याने कर्जापायी केलेली आत्महत्या " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या प्रकरणासंदर्भात शासनाने निवेदन करावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती ....

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी " शासनाने राज्यातील कुपोषणाकरिता अब्जावधी रुपये खर्चूनही जानेवारी, 2006 अखेरपर्यंत चौदा हजार बळी जाणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या प्रकरणासंदर्भात शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्या श्रीमती कांता नलावडे, वि.प.स. यांनी " नांदेली (ता.मुरबाड, जि.ठाणे) येथील नाभिक समाजाच्या तीन ग्रामपंचायत सदस्यांना इतर सदस्यांनी बहिष्कृत करणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या प्रकरणासंदर्भात शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. कन्हैयालाल गिडवाणी, वि.प.स. यांनी " दिनांक 22 मार्च, 2006 रोजी माननीय मुख्यमंत्र्यांनी मुंबई, ठाणे आणि पुणे वगळता अन्य शहरांमधील कमाल जमीन धारणा कायदा जुलै, 2006 पूर्वी रद्द करण्यात येईल, अशी केलेली घोषणा " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या प्रकरणासंदर्भात शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी व इतर वि.प.स. यांनी " राज्य शासनाने शेतकऱ्यांना वेठीस धरणाऱ्या सावकारांचा बीमोड करण्यासाठी घेतलेली खंबीर भूमिका, परंतु बुलढाणा जिल्ह्यातील शेतकऱ्यांना या निर्णयाचा लाभ न होणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या प्रकरणासंदर्भात शासनाने निवेदन करावे.

..5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती ....

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री सागर मेघे, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी व इतर वि.प.स. यांनी " फेब्रुवारी, 2006 मध्ये नागपूर येथील मनोरुग्णालयात दलालांची टोळी सक्रिय असल्याचे उघडकीस येणे व रुग्णालयात होत असलेले गैरप्रकार " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या प्रकरणासंदर्भात शासनाने निवेदन करावे.

(यानंतर श्री. वि. खर्चे ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती...

यानंतर श्री. विनोद तावडे नितीन गडकरी व इतर वि.प.स. यांनी " सिंधुदुर्ग जिल्हयातील 60 टक्के नळ पाणी पुरवठा योजना दुरुस्ती अभावी किंवा पाण्याचे स्त्रोत चुकल्याने बंद असल्यामुळे जिल्हयात जाणवणारी तीव्र पाणी टंचाई" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. हा नियम 93 चा विषय होत नसल्याने मी सूचनेचस अनुमती नाकरीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आर्वी येथील पत संस्थेमध्ये ठेवीदारांच्या लाखो रुपयांच्या ठेवी मिळाल्या नाहीत व तेथील संचालक मंडळ फरार झालेले आहे या विषयाच्या संदर्भात मी नियम 93 अन्वये सूचना दिलेली आहे, यासंदर्भात शासनास निवदेन करावयास सांगावे अशी माझी विनंती आहे.

सभापती : सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी जो विषय मांडलेला आहे त्यासंदर्भात सुध्दा शासनाने निवेदन करावे.

.....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: पर्यवेक्षकास विद्यार्थ्यांनी केलेली मारहाण

मु.शी.: पर्यवेक्षकास विद्यार्थ्यांनी केलेली मारहाण याबाबत श्री. जयंत प्र. पाटील, श्रीमती संजीवनी रायकर, श्री. रामनाथ मोते, श्री. प्रतापराव सोनावणे, वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. हसन मुश्रीफ (शालेय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, श्री. जयंत प्र. पाटील, श्रीमती संजीवनी रायकर, श्री. रामनाथ मोते, श्री. प्रतापराव सोनावणे, वि.प.स. यांनी "पर्यवेक्षकास विद्यार्थ्यांनी केलेली मारहाण " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती तिला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवदन करावयाचे आहे, निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस येथे सोबतचे निवेदन छापावे)

.....3....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, श्री. चामले हे पर्यवेक्षक ज्या विद्यालयात पर्यवेक्षक म्हणून काम करीत होते तेथील परीक्षेच्या वेळी तेथील विद्यार्थ्यांनी गडबड केली, कॉपी करीत असतांना त्यांना पकडले आहे. सदर विद्यार्थ्यी त्या विद्यालयाचे नसून ते दुस-या विद्यालयामधून येत होते. त्या विद्यार्थ्यांचे सदर परीक्षा केंद्र रद्द करण्यात आले व त्यांची एस.एस.सी परीक्षा रद्द करण्यात आली ही गोष्ट खरी आहे काय ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, हे खरे आहे, पर्यवेक्षक श्री. चामले यांना विद्यार्थ्यांकडून मारहान करण्यात आल्याने सदर विद्यार्थ्यांवर भारतीय दंड विधान 323-504 व 427 या कलमाखाली गुन्हा दाखल केलेला आहे. श्री. चामले यांना जबरदस्त मारहान झालेली असल्यामुळे अजून त्यांचा जाब-जबाब नोंदविण्यात आलेली नाही, आता पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

श्रीमती संजीवनी रायकर : सभापती महोदय, दिवसेंदिवस कॉपी करण्याचे प्रमाण वाढत चालेले आहे. उत्तरप्रदेश, बिहार सारखी परिस्थिती आपणाकडे दिसत आहे. यामध्ये 10 ते 12 विद्यार्थी दोषी आहेत त्यांना शिक्षा मिळाली आहे काय ? अशी अनेक प्रकरणे हुतात्मा राजगुरु विद्यालयात घडलेली आहेत. श्री. चामले या पर्यवेक्षकास मारहाण करण्यात आल्यामुळे सदर विद्यार्थ्यांवर काय कारवाई करण्यात आलेली आहे ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, सदर प्रकरणातील विद्यार्थी अजून सापडलेले नाहीत. श्री. चामले यांना बेदम मारहाण झालेली असल्यामुळे त्यांचे जाब-जबाब नोंदवावयाचे काम पूर्ण झालेले नाही. त्यांनी ओळख सांगितल्यानंतर सदर विद्यार्थ्यांना पकडण्यात येईल व निश्चितपणे कडक अशी कारवाई त्यांच्यावर करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

.....4....

श्री. यशवंतराव गडाख : सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये 10 वी व 12 वी च्या परीक्षेच्या काळामध्ये परीक्षा केद्रावर आपण जर पाहिले तर मग तो शहरी भाग असो किंवा ग्रामीण भाग असो त्या परीक्षा केंद्राच्यासमोर प्रचंड अशी गर्दी असते. त्यामुळे कॉपी करण्याचे प्रमाण हे वाढलेले आहे. या कॉपी करण्याच्या प्रकारामध्ये विद्यार्थी, त्यांचे पालक, शिक्षक आणि पोलीस यांचा सुध्दा सहभाग असल्याचे चित्र संपूर्ण महाराष्ट्रात आपणास पाहावयास मिळते. या सर्व प्रकाराला आळा घालण्यासाठी शिक्षण पध्दतीमध्ये काही बदल आपणाला करता येतील काय, परीक्षा पध्दतीत काही सुधारणा करता येतील काय यादृष्टीकोनातून महाराष्ट्रातील तज्ज्ञ, शिक्षण विभाग, व इतर तज्ज्ञ मंडळीसह लोकप्रतिनिधी यांच्याशी चर्चा करुन परीक्षा पध्दतीमध्ये काही सुधारण करण्याच्या दृष्टीने शासन विचार करणार आहे काय ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, आज लक्षवेधी क्रमांक 3 ही कॉपीबद्दल आहे माझी विनंती अशी आहे की यावेळी याबाबत आपणास सविस्तर चर्चा करता येईल. या निवेदनाच्या अनुषंगाने मारहाणी बद्दल चर्चा व्हावी असे मला वाटते.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, या ठिकाणी शिक्षकांनी कॉपी करण्यास प्रतिबंध केला म्हणून मारहाण झालेली आहे. शासनाने उत्तरामध्ये असे स्पष्ट म्हटलेले आहे की, गंभीर स्वरुपाची मारहाण झालेली आहे.

यानंतर श्री. सुंबरे...

अशुधारित प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री. मोते ....

आज ही घटना घडून जवळजवळ 13-14 दिवस झालेले आहेत. अद्यापही त्यांचे निवेदन मिळालेले नाही. तर ते किती दिवसात घेणार आहात ? तसेच या निवेदनात म्हटले आहे की, त्या जिल्ह्याच्या शिक्षणाधिकाऱ्यांना आपण आदेश दिलेले आहेत की, याबाबत चौकशी करून अहवाल सादर करावा. तर हा अहवाल आपल्याला किती दिवसात अपेक्षित आहे आणि आपण त्यावर किती दिवसात कारवाई करणार आहात ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, या प्रकरणी फिर्याद नोंद झालेली आहे आणि त्यातील कलमे देखील मी येथे सांगितली आहेत. यामध्ये ज्या पर्यवेक्षकांना मारहाण झालेली आहे ती इतकी जबर आहे की, त्यामुळे त्यांचा जबाब अद्याप घेतला गेलेला नाही, घेणे शक्य झालेले नाही. मात्र शिक्षणाधिकाऱ्यांनी आपला जबाब नोंदविला आहे पण त्यांना या प्रकरणांतील आरोपी मुलांची नावे सांगता आलेली नाहीत. परंतु ही मुले राजगुरू विद्यालय,पांडव नगर,पुणे यांची असावित असा संशय आहे. त्या शाळेचे तेथे 24 विद्यार्थी होते. सभापती महोदय, गेल्या वर्षीपासून तेथे थोडा तणाव आहे. 12वीची परीक्षा राजगुरू विद्यालय,पांडव नगर,पुणे येथे मार्च 2005 मध्ये सुरू असताना या परीक्षा केंद्रावर राजगुरू विद्या ालयातील विद्यार्थ्यांनी आपटे प्रशालेतील विद्यार्थ्याला मारहाण केली होती. त्यामुळे हे परीक्षा केंद्र तेथून स्थलांतरित करून विद्याभवन इंग्लिश मिडियम स्कूल, मॉडेल कॉलनी, पुणे येथे नेण्यात आले. तेव्हा तेथील 10वी व 12वी चे केंद्र बदलले हा राग मनात ठेवून तसेच शिक्षकांनी परीक्षेमध्ये कॉपी करू दिली नाही हाही राग मनात धरून त्यांनी या शिक्षकांना मारहाण केली असावी. सदर शिक्षक श्री.चामले यांना जबर मारहाण झाली असल्याने त्यांनी अजून त्या मुलांना ओळखलेले नाही वा त्याबाबत निवेदन देखील केलेले नाही. त्यांनी या मुलांना ओळखल्यानंतर याबाबत पुढील कारवाई करण्यात येईल.

***

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..... झेडझेड 2 ...

पृ. शी. : जालना शहरात अल्पवयीन मुलीचे अपहरण करून तिच्यावर करण्यात आलेले पाशवी लैंगिक अत्याचार.

मु. शी. : जालना शहरात अल्पवयीन मुलीचे अपहरण करून तिच्यावर करण्यात आलेले पाशवी लैंगिक अत्याचार याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.सुरेश जेथलिया, डॉ.दीपक सावंत, श्री.विलास अवचट व ॲड.अनिल परब, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. सिद्धाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.सुरेश जेथलिया, डॉ.दीपक सावंत, श्री.विलास अवचट व ॲड.अनिल परब, वि. प. स. यांनी " जालना शहरात अल्पवयीन मुलीचे अपहरण करून तिच्यावर करण्यात आलेले पाशवी लैंगिक अत्याचार " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>निवेदन</u>

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..... झेडझेड 3 ... ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(नियम 93 अन्वये माननीय गृह राज्यमंत्र्यांच्या निवेदनानंतर ...)

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, या निवेदनामध्ये सांगण्यात आले आहे की, या पीडित मुलीसमोर तिने सांगितलेल्या वर्णनाच्या तीन लोकांना साक्षीदारांसमक्ष आणले असता तिने त्यांना ओळखण्यास असमर्थता दर्शविली. तेव्हा मला असे सांगावयाच आहे की, या ओळखण्याबरोबरच घटना घडल्याबरोबर त्या मुलीची डीएनए टेस्ट घेणे आवश्यक होते. किंबहुना अशा प्रकरणामध्ये तरी अशा तपासण्या करून घेणे आवश्यक आहे. तर या प्रकरणी त्या मुलीची डीएनए टेस्ट घेतली गेली आहे काय ? अशी टेस्ट घेतली गेली असती तर त्यामध्ये बाकीचे रक्त वगैरे जे घटक आहे तेही त्या मुलीच्या शरीरावर मॅच झाले तर तपासामध्ये देखील खूप गोष्ट सोप्या होऊ शकतात. आताही पोलीस हवालदार मोरे याने केलेल्या बलात्काराच्या केसमध्ये देखील असेच झाले. तेव्हा अशा प्रकरणी साक्षीपुरावे मजबूत करण्याच्या दृष्टीने अशा टेस्टस् होणे आवश्यक आहे. तेव्हा या प्रकरणातील मुलीची डीएनए टेस्ट केली होती काय ? नसेल तर ग्रामीण भागामध्ये जेव्हा अशा घटना घडतात त्याबाबतीत आपण ही टेस्ट घेणे अनिवार्य करणार आहात का ? तसेच या प्रकरणातील पीडित मुलीचे पुनर्वसन होणे अत्यंत आवश्यक असते. अगोदरच तिच्यावर झालेला हा आघात इतका मोठा असतो की ती मुलगी त्यातून सावरू शकत नाही. त्यामुळे त्या दृष्टीने पोलिसांकडून प्रयत्न होणे आवश्यक आहे. आता या सगळ्या उत्तरामध्ये असा कोणताही उल्लेख नाही की, या दृष्टीने पोलिसांनी अमुक अमुक केले आहे. तेव्हा अशा प्रकरणामध्ये जेव्हा त्या मुलीची वैद्यकीय तपासणी होण्यासाठी तिला हॉस्पिटलमध्ये पाठविले जाते त्यावेळी तिला मानसिक आधार देण्याच्या दृष्टीने समुपदेशन देखील केले गेले पाहिजे. हे आपण बंधनकारक केले पाहिजे. तेव्हा अशा केसेसमध्ये सगळ्या पीडित मुलींना मानसिक समुपदेशन करण्यासाठी पाठविणे आपण यापुढे तरी बंधनकारक करणार आहात का ?

(यानंतर श्री. खंदारे ..... एएए 1 ..

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखनासाठी नाही

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, घटना घडल्यावर संबंधित मुलीची अवस्था अद्यापी वाईट आहे, त्याच्यातून ती अजून सावरलेली नाही. डॉक्टरांनी आणि पालकांनी सुध्दा असे सांगितले आहे की, आमच्या मुलीला जास्त प्रश्न विचारु नयेत. त्याशिवाय ती मुलगी अतिशय वीक आहे. त्यामुळे पोलिसांनी जास्त चौकशी केली नाही. आईस्क्रीम विक्रेत्याकडून तसेच मसाला मावावाला हया साक्षीदारांनी सांगितलेल्या वर्णनानुसार आरोपीचे पोर्टेट तयार करण्यात आले होते. त्या पोर्टेटच्या अनुषंगाने 3 माणसांना त्या मुलीसमोर ओळख पटविण्यासाठी नेले होते. परंतु त्या मुलीने त्या तिन्ही व्यक्तींना ओळखण्यास असमर्थता दर्शविली. याठिकाणी डीएनएच्या टेस्टचा माननीय सदस्यांनी उल्लेख केला आहे. ज्यावेळी खराखुरा आरोपी सापडेल त्यावेळी त्याची डीएनए टेस्ट घेतली जाईल. त्याचप्रमाणे मुलीच्या वैद्यकीय तपासण्याचाही उल्लेख करण्यात आला आहे. ही मुलगी मुस्लीम समाजाची असल्यामुळे आपण सांगितले आहे त्याप्रमाणे वैद्यकीय चाचण्या करण्यात आल्या नाही. या प्रकरणाला अपवाद करुन इतर प्रकरणांबाबत माननीय सदस्यांच्या चांगल्या सूचनेवर अंमल केला जाईल. त्याचप्रमाणे अशाप्रकारच्या घटनांमध्ये संबंधित व्यक्तीच्या मनावर परिणाम होणार नाही याची काळजी घेऊन वैद्यकीय चाचण्या केल्या जातील. तपास लवकर व चांगला होण्याच्यादृष्टीने त्याप्रमाणे कार्यवाही केली जाईल.

डॉ.एम.ए.अझिज : बलात्कार झालेल्या मुलीसमोर 3 आरोपींना नेऊन उभे केले असे सांगण्यात आले आहे. बलात्कार करणारे गुंड प्रवृत्तीचे असल्यामुळे आणि ती मुलगी लहान असल्यामुळे ती त्यांना कशी ओळखणार ? आरोपींना ओळखण्याची ही पध्दत चुकीची आहे. त्या मुलीसमोर आरोपी असेल तर ती त्यांच्यासमोर बोट कशी दाखवू शकेल ? म्हणून आरोपींना ओळखण्यासाठी वेगळी पध्दत शासन स्वीकारणार आहे काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : जो बलात्कारी आहे तो त्या मुलीला हाताला धरुन घेऊन गेला होता. आईस्क्रीमवाल्याने व पानाच्या टपरीवाल्याने या दोघांनी वर्णन सांगितल्याप्रमाणे रेखा चित्र तयार करण्यात आले होते. ते चित्र त्या मुलीला दाखविले होते परंतु तिने हे नव्हते असे सांगितले, त्यानंतर ते रेखा चित्र आईस्क्रीमवाल्याला व पानवाल्याला दाखविल्यावर त्यांनी देखील हे आरोपीचे चित्र नसल्याचे सांगितले आहे. म्हणून कोणालाही संशयित म्हणून पकडण्यापेक्षा ख-या आरोपीचा पोलीस शोध घेत आहेत.

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(**सभापतीस्थानी माननीय उपसभापती**)

श्री.विनोद तावडे : या निवेदनामध्ये "राज्यात 12 विशेष न्यायालये स्थापन करण्यात आली आहेत" असे नमूद केले आहे. ही न्यायालये कोठे आहेत त्याची माहिती देतील काय ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : त्याबाबतची माहिती आता माझ्याजवळ उपलब्ध नसल्यामुळे यासंबंधीची माहिती मी पटलावर ठेवतो.

श्री.विनोद तावडे : न्यायालयांची माहिती नसेल तर प्रश्न विचारण्यात काही अर्थ नाही.

उपसभापती : मंत्रिमहोदयांनी माहिती पटलावर ठेवतो असे म्हटलेले आहे.

3.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : माण (जि.पुणे) येथील शेतक-यांच्या जमिनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने संपादन करण्यास शेतक-यांनी केलेला विरोध.

मु.शी. : माण (जि.पुणे) येथील शेतक-यांच्या जमिनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने संपादन करण्यास शेतक-यांनी केलेला विरोध याबाबत सन्माननीय सदस्य प्रा.शरद पाटील व जयंत पाटील यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.अशोक चव्हाण (उद्योग मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा.शरद पाटील व श्री.जयंत पाटील यांनी "माण (जि.पुणे) येथील शेतक-यांच्या जमिनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने संपादन करण्यास शेतक-यांनी केलेला विरोध" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुसरून, आपण निर्देश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>निवेदन</u>

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MAP/ KGS/

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, पुणे जिल्हयातील माण तालुक्यातील राजीव गांधी माहिती तंत्रज्ञान टप्प क्रमांक 4 साठी पिकाखालील जमीन घेतली आहे. या तालुक्यामध्ये पडीक जमीन उपलब्ध आहे काय ? पडीक जमीन उपलब्ध असेल तर ती जमीन घेऊन पिकाखालील जमीन न घेण्याचा निर्णय शासन घेईल काय ? त्याचप्रमाणे निवेदनामध्ये उत्तर देताना असे म्हटले आहे की, "औद्योगिक क्षेत्रालगत भूपिडीत गावांना सवलतीच्या दराने पाणीपुरवठा करण्यात येतो" महाराष्ट्रातील अशा सर्व औद्योगिक क्षेत्रालगत भूपिडीत गावांना सवलतीच्या दराने पाणीपुरवठा केला जातो काय ? आणि सवलतीचा दर असलेल्या दरापेक्षा किती टक्के कमी आहे ?

श्री.अशोक चव्हाण : माण तालुक्यातील राजीव गांधी माहिती तंत्रज्ञान टप्पा क्रमांक 4 च्या संदर्भात उत्तर दिलेले आहे. त्यासाठी 10 टक्के बागायती असलेली जमीन संपादित केली आहे, उर्वरित जमीन शेतीसाठी उपयोगी नाही अशी माझी माहिती आहे. माण व हिंजवडी येथे राजीव गांधी माहिती व तंत्रज्ञान पार्क विकसित करण्याचा शासनाने निर्णय घेतला त्याला चांगला प्रतिसाद मिळाला आहे. परंतु मधल्या काळामध्ये जमीन मोजण्याच्या कामास विरोध केल्यामुळे मोजणी होऊ शकली नाही. त्याठिकाणी गोळीबार देखील झाल्यामुळे काम थांबले होते. त्यामुळे भूसंपादनाची कार्यवाही स्थगित करण्यात आली आहे.

श्री.किल्लेदार.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अशोक चव्हाण (पुढे सुरु....

सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला की, जी गावे जमीन संपादनामध्ये बाधित आहेत, त्यांना काही सवलती देतो. त्यामध्ये पाण्याचा दर हा महत्वाचा घटक आहे. आपण औद्योगिक क्षेत्रामधील माण व भोईरवाडी येथील राजीव गांधी माहिती व तंत्रज्ञान विभागातील पाण्याचा दर प्रती हजार लिटरला 15 रुपये 50 पैसे ठेवलेला आहे. ग्रामपंचायतीमध्ये हाच दर प्रती हजार लिटरला 3 रुपये 25 पैसे असा लावला जातो. हा धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, तात्पुरती स्थगिती दिल्याचे म्हटलेले आहे. तेथील ग्रामसभेकडून याबाबतची माहिती घेऊन, याला कायमची स्थगिती देण्याचा विचार शासन करेल काय ?

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, राज्यामध्ये उद्योग वाढले पाहिजेत, अशी सर्वांची इच्छा आहे. यासाठी हिंजवडी परिसरातील जमीन संपादित करण्याशिवाय पर्याय दिसत नाही. तेथील लोकांचा विरोध कोणत्या कारणासाठी आहे, याची माहिती घेऊन समन्वयाने मार्ग काढण्याचा शासन निश्चित प्रयत्न करेल. जमीन संपादनालाच त्यांचा विरोध की जमीन संपादनाच्या दरा विषयी विरोध आहे, हे समजत नाही. मी माहितीसाठी सांगतो की, हिंजवडी येथील 96 हेक्टर जमीन संपादित केलेली आहे, त्याची संपूर्ण विक्री झालेली आहे. माण व हिंजंवडी येथील 236 हेक्टर जमीन संपादित करण्यात आलेली आहे. त्याची विक्री झालेली आहे. आज आय.टी. आणि बायो टेक्नॉलॉजीचे उद्योग त्या ठिकाणी येतील म्हणून तेथील जमीन संपादित करतो आहोत. यामध्ये समन्वयाने कसा मार्ग काढता येईल, असा शासनाचा प्रयत्न राहील.

प्रा.शरद पाटील : महत्वाचा प्रश्न असा आहे की, त्या ठिकाणी औद्योगिकरणाची आवश्यकता आहे की नाही, हे पाहिले पाहिजे. माण गावामध्ये भूसंपादनाच्या कामामध्ये शेतकऱ्यांनी विरोध केल्यामुळे अडथळा आला. त्या गावची जमीन कासार साही प्रकल्पाच्या लाभ क्षेत्रातील आहे. कोट्यावधी रुपये खर्च करुन धरण बांधले गेले. या गावची जमीन त्या धरणाच्या जल क्षेत्रामध्ये समाविष्ट करण्यात आली. कालवे काढून शेतकऱ्यांच्या जमिनीपर्यन्त पोट कालवे देखील काढलेले आहेत. अशी एका धरणाच्या लाभ क्षेत्रामध्ये समाविष्ट असलेली जमीन आहे. त्यासाठी कोट्यावधी रुपयाचा खर्च झालेला आहे. या धरणाच्या लाभ क्षेत्रात असलेल्या शेतकऱ्यांच्या जमिनी आहेत. औद्योगिक कारणासाठी आरक्षण करण्यापूर्वी ही सर्व माहिती शासनाने का घेतली नाही ? हा माझा पहिला प्रश्न आहे. दुसरा प्रश्न असा आहे की, शेतकऱ्यांनी त्या ठिकाणी शेती

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/

प्रा.शरद पाटील (पुढे सुरु....

करण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्या संदर्भाने आंदोलन झाले. त्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी माजी पंतप्रधान माननीय व्ही.पी.सिंग आलेले होते. माननीय श्री.शरद पवार साहेबांनी तेथील शेतकरी शेतीचा विचार करणार असतील तर शेतीसाठी ही जमीन ठेवली जाईल, असे आश्वासन दिलेले होते. म्हणून मी प्रश्न विचारु इच्छितो की, औद्योगिक कारणासाठी आरक्षण ठेवून भूसंपादनाची कारवाई सुरु केलेली आहे, ही कारवाई रद्द करुन शेतकऱ्यांना शेती करण्यासाठी ती जमीन वापरु देणार आहात काय ?

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, सुरुवातीलाच स्पष्ट केलेले आहे की, जी काही जमीन ताब्यामध्ये आहे, त्यातील काही भाग लाभ क्षेत्रातील आहे, ही वस्तुस्थिती आहे. 10 टक्क्यापेक्षा कमी जमीन बागायतीची आहे, बाकीची 90 टक्के जमीन शेतीसाठी योग्य नाही, अशी माहिती आहे. त्या ठिकाणी कालव्याची कामे झालेली आहेत, ही वस्तुस्थिती आहे. परंतु यासंबंधातील माहिती घेऊनच निर्णय करण्यात आलेला आहे. दुसरा महत्वाचा मुद्दा म्हणजे जमीन संपादनातून वगळल्यानंतर ही जमीन खरोखरच शेतीसाठी ते वापरणार आहेत काय ?...

यानंतर श्री.बरवड.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक चव्हाण ...

मग ही जमीन सोडल्यानंतर त्या जमिनीची पुन्हा विक्री होणार असेल तर ती जमीन संपादनातून वगळण्यामध्ये काय स्वारस्य आहे ? असा मूलभूत प्रश्न आहे. सन्माननीय केंद्रीय कृषी मंत्र्यांचा उल्लेख या ठिकाणी केला गेला. वर्तमानपत्रातून जे वाचावयास मिळाले त्यातून असे दिसते की, कदाचित ही जमीन सोडली तर ग्रीन झोन म्हणून ती जमीन जाहीर केली तर चालेल काय ? खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांसाठी जमीन सोडावी असे भाष्य प्रत्येक ठिकाणी होत आहे. परंतु जमीन सोडल्यानंतर जर त्या जमिनीची परस्पर विक्री होणार आहे काय ? हा मूलभूत प्रश्न आहे. जर एमआयडीसी पायाभूत सुविधा देऊन या जमिनी विकसित करणार असेल आणि त्याचा योग्य मुआवजा शेतकऱ्यांना मिळणार असेल तर यामध्ये कशासाठी विरोध होत आहे ? या मूलभूत प्रश्नामध्ये जाण्याची गरज आहे. म्हणून मी सुरुवातीला सांगितल्याप्रमाणे समन्वयाने यातून मार्ग कसा काढता येईल यासाठी प्रयत्न करीत आहोत. आपण काम थांबवले तर त्या ठिकाणी असलेली जी प्रचंड मागणी आहे ते पाहता राज्यातील उद्योग अन्य राज्यांमध्ये गेले तर राज्याचे फार मोठे नुकसान होईल हे स्पष्ट केले पाहिजे. यातून मार्ग कसा काढावयाचा याबाबतीत समन्वयाने संपर्क साधून प्रयत्न केले जातील.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS

पृ. शी. : औरंगाबाद येथील सुरई गार्डनमध्ये एका तरुणीवर करण्यात आलेला सामुहिक बलात्कार

मु. शी.: औरंगाबाद येथील सुरई गार्डनमध्ये एका तरुणीवर करण्यात आलेला सामुहिक बलात्कार याबाबत श्री. सुरेश जेथलिया, डॉ. दीपक सावंत, श्री विलास अवचट, ॲड. अनिल परब, श्री. दिवाकर रावते, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सुरेश जेथलिया, डॉ. दीपक सावंत, श्री विलास अवचट, ॲड. अनिल परब, श्री. दिवाकर रावते, वि. प. स. यांनी "औरंगाबाद येथील सुरई गार्डनमध्ये एका तरुणीवर करण्यात आलेला सामुहिक बलात्कार" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, सात जणांच्या टोळक्याने बलात्कार केलेला आहे ही अतिशय गंभीर बाब आहे. त्यांनी बलात्कार केला आणि पैसे देखील लुटलेले आहेत. या निवेदनामध्ये शेवटी असे म्हटले आहे की, एक आरोपी फरार आहे. गुन्ह्यातील 2 अल्पवयीन आरोपींना बाल न्यायालयाने जामीन दिला आहे. बलात्काराच्या गुन्ह्यामध्ये देखील बाल आरोपी सापडतात ही गंभीर बाब आहे. कायदा व सुव्यवस्था कोठे आहे ? ज्या 2 बाल आरोपींना जामीन दिला आहे त्यांची सद्य:स्थिती काय आहे ? त्यांना कोठे ठेवलेले आहे ? त्यांना बाल सुधारगृहामध्ये पाठविले आहे काय ? त्यांचे वय काय आहे ? त्यांना बाल आरोपी म्हणून कसे काय प्रमाणित केले ? यातील एक आरोपी अजूनही फरार आहे. त्याचा तपास चालू आहे. त्यासंबंधात शासनाकडे काय माहिती आहे ? ज्या दोन आरोपींना घटनास्थळावर अटक केली त्यांना जामीन झाला काय ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : ज्यांचे वय 18 वर्षापेक्षा कमी आहे त्यांना बाल गुन्हेगार म्हणतो. यामध्ये जाहीद शेख आणि इम्रान सिद्दिकी या दोघांचेही वय 17 वर्षे आहे. म्हणजे त्यांचे वय 18 वर्षाच्या आत आहे. म्हणून बाल न्यायालयाने त्यांना जामीन देऊन त्यांना बाल सुधारगृहामध्ये पाठविलेले आहे. जो एक सातवा आरोपी फरार आहे तो ट्रक क्लिनर आहे. त्याला शोधण्याचा प्रयत्न चालू आहे. लवकरात लवकर त्याला अटक करण्यात येईल. दुसरे जे आरोपी होते ते आरोपी एफ.सी.आय.मध्ये आहेत.

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : वसई तालुक्यातील जोजेफ लेमॉस फरगोरा या तरुणाने पावसामुळे कांद्याचे नुकसान झाल्याने केलेली आत्महत्या.

मु. शी. : वसई तालुक्यातील जोजेफ लेमॉस फरगोरा या तरुणाने पावसामुळे कांद्याचे नुकसान झाल्याने केलेली आत्महत्या याबाबत सर्वश्री अरविंद सावंत, अनंत तरे, डॉ. दीपक सावंत, श्री. विलास अवचट, डॉ. नीलम गोऱ्हे, श्री. सुरेश जेथलिया, ॲड. अनिल परब, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. बाळासाहेब थोरात (कृषी मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सर्वश्री अरविंद सावंत, अनंत तरे, डॉ. दीपक सावंत, श्री. विलास अवचट, डॉ. नीलम गोऱ्हे, श्री. सुरेश जेथलिया, ॲड. अनिल परब, यांनी "वसई तालुक्यातील जोजेफ लेमॉस फरगोरा या तरुणाने पावसामुळे कांद्याचे नुकसान झाल्याने केलेली आत्महत्या" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...5 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, मृत्यूबाबत तालुकास्तरीय समितीने दिनांक 27.3.2006 रोजी अहवाल दिला. आत्महत्या का केली हे अहवालामध्ये नमूद करुन सुध्दा शेवटी असे म्हटले आहे की, दोन्ही शेतकऱ्यांच्या वारसदारांना मदत देण्याची शिफारस केली आहे. या दोन्ही शेतकऱ्यांच्या वारसदारांना किती मदत देणार आणि केव्हा देणार ? 70 हेक्टर जमिनीमध्ये शेतकऱ्यांनी कांदा लावला होता त्यापैकी 38.27 हेक्टरमध्ये 50 टक्क्यापेक्षा अधिक नुकसान झाल्याचे कळविले आहे. यासंदर्भात नुकसानभरपाईसाठी शेतकऱ्यांचे अर्ज आले असतील. एकूण किती शेतकऱ्यांचे अर्ज आले ? त्यापैकी किती शेतकऱ्यांच्या अर्जांचे पंचनामे पूर्ण झाले ?

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. अरविंद सावंत...)

निवेदनामध्ये 222 पंचनामे झाल्याचे म्हटलेले आहे. प्रत्यक्षात किती पंचनामे व्हावयाचे आहेत. हे पंचनामे पूर्ण होऊन शेतक-यांना केव्हा मदत मिळणार आहे ?

श्री. बाळासाहेब थोरात : मी माननीय सदस्यांच्या पहिल्या प्रश्नाचे उत्तर देतो. प्राथमिक अंदाज 70 हेक्टरचा आहे. 38.27 हेक्टरवरील पिकाचे 50 टक्क्यापेक्षा जास्त नुकसान झालेले आहे. पंचनामे करण्याचे काम सुरु झालेले आहे. ज्या शेतक-यांचे नुकसान झालेले आहे त्यांना अतिवृष्टीच्या बाबतीत जे निकष ठरलेले आहेत त्या निकषाप्रमाणे मदत दिली जाईल.

श्री. दिवाकर रावते : कोणते निकष ठरलेले आहेत ?

श्री. बाळासाहेब थोरात : अतिवृष्टीमध्ये भाताच्या आणि कापसाच्या पिकाला हेक्टरी 5 हजार रु. आणि जिराईतसाठी 3500 रु. याप्रमाणे मदत देण्याचे निकष ठरलेले आहेत. अतिवृष्टीच्या निकषाप्रमाणे गारपिटीच्या बाबतीत मदत दिली जाईल. माननीय सदस्यांनी जो दुसरा प्रश्न विचारला त्याबाबतीत 1 लाख रु. प्रमाणे तातडीने मदत दिली जाईल.

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : एम.सी.व्ही.सी. व द्विलक्षी अभ्यासक्रमातील शिक्षक निदेशकांना वेतन न मिळणे

मु.शी : एम.सी.व्ही.सी. व द्विलक्षी अभ्यासक्रमातील शिक्षक निदेशकांना वेतन न मिळणे याबाबत श्री. व्ही.यू. डायगव्हाणे, प्रा. बी.टी.देशमुख, सर्वश्री. वसंतराव खोटरे, जी.एल ऐनापुरे आणि श्री. नानासाहेब बोरस्ते, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. सुरेश शेट्टी (उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, श्री.व्ही.यू.डायगव्हाणे, प्रा. बी.टी.देशमुख, सर्वश्री. वसंतराव खोटरे, जी.एल.ऐनापुरे आणि नानासाहेब बोरस्ते,वि.प.स. यांनी "एम.सी.व्ही.सी. व द्विलक्षी अभ्यासक्रमातील शिक्षक निदेशकांना वेतन न मिळणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे, मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथेसोबतचे निवेदन छापावे.)

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, राज्यातील व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण विभागांतर्गत चालविल्या जाणा-या अनुदानित एम.सी.व्ही.सी. व द्विलक्षी अभ्यासक्रमातील शिक्षक निदेशकांना डिसेंबर-जानेवारी पासून वेतन मिळालेले नाही. याठिकाणी प्रश्न विचारल्यानंतरच शासन तरतूद करते. सभापती महोदय, 27.1.2004ला शासनाने आदेश काढलेले आहेत. परंतु डेप्युटी डायरेक्टर आणि अन्य अधिकारी झोपलेले आहेत. 22.2.2006ला निधी उपलब्ध करुन दिल्यावर देखील आज पर्यन्त वेतन मिळालेले नाही ही वस्तुस्थिती आहे. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, डिसेंबर-जानेवारी पासून थकीत असलेले वेतन 10 एप्रिल पर्यन्त शिक्षकांच्या खात्यात जमा करण्यात येणार आहे काय ? तसेच 27.1.2004च्या शासन निर्णयाप्रमाणे जी थकबाकी देण्यात येणार आहे ती थकबाकी देखील 10 एप्रिल पर्यन्त देण्यात येईल काय ? तसेच शालेय शिक्षण विभागाच्या जी.आर.प्रमाणे 1 तारखेला वेतन अदा केले जाईल काय ?

श्री. सुरेश शेट्टी : माननीय सदस्यांनी मला माहिती द्यावी. ती मी तपासून पाहतो. ज्या अधिका-यांनी 22 फेब्रुवारी पर्यन्त वेतन वितरित केले नाही त्यांच्यांवर ॲक्शन घेतो. 1 तारखेला वेतन वितरित करायला पाहिजे असे सर्क्युलर काढलेले आहे. असे कुठे घडलेले नसेल तर त्याबाबतची माहिती माननीय सदस्यांनी दिली तर त्याबाबतीत कारवाई केली जाईल.

उपसभापती : यानंतर लक्षवेधी सूचना घेण्यात येईल...

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : डिसेंबर-जानेवारी पासून वेतन मिळालेले नाही.

श्री. सुरेश शेट्टी : प्रोव्हिजन केलेली आहे. याबाबतीत आधीच ऑर्डर्स् दिलेल्या आहेत.

श्री. व्ही.यू. डायगव्हाणे : मुंबईतील शिक्षकांना देखील वेतन मिळालेले नाही.

उपसभापती : माननीय मंत्रीमहोदय हे खालच्या सभागृहामध्ये असल्यामुळे लक्षवेधी क्रमांक 1 ही नंतर घ्यावी अशी त्यांनी मला विनंती केलेली आहे. त्यामुळे लक्षवेधी क्रमांक 1 ही नंतर घेण्यात येईल. आता लक्षवेधी क्रमांक 2 घेण्यात येत आहे.

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : आमच्या महत्वाच्या प्रश्नाला न्याय मिळत नसल्यामुळे आम्ही बहिर्गमन करतो.

(माननीय सदस्य श्री. व्ही.यू.डायगव्हाणे आणि माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख बहिर्गमन करतात.)

--- ...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाने कर्ज वाटपाच्या

अटी व नियम शिथिल करण्याचा घेतलेला निर्णय

मु. शी : मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाने कर्ज वाटपाच्या अटी व नियम शिथिल करण्याचा घेतलेला निर्णय यासंबंधी सर्वश्री मुझफ्फर हुसेन, संजय दत्त, डॉ. एन.पी.हिराणी, श्री. उल्हास पवार, प्रा.जोगेंद्र कवाडे, श्री. नतिकोद्दिन खतिब, वि.प.स. यांनी यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. मुझफ्फर हुसेन सय्यद (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सामाजिक रोजगार व स्वयंरोजगार मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाने लाभार्थ्यांना कर्ज वाटप करण्यासाठी असणाऱ्या नियम व अटी शिथिल करण्याचा घेतलेला निर्णय, सदर निर्णयाची अंमलबजावणी महामंडळाकडून न होणे, कर्ज वितरणात होणारी दिरंगाई, तसेच कर्ज मागणी अर्जाची छाननी न होणे व कर्ज वाटप प्रक्रियेबाबत कार्यवाही न होणे, परिणामी कोटयवधी रुपयांचा निधी अखर्चित असून गरीब व गरजू लाभार्थ्यांना सदर निधीचा लाभ न होणे, पर्यायाने सदर महामंडळाच्या कारभारात सुधारणा करण्याची अत्यावश्यकता, अल्पसंख्यांक लाभार्थ्यांना वेळीच निधी वाटप होत नसल्याने सदर लाभार्थ्यांमध्ये पसरत असलेली नाराजी व असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

राणा जगजितसिंह पाटील (स्वयंरोजगार राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

.... 5 ....

04-04-2006 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) 3D-5
MSS/ KGS/ MAP/ पूर्वी श्री. बरवड 15:15

श्री. मुझफ्फर हुसेन : सभापती महोदय, यासंदर्भात या सदनामध्ये अनेक वेळा लक्षवेधी विचारण्यात आलेली होती. पहिली लक्षवेधी दिनांक 27 जुलैला, त्यानंतर 15 डिसेंबरला विचारण्यात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आली. 28 डिसेंबरला माननीय राज्यमंत्री महोदयांच्या दालनात या मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाच्या संदर्भात बैठक झाली. अल्पसंख्यांक समाजातील लोकांच्या मदतीसाठी हे मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळ शासनाने गठित केलेले आहे.

...नंतर श्री. कानडे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मुजफ्फर हुसेन ...

पण जे उत्तर मंत्रीमहोदयांनी 27 जुलै,2005 रोजी सभागृहात उत्तर दिले होते तेच उत्तर 15.12.2005 रोजी दिलेले आहे. त्यानंतर 28.12.2005 रोजी मंत्रीमहोदयांच्या दालनात या विषयाच्या संदर्भात जी बैठक झाली त्या बैठकीत काही नियम शिथिल करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्याबाबतीत अजून जी.आर.निघालेला नाही. 60 कोटी रुपये या महामंडळाकडे उपलब्ध असताना सुध्दा फक्त 20 कोटी रुपयांचे कर्ज मागील 7 वर्षात वितरीत करण्यात आले आहे. माझा प्रश्न असा आहे की, शासन या महामंडळाच्या संदर्भात सिरीयस् आहे किंवा नाही ? शासन या महामंडळाच्या बाबतीत सिरीयस् असेल तर आतापर्यंत महामंडळाकडे उपलब्ध असणारा निधी कर्ज मागणाऱ्यांसाठी का वितरीत करण्यात आला नाही ?

राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, 28.12.2005 रोजी माननीय सदस्य डॉ.एन.पी.हिराणी,माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान आणि माननीय सदस्य श्री. मुजफ्फर हुसेन यांच्या उपस्थितीत एक बैठक घेतली होती आणि कर्ज देत असताना ज्या अटी आहेत त्या शिथिल करण्याबाबत चर्चा झाली होती. चर्चेअंती जे 2/3 महत्वाचे निर्णय घेण्यात आले होते त्यानुसार उत्पन्नाची जी अट आहे ती शिथिल करण्यात यावी असे ठरले होते. पूर्ण कुटुंबाचे उत्पन्न वार्षिक 1 लाख रुपये असले तरी लाभार्थीला हे महामंडळ कर्ज देऊ शकते असा निर्णय घेण्यात आला होता. त्याचप्रमाणे कर्ज मंजूर करताना दोन जामिनदारांची आवश्यकता होती त्याऐवजी एक जामीनदार किंवा अर्जदाराची स्वत:ची मालमत्ता असेल आणि ती मालमत्ता तो गहाण ठेवण्यास तयार असेल तर जामीनदाराची गरज राहणार नाही असाही निर्णय झाला होता. या बैठकीच्या अनुषंगाने महामंडळाच्या संचालक मंडळाची 29.3.06 रोजी बैठक झालेली आहे आणि या अटी शिथिल करण्यास बोर्डानेही मान्यता दिलेली आहे. त्यानुसार बोर्डाने शासनाकडे प्रस्ताव पाठविला आहे. येत्या 15 दिवसात यासंबंधात जी.आर.निघेल अशी अपेक्षा आहे. त्याचप्रमाणे 2005-06 मध्ये महामंडळाकडे एकूण 4400 अर्ज प्राप्त झाले त्यातील 1100 अर्ज मंजूर करण्यात आले. 300 अर्ज प्रलंबित आहेत. 2700 अर्जामध्ये त्रुटी आढळून आल्यामुळे ते परत पाठविण्यात आले.

डॉ. एन.पी.हिराणी : सभापती महोदय, सुमारे सात वर्षापूर्वी हे महामंडळ स्थापन करण्यात आले. या सात वर्षामध्ये राज्य शासनाचे 61.20 कोटी रुपये या महामंडळाकडे लाभार्थींना वाटप करण्यासाठी उपलब्ध आहेत. 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.एन.पी.हिराणी ...

परंतु गेल्या सात वर्षामध्ये फक्त 21.91 कोटी रुपयांचे वाटप लाभार्थींना करण्यात आलेले आहे. या बाबतीत सातत्याने आमचे मित्र माननीय सदस्य श्री. मुजफ्फर हुसेन साहेब सभागृहामध्ये लक्षवेधी सूचना देत आहेत. मला वाटते या विषयाच्या बाबतीत ही तिसरी किंवा चौथी लक्षवेधी सूचना असली पाहिजे. दोनदा मंत्रीमहोदयांनी आणि एकदा राज्यमंत्री महोदयांनी उत्तर दिलेले आहे. राज्यमंत्र्यांनी निदान यासंबंधात आपल्या दालनात बैठक तरी घेतली होती. प्रत्येक वेळी दिलेले उत्तर सारखेच आहे. आजही या लक्षवेधी सूचनेला जे उत्तर आले आहे ते दोन वर्षापूर्वी दिलेल्या उत्तराची पुनरावृत्ती आहे. एकीकडे अल्पसंख्याकांच्या आर्थिक उन्नतीसाठी अशा प्रकारची महामंडळे स्थापन करावयाची आणि जोपर्यंत त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारत नाही तोपर्यंत त्यांना मुख्य प्रवाहात आपण आणू शकत नाही असे म्हणावयाचे आणि त्यांच्या व्होट बँकेचा उपयोग करुन घ्यावयाचा आणि दुसरीकडे मात्र 7/7 वर्षे त्यांच्यासाठी असलेला निधीसुध्दा शासन वापरु शकले नाही ही फार मोठी शोकांतिका आहे.

यानंतर श्री. खर्चे पी.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. एन.पी.हिराणी .....

त्या बैठकीत तसे ठरले होते. परंतु त्यानुसार अंमलबजावणी न करता प्रत्येक वेळेस तेच तेच उत्तर ऐकून आमचे कान पकले आहेत. म्हणून माझे माननीय मंत्री महोदयांना स्पेसिफिक तीन प्रश्न आहेत त्यांचा त्यांनी खुलासा करावा. किती तारखेपर्यंत हया अटी व शर्ती शिथील करण्यात येतील ? आतापर्यंत किती जिल्हयात किती मेळावे घेण्यात आले व शिबीरे घेण्यात आली आहेत ? तसेच 50 लाखाचे प्रत्येक जिल्हयासाठी टारगेट देऊन रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रांमार्फत या निधीचे वाटप करण्यात येईल असे म्हटले आहे. हे वाटप किती तारखेपर्यंत पूर्ण करणार आहात ?

राणा जगजितसिंह पाटील : महोदय, या अटी शिथील करण्याच्या प्रक्रियेत मी सांगितल्याप्रमाणे संचालक मंडळाने मान्यता दिलेली आहे परंतु शासनाच्या पातळीवर प्रलंबित आहे.

डॉ. एन.पी.हिराणी : माननीय मंत्री महोदयांनी स्पेसिफिक कालावधी सांगावा.

श्री. मुजफ्फर हुसेन : महोदय, माननीय मंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली यासंबंधी एक बैठक लावण्यात आली होती. त्या बैठकीत आम्ही विचारले होते की, आपण जी चर्चा येथे करीत आहोत त्या चर्चेचे गांभीर्य आहे की नाही ? त्यावर आपण असे उत्तर दिले होते की, आपण या ठिकाणी निर्णय घेण्यासाठी बसलो आहोत. अशा प्रकारे ज्या ज्या सूचना आपल्याकडून येतील त्या अनुषंगाने लवकरात लवकर जी.आर. काढण्यात येईल व शिथील केल्याप्रमाणे अंमलबजावणी केली जाईल, परंतु या गोष्टीला देखील तीन महिने झाले आहेत. ज्यावेळी लक्षवेधी सूचना लावली जाते त्यासंबंधी चर्चा घडवून आणली जाते आणि आता सांगण्यात येते की, हे प्रकरण शासन स्तरावर प्रलंबित आहे. त्याचबरोबर मागील दोन लक्षवेधी सूचनांच्या वेळी देखील आपण 20 कोटीची हमी दिलेली आहे त्याची मर्यादा वाढवून 50 कोटी एवढी करण्याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागाकडे प्रलंबित आहे. त्याबाबत लवकरात लवकर निर्णय घेण्यात येईल असे उत्तर आपण त्यावेळी दिले होते, मात्र अजुनही तसा निर्णय झालेला नाही. हा निर्णय शासन लवकरात लवकर घेईल काय ?

राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, या महामंडळाच्या संचालक पदावर एकूण तीन लोक असून त्यापैकी एक पद रिक्त आहे व उर्वरित एम.डी. आणि त्या खात्याचे प्रधान सचिव हया दोनच व्यक्ती आहेत. त्यामुळे हा विलंब झालेला आहे. परंतु 29 मार्च रोजी यासंबंधीची बैठक घेतली होती आणि 20 एप्रिलपर्यंत तसा जी.आर. निर्गमित करण्याचा प्रयत्न राहील.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. एन.पी.हिराणी : महोदय, प्रयत्न राहील अशा प्रकारचे उत्तर न देता माननीय मंत्री महोदयांनी स्पेसिफिक तारखेपर्यंत ही कार्यवाही करण्यात येईल, असे उत्तर द्यावे.

राणा जगजितसिंह पाटील : महोदय, या महिन्या अखेरपर्यंत हा जी.आर. काढण्यात येईल. तसेच दुसरा प्रन म्हणजे एप्रिल महिन्यापासून आतापर्यंत 260 मेळावे घेण्यात आले आहेत.

डॉ. एन.पी.हिराणी : महोदय, या मेळाव्यांना लोकप्रतिनिधींना निमंत्रित करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला असतांना आम्हाला कुठल्याच प्रकारचे निमंत्रण आलेले नाही. तसेच इतर सन्माननीय सदस्यांनाही ते निमंत्रण आलेले नाही. म्हणून जोपर्यंत लोकप्रतिनिधींना या प्रक्रियेत सहभागी करुन घेत नाही तोपर्यंत खऱ्या अर्थाने हे काम होणार नाही. या निमित्ताने मला विचारावयाचे आहे की, हे काम संपूर्णपणे अधिकाऱ्यांच्याच मर्जीप्रमाणे चालते की काय ?

राणा जगजितसिंह पाटील : महोदय, यापुढे ज्या ज्या ठिकाणी मेळावे घेण्यात येतील त्यासाठी लोकप्रतिनिधींना आवर्जून निमंत्रित करण्यात येईल आणि या गोष्टीचे काटेकोरपणे पालन करण्यात येईल.

डॉ. एन.पी.हिराणी : आपण आतापर्यंत फक्त 50 लाखाचे वाटप करण्याचीच हमी दिलेली आहे. त्याबाबत स्पष्टीकरण करावे.

राणा जगजितसिंह पाटील : महोदय यासाठी एकूण 75 लाखाचे उद्दिष्ट दिलेले आहे. परंतु जसजसे अर्ज प्राप्त होतील त्या अर्जांची छाननी करुन जे पात्र उमेदवार असतील त्यानुसार निधीचे वाटप करण्यात येईल.

यानंतर श्री. भारवि .....

अशुद्धीत प्रत / अशुद्धीपत्र नाही

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, मैंने भी इसी विषय में लक्षवेधी सूचना दी थी. चूंकि मेरा नाम इस लक्षवेधी सूचना में नहीं है इसलिए मेरी विनती है कि मेरा नाम भी प्रश्नकर्ताओं में शामिल किया जाए.

सभापति महोदय, मैं इस लक्षवेधी सूचना के संबंध में माननीय मंत्री जी से पूछना चाहती हूं कि मंत्री महोदय के साथ हुई चर्चा में यह बात सामने आई थी कि मौलाना आज़ाद आर्थिक विकास महामंडल में आवश्यक संख्या में स्टाफ नहीं है. इसलिए जब तक स्टाफ बढ़ाया नहीं जाता तब तक इस महामंडल के काम में इफिशियेन्सी नहीं आएगी. इसलिए जल्द से जल्द स्टाफ बढ़ाया जाए. दूसरी बात यह है कि इम्पलायमेंट ऑफिसर के हाथ में सारी योजनाओं के क्रियान्वयन की जिम्मेदारी सौंपी दी गई है. इम्प्लायमेंट ऑफिसर उदासीन भूमिका लेकर काम कर रहे हैं. इसलिए मेरा यह प्रश्न है कि क्या महामंडल का स्टाफ बढ़ाया जाएगा और 61 करोड़ रुपये जरुरतमंदों को कब तक वितरीत किए जाएंगे ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, प्रत्येक जिल्हयांमध्ये एक-एक प्रतिनिधी असावा यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. नेमका निधी किती तारखेपर्यंत वितरित करणार हे सांगणे कठीण आहे. कर्ज मंजुरीसंबंधीच्या अटी व शर्ती शिथिल केल्यानंतर ज्यांचे योग्य अर्ज येतील त्यांना निधीचे वाटप करण्यात येईल.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, राज्य शासनाने आतापर्यंत मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाला 20 कोटी रुपये दिले आहेत. म्हणजे गेल्या सात वर्षात वर्षाला पावणेतीन कोटी रुपये खर्च केले आहेत. हा खर्च नेमका कशावर केला आहे ? सदर खर्च हा वेतन प्रदानावर केला आहे काय ? हे शासन आपल्या फायद्यासाठी आंबेडकर, म.फुले यांची नावे घेत असते. तेव्हा यासंबंधी ठोस उत्तर मंत्रिमहोदय देतील काय ?

(उत्तर देण्यात आले नाही.)

डॉ.एम.ए.अझिझ : सभापती महोदय, मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ हे युतीचे सरकार गेल्यानंतर स्थापन करण्यात आले आहे. मौलाना आझाद हे लोकसभेमध्ये जेव्हा उदास व्हायचे तेव्हा उर्दूमधून वर्णन करायचे. त्यांचा एक शेर होता. त्यासंबंधीचा उल्लेख सकाळी सन्माननीय सदस्या फौजिया खान यांनी केला आहे.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.एम.ए.अझिझ ....

तो शेर असा आहे,

रंज का खूगर हो इंसान, तो मिट जाता है रंज
मुश्किलें इतनी पड़ी मुझ पर, की आसाँ हो गई

या शेरचा अर्थ असा आहे की, माणसाला संकटांची सवय झाली तर तो संकटे विसरून जातो. तीन वर्ष सतत मंत्रिमहोदय बोलत आहेत. आज त्यांनी पटलावर माहिती ठेवली की, आता पर्यंत 196 मुसलमान, बौध्द धर्मीय 3 व ख्रिश्चन धर्मीय 3 लाभार्थींना निधी वितरित करण्यात आला आहे. तेव्हा उर्वरित निधी कधी वितरित करण्यात येणार आहे ते शासनाने सांगावे. कर्जाचे अर्ज आपल्या कार्यालयात पडून आहेत. पण त्यावर निर्णय न झाल्यामुळे, पैशाचे वाटप न झाल्यामुळे सदर महामंडाळाचे पदाधिकारी सन्माननीय सदस्य श्री.हाफिज धत्तुरे यांनी या महामंडळाच्या सदस्यत्त्वाचा राजीनामा दिलेला आहे. तेव्हा या महामंडळावर शासन पदाधिकारी केव्हा नेमणार आहे व आज तेथे एकूण स्टाफ किती आहे ?

यानंतर श्री. बोर्डे..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, मी अगोदरच सांगितले आहे की, यावर्षी महामंडळाकडे 4,400 अर्ज प्राप्त झालेले आहेत. त्यापैकी 1123 अर्ज मंजूर केलेले आहेत. त्यांना निधीचे वाटप करण्याचे कामही सुरु आहे. शिवाय, 319 अर्ज प्रलंबित आहेत. त्रुटींच्या पूर्ततेसंदर्भातील 2700 अर्ज आहेत. कर्ज वाटप करण्यासंदर्भातील अटी शिथिल केल्यानंतर साहजिकच जास्त अर्ज येतील. त्यामुळे उर्वरित जी 37 कोटी रुपये रक्कम आहे ती लवकरात लवकर वितरित करण्याचा प्रयत्न राहील. परंतु अर्ज मंजूर होण्याच्या दृष्टीने कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक आहे.

श्री.मुझफ्फर हुसेन : सभापती महोदय, मागील तीन वर्षांपासून या विषयावरील लक्षवेधी सूचनेला "लवकरात लवकर" असेच उत्तर दिले जात आहे. लवकरात लवकर म्हणजे नेमके कधी ? त्यामुळे माननीय मंत्री महोदयांनी सांगावे की, किती महिन्यात लाभार्थ्यांचे अर्ज निकालात काढणार आहात ? तसेच किती महिन्यात हे काम पूर्ण होणार आहे ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : महोदय, निधी वितरीत करताना प्रथम अर्जाची परिपूर्ण छाननी करावी लागते. तसेच कागदपत्रांची पूर्तता होणे आवश्यक असते.

उपसभापती : मला वाटते आपणांस जे काही करावयाचे आहे ते लवकरात लवकर करा.

श्री.राणा जगजितसिंह पाटील : महोदय, आपण जे निदेश द्याल त्यानुसार कार्यवाही केली जाईल.

उपसभापती : मला वाटते तीन महिन्यांत सर्व कार्यवाही करण्यात यावी.

श्री.राणा जगजितसिंह पाटील : होय.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, अण्णासाहेब साठे आर्थिक विकास महामंडळ, महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ, वसंतराव नाईक मागासवर्गीय विकास महामंडळ, मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळ अशी अनेक महामंडळे राज्यात आहेत. मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाच्या संदर्भात शासनाची उपेक्षेची जी वृत्ती आहे ती सोडून, लाभार्थ्यांना लाभ देण्याबाबत आपण निदेश दिलेले आहेत. असे जरी असले तरी, मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळामध्ये स्टाफची कमतरता आहे, त्यामुळे त्या ठिकाणी स्टाफची व्यवस्था त्वरित केली जाणार आहे काय ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : महोदय, आवश्यक स्टाफची पूर्तता त्वरित करण्यात येईल.

--------- ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: राज्यात मोठया प्रमाणावर वाढत असलेले कॉपीचे प्रकार.

मु.शी.: राज्यात मोठया प्रमाणावर वाढत असलेले कॉपीचे प्रकार यासंबंधी श्री.श्रीकांत जोशी यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.श्रीकांत जोशी (औरंगाबाद विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"यंदाची दहावीची परीक्षा दिनांक 7 मार्च, 2006 पासून सुरु झाल्यानंतर राज्यात अनेक ठिकाणी कॉपी करण्याचे प्रकार सर्रास सुरु असणे, एका ठिकाणी मुख्याध्यापकांनी मुलांना उत्तरे लिहिण्यास मदत करण्याचा प्रकार उघडकीस येणे, काही ठिकाणी उत्तराच्या झेरॉक्स कॉपी विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन देणे, पोलिस बंदोबस्त असूनही कॉपी करण्याचे प्रकार सर्रास चालू असणे, परीक्षा केंद्राच्या आजूबाजूला असलेल्या झेरॉक्स सेंटरवर उत्तराच्या प्रतींची आगाऊ विक्री होत असणे, याचाच अर्थ या झेरॉक्स सेंटरला प्रश्नपत्रिका परीक्षा सुरु होण्यापूर्वीच उपलब्ध होत असल्याची शक्यता, या परीक्षेच्या कालावधीमध्ये झेरॉक्स सेंटरने हजारो रुपयांची माया जमा करणे, त्या भागात कॉपी मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांची प्रचंड गर्दी झाल्याने वाहतुकीवर परिणाम होणे, तरी सुद्धा पोलिसांनी दुर्लक्ष करणे, शासनाने या संदर्भात चौकशी करुन या कॉपी प्रकरणामागे असलेल्या टोळीचा तपास करुन संबंधितांवर तातडीने कारवाई करण्याची, तसेच ज्या विद्यार्थ्यांनी या प्रती खरेदी केल्या त्या सर्वांच्या उत्तरपत्रिका तपासून त्यांच्याविरुद्ध सुद्धा कडक कारवाई करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.हसन मुश्रीफ (शालेय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

:: निवेदन ::

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय, केवळ मॅट्रीकच नव्हे तर बारावी आणि इतर सर्वच परीक्षा घेण्याची महाराष्ट्र सरकारची क्षमता संपली की काय, असे चित्र आज संपूर्ण महाराष्ट्रामध्ये उभे राहिलेले आहे. कॉपी करण्यास राज मान्यता दिली की काय, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. कॉपी करण्यास सर्वतोपरी सहाय्य करु, कॉपी करणाऱ्यांना अडविण्याचा प्रयत्न करणार नाही, अशी भूमिका या शासनाकडून घेतली जात आहे.

महोदय, आज निरनिराळया वर्तमानपत्रांतून निरनिराळया बातम्या छापून येत आहेत. "पोलीस ठाण्याच्या बाजूला कॉपीची खुलेआम विक्री", "परीक्षा सुरु होण्यापूर्वी उत्तराची कॉपी तयार", "200 रुपयांत उत्तराची कॉपी", "मोबाईलवरुन पाच मिनिटात प्रश्नपत्रिका बाहेर", "कॉपीसाठी मदत करणाऱ्या तरुणास अटक" अशा बातम्या वर्तमानपत्रामध्ये वाचावयास मिळतात. अमर लोंढे याने आपल्या बहिणीला कॉपी पुरविण्यासाठी, प्रश्नपत्रिका आणण्यासाठी सातारा येथील परीक्षा केंद्रात घुसून, प्रश्नपत्रिका उतरुन काढली. एवढेच नव्हे तर "नकला पुरविणारे चार शिक्षक गजाआड" अशाही बातम्या वाचावयास मिळतात. महोदय, कॉपी पुरविण्यामध्ये पालकांचाच नव्हेतर शिक्षकांचा सुध्दा समावेश होऊ लागला आहे. या कॉपीचे लोण आता सर्वत्र पसरलेले आहे. आम्ही जी लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती, त्याबाबत कसल्याही प्रकारचे उत्तर निवेदनामध्ये देण्यात आलेले नाही.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी ....

सगळ्या ठिकाणी कॉपींचे प्रकार चालू आहेत. तरी, माझा माननीय मंत्रीमहोदयांना प्रश्न आहे की, आपण या कॉपींच्या प्रकरणासंदर्भात किती झेरॉक्स सेंटर्सच्या मालकांना अटक केली ? कॉपी करण्यामध्ये कोणत्या संस्थेचे पदाधिकारी आहेत ? तसेच, किती संस्थांना परीक्षा घेण्यापासून कायमची मुक्ती दिलेली आहे आणि किती संस्थाचालकांवर दंडात्मक कारवाई केलेली आहे ? सभापती महोदय, अशा प्रकारांमुळे शिक्षण प्रणालीच कोलॅप्स होत आहे. या संदर्भात आपल्या धोरणांच्या अंमलबजावणीचा प्रश्न आहे. तरी, या संदर्भात माझा दुसरा प्रश्न असा आहे की, हे कॉपींचे प्रकार कायमचे बंद होण्याबाबत आपण कोणते धोरण आखले आहे ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, हा प्रश्न अतिशय व्यापक असा आहे. एकंदरित दहावी व बारावीच्या परीक्षामध्ये असे घडणारे कॉपींचे प्रकार अतिशय गंभीर आहेत. सगळ्या समाजाने याकडे डोळसपणे पाहण्याची गरज आहे. तसेच आपण सगळ्यांनीही प्रबोधन करण्याची गरज आहे.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य मोठ्याने बोलण्याचा प्रयत्न करत असतात.)

आपण उत्तर ऐकू शकत नाही का ? आम्ही या संबंधी गंभीर आहोत. उत्तर ऐकण्याची सहनशीलता असावयास पाहिजे. कॉपींचे प्रकार कसे कमी होतील यासंबंधी मी माहिती देत आहे. आपण ती माहिती जरा ऐकून घ्यावी. आपण अशाप्रकारे जर बोलत असाल तर ते ठीक नाही. आपण माझे उत्तर ऐकून घ्यावे.

(गोंधळ)

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्रीमहोदय मोठ्या आवाजात बोलत आहेत, हे बरोबर नाही. हे कॉपींचे प्रकार तीन वर्षे टी.व्ही. वर दाखविण्यात आले आहेत. ई-टी.व्ही.ने अनाऊन्स केले होते की, कॉपी कशाप्रकारे होते ते आम्ही तुम्हाला दाखवतो. राज्याच्या माननीय शिक्षणमंत्र्यांनी या गोष्टीची कोणतीही दखल घेतली नाही किंवा कोणतीही कारवाई केली नाही ? सभापती महोदय, सर्रास कॉपी होत होती, 80 टक्के विद्यार्थी कॉपी करत होते आणि हा प्रश्न आल्यावर माननीय मंत्रीमहोदय आता मोठ्या आवाजात बोलत आहेत. आपण या संदर्भात कोणती कार्यवाही केली ते आम्हाला सांगावे. ..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, कॉपींचे प्रकार कमी झालेले आहेत, याबाबतची माहिती आपण ऐकून घ्यावी. मी आपणास या संदर्भातील आकडेवारी सांगतो. दहावीच्या परीक्षेमध्ये मार्च, 2003 ला 3016, मार्च, 2004 ला 4530, मार्च, 2005 ला 2992 आणि आता मार्च, 2006 ला 2409 अशाप्रकारे कॉपींची प्रकरणे झाली आहेत. सभापती महोदय, या आकडेवारीवरुन ही कॉपींची प्रकरणे आता कमी कमी झाली असल्याचेच दिसून येत आहे. त्याचप्रमाणे बारावीच्या परीक्षेमध्ये मार्च, 2003 ला 4183, मार्च, 2004 ला 3661, मार्च, 2005 ला 2660 आणि आता मार्च, 2006 ला 2438 अशाप्रकारे कॉपींची प्रकरणे झाली आहेत. यावरुन देखील आपणास असे लक्षात येईल की, कॉपींचे प्रकार कमी कमी होत चालले आहे. सभापती महोदय, या संदर्भात आम्ही बैठक क्रमांक देण्याचे काम सुरु केले आहे, ओळखपत्रावर फोटो लावण्याबाबत व स्वाक्षरी करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत, बाह्य उपद्रव टाळण्यासंदर्भात भरारी पथके नेमली आहेत आणि या संदर्भात बहुसंचित प्रश्नपत्रिका देखील सुरु केल्या आहेत. सभापती महोदय, उत्तर प्रदेशामध्ये या परीक्षांचे सर्व अधिकारी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेले आहेत. तेथील माहिती घेऊन त्याप्रमाणे कायद्यात बदल करुन कॉपी होऊ नये म्हणून लवकरच कार्यवाही करण्यात येणार आहे. त्या ठिकाणी या दिलेल्या अधिकारामुळे केंद्र प्रमुखांना अटक करण्याचे देखील अधिकार प्राप्त झालेले आहेत.

(यानंतर श्री. वि. खर्चे ..

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखी नोंदी

श्री. हसन मुश्रीफ...

सभापती महोदय, यासाठी सन्मानीय सदस्य सांगतात त्याप्रमाणे तज्ज्ञांची समिती नेमून कॉपी करण्यास पायबंद कसा बसेल हे पाहिले जाईल.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, कॉपी करण्यामध्ये विद्यार्थ्यांपेक्षा संस्थाचालक व काही प्रमाणात तेथील अध्यापक कर्मचारी वर्ग यांचा सहभाग जास्त प्रमाणात असल्याचे दिसून येते. तेथील विद्यार्थ्यांचा दोष त्यामानाने कमी असतो. आपली शाळा किंवा कॉलेजचा निकाल चांगला लागला पाहिजे, नाही तर शासनाच्या कारवाईस सामोरे जावे लागेल या भितीने तेथील संचालक मंडळ हे प्रकार करीत असतात, यांच्यावर कोणतीही अशी ठोस कारवाई होत नाही, ही खरी वस्तुस्थिती आहे. उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, काळया यादीतील परीक्षा केंद्रांना पुन्हा परीक्षा केंद्र देण्यात येऊ नये, असे मंडळाचे धोरण आहे. परंतु काही प्रकरणी अन्यत्र परीक्षा केंद्राची सोय करणे शक्य नसल्यामुळे सोईचे परीक्षा केंद्र पुन्हा देण्यात आले आहेत. या वर्षामध्ये ती देण्यात आलेली आहेत. यासंदर्भात आपण काही विशेष अशी योजना आखली आहे काय ? अशा कोणत्या केंद्रावर कॉपी झाली व परत त्यांना परीक्षा केंद्र म्हणून देण्यात आलेले आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, यासंदर्भातील माहिती माझ्याकडे आता उपलब्ध नाही ती माहिती मी नंतर पटलावर ठेवतो. कॉपी करीत असतांना एखादे केंद्र बंद करण्यात आले व विद्यार्थ्यांना सोईचे म्हणून पुन्हा ते केंद्र सुरु केले असेल व त्या केंद्रावर जर पुन्हा कॉपी करण्यात आली असे जर आढळून आले तर सदर संस्थेचे अनुदान बंद करण्यात येईल.

श्री. यशवंतराव गडाख : सभापती महोदय, कॉपीच्या प्रश्नाच्या संदर्भात ही लक्षवेधी आलेली आहे, या प्रश्नाची व्याप्ती फार मोठया प्रमाणात वाढलेली आहे. कॉपी करण्यामध्ये विद्यार्थ्यांचा, पालकांचा व संस्थांचा सहभाग आहे. मला असे वाटते याबाबतीत शासन जास्त काही करु शकत नाही, कारण या प्रश्नाची व्याप्ती खूप वाढलेली आहे. परीक्षा केंद्राच्या समोर हजारो लोक उभे असल्याचे आपणास दिसतात त्यामध्ये पालक असतात, कॉपी पुरविणारे असतात, म्हणून माझा प्रश्न असा आहे की, एकंदरीत आपणाला परीक्षा पध्दतीत काही बदल करता येतील काय ? महाराष्ट्रातील शिक्षण तज्ज्ञांची बैठक घेऊन 10 वी व 12 वी साठी परीक्षा पध्दतीमध्ये काही मुलभूत सुधारणा करण्याचा विचार शासन करणार आहे काय ?

.....2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जी सूचना केलेली आहे त्यानुसार तज्ज्ञांशी चर्चा करुन कॉपी रोखण्यासाठी काय सुधारणा करता येईल, किंवा शिक्षण पध्दतीत काय बदल करता येईल यादृष्टीने प्रयत्न करण्यात येतील. ज्या खाजगी शाळा आहेत त्यांचे कॉपी करण्याचे प्रमाण जास्त आहे. "महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी सेवाशर्ती नियम 1981" यानुसार आपण खाजगी शाळांवर कारवाई करु शकत नाही. म्हणून खाजगी शाळांवर कारवाई करण्यासाठी पुढील काळामध्ये कॉपीचे प्रमाण रोखण्यासाठी सदर नियमामध्ये बदल करावे लागतील.

श्री.जी.एल. अैनापुरे : सभापती महोदय, अतिशय गंभीर विषयावर चर्चा सुरु आहे, थोडा जास्त वेळ यासाठी द्यावा, कॉपी करण्याच्या प्रक्रियेमध्ये एकाला दोषी धरणे बरोबर होणार नाही..

यानंतर श्री. सुंबरे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. ऐनापुरे ....

कारण कॉपी प्रकरणे ही रॅकेट असल्याशिवाय होत नाहीत. या रॅकेटमध्ये प्रामुख्याने कोण कोण असते तर एक म्हणजे गावातील गुंड आणि परीक्षा केंद्रावर संरक्षणासाठी आलेले पोलीस. सभापती महोदय, मी शाळांमध्ये परीक्षा केंद्र चालविले आहे त्यामुळे मला याचा चांगला अनुभव आहे. तर या रॅकेटमधील तिसरा महत्त्वाचा घटक म्हणजे अतिमहत्त्वाकांक्षी पालक तसेच राजकीय क्षेत्रातील लोक आणि चौथा घटक म्हणजे या सगळ्यामध्ये अन्यायाला तोंड देऊ न शकणारे शिक्षक आणि तुमचे एसएससी बोर्ड देखील अत्यंत दोषी आहे. यामध्ये एसएससी बोर्ड मोठ्या प्रमाणात दोषी यासाठी आहे की, कॉपी करू दिली नाही म्हणून शिक्षकाला मारहाण होते पण तरीही त्याबाबत तक्रार करण्यास बोर्ड पुढे येत नाही. शिक्षकालाच त्याबाबत तक्रार करण्यास सांगितले जाते आणि मग त्यामध्ये येरझाऱ्या मारून शिक्षकच मरतो. या सगळ्या गोष्टींसाठी म्हणून हे सगळे रॅकेट बंद व्हावयाचे असेल तर मुलभूत परीक्षा पद्धतीमध्येच आपण बदल करणार आहात का ? दुसरे असे की, एका गावातील कॉपी आपण बंद केली म्हणून दुसऱ्या गावातील कॉपी बंद होईल असे नाही. आणि म्हणून यावर आणखी एक उपाय म्हणजे प्रगत देशांमध्ये विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तक पाहूनच उत्तरपत्रिका लिहिण्यास द्यायची आणि 50 टक्के गुण द्यायचे. असेही आपल्याला करता येईल काय याबाबत आपण निर्णय घेणार का ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी मघाशीच सांगितले आहे की, माननीय सदस्य श्री.गडाख, श्री. ऐनापुरे या सारख्या सर्व तज्ज्ञ मंडळींना घेऊन या परीक्षा पद्धतीमध्ये बदल करण्याचा आम्ही जरूर प्रयत्न करू.

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, शिक्षक संघटनेने आपल्याकडे या संदर्भात नेमकी मागणी केलेली आहे त्याबाबतीत आपण 'होय' किंवा 'नाही' मध्ये उत्तर द्यावे. विद्यार्थी संख्या पूर्ण होणार नाही. कमी होईल, पुढील वर्गामध्ये आपल्याला विद्यार्थी मिळणार नाहीत म्हणून त्यांना पुढे ढकलावयाचे यासाठी देखील हे प्रकार होतात. तेव्हा विद्यार्थी संख्या कमी झाली तरी चालेल, त्याबद्दल कोणाही शिक्षकांवर कारवाई केली जाणार नाही पण कॉपी करू दिली जाणार नाही असे धोरण आपण स्वीकारणार आहात का ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, यामध्ये दोन तीन गोष्टी शासनाने देखील विचार करणे आणि निर्णय घेणे आवश्यक आहे. उदा. मूल्यांकन करून शाळा

..... 3के 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ .....

अनुदानावर द्यावयाच्या यामुळे देखील हे प्रकार होत आहेत. शिवाय विद्यार्थी तसेच शिक्षक अतिरिक्त होतील, त्यातून तुकड्या कमी होतील म्हणूनही कॉपी प्रकरणे होतात. तेव्हा या सगळ्या अटी शासनाला रद्द कराव्या लागतील.

श्री. उल्हास पवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.गडाख आणि श्री.अैनापुरे यांनी या ठिकाणी मुलभूत प्रश्न विचारला आहे. या कॉपी प्रकरणामध्ये कोणा एका घटकाला आपल्याला जबाबदार धरता येणार नाही. यामध्ये सगळ्यात महत्त्वाचे काय असेल तर गुंडगिरी करणारे विद्यार्थी आणि त्यांना साथ देणारे गुंड. तेवहा ज्याप्रमाणे मतदान केंद्राच्या ठिकाणी अमुक एका हद्दीच्या आत कोणाला जाता येत नाही असे बंधन घातले जाते त्याप्रमाणे या परीक्षा केंद्राच्या ठिकाणी देखील हद्दीचे बंधन आपल्याला घालता येणार नाही का ?

श्री. हसन मुश्रीफ : तसे बंधन आहेच. परंतु आता हे प्रकार वाढत असल्याने जिल्हाधिकाऱ्यांकडे ही सगळी व्यवस्था देण्यासाठी कायद्यात बदल करावा लागेल.

उपसभापती : लक्षवेधी सूचनांवरील चर्चा आता संपली आहे.

*****

<u>कामकाज पत्रिकेवरील लक्षवेधी सूचना क्रमांक 1 संबंधात</u> ....

उपसभापती : आजच्या कामकाज पत्रिकेवरील लक्षवेधी सूचना क्रमांक 1 च्या बाबतीत संबंधित मंत्र्यांच्या कार्यालयाकडून माहिती आलेली आहे की, ते खालच्या सभागृहामध्ये गुंतलेले असल्याने सदरहू लक्षवेधी सूचना संध्याकाळी घेण्यात यावी. तेव्हा मी सभागृहाला विचारू इच्छितो की, ही लक्षवेधी सूचना आपण आज संध्याकाळी चर्चेला घ्यावयाची की उद्या सकाळी घ्यावयाची ?

काही सन्माननीय सदस्य : उद्या घेतली तरी चालेल.

उपसभापती : ठीक आहे. ही लक्षवेधी सूचना उद्या सकाळी लक्षवेधी सूचना क्र. 1 म्हणून चर्चेला घेण्यात येईल.

(यानंतर श्री. खंदारे ..... 3एल 1 ..

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मध्यंतरापूर्वी विशेष उल्लेखाच्या सूचना घेण्यात याव्यात अशी माझी आपल्याला विनंती आहे.

उपसभापती : सभागृहाची बैठक आता मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 4.30 वाजता पुन: भरेल.

(दुपारी 3.55 ते 4.30 पर्यंत मध्यंतर)

यानंतर श्री.किल्लेदार.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(मध्यंतरानंतर)

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्रीमती सुधा जोशी)

पृ.शी. : क्षय रोगावर आळा बसण्याकरिता राज्य शासनाने खास उपाययोजना करण्याची आवश्यकता.

मु.शी. : क्षय रोगावर आळा बसण्याकरिता राज्यशासनाने खास उपाययोजना करण्याची आवश्यकता, याबाबत श्री.संजय दत्त, वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : माननीय सदस्य श्री.संजय दत्त, वि.प.स. यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

"मुंबई शहर हे भौगोलिकदृष्टया अत्यंत महत्वाचे शहर असून दिवसेंदिवस या शहराच्या लोकसंख्येमध्ये वाढ होत आहे. या शहरामध्ये अनेक राज्यातून प्रांतातून लोक उदरनिर्वाहासाठी या शहरात येत असतात. वाढत्या लोकसंख्येमुळे पर्यावरणात बदल होऊन प्रदूषणात वाढ होऊन बरोबरच अनेक संसर्गजन्य रोगांमध्ये वाढ होत आहे. त्यामध्ये प्रामुख्याने क्षय रोगासारख्या रुग्णांमध्येही वाढ होत असल्याचे दिसून येते. यापूर्वी क्षय रोगावर शासनाने मोठया प्रमाणात रोगप्रतिबंधक मोहीम राबवून क्षय रोग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला होता. परंतु सध्या या रोगाचे रुग्ण मोठया प्रमाणात आढळून आलेले आहे. शासनाने जशी एड्स सारख्या दुर्धर रोगावर मोठया प्रमाणात मोहीम राबवीत आहे. त्याचप्रमाणे क्षय रोगावर आळा बसण्याकरिता राज्य शासनाने मोठया प्रमाणात मोहीम राबवून क्षय रोगासारख्या रुग्ण वाढीपासून प्रतिबंध करण्यासाठी खास उपाययोजना करण्याची आवश्यकता, यासाठी मी ही विशेष उल्लेखाची सूचना देत आहे."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MHM/ KGS/ MAP/

पृ.शी. : मुंबईतील अंधेरी येथील नॅशनल पार्क म्हणून घोषित केलेल्या गिलबर्ट हिल ही दुर्मिळ वास्तू जतन करण्याबाबत.

मु.शी. : मुंबईतील अंधेरी येथील नॅशनल पार्क म्हणून घोषित केलेल्या गिलबर्ट हिल ही दुर्मिळ वास्तू जतन करण्याबाबत श्रीमती संजीवनी रायकर,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : माननीय सदस्या श्रीमती संजीवनी रायकर, वि.प.स. यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्रीमती संजीवनी रायकर (मुंबई शिक्षक) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

"700 लाख वर्षापूर्वीची उत्पत्ती व भूगर्भ शास्त्रीय महत्व लखात धेऊन गिलबर्ट हिल अंधेरी (प) ला नॅशनल पार्क म्हणून घोषित केले. या गिल्बर्ट हिलची डोंगरतोड खाण कामासाठी सुरु आहे. हिलला टेकून बहुमजली इमारतीचे काम सुरु आहे. त्यामुळे शक्तीशाली यंत्रांचे फटके हिलच्या पायथ्याला बसत आहेत. जगातील दुर्मीळ अशी वास्तू शेवटचे आचके देत आहे. या संबंधी करावयाची कारवाई."

सभापती महोदया, मुंबई उपनगरात अंधेरी मध्ये पुरातन काळातील गिल्बर्ट हिलचा परिसर सन 1952 च्या सुमारास जिऑलॉजिकल हेरिटेजमुळे नॅशनलपार्क घोषित केला. त्यासाठी या डोंगराच्या भोवतालचा भाग आरक्षित केला होतो. आज तिथे अवैध खाणकाम आणि बांधकामामुळे गिल्बर्ट हिलचा विध्वंस होत आहे. विविध संबंधित विभागांकडे तक्रारी करुन उपयोग झाला नाही. डोंगरतोड सुरुच आहे.

450 वर्षापूर्वीच अंधेरी ग्रामदेवतेच दुर्गामाता मंदिर या टेकडीवर आहे. जून, 1969 मध्ये मंदिराच्या पुजाऱ्याचा खून झाला. अजूनही दहशतीचं वातावरण आहे. मंदिराच्या ट्रस्टतर्फे अवैध बांधकामांना प्रतिबंध होत नाही हिलला टेकून बहुमजली इमारती उभ्या होत आहेत. अवजड शक्तीशाली यंत्राचे फटके गिल्बर्ट हिलला बसतायेत. 13 जानेवारी, 2006ला अजमेरा बिल्डरने डोंगर पायथ्याशी दगड फोडण्याचे काम केलेले आहे, त्यामुळे डोंगरमाथ्यावर प्रचंड खोलवर जाणारी भेग पडली. 60 टन वजनाची शिळा आता कधीही कोसळेल. जगातील दुर्मिळ अशी 700 लाख वर्षापूर्वीची उत्पत्ती असणारी वास्तू गिल्बर्ट हिल शेवटच्या उचक्या देत आहे. ती नामशेष होईल, अजूनही तिला वाचविण्यासाठी शासन काही उपाययोजना करेल काय ? अशाप्रकारचा विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MHM/ KGS/ MAP/

पृ.शी. : रायगड जिल्हयातील रायवाडी-अक्षी येथील बुडी मारुन रेती काढण्यास शासनाची परवानगी नसल्यामुळे व्यवसाय बंद पडल्याबाबत.

मु.शी. : रायगड जिल्ह्यातील रायवाडी-अक्षी येथील बुडी मारुन रेती काढण्यास शासनाची परवानगी नसल्यामुळे व्यवसाय बंद पडल्याबाबत,श्री.जयंत प्र.पाटील, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील,वि.प.स. यांनी एक विशेष उल्लेखाची सूचना दिलेली आहे, ती त्यांनी मांडावी.

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदया, मी पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो :-

"रायगड जिल्हयातील (रायवाडी-आक्षी) ता.अलिबाग येथील अनेक ग्रामस्थ बुडी मारुन रेती काढण्याचा व्यवसाय अनेक वर्षांपासून परंपरेने करीत आहेत. मात्र शासनाने सध्या बुडीमारुन रेती काढण्यास परवानगी दिली नसल्याने हा व्यवसाय बंद आहे. व्यवसाय बंद झाल्यामुळे अनेक कुटुंबाचा रोजी-रोटीचा प्रश्न निर्माण झाला आहे.

जिल्हाधिकारी रायगड यांनी दिनांक 19/4/2005 रोजी हातपाटीने रेती काढण्यासाठी परवानगी मिळावी म्हणून शासनाच्या महसूल विभागाकडे प्रस्ताव पाठविला आहे. तब्बल वर्ष झाले तरी शासनाने या प्रस्तावावर निर्णय घेतलेला नाही. तरी या प्रस्तावास त्वरित मान्यता देवून गरीब कुटुंबाचा रोजी-रोटीचा प्रश्न सोडविण्यासाठी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनाचे लक्ष वेधू इच्छित आहे."

सभापती महोदया, रेती काढण्यासाठी परवानगी मिळावी म्हणून शासनाकडे प्रस्ताव पाठविलेला आहे तो प्रलंबीत आहे. त्या ठिकाणचे जे कोळी बांधव आहेत, त्यांच्यावर उपासमारी होण्याची वेळ आलेली आहे...

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील ....

त्यादृष्टीकोनातून प्रलंबित असलेला जिल्हाधिकाऱ्यांचा हा प्रस्ताव शासकीय पातळीवर तातडीने मंजूर करुन तो जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठवावा आणि त्याप्रमाणे शासनाने ताबडतोब याची दखल घ्यावी यादृष्टीकोनातून मी या विशेष उल्लेखाव्दारे शासनाचे लक्ष वेधू इच्छितो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : वांद्रे (पूर्व) येथील पश्चिम द्रूतगती मार्गावरुन विधान भवनाकडे जाणाऱ्या रस्त्यावर माहीम येथे रहदारी ठप्प होणे.

मु. शी. : वांद्रे (पूर्व) येथील पश्चिम द्रूतगती मार्गावरुन विधान भवनाकडे जाणाऱ्या रस्त्यावर माहीम येथे रहदारी ठप्प होणे याबाबत श्री. मधुकर सरपोतदार, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : मा□□य सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यां□ ए□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. मधुकर सरपोतदार (विधानसभेने निवडलेले) : महोदया, मी पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडतो.

" वांद्रे (पूर्व) येथील पश्चिम द्रूतगती महामार्गावरुन विधान भवनाकडे जाणाऱ्या रस्त्यावर माहीम येथे रहदारी ठप्प होते. याबाबत मी सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांच्याशी पत्रव्यवहार केलेला असून या विभागांकडून अद्यापही या प्रश्नावर उपाययोजना केली जात नाही. परिणामी दररोज वांद्रे (पूर्व) ते माहीम हे अंतर पार करण्यास 30 ते 45 मिनिटांचा अवधी लागतो. त्यामुळे मंत्रालय, विधान भवन, उच्च न्यायालय आदी शासकीय कार्यालयात काम करणारे कर्मचारी, खाजगी वाहनाने व सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेच्या माध्यमातून प्रवास करणारी जनता यांना वेळेवर व्यवसायाच्या ठिकाणी पोहोचणे अशक्य होते. यासंदर्भात काय उपाययोजना करता येईल याविषयी मी संबंधित विभागाला लेखी सूचना केलेली आहे. रहदारीची ही मोठी समस्या सोडविण्यात अद्याप शासनाला यश आलेले नाही व रोजच ही समस्या गंभीर बनत चालली आहे.

वांद्रे ते वरळी हा सागरी सेतू मार्ग बांधण्याचे काम सुरु आहे. हे काम पूर्णत्वास गेल्यानंतर ही रहदारीची समस्या काही प्रमाणात सुटेल असे संबंधित विभागाचे मत आहे. परंतु हे काम पूर्ण होण्यासाठी किती काळ लागणार आहे याविषयी कोणतीही अधिकृत माहिती उपलब्ध नाही. त्यामुळे हा रहदारीचा प्रश्न अनिश्चित काळापर्यंत जैसे थे राहणार का हा प्रश्न सर्वसामान्य जनतेसमोर उभा आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS/

श्री. मधुकर सरपोतदार .....

आपण सभागृहात संबंधित विभागाची बैठक बोलावून या प्रश्नावर मार्ग शोधण्याविषयी निर्देश दिले आहेत. हे जरी खरे असले तरी ज्या गतीने ही समस्या सोडविण्यासाठी संबंधित विभागाने प्रयत्न करणे आवश्यक होते ते प्रयत्न होताना दिसत नाहीत हे अतिशय खेदाने नमूद करावेसे वाटते. या प्रश्नाबाबत बस, टॅक्सी, खाजगी वाहनचालक या सर्वांना प्रतिदिन त्रास सहन करावा लागत आहे. या प्रश्नावर तातडीने उपाययोजना व्हावी यासाठीच विशेष उल्लेखाच्या माध्यमातून मी हा प्रश्न आपल्या अनुमतीने सभागृहात मांडत आहे "

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: महानगरपलिका (दुसरी सुधरणा) विधेयक.

मु.शी.: महानगरपालिका (दुसरी सुधारणा) विधेयक व्यपगत न करता पुढे चालू ठेवण्याबाबत माननीय मुख्यमंत्र्यांचा प्रस्ताव.

श्री. राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडतो :-

" सन 2004 चे वि. प. वि. क्रमांक 28 - मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम,1949 आणि नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, 1948 यात आणखी सुधारण्या करण्याकरिता विधेयक महाराष्ट्र विधान परिषद नियमावलीतील नियम 151(1) अन्वये व्यपगत न करता त्याच नियमातील परंतुकामधील तरतुदीनुसार विधान परिषदेमध्ये पुढे चालू ठेवण्यात यावे."

सभापती महोदया, या तीनही महानगरपालिका अधिनियमांमध्ये जर महानगरपालिकेच्या कोणत्याही नगरसेवकाने आपले कर्तव्य व्यवस्थित पार पाडले नाही किंवा आपले कर्तव्य पार पाडत असताना लज्जास्पद वर्तन केले तर त्यांना काढून टाकण्याची तरतूद आहे. त्याला मुदतवाढ देण्याच्या दृष्टीने हा प्रस्ताव मांडलेला आहे.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: स्वयं-अर्थसहाय्यित विद्यापीठे (स्थापना व विनियमन) विधेयक

मु.शी.: L.C.BILL NO.X OF 2006.

(A BILL TO PROVIDE FOR ESTABLISHMENT OF THE SELF-FINANCED UNIVERSITIES IN THE STATE; TO REGULATE THEIR WORKING AND FUNCTIONS AND FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.)

श्री. दिलीप वळसे-पाटील (वैद्यकीय शिक्षण, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री) : सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने सन 2006 चे वि.प.वि. क्रमांक 10 राज्यात स्वयं-अर्थसहाय्यित विद्यापीठांची स्थापना करण्याची तरतूद करण्यासाठी, त्यांच्या कामकाजाचे व कार्यांचे विनियमन करण्यासाठी आणि त्यांच्याशी संबंधित किंवा तदनुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदया, विधेयक विचारात घेण्यापूर्वी मला या विधेयकाच्या संदर्भात आपणास विनंती करावयाची आहे. या विधेयकाच्या संदर्भात मी आपणास एक पत्रही दिलेले आहे. महाराष्ट्र स्वयं-अर्थसहाय्यित विद्यापीठे (स्थापना व विनियमन) विधेयक 2006 हे विधेयक यापूर्वी 16 डिसेंबर 2004 रोजी संयुक्त समितीकडे पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला. संयुक्त समितीच्या या विधेयकाच्या संदर्भात अनेक बैठका झाल्या. सर्वोच्च न्यायालयाने देखील यासंबंधात एक महत्वपूर्ण निर्णय दिलेला आहे. त्या निर्णयाच्या अनुषंगाने हे विधेयक प्रथम परत घेण्यात आले आणि आता पुन्हा नव्याने हे विधेयक याठिकाणी विचारार्थ आलेले आहे. परंतु आधी हे विधेयक ज्या संयुक्त समितीकडे पाठविण्यात आलेले होते त्या समितीचा अहवाल सभागृहाला सादर झालेला नाही. आधीच्या संयुक्त समितीने अनेक बैठका घेऊन या विधेयकाच्या संदर्भात अभ्यास करुन ज्या काही शिफारशी केलेल्या आहेत त्या सभागृहासमोर आलेल्या नाहीत. संयुक्त समितीच्या शिफरशी न येताच नव्याने विधेयक विचारार्थ ठेवलेले आहे. हे विधेयक पुन्हा संयुक्त समितीकडे पाठविण्यात यावे अशी मी मागणी करीत असून तसे पत्र देखील मी दिलेले आहे. आधीच्या संयुक्त समितीमध्ये माननीय सदस्य मधुकर सरपोतदार तसेच माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख हे होते. त्यांचीही या विधेयकाच्या संदर्भातील मते जाणून घेतली

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पांडुरंग फुंडकर पुढे सुरु...)

पाहिजेत. आता हे विधेयक विचारात घेतले तर आधी नेमलेल्या संयुक्त समितीला आणि त्या समितीने केलेल्या शिफारशींना काहीच अर्थ राहाणार नाही. हे अत्यंत महत्वाचे विधेयक असल्यामुळे ते संयुक्त समितीकडे पाठवून त्यानंतर ते सभागृहात विचारासाठी आणावे अशी मी मागणी करीत आहे.

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : पूर्वीचे संयुक्त समितीकडे पाठविलेले विधेयक परत घेण्यात आलेले असून त्यानंतर नव्याने हे विधेयक मांडण्यात आलेले आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : आधीचे विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याचा निर्णय या सार्वभौम सभागृहाने घेतलेला होता. मग संयुक्त समितीच्या शिफारशी सभागृहासमोर येण्यापूर्वी ते विधेयक कसे काय परत घेण्यात आले ? अशा पध्दतीने सभागृहाचे कामकाज करणे उचित नाही.

तालिका सभापती : आता नवीन विधेयक सदनासमोर विचारार्थ मांडलेले आहे. माननीय सदस्यांना त्यावर आपले विचार मांडता येतील.

(विरोधी पक्षाचे काही माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

श्री. दिलीप वळसे-पाटील : माझी माननीय सदस्यांना विनंती आहे की, या विधेयकाच्या संदर्भातील क्रोनोलॉजी त्यांनी कृपा करुन समजून घ्यावी. 21 जानेवारी 2004ला महाराष्ट्र स्वयं-अर्थसहाय्यित विद्यापीठे(स्थापना व विनियमन) विधेयक मांडण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली.

...नंतर श्री. कानडे...

अशुधारित प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

SSK/ KGS/ MAP/ पूर्वी श्री.शिगम 16:45

श्री. दिलीप वळसे-पाटील ....

परंतु ते विधेयक वेळेअभावी सभागृहामध्ये सादर होऊ शकले नाही. त्यानंतर 16 जुलै 2004 रोजी या संदर्भातील अध्यादेश निर्गमित करण्यास राज्य शासनाने मान्यता दिली आणि त्यानंतर 18 ऑगस्ट 2004 रोजी राज्यपालांनी मान्यता दिल्यानंतर या संदर्भातील अध्यादेश जारी करण्यात आला. नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात हे विधेयक मांडण्यात आले आणि 18.12.2004 रोजी सभागृहाने गठीत केलेल्या संयुक्त समितीकडे ते पाठविण्यात आले. 2004 मध्ये जो अध्यादेश काढण्यात आला होता त्याची मुदत संपली होती. दरम्यानच्या काळात या खात्याचे तत्कालिन मंत्री श्री. सुरेशदादा जैन यांनी या विधेयकाच्या संदर्भात चार बैठका घेतल्या. 6 जानेवारी,2005 रोजी मुंबई येथे,13 जानेवारी,2005 रोजी पुणे येथे,14 जानेवारी,2005 रोजी औरंगाबाद येथे आणि 15 जानेवारी,2005 रोजी अमरावती येथे अशा विभागवार बैठक घेतल्या. त्यानंतर हे विधेयक ज्या संयुक्त समितीकडे पाठविण्यात आले होते त्या समितीच्या तीन बैठका झाल्या. 8.2.2005 रोजी मुंबई येथे, दुसरी 7 जून 2005 रोजी मुंबईमध्ये बैठक झाली. दरम्यानच्या काळात उत्तरांचल आणि सुप्रीम कोर्टाचे यासंदर्भात काही निर्णय आले. त्यानंतर जुलै 2005 मध्ये लोणावळा येथे बैठक झाली. मी या विभागाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर आधीचा अध्यादेश काढला होता त्यासंदर्भातील बिल सभागृहात मांडले होते. सदनाने ते संयुक्त समितीकडे पाठविले होते. विधेयक विचारात घेतल्यानंतर उत्तरांचल आणि सुप्रीम कोर्टाचे निवाडे लक्षात घेता मूळ विधेयकामध्ये काही सुधारणा करण्याची आवश्यकता आहे असे वाटले आणि तशी भूमिका सरकारने स्वीकारल्यानंतर हे विधेयक सभागृहामध्ये मागे घेण्याचा निर्णय झाला. हे विधेयक मागे घेण्याचा प्रस्ताव मांडला आणि सभागृहाने त्याला मान्यता दिली. ज्यावेळी हा प्रस्ताव सादर करण्यात आला त्यावेंळी प्रश्न उपस्थित करण्यात आला होता की संयुक्त समितीमध्ये आम्ही काम केलेले आहे ते विधेयक आता मागे कसे घेत आहात ? त्यावेळी सभागृहात मी आश्वासन दिले होते की बिल मागे घेत असलो तरी आणि संयुक्त समितीचे अस्तित्व राहणार नसले तरी सुध्दा जे माननीय सदस्य संयुक्त समितीवर काम करीत होते त्यांचे मत मी समजावून घेणार आहे आणि मंत्रिमंडळासमोर सुधारित बिल घेऊन जाण्यापूर्वी संयुक्त समितीच्या सदस्यांशी चर्चा करुन मंत्रिमंडळासमोर जाईन. ज्यावेळी ही चर्चा झाली त्यावेळी माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख आणि माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण हे उपस्थित होते. त्यानंतर खालच्या आणि वरच्या अशा दोन्ही सभागृहातील संयुक्त समितीच्या

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील ...

सदस्यांसमवेत दोन दिवस अतिशय शांत वातावरणात या बिलाबाबत चर्चा झाली. त्यानंतर विभागाने प्रस्ताव तयार केला आणि मंत्रिमंडळासमोर जाण्यापूर्वी यासंदर्भात 6 ऑक्टोबर आणि 29 ऑक्टोबर 2005 रोजी चर्चा झाली. 6 ऑक्टोबरला सहयाद्री अतिथीगृहामध्ये आणि 29 ऑक्टोबरला माझ्या दालनात यासंबंधात चर्चा झाली. त्यामध्ये अनेक माननीय सदस्य उपस्थित राहू शकले नाहीत. काही सदस्य उपस्थित होते. यासंदर्भात जे सुधारित बिल तयार झाले ते मंत्रिमंडळासमोर घेऊन जाण्यापूर्वी या सभागृहातील सदस्यांबरोबर त्यासंबंधात चर्चा केली आणि त्यानंतर मंत्रिमंडळासमोर हे बिल घेऊन गेलो आणि मंत्रिमंडळाने या बिलाला मान्यता दिली. यासंदर्भात घाई अशासाठी आहे की हे बिल मंजूर झाल्यानंतर लगेचच दुसऱ्या दिवशी सकाळी कोणत्या विद्यापीठाला परवानगी देणार नाही. एक वर्षाचा कालावधी त्यामध्ये जाणार आहे. एक वर्षाच्या कालावधीमध्ये यासंदर्भातील पायाभूत सुविधा करावयाच्या आहेत. हे कॅम्पस आहे,अफीलेटेड युनिव्हर्सिटी नाही. विद्यापीठ काढण्यासाठी विभागाला किंवा मला अधिकार नाहीत. ते अधिकार मंत्रिमंडळाला आहेत. राज्याच्या मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव सादर केले जाणार आहेत. त्यासंदर्भातील भूमिका या विधेयकामध्ये मांडण्यात आलेली आहे.

यानंतर श्री. खर्चे पी.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापतीस्थानी माननीय उपसभापती

श्री. दिलीप वळसे-पाटील .....

एका बाजूला यासंदर्भात आपण भूमिका घेतो आणि दुसऱ्या बाजूला मात्र अशा प्रकारे स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे काढतांना कोणाला तरी कमिटमेंट केलेले आहे असे म्हणावयाचे हे बरोबर नाही. या कायदयामध्ये आपण त्यांना एक वर्षाची मुदत दिलेली आहे, त्यांना एक वर्ष समजून घ्यावयाचे आहे, त्यानंतर इन्फ्रास्ट्रक्चर त्यांचेच असणार व या कायदयामध्ये ज्या तरतुदी आपण केलेल्या आहेत त्या ही विद्यापीठे पूर्ण करु शकली तरच त्यांना मंत्रिमंडळ अंतिम मान्यता देईल ही शासनाची भूमिका आहे. आज ज्यावेळी बी.अे. आणि बी.कॉम. सारख्या जनरल एज्युकेशनसाठी आपण विद्यापीठे काढत नाही आणि दुसरीकडे जगातील अनेक विद्यापीठे आपल्या देात व आपल्या राज्यात यायला लागली आहेत त्यावर आपला कुठलाही कंट्रोल नाही. अशा परिस्थिती आपल्याच राज्यात ज्या चांगल्या संस्था काम करु इच्छितात त्या संस्था शिक्षण क्षेत्रामध्ये गुंतवणूक करायला निघालेल्या आहेत अशा वेळी आपण बायो-टेक्नॉलॉजीसारख्या विषयामध्ये एखादया ट्रस्टला, एखादया इंडस्ट्रीअल हाऊसला असे वाटले की, 100 कोटी रुपये खर्च करुन काही तरी करावे व त्यासाठी आपण स्वतंत्र पाहिजे, यादृष्टीने हा निर्णय घेण्याची गरज आहे. आज जगातील विद्यापीठे पाहिली तर ब्रिटनमधील सगळीच विद्यापीठे ही ॲफिलिएटेड युनिव्हर्सिटीज नाहीत तर त्यात काही कॅम्पस युनिव्हर्सिटीज सुध्दा आहेत. या ठिकाणी आपण सुध्दा तसाच विचार करीत आहोत. जगापेक्षा वेगळे असे काहीच करीत नाही. अशा वेळी दर्जेदार शिक्षण देण्याचे काम, संशोधनाचे काम करण्यासाठी हा नवीन प्रयोग करायला आपण निघालो असतांना अशा विद्यापीठांची गरज आहे. आपल्याच देशतील बाकीच्या राज्यांबाबत विचार केला तरी दिसून येईल की, ती राज्ये देखील आपल्या पुढ गेलेली आहेत. गुजरातमध्ये सन 2003 मध्ये हा निर्णय घेतला आहे, उत्तरांचल सरकारने तीन वर्षापूर्वी निर्णय घेतला आहे, हिमाचल प्रदेश, सिक्कीम, उत्तर प्रदेश यांनी देखील हे निर्णय यापूर्वीच घेतलेले आहेत. राजस्थान, झारखंड, आंध्र प्रदेश, जम्मू-काश्मिर हया राज्यांनी देखील अशी खाजगी व स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे स्थापन करण्याचे प्रयत्न सुरु केलेले आहेत. माझी एवढीच विनंती आहे की, हे विधेयक विधानसभेत देखील मांडता आले असते परंतु या विधेयकाच्या संदर्भात विधानसभेबरोबरच विधानपरिषदेत अशा प्रकारे दोन्ही सदनात सविस्तर चर्चा होऊन त्यात काही त्रुटी वाटल्या आणि सदनाचा आग्रह असेल तर चर्चेच्या ओघात

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील .....

संयुक्त समितीकडे हे विधेयक पाठविण्याच्या संदर्भातही माझी हरकत राहणार नाही. पण चर्चा सुरु करण्यापूर्वीच हे विधेयक संयुक्त समितीकडे पाठवावे असा आग्रह धरणे योग्य ठरणार नाही, असे मला वाटते. आपण या विद्यापीठांची स्थापना करतांनाच त्यांना एक वर्षभराचा कालावधी दिलला आहे, लगेच त्याबाबतचा अंतिम निर्णय होईल अशातला भाग नाही. म्हणून माझी विनंती अशी आहे की, आज सदनासमोर हे विधेयक मांडले आहे त्यामध्ये प्रामाणिकपणाच्या भावनेतून संयुक्त समिती अस्तित्वात नसतांना दोन्ही सभागृहातील सन्माननीय सदस्यांना बोलावून त्यांच्याशी प्राथमिक चर्चा केली, त्या चर्चेतून अनेक मुद्दयांच्या बाबतीत एकमत झालेले आहे, अनेक राजकीय पक्षाच्या प्रमुखांनी देखील चर्चा केलेली आहे. अशा प्रकारे सर्व बाजुंनी विचार केल्यानंतर सभागृहात हे विधेयक मान्यतेसाठी आणलेले आहे. म्हणून माझी विनंती आहे की, आपण काळाच्या पाठीमागे राहून चालणार नाही, तसेच यामध्ये दुसरी कुठलीही भिती बाळगण्याचे कारण नाही आणि शासनाला यामध्ये हस्तक्षेप करावयाचा नाही. अशा वेळी या राज्यात दर्जेदार शिक्षणाच्या संधी निर्माण करण्यासाठी बाकीच्या राज्यांप्रमाणेच आपल्या राज्यासारख्या प्रागतिक राज्याने मागे रहावे ही भूमिका आपल्या राज्याला कमीपणा आणणारी ठरेल, असे मला वाटते. म्हणून या विधेयकावरील चर्चा सदनात सुरु करावी, चर्चेतून ज्या सुधारणा सुचविल्या जातील त्या आवश्यक वाटल्या तर स्वीकारण्याची सुध्दा माझी तयारी आहे. आजच हे विधेयक मान्य करावे असा माझा आग्रह देखील नाही तर यावर जेवढी चर्चा करावयाची असेल तेवढी चर्चा करावी, ती चर्चा ऐकून घेण्यास मी तयार आहे. म्हणून सभागृहाने यावरील चर्चा सुरु करावी, अशी मी विनंती करतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

यानंतर श्री. भारवि .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी. देशमुख (अमरावती विभाग पदवीधर) : सन 2006 चे क्र. 10 हे विधेयक या ठिकाणी मंत्री महोदयांनी मांडले आहे. त्या विधेयकाच्या बाबतीत काही गोष्टींचा स्पष्टपणे खुलासा माननीय मंत्री महोदयांनी केलेला आहे. त्यातील काही भागाविषयी मी स्वत: मुद्दाम माहिती देईल. ते म्हणजे हे विधेयक ज्यावेळी सभागृहात आले त्यावेळी आम्ही यासंबंधी विचार मांडले. मी त्या विचाराशी ठाम असलेला माणूस आहे. संयुक्त समिती नेमल्यानंतर जे मुद्दे होते त्यावरचे थिंकिंग मी काढून आणले होते. मी स्वत: त्या समितीचा सदस्य असल्याने त्यासंबंधीची यादी दिली होती. त्यानुसार सर्व कागदपत्र समितीला विभागाकडून उपलब्ध करून देण्यात आली होती. समितीला कागदपत्र उपलब्ध करून देण्यात आल्यानंतर छाननीला सुरूवात झाली. त्यावेळी अतिशय महत्त्वाचा निवाडा सर्वोच्च न्यायालयाचा आलेला आहे. 1-2 जुलै रोजी लोणावळा येथे जी बैठक बोलाविण्यात आली होती, त्या बैठकीला मी स्वत: उपस्थित होतो. प्रत्येक कलम वाचल्यानंतर असे लक्षात आले की, त्यात सर्वोच्च न्यायालयाच्यचा निर्णयाप्रमाणे बदल करणे आवश्यक आहे. त्यावेळी मी एका गोष्टीला विरोध केला होता. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय आलेला आहे. तेव्हा काय रिपील करणे आवश्यक आहे ते शासनाने करावे असे मी मंत्रिमहोदयांना सांगितले होते. प्रत्येक कलमामध्ये बदल करणे आवश्यक होते. त्यावेळी मंत्रिमहोदय माझी गंमतसुध्दा करीत होते. सर्वोच्च न्यायालयाने जो निर्णय दिला आहे, तो लक्षात घेऊन विभागाने बिलामध्ये बदल करून ते बिल समिती समोर मांडण्यात आल्यानंतरच मग आपल्याला काम करता येईल किंवा रिपील करून सभागृहासमोर जाता येईल असा आग्रह मी धरला होता. या दोनपैकी कोणता मार्ग शासनाने स्वीकारला आहे ? हे कळत नाही. जुने विधेयक होते ते सभागृहाच्या अनुमतीने नियमाप्रमाणे मागे घेतले आहे. त्याच वेळी संयुक्त समिती संपुष्टात आली. येथे मंत्रिमहोदयांनी अशी माहिती दिली की, संयुक्त समिती संपुष्टात आल्यानंतर देखील बैठक घेण्यात आली. परंतु, ती बैठक अनौपचारिक होती. त्यामुळे त्या बैठकीला मी व्यक्तिश: हजर नव्हतो. सर्वोच्च न्यायालयाने कोणते बदल केले आहेत हे आज कोणालाही कळलेले नाहीत. ज्यावेळी एखादे विधेयक संयुक्त समितीपुढे जाते त्यावेळी प्रत्येक कलमावर विस्तृत चर्चा होते. या शब्दा ऐवजी असा शब्द समावेश करण्यात यावा उल्लेख करण्यात येतो. विधेयकाच्या संबंधीचे ॲडिशन, डिलिशन व सबस्ट्रॅक्शन लक्षात घेऊन विधेयक सभागृहापुढे मांडावे लागते. पण या विधेयकामध्ये कशाचाही उल्लेख नाही. सर्वोच्च न्यायालयाने कोणता बदल सुचविला आहे, त्यासंबंधी एका शब्दाचा देखील उल्लेख नाही.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख....

जी बैठक झाली होती त्यात मला अशी माहिती मिळाली होती की, भारत सरकारने या कामाचा पिच्छा सोडून दिलेला आहे. भारत सरकारने त्यातून अंग बाहेर काढून घेतले आहे. माझे असे म्हणणे आहे की, शासन महाराष्ट्रामध्ये एक नवा अध्याय सुरू करीत आहे. ज्याच्या जवळ पैसा असेल तो शिकेल. हे धोरण मान्य होऊ शकत नाही असे मी त्यावेळी बोललो होतो. त्यात अनुषंगिक बदल करण्याचा विचार करून मी तेथे गेलो होतो. पुढील अधिवेशन सत्रामध्ये हे विधेयक घेतले तर काहीही होणार नाही. यातील 3-4 गोष्टी महत्त्वाच्या आहेत. संयुक्त समितीपुढे हे विधेयक गेले तर थिंकिंग अनुभवता येते. परंतु, जो सोन्याचा चमचा घेऊन जन्माला येणार आहे, त्यालाच प्रवेश देण्याचा विचार शासन करीत आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख....

माझी माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे की, हे विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यात यावे आणि त्या ठिकाणी या तीन-चार महत्वाच्या गोष्टींबाबत तपशीलवार चर्चा करुन, नंतर हे विधेयक सभागृहापुढे सादर करावे.

उपसभापती : विधेयक जर संयुक्त समितीकडे पाठविण्याबद्दलच जर चर्चा होत असेल तर याबाबत सदनानेच काही तरी ठरविले पाहिजे.

श्री.दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, पूर्वी ज्यावेळी हे विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यात आले होते त्यावेळी न्यायालयाने दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने विधेयकामध्ये क्लॉज-टू- क्लॉज सुधारणा करण्याची आवश्यकता असल्याचे मत व्यक्त केले गेले होते. म्हणून शासनाने नवीन विधेयक करण्याचे ठरविले. ज्यावेळी लोणावळा-खंडाळा येथे संयुक्त समितीची बैठक झाली त्यावेळी सन्माननीय सदस्यांनी असे मत व्यक्त केले होते की, नवीन बील आणल्यानंतर आम्हाला माईंड अप्लाय करण्यास वाव राहणार नाही. त्यामुळे मी संयुक्त समितीच्या सदस्यांबरोबर अनौपचारिक बैठक घेण्याचा निर्णय घेतला. ज्या दोन बैठका घेतल्या त्या बैठकांना काही सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

महोदय, जेव्हा हे बील मांडण्यात आले होते त्यावेळी, पहिल्याच आठवडयात हे विधेयक चर्चेला घ्यावे अशा प्रकारची माझी अपेक्षा होती. परंतु सन्माननीय सदस्यांनी या विधेयकासंदर्भात अभ्यास करण्यासाठी वेळ मिळावा अशी मागणी केल्यामुळे हे विधेयक आणण्याचा मी आग्रह धरला नाही. हे विधेयक आणून मला कोणाला फेवर करावयाचे नाही हे कृपया आपण ध्यानात घ्यावे. वास्तविक पाहता या विधेयकासंदर्भात सभागृहाला आणि मंत्रिमंडळाला अधिकार देण्यात आलेले आहे. सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी जे मत मांडले त्या मताशी मी सहमत आहे. शासनाचे जे विद्यापीठ आहे त्यातून दर्जेदार शिक्षण दिले जाते. महाराष्ट्रामध्ये खाजगी क्षेत्रांमधून उभ्या राहत असलेल्या संस्था पाहिल्या तर.....मी त्यांची तरफदारी करीत आहे अशातला भाग नाही. परंतु त्यांची जी सिस्टीम आहे ती नजरेआड करुन चालणार नाही.

महोदय, आज दीड लाखापासून ते दहा लाख रुपयांपर्यंत इयत्ता पहिली, दुसरी, तिसरीची फी आहे. एवढया मोठया प्रमाणावर फी देणारे पालकही आहेत, ही वस्तुस्थिती आहे. आपण मला सांगा "एरोनॉटीक" सारखा विषय आज कोणत्या विद्यापीठांत शिकविला जातो ? ज्या ठिकाणी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप वळसे-पाटील....

शिकविला जात असेल त्या ठिकाणीही काही मर्यादा आहेत. महोदय, या विधेयकाच्या संदर्भात आवश्यकता वाटल्यास दोन्ही सभागृहाच्या सन्माननीय सदस्यांची बैठक आयोजित करण्यात यावी. त्या बैठकीमध्ये या विधेयकासंदर्भात प्रेझेंटेशन करण्यास मी तयार आहे. सुप्रीम कोर्टाने जो निर्णय दिलेला आहे, त्या निर्णयाचा अभ्यास करुन, या विधेयकाबाबत कोणत्याही क्लॉजमध्ये अडथळा येणार नाही. हे विधेयक संमत झाल्यानंतर देशामधील हा आदर्श कायदा असेल असे मला वाटते. जर या विधेयकामध्ये काही चूका असतील आणि त्या सुधारावयाच्या असतील तर तशी सुधारणा करता येईल. आपण जर तसे लक्षात आणून दिले तर माझी थांबण्याची तयारी आहे. सभापती महोदय, आपण उद्या सुध्दा बैठक बोलाविली तर त्या बैठकीमध्ये पॉवर प्रेझेंटेशन करण्याची माझी तयारी आहे. मी सन्माननीय सदस्यांच्या हेतूबद्दल शंका घेत नाही. त्यांनी प्रामाणिकपणाच्या भावनेतून या ठिकाणी आपले मत व्यक्त केले आहे. परंतु या विधेयकात विलंब होत असल्यामुळे आपले राज्य मागे राहत आहे. आज छोटे-छोटे राज्य आपल्या राज्यापुढे गेले असताना आपण मागे राहू नये एवढीच माझी भावना आहे. शेवटी याबाबतचा निर्णय सभागृहाने घ्यावयाचा आहे.

नंतर श्री.कांबळे....

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी (नागपूर विभाग पदवीधर) : सभापती महोदय, हे विधेयक अतिशय महत्वाचे असे विधेयक आहे. विशेषत: हे विधेयक उच्च शिक्षणाशी संबंधित आहे. सभापती महोदय, शिक्षणाचे व्यापारीकरण न होता शैक्षणिक गुणवत्ता कायम राहिली पाहिजे. दुसरीकडे जर ग्रँट उपलब्ध करुन देण्याकरिता आपल्याकडे पैसे असतील तर प्रायव्हेट, पब्लिक इन्स्टीट्युशन करण्याशिवाय मार्ग नाही. सभापती महोदय, आपल्याला इंटरनॅशनल स्टॅन्डर्डप्रमाणे जावयाचे असेल तर याचा आपण जरुर विचार करण्याची आवश्यकता आहे. सभापती महोदय, यामध्ये अनेक गुंतागुंतीचे विषय आहेत. अनायसे अधिवेशन देखील सुरु आहे. तरी मला असे वाटते की, ज्याप्रमाणे आपल्याकडे राष्ट्रकुल संसदीय मंडळात कॉन्स्टिटयुशनवर चर्चा होते, त्याप्रमाणे यावर देखील चर्चा झाली पाहिजे. यासंदर्भात खालच्या सभागृहामध्ये काही आमदारांनी वक्तव्ये केली, पत्रकार देखील वर्तमानपत्रात वक्तव्ये करत आहेत. तरी, सभापती महोदय, घटनेचा व शिक्षणाचा ज्या विषयाबाबत संबंध येतो, त्या विषयावर चर्चा झालीच पाहिजे. हे कायदे असेच पास करणे योग्य नाही. तरी, माझी आपणास विनंती आहे की, आपण हे विधेयक आज स्थगित करावे. साधारणपणे या संदर्भात 2-3 दिवसांमध्ये दोन्ही सभागृहांसमोर लॅपटॉपच्या माध्यमातून प्रेझेन्टेशन करावे. सभापती महोदय, आपण आयोजित केलेल्या बैठकीस येण्याची माझी इच्छा होती, परंतु मी दौऱ्यावर असल्यामुळे येऊ शकलो नाही. सभापती महोदय, या गोष्टींना विरोध करण्याची आमची भावना नाही. सभापती महोदय, असे झाल्यास महाराष्ट्रातील शिक्षण सम्राट आहेत, जे दोनशे-तिनशे कोटी रुपयांचे मालक आहेत, ते मनाला येईल तशाप्रकारे अपॉईंटमेंट्स करतील, अशी लोकांच्या मनात भीती आहे. हे मालक एका मुलाला कुलपती बनवतील तर दुसऱ्याला व्हाईस चॅन्सलर बनवतील. तरी, असे घडता कामा नये. आपल्याकडे इंटरनॅशनल स्कुल्स तसेच युनिव्हर्सिटीज येत आहेत. तरी, मी माननीय मंत्रीमहोदयांना विनंती करतो की, हे विधेयक तुम्ही आता मागे घ्यावे. अधिवेशन आता चालूच राहणार आहे. पुढील शुक्रवारी आपण दोन्ही सभागृहांच्या सभापतींना विनंती करुन सगळ्यांना बोलावून कलमांविषयीचे प्रेझेन्टेशन करु आणि नंतर चर्चा घेऊ आणि या संदर्भात आमच्या काही सूचना असतील तर त्या देखील आपणास लक्षात घेता येतील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी या ठिकाणी काही सूचना केल्या आहेत. त्या सूचना प्रिन्सीपली मान्य करायला मला काहीच हरकत नाही. आज आपण या विधेयकासंदर्भातील चर्चा स्थगित करु शकतो. या संदर्भात मी कालच माननीय सभापतींना विनंती केली होती की, या संदर्भात आपण आज एक बैठक बोलवा. सभागृहात चर्चा करण्याऐवजी उद्या संध्याकाळी बैठक घेऊन आपण चर्चा करु. आपल्यासमोर या संदर्भातील प्रेझेन्टेशन देखील करु. या संदर्भात आपल्याकडून काही सुधारणा येणार असतील तर त्या सुधारणा मला अकॉमोडेशन करावयाच्या असतील तर 2-3 दिवसांमध्ये वर्कींग करण्यासाठी वेळ लागेल. हे बील याच अधिवेशनात झाले पाहिजे, आजच झाले पाहिजे अशी आमची आजिबात भूमिका नाही.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आपल्या सगळ्यांनाच मान्य केले पाहिजे की, एखाद्या महत्वाच्या विधेयकातील ए टू झेड क्लॉजवर चर्चा झालीच पाहिजे.

(यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. यशवंतराव गडाख ....

सभापती महोदय, या सर्व गोष्टींमध्ये शासनाने लक्ष घातलेले नाही. अनेक शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची वाट शासन पाहणार आहे का ? आतापर्यंत हजार, दोन हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. आपल्याला हा आकडा अजून वाढवायचा आहे का ? तरी, याचे देखील शासनाने आत्मपरिक्षण करणे आवश्यक आहे. आपण या संदर्भात जे केले, त्याबद्दल मी आपले जरुर अभिनंदन करतो. परंतु बाकीच्या प्रश्नांसंदर्भात आपण लक्ष घालावे, अशी या निमित्ताने विनंती करतो. त्याचप्रमाणे सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी वन टाईम सेटलमेंटच्या संदर्भात जी सूचना केली, त्यामध्ये सर्वांना सहभागी करुन घ्यावे व या संदर्भात तातडीने निर्णय लागू करावा, अशी विनंती करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, राज्यातील शेतकऱ्यांच्या समस्या, कर्जाचे व्याज दर कमी करणे, शेतमालाला आधारभूत व रास्त किंमत देणे, एक रकमी परतावा मिळवून देणे या विषयावर महाराष्ट्र विधानपरिषद नियम 260 अन्वये प्रस्ताव मांडलेला आहे. सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या दुरावस्थेबाबत या सदनामध्ये वारंवार चर्चा झालेली आहे. आत्महत्या हा विषय दयेचा विषय नाही आणि राजकारणाचाही नाही. शेतकऱ्यांच्या दुरावस्थेसंदर्भात तसेच त्यांच्या हालाखीच्या परिस्थितीबाबत सत्ताधारी पक्षाकडून व विरोधी पक्षाकडूनही सातत्याने यावर प्रस्ताव मांडले जात असतात. सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये अनेक वेळा वेगवेगळ्या घटना घडत असतात. सभापती महोदय, गोळीबार, आंदोलने यातून आपल्याला शेतकऱ्यांच्या असंतोष नक्कीच दिसतो. सभापती महोदय, शेतकऱ्यांची परिस्थिती बदलणे आवश्यक आहे. सर्व राजकीय पक्षांमध्ये शेतकऱ्यांचीच मुले आहेत आणि तिही नेतृत्व पदावर आहेत. जिल्हा परिषदेच्या सदस्यांपासून, गावच्या सरपंचापासून, आमदारांपासून ते खासदारांपर्यंत असलेल्या बऱ्याचशा व्यक्ती शेतकऱ्यांच्या कुटुंबामध्येच जन्माला आलेली मुले आहेत आणि ती मुले मोठ्या प्रमाणात निर्णय प्रक्रियेत आहेत. सभापती महोदय, आता पुणे जिल्ह्यामध्ये शेतकऱ्यांच्या संघटनांना सुरुवात झाली आहे. कांदा उत्पादकांनी केलेल्या आंदोलनापासून अमरावतीमध्ये झालेल्या गोळीबारापर्यंत आपल्याला शेतकऱ्यांचा उद्रेक दिसून येतो. अकोला जिल्ह्यातील अकोट येथे गणगणे नावाच्या शाळेमध्ये वर्कृत्व स्पर्धा ठेवली होती. अकोटमधील कु. दिपाली कोल्हे या शेतकरी कुटुंबातील मुलीने भाग घेतला होता. त्या वर्क्तृत्व स्पर्धेचा विषय होता, "शेतकऱ्यांच्या आत्महत्येस जबाबदार कोण ? " सभापती महोदय, शाळेच्या वर्क्तृव स्पर्धेत भाषण केल्यानंतर ती मुलगी तिच्या घरी परतली आणि स्वत:च्याच घरातील चार बहिणी आणि दोन भावांची शिक्षणाअभावी झालेली परिस्थिती पाहून असह्य होऊन कु. दिपाली कोल्हे हिने किटकनाशक पिऊन आत्महत्या केली. अकोट या ठिकाणी मी स्वत: जाऊन त्या कुटुंबास भेटले. अनेक सन्माननीय सदस्यांनी या संदर्भात मुद्दा उपस्थित केला होता. त्यामधून महत्वाची गोष्ट अशी जाणवली की, केवळ एका कुटुंबापर्यंत ही परिस्थिती मर्यादित नाही. ज्या मुलांचे शिक्षण काही कारणास्तव थांबले असेल आणि पुन्हा जर त्यांना शिक्षण घ्यावयाचे असेल तर त्या संदर्भात कुठे

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ....

काय करावयाचे याची माहिती देखील त्या शेतकऱ्यांच्या कुटुंबापर्यंत पोहोचलेली नाही. दुसरा एक महत्वाचा मुद्दा हुंड्यासंबंधी आहे. या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. यशवंतराव गडाख साहेबांनी देखील सांगितले की, मुलीला लग्नात द्यावे लागणाऱ्या हुंड्यामुळे शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. सभापती महोदय, जेव्हा आपल्या शरीराच्या एखाद्या भागाला गँगरीन होते, तेव्हा आपण तो भाग कापून टाकतो. तरी, या संदर्भात देखील शासनाने योग्य तो विचार करणे आवश्यक आहे. सभापती महोदय, कु. दिपाली कोल्हे हीची मोठी बहिण परितक्त्या आहे. ज्या मुलीच्या संदर्भातील केस कोर्टात चालू असते, तिच्या लहान बहिणींच्या लग्नात अडचणी निर्माण होतात, अशी आज परिस्थिती आहे. सभापती महोदय, आपल्या दोन बहिणींच्या व दोन भावांच्या या प्रश्नांकडे पाहून व्यथित होऊन कु. दिपाली कोल्हे हिने आत्महत्या केली.

(यानंतर श्री. वि. खर्चे ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, बिलाच्या संदर्भातील पॉवर पॉईंट प्रेझेंन्टेशन तयार आहे. आपण जर म्हणत असाल तर मी ते सभागृहात सुध्दा सादर करण्यास तयार आहे. यासंदर्भात आपण बैठक बोलाविण्यास माझी हरकत नाही.

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी माननीय मंत्री महोदयांना जी विनंती केलेली ती विनंती मंत्री महोदयांनी मान्य केलेली आहे. या बिलाच्या अनुषंगाने अभ्यास करण्यासाठी आपणास दोन-तीन दिवस मिळतील. उद्या सकाळी दोन्ही सभागृहाचे सन्माननीय विरोधी पक्ष नेते, पक्षांचे गट नेते व माननीय मंत्री महोदय यांनी माननीय सभापती विधानपरिषद व माननीय विधासभा अध्यक्ष यांची भेट घ्यावी, बिलाच्या संदर्भातील प्रेझेंटेशन केव्हा करावे याबाबत वेळ ठरवून घेण्यात यावी, त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात यावी.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी. देशमुख यांनी बिलाच्या संदर्भात जी भूमिका मांडली ती अत्यंत योग्य अशी आहे.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, महाराष्ट्र स्वयं-अर्थसहाय्यित विद्यापीठे विधेयक सभागृहात मांडलेले आहे. त्यावर चर्चा सुरु झालेली आहे. या बिलाच्या संदर्भात संयुक्त समितीने अभ्यास सुध्दा केलेला आहे. गेल्या 15 दिवसांपूर्वीच यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे सॅम पिट्रोडा यांनी यासंदर्भात भूमिका मांडलेली आहे.....

उपसभापती : सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी आपण कृपया खाली बसावे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, काल या सभागृहामध्ये सन्माननीय सदस्या श्रीमती नीलम गोऱ्हे यांनी "लॅक्मे फॅशन शो" च्या संदर्भात मुद्दा उपस्थित केला होता, त्यावर खालच्या सभागृहामध्ये चर्चा झालेली आहे.

उपसभापती : या संदर्भातील चर्चा आज करावयाची नाही, सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे...

.....2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, महाराष्ट्र स्वयं-अर्थसहाय्यित विद्यापीठे हे विधेयक मंत्री महोदयांनी सभागृहात मांडलेले आहे. म्हणजेच हे बील आता जिवंत आहे या बिलांमध्ये काही तरतुदी केल्यानंतर ते पुन्हा सभागृहामध्ये येईल. यासंदर्भात आम्हाला काही सूचना करावयाच्या असतील त्या संदर्भातील आमचा अधिकार मंत्री महोदयांनी मान्य केलेला आहे. या बिलाच्या संदर्भात क्लॉज टू क्लॉज सादरीकरण झाल्यानंतर सर्व पक्षांच्या सदस्यांना तो कायदा नीट समजल्यानंतर ते बील परत सभागृहापुढे येईल त्यामध्ये सर्व पक्षांना काही सुधारणा करावयाच्या असतील तर त्या आपणाला चर्चेच्या माध्यमातून करता येतील.

श्री. दिलीप वळसे-पाटील : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष सदस्यांनी या बिलाच्या संदर्भात काही विधायक सूचना मांडल्या तर त्या स्वीकारण्यास शासनाची तयारी आहे.

यानंतर श्री. सुंबरे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, लॅक्मे ब्युटी कॉंटेस्टमध्ये घडलेल्या प्रकारासंबंधातील चर्चा वा निवेदन हे उद्या घेण्यात येईल. तसेच वि.प.वि.क्रमांक 10 च्या संदर्भात देखील मी आताच येथे निर्णय दिलेला आहे. ...

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, लॅक्मे ब्युटी कॉंटेस्टच्या संदर्भात घडलेल्या प्रकारासंबंधात काल खालच्या सभागृहामध्ये चर्चा झाल्यानंतर सदर प्रकाराची चौकशी करून, सदर कार्यक्रमाची कॅसेट पाहून निवेदन करण्यात येईल असे शासनाकडून सांगण्यात आले होते. पण त्यानंतर आता दूरदर्शनवर श्री.संजय अपराज नावाच्या त्यांच्या एका अधिकाऱ्याने हा प्रकार म्हणजे एक अपघात होता असे निवेदन टीव्ही वर करून टाकले आहे. तेव्हा असे जे वृत्त टीव्ही वर येत आहे ते खरे आहे की, उद्या सभागृहामध्ये शासनातर्फे जे निवेदन येणार आहे ते खरे हा प्रश्न निर्माण झालेला आहे. ...

उपसभापती : मी याबाबत एवढेच सांगेन की, याबद्दलचा खुलासा सरकारने प्रथम करावा. आता यानंतर नियम 260 खालील प्रस्ताव चर्चेला घेण्यात येईल.

****

..... 3व्ही 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : राज्यातील शेतकऱ्यांना शेतीसाठी 6 टक्के दराने कर्ज उपलब्ध करून देणे.

मु.शी. : राज्यातील शेतकऱ्यांना शेतीसाठी 6 टक्के दराने कर्ज उपलब्ध करून देण्याची आवश्यकता याबाबत सर्वश्री रणजितसिंह मोहिते-पाटील, यशवंतराव गडाख, डॉ.वसंत पवार, सर्वश्री जयंत प्र.पाटील, प्रतापसिंह मोहिते-पाटील, दिलीपराव देशमुख, नतिकोद्दिन खतीब, गुरूनाथ कुलकर्णी, सदाशिवराव पोळ, विलासराव शिंदे, प्रा.शरद पाटील, सर्वश्री धोंडीराम राठोड, संजय दत्त, श्रीमती सुधा जोशी, डॉ.एन.पी.हिराणी, सर्वश्री विनायकराव मेटे, चंद्रकांत रघुवंशी, सुरेशदादा देशमुख, वि.प.स. यांचा प्रस्ताव.

(सभापतीस्थानी - तालिका सभापती श्रीमती सुधा जोशी)

श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील (सोलापूर स्थानिक प्राधिकारी संस्था) : माननीय सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने नियम 260 अन्वये पुढीलप्रमाणे प्रस्ताव मांडतो. -

" राज्यातील शेतकऱ्यांच्या दिवसेंदिवस वाढत असलेल्या समस्या, अतिवृष्टी, नापिकी, दुष्काळ इत्यादी विविध समस्यांनी ग्रासलेला सामान्य शेतकरी, तसेच खाजकी सावकार, सोसायट्या, जिल्हा बँका, राष्ट्रीयकृत बँका, यांच्या कर्जाच्या विळख्यात अडकून अतिशय अडचणीत आलेला राज्यातील शेतकरी, विविध बँकांचे त्यांच्यावर असलेले कर्ज फेडण्यासाठी 'क्रय शक्तीच्या' अभावी तो असमर्थ ठरणे., एकंदरीतच राज्यातील शेतकऱ्यांच्या समस्यांचा सर्वांगीण विचार करून त्यावर कायमस्वरूपी तोडगा काढण्याची निर्माण झालेली निकड, या सर्व पार्श्वभूमीवर शेतकऱ्याला शेतीसाठी द्यावयाच्या कर्जाच्या व्याजाचा दर कमी करून त्याला 6 टक्के दराने विविध वित्तीय संस्थांकडून कर्जपुरवठा करण्याची निकड, नाबार्ड कडून होणाऱ्या पतपुरवठ्यावर नियंत्रित व्याज दर आकारणी करणे, त्यावर शासनाने नियंत्रण ठेवणे, शेतीमालाला आधारभूत व रास्त किंमत ठरवून देणे, कर्जबाजारी शेतकऱ्यांची या सर्व बाबींमधून मुक्तता करण्यासाठी केंद्र शासनाने व राज्य शासनाने एकत्रितरित्या प्रयत्न करण्याची निकड., विशेषत: एक रकमी परतावा शासनाने मिळवून देण्याची गरज, ही योजना तातडीने अमलात आणण्यासाठी कर्ज कमी व्याजदराने तातडीने उपलब्ध करून देणे इत्यादी बाबींचा साकल्याने विचार करून शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

..... 3 व्ही 3 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मोहिते-पाटील (पुढे चालू...

सभापती महोदया, या चर्चेच्या माध्यमातून मी सरकारला विनंती करू इच्छितो की, आज जगामध्ये सर्वत्र जागतिकीकरण होत असताना विकसित आणि विकसनशील देशांमधील जे शेतकरी आहेत त्यांना एक सवलत दिली जाते की, तेथे तयार झालेला माल, बाजारामध्ये त्याची असलेली उपलब्धता मागणी व पुरवठा यांचा विचार करून उत्पादन जास्त झाले तर सरकार त्याच्या मालाला हमीभाव देते किंवा त्याचे त्यातून नुकसान होणार नाही याची काळजी विशेष करून विकसित देशांमध्ये घेतली जाते. त्याच दृष्टीने आपल्या देशामध्ये देखील काही दिवसांपूर्वी सरकारने एमसीएक्स च्या माध्यमातून, जसे सोने-चांदीवर एक भाव निश्चितपण ठरविला जातो त्याचप्रमाणे डाळी, साखर, गूळ, सोयाबीन, खाद्यतेल इत्यादी सर्व गोष्टींसाठी सरकारने हमीभाव देण्याची आणि सर्वत्र एकच भाव असण्याची पद्धत स्वीकारली. त्यामुळे या प्रकारची शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना दिलासा मिळालेला आहे. आज वारंवार येणाऱ्या नैसर्गिक आपत्तींमुळे, मग ती अतिवृष्टी वा गारपीट असेल, शेतकरी संकटात सापडलेला आहे. त्यामुळे मला या निमित्ताने विनंती करावयाची आहे की, ज्या वित्तीय संस्था आहेत, विशेष करून जिल्हा बँका आहेत, ज्या शेवटचा घटक असणाऱ्या शेतकऱ्यापर्यंत पोहोचणाऱ्या संस्था आहेत, त्या संस्थेला सक्षम करावयाचे असेल, 1997 साली सरकारने राष्ट्रीयीकृत बँकांसाठी पॅकेज जाहीर केले. खाजगी व्यापाऱ्यांनी घेतलेली कर्जे ते फेडू न शकल्याने या वित्तीय संस्था, राष्ट्रीयीकृत बँका संकटात आल्या. ..

(यानंतर श्री. खंदारे ... 3डब्ल्यू 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील.....

आणि सरकारने या नॅशनलाईज बँकांना पॅकेज दिले आणि त्यांना आर्थिक संकटातून बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. आज शासनाने 16000 कोटींचे पॅकेज जाहीर केलेले आहे. परंतु त्याची नियमावली वा निकष या जिल्हा बँकांपर्यंत पोहोचू शकलेले नाही. मला आपल्यामार्फत सरकारला विनंती करावयाची आहे की, जिल्हा बँकांना सक्षम करावयाचे असेल तर विकास सोसायटया भक्कम राहिल्या पाहिजेत. आज राज्यामध्ये काही चांगल्या जिल्हा बँका आहेत. त्यातील 50 टक्के बँका अवसायनात आहे. हया संस्थांचा घटक सक्षम असावयास पाहिजे, पण ही बाजू कोठे तरी कमी पडत आहे. शासनाने 16000 कोटींचे पॅकेज जाहीर केले असले तरी त्या घटकाला अवसायनातून बाहेर काढण्यासाठी सरकारने काही गाईड लाईन्स जाहीर करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे शेअर्सपोटी शेतक-यांकडून 10 टक्के कपात केली जाते. ही कपात आता जास्तीत जास्त 20 टक्क्यांपर्यंत करण्यासाठी सहकार खात्याने कायदा केलेला आहे. एका बाजूला ही 20 टक्के कपात केली जाईल आणि त्यासाठी 7.5 टक्के व्याजदर ठेवला आहे आणि दुस-या बाजूला हया बँकांनी 7 टक्क्यांनी कर्ज उपलब्ध करुन द्यावे असे शासनाने परिपत्रक काढले आहे. म्हणजे ठेवीवर 7.5 टक्के व्याज आणि कर्ज 7 टक्क्यांनी द्यावयाचे, त्यामुळे हा न परवडणारा धंदा आहे. ठेवीवर 7.5 टक्के व्याज द्यावयाचे आणि 7 टक्के दराने कर्ज वाटप करण्याचे धोरण सुरु राहिल्यास हया संस्था अडचणीमध्ये येतील. 20 टक्के कपातीबाबत आणि कर्जाच्या व्याजदराबाबत शासनाने पुनर्विचार करावा. शेतक-यांना 6 टक्के दराने कर्ज उपलब्ध करुन द्यावे आणि शेअर्स कपातीवर 7.5 टक्के व्याजदर देण्याचा कायदा केला जात आहे यामध्ये शासनाची गल्लत होत आहे. सभापती महोदया, राज्यातील सहकारी बँकांना इनकम टॅक्स भरण्याबाबत परिपत्रक आलेले आहे. मला शासनाला विनंती करावीशी वाटते की, विशेषत: हया सहकारी बँका गोरगरीब शेतक-यांच्या बँका आहेत. पैसा कमविणे असा संचालक मंडळाचा हेतू नसतो. प्रशासकीय खर्च भागविता आला पाहिजे एवढाचा उद्देश संचालक मंडळाचा असतो. हया बँकांच्या माध्यमातून ज्यांना फायदा मिळाला पाहिजे याचा विचार करतो त्या शेतक-यांना लाभ झाला पाहिजे. हा विचार बाजूला जाईल आणि ते शेतकरी लाभापासून वंचित राहतील. म्हणून सहकारी बँकांना इन्कम

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MAP/

श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील.....

टॅक्स भरण्याची अट लागू करण्यात आली आहे त्याबाबत राज्यशासनाने केंद्र शासनाकडे ही अट शिथिल करण्याबाबत आग्रह धरावा. त्याचप्रमाणे आणखी एक प्रमुख विषय मला मांडावयाचा आहे. खाजगी व्यापा-यांना एक रकमी परतावा भरण्याची सवलत शासनाने दिली आहे. करोडो रुपये हया वन टाईम सेटलमेंटचे होतात. परंतु गारपीट, दुष्काळ, टंचाई अश नैसर्गिक आपत्तींमध्ये सापडलेल्या शेतक-यांसाठी मात्र वन टाईम सेटलमेंटची तरतूद करण्यात आलेली नाही. प्रामाणिकपणे पैसे भरणारा हा शेतकरी वर्ग आहे. त्यांच्यासाठी वन टाईम सेटलमेंटची भूमिका शासनाने स्वीकारावी अशी माझी शासनाला विनंती आहे.

नंतर श्री.किल्लेदार.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील (पुढे सुरु...

मराठवाड्यामधील, विदर्भामधील आणि पश्चिम महाराष्ट्रातील काही भागामध्ये जवळपास 45 डिग्री सेल्सीयस तपमान वाढत आहे. सकाळी 10 वाजता शासकीय कार्यालये सुरु होतात. शासकीय कार्यालये सुरु होण्याच्या अगोदर बँका सुरु झाल्या पाहिजेत. कारण सकाळी 11-00 वाजता बँकेत जावयाचे असेल तर शासकीय कार्यालयातून कर्मचारी आणि अधिकाऱ्यांना जावे लागते. त्यातच 45 डिग्री सेल्सीयस तपमान झाल्यानंतर खेड्या-पाडयातील लोकांना एस.टी.ने जावे लागते, बँकेत गेल्यानंतर बँकेचे अधिकारी वेळेवर उपस्थित असतात असे नाही. ते उशिरा आले तर लोकांना थांबावे लागते. बाहेर गरम वातावरण असते. माझी या निमित्ताने सूचना आहे की, सकाळी 10 च्या अगोदर बँकां सुरु करुन तीन तासांनी सुट्टी द्यावी आणि दुपार नंतर 3 तास बँक चालू ठेवली तर लोकांना सोयीचे होईल. तेव्हा एकंदरीत संपूर्ण बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक यांच्या वेळेबाबत विचार करुन, तसा प्रस्ताव त्यांना द्यावा अशी या निमित्ताने विनंती करतो. त्याचबरोबर शेतकऱ्यांचे वन टाईम सेटलमेंट व्हावे, अशी पुन्हा एकदा मागणी करतो आणि थांबतो, जयहिंद.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ MHM/ KGS/ SBT/

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी महत्वाची चर्चा उपस्थित केलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.यशवंतराव गडाख, मी स्वत: आणि सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेबांनी प्रत्येक अधिवेशनामध्ये चर्चा उपस्थित केलेली आहे. शासनाकडून अनेक वेळेला तसे करण्यात येईल अशी आश्वासने देण्यात आली. परंतु प्रत्यक्षात अजूनपर्यन्त याबाबतची अंमलबजावणी झालेली नाही. सभापती महोदया, शासनावर कोणत्याही प्रकारचा आर्थिक भार न पडणाऱ्या ज्या गोष्टी आहेत त्या सुध्दा शासन मंजूर करायला तयार नाही. . गेल्या नागपूरच्या अधिवेशनामध्ये सन्माननीय सदस्य श्री.यशवंतराव गडाख, सन्माननीय सदस्य श्री.विलास अवचट आणि मी या विषयावर चर्चा घडवून आणली असता, सदस्यांची समिती नेमली. शासनाने शेतकऱ्यांना दिलेल्या कर्जामधील इंटरेस्टचा भार स्वत: सहन करण्याबाबत शासनाच्या वतीने मान्य करण्यात आले. सन्माननीय सहकार मंत्री डॉ.पतंगराव कदम यांनी कमिटी जाहीर केली. त्या कमिटीमध्ये मी आणि सन्माननीय सदस्य श्री.यशवतंराव गडाख सदस्य म्हणून होतो. त्या समितीच्या दोन बैठका झालेल्या होत्या. समितीने शासनाला शिफारस देखील केली. सन्माननीय राज्यमंत्री महोदयांनी गंभीरपणाने बैठक घेतली, त्या बैठकीमध्ये चर्चा देखील चांगली झाली. परंतु दुसरी बैठक घेण्यात आली, त्यामध्ये जी काही चर्चा झाली, ती आम्हाला आवडली नाही.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील .....

यामध्ये शासनाचाही भार कमी झालेला आहे. केंद्र सरकारने आता 6 टक्के दराने थेट कर्ज पुरवठा करण्याबाबत अर्थसंकल्पामध्ये धोरण मंजूर केलेले आहे. म्हणजे 4 टक्के दराने नाबार्डकडून कर्ज पुरवठा होणार आहे. या ठिकाणी अधिकारी बसलेले आहेत. त्यांनी बैठकीमध्ये होय म्हटले. मी या चर्चेमध्ये बोलणार नव्हतो परंतु आमचे सहकारी सन्माननीय सदस्य श्री. यशवंतरावजी गडाख यांनी विनंती केली की, मी यावर बोलावे. आम्ही शासनाकडे साधी मागणी करीत आहोत की, आम्ही आमच्या नफ्यातून एकरकमी कर्जफेड करतो. ज्या संस्था सक्षम आहेत, ज्यांची कुवत आहे, ज्या संस्थांनी स्वत: आर्थिक बळकटी निर्माण केलेली आहे त्यांना या सवलतीस मान्यता द्यावयाची आहे. पण ती मान्यता शासन देत नाही. आम्ही या ठिकाणी वन टाईम सेलटमेंटची सूचना केली. कालच एम.एस.सी. बँकेमध्ये या देशाचे केंद्रीय कृषी मंत्री श्री. शरद पवार तसेच सन्माननीय दादा आणि इतर सर्व लोक उपस्थित होते. त्यांनी हेच विचार त्या ठिकाणी मांडले. आम्ही या सभागृहामध्ये दोन वर्षे सातत्याने हेच मांडत आहोत. हे कोठे तरी संपवले पाहिजे. जी मालमत्ता गहाण ठेवली आहे त्याची तेवढी किंमत येणार नाही. म्हणून एकदा वन टाईम सेटलमेंट करुन तो विषय एकदा संपवावा. ज्यांनी या देशाला दिशा दिली ते माननीय कृषी मंत्री यांच्याकडे सहकार खाते सुध्दा आहे. या सभागृहाचे चार पाच सन्माननीय सदस्य एम.एस.सी. बँकेच्या संचालक मंडळावर आहेत. सात आठ माननीय मंत्रिमहोदय त्या बोर्डचे सदस्य आहेत. त्या ठिकाणी आम्हाला सांगण्यात आले तसेच गेल्या अधिवेशनामध्ये सुध्दा सांगण्यात आले की, वन टाईम सेटलमेंट देण्यात येईल. परंतु ती सवलत अजूनही दिलेली नाही. आमचे सहकारी सन्माननीय सदस्य श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील हे नवीन आहेत. त्यांनी विषय मांडत असताना सोलापूरच्या अर्थव्यवस्थेच्या संदर्भात दोन गोष्टी सांगितल्या. बॅकांची जी परिस्थिती आहे, आपण जे मुक्त आर्थिक धोरण स्वीकारलेले आहे त्यामुळे आपल्याला दीड ते दोन टक्क्यावर धंदा करावा लागणार आहे. मी 1984 साली ज्यावेळी बँकेचा संचालक झालो त्यावेळी सेव्हिंग आणि करंट डिपॉझीटचा सरासरी व्याजदर 6 ते 7 टक्के होता आणि कर्जपुरवठ्याचा व्याजदर 20 टक्के होता. म्हणजे आपण 14 टक्के मधले मार्जिन घेत होतो. आता मुक्त आर्थिक धोरणामध्ये ते मार्जिन कमी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील .....

झालेले आहे. यामध्ये जसे फायदे आहेत तसे तोटे सुध्दा आहेत. आता आपल्याला दीड ते दोन टक्क्याने धंदा करावा लागणार आहे. याची जाणीव ठेऊन पुढचा व्यवसाय करावा लागणार आहे. या ठिकाणी वेगवेगळ्या ते-हेचे वेगवेगळे प्रयोग केले. चंद्रपूरमध्ये बचत गटाचा प्रयोग केला. चंद्रपूरच्या बँकेने सक्षम असे बचत गट तयार केले. आमच्या जिल्ह्यातील काही बचत गटाच्या अध्यक्षांना अभ्यास करण्यासाठी त्या ठिकाणी पाठवले. सभापती महोदया, आमच्या जिल्ह्यामध्ये आमच्या बँकेमध्ये आम्ही शेअर कापण्याचे केव्हाच बंद केलेले आहे. फक्त 10 टक्के शेअर्स एकदाच कापावयाचे, पुन्हा शेअर्स कापावयाचे नाहीत असे केलेले आहे. ही गोष्ट कधी तरी शासनाच्या निदर्शनास आली काय ? शासनाने हा प्रयोग केला नाही. जे एका बँकेला जमले ते दुसऱ्या बँकेला का जमत नाही ? सभापती महोदया, मी सभागृहामध्ये थोडा उशिरा आलो. आमचे सहकारी सन्माननीय सदस्य श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी एक गोष्ट सांगितली असेल. विविध कार्यकारी संस्था या खरोखर सक्षम झाल्या पाहिजेत. जोपर्यंत विविध कार्यकारी संस्था सक्षम होत नाहीत तोपर्यंत या बँकांचा कारभार किंवा सहकार चळवळ खऱ्या अर्थाने सुधारणे शक्य नाही आणि तोपर्यंत शेतकऱ्यांचा योग्य असा फायदा, शेतकऱ्यांना योग्य तो पतपुरवठा खऱ्या अर्थाने आपण करु शकत नाही, ही खरी परिस्थिती आहे.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. जयंत प्र. पाटील...)

त्याचा अभ्यास शासकीय पातळीवर करण्याची गरज आहे. माझी या निमित्ताने अशी मागणी आहे की, शासनाने वन टाईम सेटलमेंटचे धोरण ठरविले पाहिजे. वेगवेगळया विभागांचे वेगवेगळे प्रश्न आहेत.महसूल विभागाचे वेगळे प्रश्न आहेत. दोन वर्षापूर्वी या राज्यामध्ये ऊस पिकत नव्हता, उसाचे उत्पादन कमी झाले होते. यावर्षी उसाचे पीक चांगले आलेले आहे. पुढील वर्षी ते आणखीन चांगल्या प्रकारे येईल असे मला वाटते. परंतु याचे नियोजन सहकार आणि महसूल खात्याने अगोदर पासून केले तरच या राज्यातील शेतकरी ख-या अर्थाने या सर्व परिस्थितून वाचणार आहे. जोपर्यन्त शेतीच्या बाबतीत नियोजन होत नाही तोपर्यन्त या सभागृहातील चर्चा सभागृहातच राहतील आणि शेतक-याला मात्र यत्किचिंतही दिलासा मिळणार नाही. या राज्यातील 13 जिल्हा बँका चांगल्या त-हेने चालल्या आहेत. काही 7-8 बँका ह्या रसातळाला गेलेल्या आहेत. त्या बँकांची डिपॉझिटस् देण्याचीही कुवत राहिलेली नाही. या विषयावरील चर्चेमध्ये महसूल खात्याचाही अंतर्भाव होणे आवश्यक आहे. महसूल खात्याशी निगडित अशा अनेक गोष्टी आहेत. माननीय मंत्री महोदय हे महसूल खात्याची उत्तरे देण्यासही सक्षम आहेत. मला हे सांगावयाचे आहे की, याप्रश्नाच्या बाबतीत शासनाने नॉर्म्स ठरविले पाहिजेत. प्रश्नोत्तराच्या तासाच्या वेळी देखील मी सांगितले की, आता आपल्याला नैसर्गिक आपत्तीच्या संदर्भात नॉर्म्स ठरविले पाहिजेत. नैसर्गिक आपत्ती आल्यानंतर शेतक-यांना कर्जाचे हप्ते पाडून दिले जातात. परंतु कर्ज फेडण्याची त्यांची कुवत आहे की नाही हे पाहिले जात नाही. मग त्यांना कर्जाचे हप्ते पाडून देण्यापेक्षा व्याजाला सबसिडी देता येईल काय याचा विचार झाला पाहिजे. आता पर्यन्त ज्या ज्या शेतक-यांना कर्जाचे हप्ते पाडून दिलेले आहेत त्यांच्या कर्जाची वसुली अजूनपर्यन्त झालेली नाही. या राज्यातील शेतकरी अडचणीमध्ये आलेला आहे. पाऊस कधी पडतो तर कधी पडत नाही. उन्हाळयात देखील पाऊस पडायला लागला आहे. कोकणामध्ये थोडी फार पिके उन्हाळ्यात येतात. पण ती देखील पिके आता शेतक-याच्या हातातून जायला लागली आहेत. मागील अधिवेशनामध्ये माननीय मंत्री महोदय डॉ. पतंगराव कदम यांनी "उद्या पासून 6 टक्के दराने कर्ज पुरवठा होईल" अशी घोषणा केली. परंतु अजून पर्यन्त शासनाचे धोरण जाहीर झालेले नाही. चार महिन्यापूर्वी ही घोषणा केलेली असून त्याबाबतचे सर्क्युलर शासनाने अजून काढलेले नाही. बँका जेव्हा शेतक-यांना कर्ज

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. जयंत प्र. पाटील...)

देतात त्यावेळी ते विचारणा करतात की, शासनाने कर्जाचा दर 6 टक्के इतका जाहीर केलेला असताना आमच्याकडून 8 ते 10 टक्के व्याज कसे काय घेता ? केन्द्र शासनाचे जे काही धोरण अमलात यावयाचे असेल ते येईल, पण तोपर्यन्त तरी राज्य शासन व्याजाचा भूर्दंड स्वत: सोसून

...नंतर श्री. कानडे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील..

त्यादृष्टिकोनातून शेतकऱ्यांना खऱ्या अर्थाने शासन दिलासा देणार आहे किंवा नाही हा प्रश्न या चर्चेच्या निमित्ताने मी शासनाला विचारु इच्छितो. शेतकऱ्यांना खऱ्या अर्थाने वाचविण्यासाठी आणि बँका सक्षम करण्याच्या दृष्टीने तसेच बँका आणि सहकारी चळवळीचा कारभार पारदर्शक करण्याच्या दृष्टीने ठोस अशी भूमिका आणि निर्णय शासनाने घ्यावेत अशी अपेक्षा व्यक्त करुन मी माझे भाषण संपवितो.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. यशवंतराव गडाख (अहमदनगर स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सभागृहामध्ये नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावान्वये राज्यातील शेतकऱ्यांच्या एकंदरीत असलेल्या समस्या,शेतकऱ्यांच्या होणाऱ्या आत्महत्या,शेतीचे अर्थकारण,बिघडलेली ग्रामीण अर्थव्यवस्था यासंबंधातील चर्चेचे स्वरुप या प्रस्तावाच्या निमित्ताने मांडलेले आहे. माझे तरुण मित्र माननीय सदस्य श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी या प्रस्तावावर बोलताना काही विचार व्यक्त केले आणि चांगल्या सूचनाही शासनाला केलेल्या आहेत. माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील आणि मी नेहमीच या विषयावर बोलत असतो. मुंबईच्या मागील अधिवेशनामध्ये आणि त्यानंतरच्या नागपूरच्या हिवाळी अधिवेशनामध्ये सुध्दा या प्रश्नावर सभागृहामध्ये आम्ही चर्चा केली होती तसेच काही प्रश्नही मांडले होते. नागपूरच्या अधिवेशनामध्ये या प्रश्नावर निर्णय घेण्यासाठी अभ्यासगट नेमावा अशी सूचना केली होती आणि शासनाने ती मान्यही केली. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांच्या ज्या आत्महत्या घडत आहे त्याला कारण शेतकऱ्याला दिल्या जाणाऱ्या कर्जावर जो व्याजाचा दर आकारला जात आहे ते आहे असेही आम्ही सांगितले होते. शेतकरी जे कर्ज घेतो त्यावर 12 ते 15 टक्के व्याज आकारले जाते हे आम्ही शासनाच्या निदर्शनास आणून दिले होते. त्यावेळी हेही सांगितले होते की जे विकसित देश आहेत त्या देशांमध्ये शेतीसाठी दिल्या जाणाऱ्या कर्जावरील व्याजाचा दर हा 2 ते 3 टक्केच आकारला जातो. चीनमध्ये दर हाच दर शून्य टक्के आहे. या सर्वच बाबी आम्ही शासनाच्या निदर्शनास आणून दिल्या होत्या. एकंदरीत शेतीच्या प्रश्नासंबंधी सखोल अभ्यास करावा आणि त्या प्रश्नांची निकड लक्षात घेऊन त्यानुसार निर्णय घ्यावेत अशा प्रकारची विनंती शासनाला करण्यात आली होती. मला एका गोष्टीबद्दल सरकारचे अभिनंदन करावयाचे आहे. गेल्या दोन अधिवेशनांमध्ये हा प्रश्न सातत्याने मांडत असताना शासनाने 6 टक्के दराने शेतकऱ्यांना कर्ज देण्याचा निर्णय घेतला आहे. अहमदनगर येथे माननीय मुख्यमंत्र्यांनी हा निर्णय जाहीर केला होता. एक अत्यंत चांगला निर्णय शासनाने घेतला आहे. माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे याबाबतीतील आदेश खालच्या स्तरापर्यंत पोहोचलेले नाहीत. केंद्र शासन 7 टक्के व्याजाने कर्जपुरवठा करणार आहे आणि राज्य शासन 6 टक्के व्याजाने कर्जपुरवठा करणार आहे. परंतु तातडीने या निर्णयासंबंधात असलेले परिपत्रक खालच्या स्तरावर आले पाहिजे आणि त्याची अंमलबजावणी झाली पाहिजे. त्याचप्रमाणे 6 टक्के व्याजाचा दर हा सर्व पिकांना लागू असला पाहिजे. नाही तर त्याच्यामध्ये सुध्दा सरकार अशा पध्दतीने

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. यशवंतराव गडाख ...

विचार करण्याची शक्यता आहे की अल्पभूधारक किंवा ठराविक एका पिकांसाठी 6 टक्के व्याजाने कर्जपुरवठा केला जाईल. अशा प्रकारे नियम करावयाचे की या निर्णयाचा लाभ फार थोडया लोकांना मिळाला पाहिजे. अशा प्रकारची जगलरी सरकारने करु नये. ज्या ज्या पिकांसाठी म्हणून शेतकऱ्याला कर्ज हवे असेल त्या सर्व पिकांना 6 टक्के व्याजाने कर्जपुरवठा करावा अशी मी शासनाला विनंती करतोऱ दुसऱ्या एका गोष्टीबद्दल मी सरकारचे अभिनंदन करु इच्छितो. " "शेतक-यांच्या आत्महत्या -एक शोध" हा अहवाल सरकारने सादर केला आहे. पत्रकारितेमध्ये केवळ चटक-पटक बातम्या छापणे एवढेच काम नसून जे प्रश्न समाजामध्ये निर्माण होत आहेत त्यांचा शोध घेऊन त्यांचा अभ्यास करणे आणि सरकारला सूचना करणे हे देखील त्यांचे काम आहे. सरकारने दोन जिल्हयांचा संपूर्ण सर्व्हे करुन अभ्यास केला आणि अहवाल सादर केला त्याबद्दल शेतकऱ्यांच्या वतीने आणि सभागृहाच्या वतीने मी शासनाचे अभिनंदन करु इच्छितो.

यानंतर श्री. खर्चे पी.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. यशवंतराव गडाख .....

यात काही निष्कर्ष काढलेले आहेत त्यासंदर्भात देखील शासनाने अभ्यास करणे आवयक आहे. पूर्वीच्या काळात एखाद्या शेतकऱ्याने आत्महत्त्या केली तर तो दारुडा होता, त्याला व्यसन होते अशा प्रकारचे पंचनामे पोलीस विभागामार्फत केले जात होते. पण यासंबंधी जो अभ्यास केलेला आहे त्यातून अनेक निष्कर्ष काढले असून त्यात आत्महत्त्या करणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये शांत स्वभावाचे 68 टक्के, स्वाभिमानी शेतकरी 24 टक्के, विरुध्द 95 टक्के, 85 टक्के निर्व्यसनी आणि 78 टक्के मनमिळाऊ शेतकरी होते. असे शेतकरी आत्महत्त्या करतात म्हणजेच महाराष्ट्र शासनाने या प्रश्नाचा किती खोलवर विचार केला पाहिजे, किती जाणीवपूर्वक या सर्व प्रश्नांकडे पाहिले पाहिजे याचे एक उत्तम उदाहरण आहे. त्यात असेही म्हटले आहे की, 40 टक्के तरुण शेतकऱ्यांनी आत्महत्त्या केलेल्या आहेत, 77 टक्के सुशिक्षित शेतकरी होते आणि अशाच पध्दतीने हे निष्कर्ष असतील तर त्यासंबंधात शासनाने गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. केवळ 6 टक्के दराने शेतकऱ्यांना कर्ज देऊन त्यांचे प्रश्न सुटणार नाही तर माननीय अर्थमंत्री वन टाईम सेटलमेंटच्या संदर्भात जी योजना गेली दोन वर्षे बोलत आहेत त्यासंदर्भात मी आकडेवारी देऊ इच्छितो. त्याप्रमाणे विचार केला तर जवळजवळ या राज्यात 20620 विकास सोसायटया असून त्यांचे 1.05 कोटी सभासद आहेत. या सभासदांपैकी 33 लाख सभासद थकबाकीदार आहेत आणि 40 टक्के शेतकरी या ना त्या कारणाने कर्ज घेऊ शकत नाही. म्हणजेच 1.05 कोटी सभासद असतांना 40 टक्के लोक कर्ज घेऊन शकत नाही याचा अर्थ असा होतो की, इतक्या मोठया प्रमाणात थकबाकीदार आहेत. या सर्वांचे वन टाईम सेटलमेंट करण्याबाबत आम्ही अनेक वेळा मागणी केली पण अद्यापही शासनाने त्याबाबतचा निर्णय घेतलेला नाही. महत्वाची बाब मी सदनाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, आतापर्यंत आपल्या राज्यात एकरकमी परतफेड योजना नाबार्डच्या माध्यमातून तीन वेळा जिल्हा बँकांना पाठविली होती. पण ती योजना किचकट असल्यामुळे तिचा फायदा फार कमी लोकांना होऊ शकला. या निमित्ताने मी माझ्या जिल्हयाचे उदाहरण देऊन सांगू इच्छितो की, ज्यावेळी प्रथम सन 2001 मध्ये ही योजना आली त्यावेळी माझ्या नगर जिल्हयात 26 हजार थकबाकीदार शेतकरी होते, त्यापैकी केवळ 466 शेतकऱ्यांनी त्यात भाग घेतला होता व

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. यशवंतराव गडाख .....

थकबाकी 36 कोटीची होती, परंतु फक्त 90 लाख एवढीच वसुली होऊ शकली. कारण त्या योजनेचे नियमच इतके किचकट आहेत की, त्यात जास्त शेतकरी भाग घेऊ शकत नाहीत. त्यानंतर सन 2003 मध्ये पुन्हा 23622 शेतकऱ्यांपैकी केवळ 28 शेतकरीच यामध्ये भाग घेऊ शकले. अशा प्रकारची योजना जर असेल तर त्यात शेतकरी सहभाग घेऊच शकणार नाही.

यानंतर श्री. भारवि .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.यशवंतराव गडाख...

त्यामुळे वन टाईम सेटलमेंटसंबंधी राज्य शासन, सहकार विभाग आणि नाबार्ड यांनी एकत्रित येऊन सुटसुटीत आणि सोपी योजना शेतकऱ्यांकरिता तयार केली पाहिजे. महाराष्ट्रातील ज्या बँका नफ्यामध्ये आहेत, त्यांना कॉर्पस् फंड तयार करण्यास सांगितले पाहिजे. जिल्हा बँका, राज्य बँक आणि सरकार तसेच नाबार्ड यांनी एकत्रित येऊन योजना तयार केली तर थकबाकीदार शेतकरी मोठया प्रमाणावर बाहेर पडू शकतो. यासाठी नाबार्डशी शासनाने बोलणे आवश्यक आहे. थकबाकीचा प्रवास मोठा मजेशीर आहे. संबंधिताने मुदतीपूर्व कर्ज न फेडल्यामुळे तो थकबाकीदार होतो. पहिल्या वर्षासाठी सब स्टँडर्ड एनपीए होतो. दुसऱ्या वर्षासाठी डाऊनपूट एनपीए होतो. तिसऱ्या वर्षासाठी लॉस एनपीए होतो. अशा पध्दतीचा थकबाकीचा प्रवास असतो. यानंतर वनटाईम सेटलमेंट आले होते. यामुळेच त्याचे व्याज, दंडव्याज वाढत जाते. म्हणून माझी विनंती आहे की, वन टाईम सेटलमेंटची सुटसुटीत योजना सुरू करण्यात यावी. यासाठी केंद्र शासन, राज्य शासन, नाबार्ड, बँका यांच्या मदतीने योजना पूर्ण करावी लागेल. यासाठी कॉर्पस् फंड तयार करावा लागेल. यात सगळयांचा सहभाग असणे आवश्यक आहे. तरच थकबाकीदार शेतकरी बाहेर पडू शकतो. त्यादृष्टीने शासनाने विचार करावा. आर.बी.आय.ने एक परिपत्रक राष्ट्रीयकृत बँकाना पाठविले आहे. या परिपत्रकानुसार त्यांनी बँकांच्या बोर्डांना अधिकार दिले आहेत. त्यामुळे ज्या सहकारी बँकां नफ्यामध्ये आहेत, त्यांना वन टाईम सेटलमेंट करण्याची परवानगी शासनाने दिली पाहिजे. पण तशी मानसिकता या शासनाची दिसत नाही. तेव्हा याबाबत शासनाने जरूर विचार करावा. जर बँकांची थकबाकी वाढत जाणार असेल तर या परिपत्रकाचा आधार घेऊन सहकार खात्याने आपला माईंड वापरला पाहिजे. असे करण्यास ज्या बँका तयार असतील त्यांना शासनाने मंजुरी दिली पाहिजे. आता व्याजाचे दर कमी केले आहेत, त्याबद्दल अभिनंदन. एवढेच नव्हे तर शासनाने आता अभ्यासगट नेमला आहे. त्याच्या दोन बैठका झाल्या आहेत. व्याजाचा निर्णय झाला हे बरे झाले. तरी पण काही प्रश्नांसंबंधी चर्चा झाली असती तर अधिक बरे झाले असते.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सन्माननीय मंत्री श्री.जयप्रकाश दांडेगांवकर यांनी त्यासाठी अधिक वेळ दिला त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. शेतकऱ्याचे जे लहान-लहान प्रश्न आहेत त्या प्रश्नांबाबत देखील साकल्याने चर्चा झाली पाहिजे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या खरोखरच थांबवावयाच्या असतील तर इतर बाबींसंदर्भात सुध्दा विचार करावा लागेल. ज्या आत्महत्या झालेल्या आहेत त्या बाबत जो अहवाल प्रकाशित झालेला आहे त्यावरुन असे निदर्शनास येते की, 20 टक्के आत्महत्या या मुलींच्या लग्नासाठी जवळ पैसा नसल्यामुळे झालेल्या आहेत. महोदया, कोणी कितीही गरीब असला तरी त्याला मुलीचे लग्न हे करावेच लागते. परंतु आज तर अशी परिस्थिती आहे की, गरीब शेतकऱ्यांना कर्ज मिळत नाही. म्हणून त्यांना कर्जासाठी खाजगी सावकारांकडे जाऊन, जादा दराने कर्ज घ्यावे लागते. त्यामुळे जिराईत शेतकरी असेल, अल्प भू-धारक शेतकरी असेल त्यांना मुलीच्या लग्नासाठी 4-5 टक्के व्याजाने कर्ज उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने विचार करणे अत्यावश्यक आहे. ज्यावेळी अभ्यास गट नेमण्यात आला त्यावेळी आम्ही याबाबत लेखी सूचना दिल्या होत्या. सर्वांनाच कमी व्याज दराने कर्ज उपलब्ध करुन द्या असे मी म्हणणार नाही, परंतु जे खरोखरच गरीब शेतकरी आहेत त्यांना तरी सवलतीच्या दराने कर्ज उपलब्ध करुन देण्यासंदर्भात शासनाने विचार केला पाहिजे.

महोदया, जिराईत भागातील शेतकऱ्यांच्या मुलांसाठी, गरीब शेतकऱ्यांच्या मुलांसाठी शिक्षणासाठी अल्प व्याज दराने कर्ज उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने विचार केला पाहिजे. या शेतकऱ्यांच्या मुलाला डी.एड., बी.एड. अथवा अन्य शिक्षणासाठी कमी व्याज दराने कर्ज उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. आज या शेतकऱ्यांना आपल्या मुलाच्या शिक्षणासाठी खाजगी सावकारांकडून जादा व्याज दराने कर्ज घ्यावे लागते. त्यामुळे शासनाने या बाबतीत विचार करुन, गरीब शेतकऱ्यांच्या मुलांना कमी व्याज दराने कर्ज उपलब्ध करुन देण्याबाबत विचार करावा अशी मी आग्रहाची विनंती करीत आहे.

महोदया, सर्वसामान्य शेतकरी, जिराईत शेतकरी, गरीब शेतकरी आयुष्यभर शेती करतो. त्याला वैद्यकीय रजा नसते, सणवार नसतो. तो रात्रं-दिवस राब-राब राबत असतो. तो आजारी पडला तरी त्याला मदत करण्यास कोणी तयार नसतो. तो आयुष्यभर कष्ट करतो, शेती

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.यशवंतराव गडाख....

पिकवितो. परंतु म्हातारपणामध्ये त्याला कसल्याही प्रकारचा आधार नसतो. त्यामुळे या चर्चेच्या माध्यमातून माझी शासनाला सूचना आहे की, शेतकऱ्यांचे वय 58-60 वर्षे झाल्यानंतर शासनाने त्यांना पेन्शन सुरु करावयास पाहिजे. कारण आज कुटुंब व्यवस्था खिळखिळी होत चालली आहे. ग्रामीण भागामध्ये तर अशी परिस्थिती आहे की, वडिल एका मुलाच्या घरी, तर आई दुसऱ्या मुलाच्या घरी वास्तव्यास असते. आज आई-वडिलांना दोन मुलांमध्ये विभागले गेले आहे. आजारी पडल्यास रुग्णालयात जाण्यासाठी सुध्दा त्यांच्याजवळ पैसा नसतो. म्हणून या बाबतीत कोठे तरी विचार करण्याची गरज आहे. त्यामुळे सर्वांगीण अभ्यास करुन, लहान-लहान प्रश्नांचा विचार करुन, शेतकऱ्यांना पेन्शन दिली गेली पाहिजे.

महोदया, आज शेतकऱ्यांच्या संदर्भातील अत्यंत महत्वाच्या विषयावर सदनामध्ये चर्चा सुरु असताना सत्ताधारी आणि विरोधी बाकावर मात्र अतिशय कमी उपस्थिती असणे ही खरोखरच दु:खदायक बाब आहे. आपण छोटया-छोटया प्रश्नांसाठी सभागृहात अधिक वेळ देतो, परंतु अतिशय महत्वाच्या विषयावर अशी उदासिनता योग्य नाही. या विषयाबाबत आपण निगेटीव्ह विचार केला तर ते बरोबर होणार नाही. म्हणून जो शेतकरी आयुष्यभर राबतो, सणासुदीत राबतो त्या शेतकऱ्याला मदत केली पाहिजे. महोदया, पेरणीचा दिवस असेल आणि शेतकऱ्याच्या घरात जर मयत झाली तर, हाच शेतकरी घरातील मयत झाकून पहिले पेरणी करतो, पेरणीसाठी स्वत:ला इ ोकून देतो. त्यामुळे अशा गरीब शेतकऱ्यांना आयुष्याच्या शेवटी पेन्शन देणे हे शासनाचे एक प्रकारे कर्तव्यच आहे असे मला वाटते.

नंतर श्री.कांबळे....

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. यशवंतराव गडाख ....

सभापती महोदय, या सर्व गोष्टींमध्ये शासनाने लक्ष घातलेले नाही. अनेक शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची वाट शासन पाहणार आहे का ? आतापर्यंत हजार, दोन हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. आपल्याला हा आकडा अजून वाढवायचा आहे का ? तरी, याचे देखील शासनाने आत्मपरिक्षण करणे आवश्यक आहे. आपण या संदर्भात जे केले, त्याबद्दल मी आपले जरुर अभिनंदन करतो. परंतु बाकीच्या प्रश्नांसंदर्भात आपण लक्ष घालावे, अशी या निमित्ताने विनंती करतो. त्याचप्रमाणे सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी वन टाईम सेटलमेंटच्या संदर्भात जी सूचना केली, त्यामध्ये सर्वांना सहभागी करुन घ्यावे व या संदर्भात तातडीने निर्णय लागू करावा, अशी विनंती करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, राज्यातील शेतकऱ्यांच्या समस्या, कर्जाचे व्याज दर कमी करणे, शेतमालाला आधारभूत व रास्त किंमत देणे, एक रकमी परतावा मिळवून देणे या विषयावर महाराष्ट्र विधानपरिषद नियम 260 अन्वये प्रस्ताव मांडलेला आहे, त्यावर मी माझे विचार मांडणार आहे.

सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या दुरावस्थेबाबत या सदनामध्ये वारंवार चर्चा झालेली आहे. आत्महत्या हा दयेचा विषय नाही आणि राजकारणाचाही नाही. शेतकऱ्यांच्या दुरावस्थेसंदर्भात तसेच त्यांच्या हालाखीच्या परिस्थितीबाबत सत्ताधारी पक्षाकडून व विरोधी पक्षाकडूनही सातत्याने यावर प्रस्ताव मांडले जात असतात. सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये अनेक वेळा वेगवेगळ्या घटना घडत असतात. सभापती महोदय, गोळीबार, आंदोलने यातून आपल्याला शेतकऱ्यांच्या असंतोष नक्कीच दिसतो. सभापती महोदय, शेतकऱ्यांची परिस्थिती बदलणे आवश्यक आहे. सर्व राजकीय पक्षांमध्ये शेतकऱ्यांचीच मुले आहेत आणि तिही नेतृत्व पदावर आहेत. जिल्हा परिषदेच्या सदस्यांपासून, गावच्या सरपंचापासून, आमदारांपासून ते खासदारांपर्यंत असलेल्या बऱ्याचशा व्यक्ती शेतकऱ्यांच्या कुटुंबामध्येच जन्माला आलेली मुले आहेत आणि ती मुले मोठ्या प्रमाणात निर्णय प्रक्रियेत आहेत. सभापती महोदय, आता पुणे जिल्ह्यामध्ये शेतकऱ्यांच्या संघटनांना सुरुवात झाली आहे. कांदा उत्पादकांनी केलेल्या आंदोलनापासून अमरावतीमध्ये झालेल्या गोळीबारापर्यंत आपल्याला शेतकऱ्यांचा उद्रेक दिसून येतो. अकोला जिल्ह्यातील अकोट येथे गणगणे नावाच्या शाळेमध्ये वक्तृत्व स्पर्धा ठेवली होती. अकोटमधील कु. दिपाली कोल्हे या शेतकरी कुटुंबातील मुलीने भाग घेतला होता. त्या वक्तृत्व स्पर्धेचा विषय होता, "शेतकऱ्यांच्या आत्महत्येस जबाबदार कोण ? " सभापती महोदय, शाळेच्या वक्तृव स्पर्धेत भाषण केल्यानंतर ती मुलगी तिच्या घरी परतली आणि स्वत:च्याच घरातील चार बहिणी आणि दोन भावांची शिक्षणाअभावी झालेली परिस्थिती पाहून असह्य होऊन कु. दिपाली कोल्हे हिने किटकनाशक पिऊन आत्महत्या केली. अकोट या ठिकाणी मी स्वत: जाऊन त्या कुटुंबास भेटले. अनेक सन्माननीय सदस्यांनी या संदर्भात मुद्दा उपस्थित केला होता. त्यामधून महत्वाची गोष्ट अशी जाणवली की, केवळ एका कुटुंबापर्यंत ही परिस्थिती मर्यादित नाही. ज्या मुलांचे शिक्षण काही कारणास्तव थांबले असेल आणि पुन्हा जर त्यांना शिक्षण घ्यावयाचे असेल तर त्या संदर्भात कुठे

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ....

काय करावयाचे याची माहिती देखील त्या शेतकऱ्यांच्या कुटुंबापर्यंत पोहोचलेली नाही. दुसरा एक महत्वाचा मुद्दा हुंड्यासंबंधी आहे. या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. यशवंतराव गडाख साहेबांनी देखील सांगितले की, मुलीला लग्नात द्याव्या लागणाऱ्या हुंड्यामुळे शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. सभापती महोदय, जेव्हा आपल्या शरीराच्या एखाद्या भागाला गँगरीनचा प्रादुर्भाव होतो, तेव्हा आपण तो भाग कापून टाकतो. तरी, या संदर्भात देखील शासनाने योग्य तो विचार करणे आवश्यक आहे. सभापती महोदय, कु. दिपाली कोल्हे हिची मोठी बहिण परितक्त्या आहे. त्या मुलीच्या संदर्भातील केस कोर्टात चालू आहे, तिच्या लहान बहिणींच्या लग्नात अडचणी निर्माण झालेल्या आहेत, अशी आज परिस्थिती आहे. सभापती महोदय, आपल्या दोन बहिणींच्या व दोन भावांच्या या प्रश्नांकडे पाहून व्यथित होऊन कु. दिपाली कोल्हे हिने आत्महत्या केली.

(यानंतर श्री. वि. खर्चे ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे...

त्यावेळी ठिकठिकाणी कार्यकत्यांना भेटून हा प्रश्न समजून घेतला. दैनिक सकाळने यासंदर्भात जो अहवाल दिलेला आहे, त्यामध्ये शेतक-यांना असहाय्य का वाटते, आत्महत्येच्या निर्णयापर्यंत ते का येतात ? आपल्याला मदत कोणी करणार नाही, असे त्यांना वाटते का ? याची माहिती आहे, येथे सगळया बँकाची आकडेवारी जरी देता आली नाही तरी मी ठराविक बँकाची आकडेवारी देते. सामान्य जनतेकरिता अडचणीच्या वेळी वेगवेगळया बँका त्यांना उपलब्ध असल्या पाहिजेत, बँकानी सामान्य माणसांसाठी केलेली मदत यासंदर्भात मी आकडेवारी देते. बँकांना लक्ष्य ठरवून दिलेले आहे. बॅकांनी लक्ष्याच्या पूर्ती केली आहे किंवा नाही, याबाबतची माहिती सुध्दा सकाळच्या रिपोर्टमध्ये दिलेली आहे. स्टेट बँक ऑफ इंडिया 64 टक्के, सिंडीकेट बँक 5 टक्के, आंध्र बँक ब्लँक, केनरा बँक ब्लँक, पंजाब नॅशनल बँक 18 टक्के, बँक ऑफ इंडिया 32 टक्के, विजया बँक 62 टक्के, बँक ऑफ बरोडा 46 टक्के, बँक ऑफ महाराष्ट्र 87 टक्के या प्रमाणात शेतकऱ्यांना मदत दिलेली आहे. राज्य व केंद्र शासनामध्ये यासाठी समन्वय असावयास पाहिजे, शेतकरी हा स्वालंबी झाला पाहिजे. वेळोवेळी त्यास मदत मिळू शकत नाही. हा प्रश्न फार मोठया प्रमाणात निर्माण झालेला आहे. या बँकापेक्षा गावातील सावकार आपल्या मदतीला धावून येतो. अशी माहिती समोर येत आहे की, एखाद्या माणसाला बॅकेकडून कर्ज मिळाले व त्याने ते वेळेवर परत केले नाही तर त्याच्या घरी नोटीस येतो, चार-चौधांमध्ये त्यांना शिव्या देण्यात येतात, त्यांच्यावर दबाव आणला जातो. शेतकरी कर्जबाजारी का होतो, याची अनेक कारणे आहेत. शेतक-यांच्या मालाला उचित भाव मिळत नाही, दुष्काळ, नापिकी, महागाई, कर्ज फेडू न शकल्यामुळे कर्जबाजारीपणा वाढत आहे. अशा अनेक प्रकारच्या प्रश्नांतून शेतकरी आत्महत्या करीत आहेत. अशा प्रकारची माहिती इंदिरा गांधी इन्स्टिटयूट, टाटा इंन्स्टिटयूट, गोखले इन्स्टिटयूट व दैनिक सकाळ यांनी आपल्या अहवालात दिलेली आहे. यासंदर्भात अनेक मुद्दे त्यांनी मांडलेले आहेत, तालुका व जिल्हयापर्यंत हे लोण आता पोहचलेले आहे. एखाद्या कुटुंबामध्ये शेतकऱ्याला त्याच्या घरातील मुला-मुलीच्या लग्नासाठी कर्ज मिळाले नाही तर त्याची प्रतिष्ठा त्या ठिकाणी राहत नाही. जिल्हयातील व तालुक्यातील शेतकरी कुटुंबामध्ये लग्नामध्ये मोटर भेट देणे, अशा प्रकारच्या चालीरिती संस्कृतीप्रमाणे चालल्या आहेत. शेतकरी कुटुंबात आत्महत्येचे प्रमाण खूप मोठया प्रमाणात आहे.

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे...

मला तरी असे वाटते की, राज्याच्या आर्थिक व सामाजिक विकासाच्या बाबतीत अशा प्रकाराबाबत खबरदारी घेणे अत्यंत गरजेचे आहे. या घटनांमुळे टेकन फॉर गॅन्टेड अशा प्रकारची भूमिका घेण्याबाबत विचार करण्याची वेळ आलेली आहे. सभागृहाच्या माध्यमातून मी आपले लक्ष वेधू इच्छिते की, शेतकऱ्यास कोठलाही अर्ज करावयाचा असेल, वेगवेगळया कार्यालयात जावयाचे असेल तर त्याला वाटते आपण एकटे आहोत, राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्याशिवाय किंवा पदाधिकाऱ्यांशिवाय कोणतेही काम होत नाही, प्रत्येक तालुक्यामध्ये गावांगावांमध्ये सकाळी उठल्यापासून संध्याकाळपर्यंत सर्व साधारणपणे एखाद्या छोटया कामासाठी राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्याला घेऊन गेल्याशिवाय कोणत्याही कार्यालयात काम होत नाही. राजकीय पक्षांचे कार्यकर्ते गेल्याशिवाय शेतकऱ्यांसाठी त्यांचे दार उघडे होत नाही. अशी परिस्थिती असल्यामुळे मोठया प्रमाणात भ्रष्टाचारास वाव मिळतो आहे. शेतकऱ्यांना कोणीही किंमत देत नाही. शेतकऱ्यांचा मालाला उचित भाव देण्यात येत नाही. अनेक वेळा शेतकऱ्यांना सबसिडी देण्याचा विषय आला की, शेतकऱ्यांना सबसिडी कशासाठी पाहिजे असा प्रश्न उपस्थित करण्यात येतो. आपण प्रगत देशांमध्ये पाहिले तर ज्या वेळी ते देश अप्रगत होते, त्या वेळी सातत्याने तेथे सबसिडी मोठया प्रमाणात देण्यात येत होती. तेथे जे घटक अप्रगत होते त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात येण्यासाठी तेथील शासनाने त्यांना आर्थिक संरक्षण दिल्यामुळे त्या देशांची प्रगती झालेली आहे. आपल्या देशामध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत ही वस्तुस्थिती आहे. सातत्याने एकाच वर्गात मोठया प्रमाणात आत्महत्येच्या घटना घडत आहेत.

यानंतर श्री. सुंबरे...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखनासाठी नाही

डॉ. गोऱ्हे ...

शेतकऱ्यांच्या या दुरावस्थेच्या बाबतीत आपल्याला खरोखरी काही भूमिका बजवावयाची असेल तर मघाशी ज्या अभ्यासगटाचा उल्लेख येथे झाला त्यांच्या शिफारशींवर काय कृती झाली याचीही माहिती सदनासमोर ठराविक कालावधीमध्ये आली पाहिजे असे मला वाटते. दुष्काळाच्या बाबतीत किंवा पूर परिस्थतीच्या काळामध्ये कोणतेही राजकारण न आणता, सर्व पक्षीय समित्या करून, सर्व पक्षांना एकत्र घेऊन आपण कार्यक्रम ठरवित असतो. त्याप्रमाणे शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या संदर्भात त्यामागील कारण मिमांसा काय आहे हे लक्षात घेऊन शेतीमालाच्या भावाचा जो प्रश्न आहे तो सोडविला गेला पाहिजे. कृषीमूल्याच्या बाबतीत, यातील अंमलबजावणीमध्ये ज्या ज्या तांत्रिक अडचणी आहेत, शेतकऱ्यांसाठी म्हणून आणण्यात आलेल्या योजनांची अमलबजावणी का योग्य प्रकारे होत नाही याचेही मूल्यमापन केले गेले पाहिजे. असे मूल्यमापन आज होते आहे का ? या योजना राबविणाऱ्या अधिकाऱ्यांच्या विरोधात जोपर्यंत आंदोलन उभे रहात नाही ... सभापती महोदया, शासनाकडून जसा प्रतिसाद मिळत नाही तसे लोक देखील अधिकाधिक वेगवेगळ्या युक्त्या शोधू लागतात. मला आठवते की, मराठवाड्यामध्ये असेही एक आंदोलन करण्यात आले होते की, जे सरकारी अधिकारी सरकारी कामाव्यतिरिक्त सरकारी गाडी वापरताना दिसले की त्या अधिकाऱ्याच्या थोबाडीत मारायची. त्यामुळे असे झाले की, कोणाही अधिकाऱ्याकडे गेले की, तो प्रथम आपल्याला आलेला माणूस मारेल म्हणून दोन्ही गालांवर हात ठेवीत असे. लोकांच्या आंदोलनाचा हा परिणाम होता. पण अशा पद्धतीने जनतेला हिंसेकडे जाण्याची वेळ येता कामा नये या दृष्टीने शासनाने आणि शासनातील अधिकाऱ्यांनी देखील काम केले पाहिजे. अशा पद्धतीची आंदोलने लोक करू लागले आणि मग त्यांच्यावरील खटले वाढू लागले. आजही गावागावातून यासाठी आम्हाला निरोपउ येतात. ज्या शेतकऱ्यांनी पाण्यासाठी असेल वा अन्य त्यांच्या मूलभूत समस्यांसाठी असेल, आंदोलन केले असेल तर सरकार त्यांच्यावरील त्याबाबतचे खटले मागे घेईल काय ? आज सरकारला खरोखरी शेतक-यांसाठी काही करावयाचे असेल तर पहिल्या प्रथम सरकारने त्यांच्यावर अशा आंदोलनातून दाखल केलेले खटले एकमुखी मागे घ्यावेत. असे झाले तर गावागावांमध्ये भारत-पाकिस्तान होण्याची जी वेळ आलेली आहे ती येणार नाही आणि सरकारची भूमिका शेतकऱ्यांच्या बाबतीत योग्य आहे हेही समजू शकेल. सभापती महोदया, शेवटी एकच मुद्दा सांगून मी भाषण संपविणार आहे. जसे पाण्याच्या प्रश्नासाठी लोक एकत्र येतात तसे

..... 4जी 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. गोऱ्हे .....

लोक आता अतिशय हुशार होऊ लागले आहेत. एखादी योजना जाहीर झाली की, ज्या हेतूने ती योजना जाहीर केलेली असते तो हेतूच बाजूला राहतो आणि ज्याप्रमाणे भुंगा फुलातील रस शोषून घेतो त्या पध्दतीने सत्तेशी जवळीक असलेले चार लोक त्या योजनेचा फायदा घेतात आणि ज्यांच्यासाठी म्हणून ती योजना आखण्यात आलेली असते त्या लोकांना त्या योजनेचा काही फायदाच मिळत नाही. तेव्हा आताही आपण आपत्तीत सापडलेल्या शेतकऱ्यांसाठी जी योजना आखाल ती त्यांच्यापर्यंत निश्चितपणे पोहोचेल या दृष्टीने तिची अंमलबजावणी होईल याची दक्षता घ्यावी अशी विनंती करून मी भाषण संपवितो. जयहिंद, जय महाराष्ट्र.

****

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. शरद पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी शेतकऱ्यांच्या एका अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नासंबंधात येथे चर्चा उपस्थित केलेली आहे. शेतकऱ्यांच्या जीवनामध्ये नेहमीच चढउतार होत असतात. एखाद्या वर्षी पीक बरे होते आणि दुसऱ्या वर्षी अनावृष्टी वा अतिवृष्टी किंवा अन्य नैसर्गिक आपत्तीला त्याला सातत्याने तोंड द्यावे लागते. त्यामुळे शेतकरी हा नेहमीच अस्थिर अवस्थेमध्ये जगत असतो. 100 वर्षापूर्वी आपल्या राज्यामध्ये, देशामध्ये सहकारी बँका निर्माण झाल्या. त्यापूर्वी शेतकरी आणि सामान्य माणूस हा सावकाराच्या विळख्यामध्ये सापडलेला होता. त्या सावकारी विळख्यातून सामान्य माणसाला आणि शेतकऱ्याला बाहेर काढण्यासाठी सहकार चळवळ केली गेली आणि सहकाराच्या माध्यमातून जिल्हा बँका, विकास सोसायट्या, सहकारी बँका, नागरी सहकारी बँका आणि पतसंस्था उभ्या राहिल्या आणि त्यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आणि सर्वसामान्य माणसांना पतपुरवठा मिळण्याची व्यवस्था झाली आणि काही अंशी त्यांना दिलासा मिळाला. ..

(यानंतर श्री. खंदारे .... 4जी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.शरद पाटील.....

गेली 100 वर्षे सहकाराच्या माध्यमातून शेतक-यांना त्यांच्या शेतीसाठी कर्जपुरवठा करण्याची पध्दत चालत आलेली आहे. या सहकारी चळवळीच्या माध्यमातून शेतक-यांना मोठया प्रमाणात दिलासाही मिळाला आहे. परंतु अलिकडच्या काळामध्ये कधी दुष्काळामुळे, कधी नैसर्गिक आपत्तीमुळे, महापुरामुळे शेती आणि शेतकरी मोठया प्रमाणावर अडचणीमध्ये सापडला आहे. सहकारी बँका, विकास सोसायटया यांचे कर्ज घेऊन शेती करणा-या शेतक-याला आज आर्थिक संकटाला सामोरे जावे लागत आहे. बँकांकडून घेतलेल्या कर्जाची परतफेड करणे शक्य होत नाही आणि ज्या नवीन खर्चाच्या बाजू असतात त्यासाठी पैशाची कोणतीही व्यवस्था नसते अशा परिस्थितीत खाजगी सावकाराच्या विळख्यामध्ये हा शेतकरी सापडतो असे चित्र निर्माण झालेले आहे. सावकाराच्या पाशातून सुटका होण्यासाठी तो सहकारी बँकांकडून कर्ज घेतो, परंतु ते कर्ज फेडणे शक्य होत नसल्यामुळे पुन्हा तो खाजगी सावकाराकडे जातो अशी विचित्र स्थिती या राज्यात निर्माण झाली आहे. सभापती महोदया, आम्ही देखील सहकारी बँक चालविण्याच्या प्रक्रियेमध्ये सहभागी आहोत. मी माननीय सदस्य श्री.यशवंतराव गडाख यांना सांगू इच्छितो की, शेतक-यांना दिलेले कर्ज हे सर्वात सुरक्षित कर्ज असते. कारण त्याला कर्ज देत असताना त्याची जमीन आपण तारण म्हणून ठेवतो. त्याच्या जमिनीच्या जास्तीत जास्त 30 टक्के रक्कम कर्ज म्हणून देतो. या रकमेच्या थकबाकीची वसुली करावयाची असेल तर त्याची जमीन विकून, त्याला मातीमोल करुन आम्ही आमच्या कर्जाची वसुली करु शकतो. बडेबडे उद्योजक, व्यापारी हे राष्ट्रीयकृत बँकांकडून कर्ज घेतात. हे कर्ज शेकडो कोटींचे असते. मार्डिया नावाच्या एका व्यापा-याने राष्ट्रीयकृत बँकेकडून 500 कोटी रुपये कर्ज घेतले, त्याने त्याची परतफेड केली नाही, त्या पैशाची वसुली झाली नाही, त्याने ते कर्ज बुडविले. म्हणजे राष्ट्रीयकृत बँकांचे, व्यापारी बँकांचे हे पैसे मोठे लोक बुडवितात आणि त्यामुळे अडचणीमध्ये आलेल्या बँकांना वर काढण्यासाठी केंद्र सरकार वा रिझर्व्ह बँक पुढे येते आणि त्यांना वाचविते. ज्यावेळी युनिट ट्रस्ट ऑफ इंडियाला 16000 कोटीं इतका तोटा झाला होता तेव्हा केंद्र सरकारने हा सगळा पैसा भरला होता. मग ज्या सहकारी बँका, विकास सोसायटया आहेत या गरीब शेतक-यांना कर्ज देतात, त्या कर्जाच्या वसुलीसाठी त्यांच्यावर

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MHM/ SBT/

प्रा.शरद पाटील.....

कायदेशीर कारवाई करावी लागते आणि कायदेशीर कारवाईच्या माध्यमातून ती वसुली करता येते अशावेळी केंद्र सरकार किंवा राज्यसरकार त्यांच्या मदतीला धावून येत नाही. ज्यावेळी शेतकरी दिलेले कर्ज फेडू शकत नाही, तेव्हा तो हतबल होऊन सावकाराकडे जातो आणि त्याच्या जाळयात सापडतो. अशा घटना नेहमी घडत आहेत. मी मागील वर्षी एक प्रश्न उपस्थित केला होता. एका सावकाराने 5 लाख रुपयांच्या कर्जासाठी एका शेतक-याची 60 लाख रुपये किंमतीची जमीन हडप केली होती. त्या शेतक-याने तारण म्हणून घेतलेली जमीन सावकाराने ताब्यात घेतली पण शासन त्याबाबत काही करु शकले नाही. खाजगी सावकार हा शेतक-यांना दामदुप्पट दराने कर्ज देतो.

नंतर श्री.किल्लेदार.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.शरद पाटील (पुढे सुरु...

आणि त्याची वसुली त्यांच्या पध्दतीने ते करत असतात. कर्जाची परतफेड केली नाही तर जमीन काढून घेण्यात येईल, असे शेतकऱ्याकडून लिहून घेतलेले असते. त्यांच्यावर कडक कारवाई करण्याची व्यवस्था सन्माननीय मंत्री महोदयांनी केली पाहिजे. माझा सांगण्याचा मुद्दा असा आहे की, जर सहकारी सोसायट्यांनी किंवा मध्यवर्ती सहकारी बँकेने एखाद्या शेतकऱ्याला कर्ज दिले असेल आणि नैसर्गिक आपत्तीमुळे, काही अडचणीमुळे ते कर्ज तो शेतकरी फेडू शकत नसेल किंवा मुलीचे लग्नासाठी, मुलाच्या शिक्षणासाठी किंवा शेतीमध्ये धान्य पिकविण्यासाठी त्याला कर्ज हवे असेल तर ते दिले पाहिजे. अशाप्रकारची शेतकऱ्यांसाठी फेर पतपुरवठा करण्याची व्यवस्था झाली तर शेतकरी सावकाराच्या दारामध्ये जाणार नाही. सभापती महोदया, शासनाने 6 टक्के दराने कर्ज पुरवठा करण्याचे धोरण जाहीर केलेले आहे, त्याबद्दल शासनाचे अभिनंदन करतो. परंतु त्याची अंमलबजावणी होत नाही. भारताचे माजी पंतप्रधान माननीय श्री.एच.ए.देवेगौडा यांनी कर्नाटकमध्ये काँग्रेस आणि जनता दलाचे सरकार असताना,शेतकऱ्यांना 6 टक्के दराने कर्जपुरवठा करण्याचे जाहीर केले आणि ते अंमलात आणून दाखविले. देशातील पहिलेच कर्नाटक राज्य असे आहे की, त्यांनी शेतकऱ्यांना 6 टक्के दराने आज देखील कर्जपुरवठा करण्याचे सुरु ठेवलेले आहे. त्या ठिकाणचे उदाहरण आपल्या डोळयासमोर ठेवून केवळ पीक कर्जासाठी नव्हे तर इतरही कर्जासाठी मध्यम मुदतीचे, दीर्घ मुदतीचे जे काही कर्ज असेल ते 6 टक्के दराने उपलब्ध करुन द्यावे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी विकास सोसायट्या सक्षम असल्या पाहिजेत, अशाप्रकारचा उल्लेख केला, तो अतिशय महत्वाचा आहे. सहकारी व्यवस्थेमध्ये जिल्हा सहकारी बँका आणि विकास सहकारी सोसायट्या आहेत. या विकास सोसायट्यांना सक्षम बनवून त्यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना अल्प दराने कर्जपुरवठा झाला तर शेतकऱ्यांना सावकाराच्या दारी जाण्याची वेळ येणार नाही. हा महत्वाचा मुद्दा शासनाने मान्य करावा, अशी विनंती आहे. त्याचबरोबर एक रक्कमी परतफेड योजना रिझर्व्ह बँकेने 1999 सालापासून सुरु केलेली आहे. शासनाला एक रक्कमी परतफेड योजना कशी राबवावी याचे स्वातंत्र्य रिझर्व्ह बँकेने दिलेले आहे. सहकार आयुक्त आपल्या राज्यातील सहकारी बँकांना आणि सहकारी संस्थांना एक रक्कमी परतफेड योजनेची अंमलबजावणी करण्याबाबत निर्देश देऊ शकतात. सध्या महाराष्ट्र सरकारच्या सहकार खात्याच्या मार्गदर्शक सूचनेनुसार 31 मार्च 2001

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.शरद पाटील (पुढे सुरु....

पर्यन्त एम.टी.ए. डाऊटफूल आहे. कृषी खात्यासाठी एक रक्कमी परतफेड योजनेची सवलत लागू आहे. रिझर्व्ह बँकेने बँकांना सवलत कायम स्वरुपात दिलेली आहे. त्यांच्या नफ्यातून त्यांनी थकित कर्जासाठी एक रक्कमी परतफेड योजनेची सवलत द्यावी, अशी योजना आहे. महाराष्ट्रातील सहकारी बँकांची अशी मागणी आहे की, किमान 31 मार्च 2001 ऐवजी 31 मार्च 2002 पर्यन्त थकलेल्या कर्जासाठी एक रक्कमी परतफेड योजना लागू करावी. गेल्या आठवड्यामध्ये या विषयाच्या संदर्भात प्रश्न उपस्थित झाला असतांना, सन्माननीय सहकारी मंत्री डॉ.पतंगराव कदम साहेबांनी 31 डिसेंबर 2006 पर्यन्त या योजनेला मुदत वाढ देण्यात आलेले आहे,अशी घोषणा केली. यामध्ये दोन अर्थ निघू शकतात. एक म्हणजे 31 डिसेंबर 2006 पर्यन्त ज्यांची रक्कम थकित आहे, त्यांना ही सवलत लागू होईल आणि दुसरा अर्थ असा होऊ शकतो की, 31 मार्च 2001 पर्यन्त थकलेल्या कर्जासाठी परतफेड योजनेसाठी अर्ज करण्याची मुदत असावी. या संदर्भाने मंत्री महोदयांनी खुलासा करावा. मी एवढेच सांगेन की, सर्वसामान्य कर्जधारकांना थकलेल्या कर्जाच्या व्याजाच्या ओझ्यातून मोकळे करण्यासाठी....

यानंतर श्री.बरवड...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. शरद पाटील ....

एक रकमी कर्जफेड योजना ज्या मुदतीपर्यंत दिलेली आहे ती मुदत एक वर्ष वाढवून देऊन बँकांना आणि कर्जदारांना यातून दिलासा देण्याचा प्रयत्न करावा अशी मी या निमित्ताने मागणी करतो. सन्माननीय सदस्य श्री. यशवंतराव गडाख साहेबांनी शेतकऱ्यांना वयाच्या 58 वर्षानंतर निवृत्तिवेतन योजना लागू करावी अशी जी सूचना केलेली आहे त्या सूचनेला पाठिंबा देऊन मी माझे भाषण संपवितो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. वसंत पवार (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : आदरणीय सभापती महोदया, या सभागृहामध्ये नियम 260 अन्वये आमचे मित्र सन्माननीय सदस्य सर्वश्री. रणजितसिंह मोहिते-पाटील, यशवंतरावजी गडाख तसेच इतर सन्माननीय सदस्यांनी जो प्रस्ताव मांडलेला आहे त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देईन. अत्यंत महत्वाच्या विषयावर आपल्या सभागृहामध्ये ही चर्चा होत आहे. शेतकरी हा आपल्या देशाचा कणा आहे. आताच अर्थसंकल्पाची जी कागदपत्रे आमच्याकडे आलेली आहेत त्यानुसार जवळपास 68 टक्के जनता ग्रामीण भागामध्ये राहते आणि 32 टक्के जनता नागरी भागामध्ये राहात आहे. आपली अर्थव्यवस्था शेतीवर अवलंबून आहे असे आपण म्हणतो. परंतु कायद्यांमध्ये किंवा इतर बाबींमध्ये ही बाब तशी परावर्तीत होत नाही. शेतकऱ्यांना ज्या अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते त्यामध्ये अतिवृष्टी, दुष्काळ याही बाबी आहेत. तसेच शेतीमालाचा भाव जास्तीतजास्त वेळा कमी होतो त्यामुळे तो शेतकरी कर्जाच्या विळख्यात अडकून जातो. नाशिक जिल्ह्यामध्ये आतापर्यंत शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे लोण नव्हते परंतु गेल्या दीड दोन महिन्यांमध्ये त्या ठिकाणी 3 शेतकऱ्यांच्या आत्महत्या झालेल्या आहेत. निफाड तालुक्यामध्ये शिगवे या गावी श्री. बेरने या शेतकऱ्याने आत्महत्या केली. चाटोरी, ता. निफाड या ठिकाणी श्री. हिरे नावाच्या शेतकऱ्याने आत्महत्या केली. लासलगावमध्ये सुध्दा एका तरुणाने आत्महत्या केली. या सगळ्याची कारणमिमांसा पाहिली तर यामध्ये निश्चितपणे कर्जबाजारीपणा हे कारण दिसून येते. हा कर्जबाजारीपणा सारखा वाढत आहे. आज नाबार्डच्या माध्यमातून असेल, एमएससी बँकेच्या माध्यमातून असेल किंवा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या माध्यमातून किंवा विकास सोसायट्यांच्या माध्यमातून कर्ज देण्याची जी पध्दत आहे त्याबाबत सरकारने असे जाहीर केले आहे की, शेतकऱ्यांना 7 टक्के दराने कर्ज द्यावयाचे आणि त्यापैकी 1 टक्का कर्ज राज्य सरकार देणार. म्हणजे शेतकऱ्यांना 6 टक्के दराने कर्ज मिळणार आहे. यापूर्वी जे कर्ज घेतलेले आहे त्याची परतफेड कशी करावयाची ? आपल्या को-ऑपरेटीव्ह क्षेत्रामध्ये जे काही जुने-नवे होत असते त्यामुळे कर्जाचा डोंगर हळूहळू वाढत असतो. 31 मार्च ही तारीख परवा संपली. कर्मधर्मसंयोगाने मी एका बँकेचा अध्यक्ष आहे तसेच मी एका पतपेढीचाही अध्यक्ष आहे. 31 तारखेला त्या ठिकाणी सकाळपासून रात्री 12.00 ते 1.00 वाजेपर्यंत बसून राहावे लागते. एनपीएमधून आपली बँक किंवा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM/

डॉ. वसंत पवार .....

पतपेढी कशी बाहेर येईल, कमीतकमी एनपीए कसा राहील यासाठी प्रयत्न करावा लागतो.त्यामध्ये आमच्या शेतकऱ्यांचे जे काही कर्ज आहे ते बऱ्याचवेळा जुने-नवे करावे लागते. जेवढे व्याज झालेले आहे ते जरी त्यांनी भरले नाही तरी त्या व्याजासह नवीन कर्ज त्यांच्या नावाने केले जाते अशीच आजची परिस्थिती आहे.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ. वसंत पवार...)

सर्वच अधिका-यांना हे माहीत आहे. कर्जबाजारीपणा वाढत जातो आणि दंडव्याजही वाढत जाते. हे एकदा वाढले की मग कर्जदाराला कर्जाची परतफेड करता येत नाही. आमच्याकडे 60-65 एकरावर द्राक्षांची लागवड करणारे मोठमोठे शेतकरी आहेत. हे मोठे शेतकरी मध्यंतरीच्या दोन हंगामामध्ये काही ना काही कारणामुळे इतके कर्जबाजारी झाले की ते अजूनही त्या कर्जातून बाहेर येऊ शकत नाहीत. छोटया शेतक-यांना अडचणी येतात त्याप्रमाणे मोठ्या शेतक-यांना सुध्दा अडचणी येत असतात. आजच मला नाशिकहून फोन येत होते की, द्राक्षांच्या बागा विकायचा आहेत, कोणी तरी व्यापारी पाठवा. द्राक्षे आज 4 ते 5 रु. किलो दराने विकली जात आहेत. द्राक्षाचे पीक घेण्यासाठी शेतक-याला विविध प्रकारची 60 ते 70 ऑपरेशन्स करावी लागतात. ही ऑपरेशन्स केल्यानंतर द्राक्षाची बाग तयार होते. अशा वेळी द्राक्षाला 4 किंवा 5 रु. भाव मिळाला तर द्राक्ष बागायतदार कधीच फायद्यात येणार नाहीत. शेतक-याचा जास्तीत जास्त फायदा व्हायला पाहिजे या मताचा मी आहे. शेतक-याचे कर्ज माफ करा किंवा त्याचे व्याज माफ करा असे मी म्हणणार नाही. आता ही जी ओ.टी.एस. स्कीम सांगितलेली आहे त्याप्रमाणे 31.3.2001पर्यन्त ओ.टी.एस. करता येते, बाकीचे ओ.टी.एस. करता येत नाही. एन.पी.ए.ची तारीख निश्चित झालेली आहे. रिझर्व्ह बँक कोणाचे ऐकत नाही. आपला देश हा कृषी प्रधान आहे. पूर्वी एन.पी.ए. नॉर्म्स 180 दिवसांचे होते ते आता 90 दिवसांचे केलेले आहेत. नरसिंह कमिटीने रिपोर्ट दिल्यानंतर हे 90 दिवसांचे नॉर्म्स करण्यात आले आहेत. यामुळे बँकाची परिस्थिती देखील बिघडत आहे. बँकाना देखील एन.पी.ए.च्या बाबतीत तोंड द्यावे लागत आहे. बॅड आणि डाऊटफूल डेटसाठी बँकाना देखील प्रोव्हिजन करावे लागत आहे. आर.बी.आय. आणि सरकार यांच्यामध्ये ॲग्रीमेंटच्या बाबतीत वाद चालू आहे. आर.बी.आय.ने सरकारला ॲग्रीमेंटवर सही करुन देण्यास सांगितले जेणे करुन त्यांना सहकार क्षेत्रातील अधिकार प्राप्त होतील आणि त्याबाबतीत ते कारवाई करु शकतील. सरकारने अद्याप ॲग्रीमेंटवर सही केलेली नाही. गुजरात, केरळ आणि तामिळनाडू या तीन राज्यांनी ॲग्रीमेंटवर सही केलेली आहे. सभापती महोदया, सहकार आणि शेती या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. पूर्वी शेती आणि सहकाराचे एकच खाते होते आणि त्या खात्याला एकच मंत्री होता. सहकार क्षेत्रात चांगली कामगिरी केली, शेतीमध्ये त्याचा वापर केला की त्याचा

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MHM/ SBT/ MAP/ KGS/ पूर्वी श्री. बरवड 18:30

(डॉ. वसंत पवार पुढे सुरु...)

फायदा शेतक-याला होतो. तेव्हा माझी विनंती आहे की, ही जी ओ.टी.एस. स्कीम आहे त्यामध्ये एन.पी.अे. डेट पासून प्रत्येक बँकेला आणि प्रत्येक पतपेढीला जो पी.एल.आर. आहे, ज्या दराने कर्ज घेतले असेल तो दर नाही किंवा त्यावरील दंडव्याज देखील नाही. पण पतपेढी आणि बँका यांचा जो प्रायमरी लेण्डींग रेट आहे त्या दराने सरळ व्याजाने कॅल्क्यूलेशन करावे आणि ओ.टी.एस.रक्कम फायनल करावी आणि ती करण्यासाठी सरकारने आपला विशेष अधिकार वापरुन लवकरात लवकर सर्क्युलर काढावे अशी माझी नम्र विनंती आहे. जास्तीत जास्त बँकांनी 16 टक्के दराने कर्ज दिले. पी.एल.आर. 12 टक्के आहे. एन.पी.अे.ची जी डेट आहे त्या डेट पासून पी.एल.आर. रेटने सरळ व्याजाने तेवढी अमाऊंट स्वीकारुन ओ.टी.एस. करुन खाते बंद करावे.

...नंतर श्री. कानडे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीपाठी नाही

डॉ. वसंत पवार ...

हा बोर्डाने सद्सद्विवेकबुध्दीने निर्णय घेतला आहे. नाही तर शासनाला मुद्दलही मिळणार नाही आणि व्याज तर बाजूलाच राहिले. सहकारी संस्थांची परिस्थिती चांगली ठेवण्यासाठी आणि शेतकऱ्याला आणि कर्जदाराला त्याचे खाते जर बंद करावयाचे असेल तर चांगल्या प्रकारची सवलती मिळणे अत्यंत महत्वाचे आहे. शेतकऱ्यांसाठी अशा प्रकारचे निर्णय घेण्याची अत्यंत गरज आहे. नाशिक जिल्हयातील निफाड तालुका हा सधन तालुका म्हणून समजला जातो. या तालुक्यामध्ये 36 लिफ्ट इरिगेशन सोसायटया आहेत त्यातील फक्त पाच लिफ्ट इरिगेशन सोसायटया सुरु आहेत बाकी सगळया कर्जबाजारीपणामुळे बंद झालेल्या आहेत. आम्ही मागणी केली आहे की ज्याप्रमाणे साखर कारखान्यांना मदतीचे पॅकेज जाहीर केले त्याचप्रमाणे या लिफ्ट इरिगेशन सोसायटयांना मदतीचे पॅकेज शासनाने जाहीर करावे. पाणी पुरवठा करणाऱ्या सोसायटयांना पॅकेज देण्यात यावे ते पॅकेज दिल्याने शेतकऱ्याला पाणी मिळेल आणि योजनाही सुरु होतील त्यातून शेतीला पाणी मिळेल आणि शेतकऱ्याची क्रयशक्ती वाढण्यास मदत होईल. याचा सरकारने जरुर विचार करावा. माझी शेवटची मागणी अशी आहे की सरकारने यासंदर्भात जी मुदत दिलेली आहे ती 31.3.2001 पर्यंतची आहे ती मुदत दोन वर्षांनी वाढवून द्यावी. म्हणजे 31.3.2003 पर्यंत वन टाईम सेटलमेंट करण्यासाठी अर्ज स्वीकारण्याची मुदत वाढवून द्यावी. त्यामुळे बऱ्याच शेतकऱ्यांना त्याचा फायदा होईल आणि कर्जाची खाती बंद होतील. आमचे नेते आदरणीय श्री. शरद पवार साहेब यांनी शेतकऱ्यांना पतपुरवठा वाढविण्याचा निर्णय घेतलेला आहे. अनेक शेतकऱ्यांना जी काही सबसिडी मिळते मग ती राज्य सहकारी बँकेच्या माध्यमातून असो किंवा एनएचबी च्या माध्यमातून असो किंवा एचएच च्या माध्यमातून असो यातून शेतकऱ्यांना फार मोठा दिलासा मिळणार आहे. ही जी कर्ज प्रकरणे आहेत त्यासाठी ग्रास्टीक निर्णय घेतल्याशिवाय यावर तोडगा निघणार नाही. नाही तर त्यातून शेतकऱ्यांच्या अडचणी वाढतच राहतील. या चर्चेच्या निमित्ताने शेतकऱ्यांना पेन्शन देण्याचा विषय माननीय सदस्य सर्वश्री यशवंतराव गडाख आणि जयंत प्र.पाटील यांनी मांडला त्याला सुध्दा माझा पूर्ण पाठिंबा आहे. Those who are not pensioners अशा 65 वर्षे वयावरील शेतकऱ्यांना पेन्शन चालू करणे गरजेचे आहे. त्यातून सोशन सिक्युरिटी बेनिफिट मिळू शकेल. निसर्गावर अवलंबून असणारी आपली शेती आणि त्याच्यातून निर्माण होणारा कर्जबाजारीपणा आणि बिघडलेली सामाजिक परिस्थिती सुधारण्यासाठी

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. वसंत पवार ...

सोशल सिक्युरिटीचा निश्चितपणे उपयोग होऊ शकेल. मी या चर्चेच्या निमित्ताने शासनाने शेती मालाला आधारभूत आणि रास्त किंमत मिळण्यासाठी प्रयत्न करावेत अशी विनंती करतो. नाशिक जिल्हयामध्ये कांद्याच्या प्रश्नावरुन आंदोलन झाले. देशात जेवढा कांदा पिकतो त्यातील 40 टक्के कांदा नाशिक जिल्हयामध्ये तयार होतो. सर्वसामान्य शेतकऱ्याचे कांदा हे प्रमुख पीक आहे. कांदा पिकवून शेतकरी वर्षभर रोजीरोटीची कमाई करतो. मी शासनाला विनंती करतो की कांदा उत्पादक प्रत्येक शेतकऱ्याला नुकसान भरपाई मिळणे गरजेचे आहे. यासंदर्भात शासन उद्या घोषणा करणार आहे असे समजते. जास्तीत जास्त 500 रु. आधारभूत किंमत धरुन कमी दराने कांदा विकला गेला असेल तर त्याला सबसिडी मिळावी व त्यामध्ये भ्रष्टाचार होऊ नये हे धोरण शासनाने उद्या सभागृहात जाहीर करावे. या प्रस्तावावर मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानतो आणि माझे भाषण संपवितो.

यानंतर श्री. खर्चे पी.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदया, नियम 260 अन्वये जी चर्चा या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी उपस्थित केलेली आहे त्या चर्चेत भाग घेण्यासाठी मी या ठिकाणी उभी आहे.

महोदया, सन्माननीय सदस्यांनी अत्यंत जिव्हाळयाच्या प्रश्नावर ही चर्चा उपस्थित केलेली आहे. खरे म्हणजे आपला भारत देश हा कृषिप्रधान देश म्हणून ओळखला जातो आणि या कृषिप्रधान देशातील अभिमानाने मिरवावे अशा प्रगतशील म्हणविणाऱ्या महाराष्ट्र राज्यात शेतकऱ्याची जी बिकट अवस्था झालेली आहे, कर्जाच्या विळख्यात तो शेतकरी आज सापडलेला आहे हे या राज्याला भूषणावह नाही. आज राज्यात अनेक शेतकरी गळयाला फास लावत आहेत. शेती करणे हे निव्वळ व्यवसाय नाही तर ती आपली जीवन पध्दती आहे असे समजणारा शेतकरी सर्वांच्या पोटाला अन्न देतो, शेतात काबाडकष्ट करतो आणि संपूर्ण जीवन त्या शेतीसाठी खर्ची घालतो, परंतु या शेतकऱ्याची आज काय अवस्था आहे ? त्या अवस्थेला कारणीभूत कोण आहे ? याचा कुठेतरी व केंव्हातरी विचार करावाच लागणार आहे. महाराष्ट्र राज्यातील विविध भागातील शेतकऱ्यांचा विचार केला तर अनेक संकटांनी या शेतकऱ्यांना घेरलेले दिसून येईल. मग कुठल्या भागात 2700 रुपये पर क्विंटल या भावाच्या आशेने लावलेल्या कापसाला शासनाच्या चुकीच्या धोरणामुळे 1200 ते 1400 रुप्येच भव मिळतो. कांदयाच्या बाबतीत काही महिन्यापूर्वी 2000 रुपये भाव असतांना देखील कांदयाच्या निर्यातीवर बंदी घालण्यात आली त्यामुळे कांदयाचे भाव घसरले व कांदा उत्पादक शेतकरी आत्महत्त्या करायला लागले. नुकतीच लासलगांव तालुक्यातील एका शेतकऱ्याच्या 19 वर्षे वयाच्या मुलाने कर्जापोटी तसेच कांद्याचे उत्पादन न झाल्यामुळे वडिलांना बैलजोडी, जिच्या जिवावर आपण शेती करतो, आपल्या घरातील एक सदस्य म्हणून मानतो अशी बैलजोडी विकल्यामुळे व ते सहन न झाल्यामुळे त्या 19 वर्षे वयाच्या मुलाने आत्महत्त्या केल्याचे आपण वाचले. अशा प्रकारे अत्यंत विदारक अशी परिस्थिती आपल्या राज्यात निर्माण झालेली आहे. त्याचप्रमाणे द्राक्षाची निर्यात चीनमध्ये होऊ शकते पण त्यासाठी शासनाच्या स्तरावर निश्चित असे नियोजन नसल्यामुळे ते होऊ शकत नाही. कोंकणात मागील वर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे आंबा पिकाचे नुकसान झाले होते व त्यासाठी शासनाने हेक्टरी 10 हजार रुप्ये एवढी मदत दिली होती परंतु ती मदत प्रत्यक्षात तेवढी न देता त्यात 40 टक्के एवढी कपात करण्यात आली आणि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे .....

अजूनही 70-75 टक्के लोकांना मदत मिळालीच नाही. आंब्याला हमी भाव देण्यात यावा, कोकणात आंबा संशोधन केंद्राची उभारणी करण्यात यावी अशा प्रकारची चर्चा अनेक वेळा या सभागृहात झालेली आहे परंतु शासन त्याबाबतीत उदासीन आहे असे मला वाटते. शेतकऱ्यांनी आत्महत्त्या केल्या व त्यासंबंधी जे पंचनामे केलेले आहेत त्यामध्ये मयत व्यक्तीची कौटुंबिक भांडणे, व्यसनाधिनता अशा प्रकारची वैयक्तिक कारणे दिलेली आहेत व त्यामुळे आत्महत्त्या होत आहेत असे म्हटलेले असते. अश प्रकारचे खोटे पंचनामे केले जातात व त्याची दखल उच्च न्यायालयाने सुध्दा ताशेरे ओढलेले आहेत आणि त्यामध्ये विजेचे भारनियमन, वीज कनेक्शन न मिळणे, मुलाचे शिक्षण, मुलीचे लग्न इ. बाबीसाठी कर्ज काढावे लागते आणि शेतातच काही उत्पन्न निघाले नसेल, शेताला पाणी नसेल, वीज कनेक्शन नसेल तर उत्पादन कोठून काढावयाचे.

यानंतर श्री. भारवि .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे...

त्यामुळे प्रत्येक गोष्टीसाठी कर्ज काढावे लागत आहे. ॲड.निर्मलकुमार सुर्यवंशी यांनी फार सुंदर लेख लिहिला आहे. त्यात त्यांनी शेतकऱ्यांच्या आत्महत्येवर प्रकाश टाकला आहे. शिखर सहकारी बँक कृषि कर्जाची रक्कम प्रथम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडे 7 टक्के दराने हस्तांरित करते. जिल्हा बँक प्राथमिक संस्थेकडे ती रक्कम 8.25 टक्के दराने हस्तांतरित करते व प्राथमिक संस्था 11.25 टक्के दराने ती रक्कम कर्ज म्हणून शेतकऱ्यांकडे हस्तांतरित करते. अशा तऱ्हेने शिखर बँकेने 7 टक्के दराने दिलेले कर्ज शेतकऱ्यांच्या हाती येईपर्यंत त्यात 4.25 टक्के दराची वाढ होते. जिल्हा बँक व प्राथमिक संस्थांच्या नफ्याचा भूर्दंड शेतकऱ्याला भरावा लागतो. या भूर्दंडाच्या रकमेतून बँकेच्या संचालकांची मौजमस्तीची सोय केली जाते. खरे म्हणजे आज खाजगी सावकारांपेक्षाही सहकारी बँक व संस्था अधिक क्रूरतेने कर्जवसुली करून 60 टक्क्यांवर वसुली करीत आहे. राज्यात सुका, ओला दुष्काळ पडल्यामुळे शेतकऱ्यांवर संकट येते. परंतु, शेतकऱ्यांचे आपत्तीकालापासून रक्षण करण्यासाठी आपल्याकडे एकही कायदा नाही, याचासुध्दा शासनाने विचार केला पाहिजे. या चर्चेद्वारे अनेक सन्माननीय सदस्यांनी शेतकऱ्याच्या मुलींच्या विवाहाच्या प्रश्नालासुध्दा स्पर्श केला आहे. हुंडा देणे आणि घेणे यास कायद्याने बंदी असली तरी देखील वर दक्षिणा म्हणून फ्लॅट किंवा गाडीची मागणी मुलीकडे करण्यात येते. त्यासाठी देखील शेतकऱ्याला कर्ज काढावे लागते. यावर उपाय म्हणून सामुहिक विवाहाला चालना मिळावी म्हणून यंदाच्या अर्थसंकल्पामध्ये काही प्रमाणात निधीची तरतूद करण्यात आली आहे. गरीब शेतकऱ्यांच्या मुलींच्या सामुहिक विवाहा भरविण्यासाठी वेगवेगळया स्वयंसेवी संस्थांना मदत केली तर या संकटातून शेतकऱ्यांची मुक्तता होऊ शकते. शेतकऱ्यांच्या सोयीसाठी डिपार्टमेंट स्टेअर्स उघडून त्यात बी-बियाणे, कीटकनाशके, एवढेच नव्हे तर जीवनावश्यक वस्तू म्हणजे तेल, धान्य वगैरे ठेवल्या पाहिजेत. वेगवेगळया सुविधा शेतकऱ्याला पुरविल्या तर शेतकरी सावकाराच्या दारात जाऊ शकणार नाही. ग्रामीण भागात कृषि व फळांवर प्रक्रिया करणारे उद्योग उभारण्यासाठी फार मोठया प्रमाणावर मदत केली पाहिजे. त्याच बरोबर जलसंवधर्नाला प्राधान्य दिले पाहिजे. तसेच वन टाईम सेटलमेंटचा गांभीर्याने विचार केला पाहिजे. सदर योजना सोपी कशाप्रकारे करता येईल व तिचा

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे...

लाभ जास्तीत जास्त शेतकऱ्यांना कशाप्रकारे देता येईल याचा विचार शासनाने केला पाहिजे. एक महिन्यापूर्वी गारपीट झाली. त्यात संत्रा व द्राक्ष बागायतदार शेतकऱ्यांचे तसेच कोकणात आंबा उत्पादक शेतकऱ्यांचे फार मोठया प्रमाणावर नुकसान झाले. तसेच काही भागामध्ये ज्यांनी पीक काढून शेतामध्ये ठेवले होते, अशा शेतकऱ्यांच्या पिकाचे देखील नुकसान झाले आहे.

यानंतर श्री.बोर्डे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती कांता नलावडे....

मग त्यामध्ये तांदूळ असेल, गहू असेल, ज्वारी असेल या पिकांचे मोठया प्रमाणावर नुकसान झालेले आहे. वादळामुळे शेतकऱ्यांच्या घरांचे सुध्दा नुकसान झालेले आहे. अशा परिस्थितीत शासनाकडून योग्य प्रकारे सर्व्हे झाला पाहिजे. आज सर्व्हेचे काम तलाठयाकडे दिले जाते. अगोदरच तलाठयाकडे कामाचा मोठा व्याप आहे, शिवाय पुन्हा सर्व्हेचे काम त्याच्याकडे सोपविले जाते. त्यामुळे त्याच्याकडून वेळेत सर्व्हे आणि पंचनामे होत नाहीत, म्हणून सर्व्हे आणि पंचनामे करण्याबाबत शासनाने स्वतंत्र व्यवस्था निर्माण केली पाहिजे अशी या चर्चेच्या माध्यमातून मला सरकारला सूचना करावयाची आहे.

महोदया, आदिवासी भागाबाबत या ठिकाणी कधीच विचार केला जात नाही. या भागातील आदिवासी शेतकरी जे उत्पादन घेतो, त्या उत्पादनाला बाजारपेठ उपलब्ध करुन देण्याबाबत आपण कधी विचार करतो काय ? असा विचार केला जात नाही, म्हणून आदिवासी शेतकऱ्यांच्या दृष्टिकोनातून सुध्दा विचार करणे गरजेचे आहे. या सभागृहातील सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते राज्यामध्ये शेतकऱ्यांच्या दररोज होत असलेल्या आत्महत्येसंदर्भातील बाब वारंवार सदनाच्या निदर्शनास आणून देत आहेत. वास्तविक ही खंत वाटणारी अशी गोष्ट आहे. या निमित्ताने माझी शासनाला विनंती आहे की, आत्महत्येच्या प्रश्नामध्ये राजकारण न आणता, सर्वानुमते विचार केला पाहिजे. या आत्महत्या रोखण्यासाठी सर्वपक्षीय "स्टडी ग्रुप" स्थापन केला पाहिजे. असे केले तरच निरपेक्ष भावनेने खरोखरच शेतकऱ्यांना न्याय मिळावा आणि शेतकऱ्यांना आज ज्या संकटांना सामोरे जावे लागत आहे, ती संकटे पुन्हा येणार नाहीत याबाबत विचार करणे आवश्यक आहे. या शेतकऱ्यांच्या आयुष्याचा विचार करीत असताना ज्या मागण्या मी या चर्चेच्या माध्यमातून शासनाकडे केलेल्या आहेत त्या मागण्यांचा शासनाने गांभीर्याने विचार करावा एवढीच या निमित्ताने विनंती करते. सभापती महोदया, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपलेही आभार मानते व माझे भाषण पूर्ण करते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धोंडीराम राठोड (नामनियुक्त) : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य सर्वश्री रणजितसिंह मोहिते पाटील, यशवंतराव गडाख आणि इतर वि.प.स. यांनी म.वि.प. नियम 260 अन्वये जी चर्चा उपस्थित केलेली आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदया, निसर्गावर अवलंबून असलेल्या या शेतकऱ्याला नेहमी अतिवृष्टी, दुष्काळ, गारपीट, लाल्या रोग, करप्या रोग अशा विविध समस्यांना तोंड देत-देत शेती करावी लागते. त्यामुळे शेती करीत असताना त्याच्यासमोर वारंवार अडचणी येतात. त्या अडचणींबाबत आपण सभागृहात वारंवार चर्चा देखील केलेली आहे. शेतकऱ्यांचे प्रश्न कायमस्वरुपी सुटले पाहिजेत, अशी सर्वांची इच्छा असताना सुध्दा शेतकऱ्यांचे प्रश्न अद्याप पर्यंत सुटलेले नाहीत, असे नाईलाजाने म्हणावे लागत आहे. आज शेतकऱ्यांची व्याज भरण्याची आणि कर्जाची परतफेड करण्याची क्रयशक्ती संपलेली आहे असे आपल्याला म्हणावे लागत आहे. राज्यात शेतकऱ्यांच्या होत असलेल्या आत्महत्यांबाबत आपण नेहमीच बोलत असतो. शेतकऱ्यांनी अधिक व्याज दराने कर्ज घेतले असल्यामुळे, शिवाय नापिकी आणि अनेक अरिष्टे येत असल्यामुळे शेतकऱ्यांवरील कर्जाचा बोजा दिवसेंदिवस वाढत आहे.

महोदया, मला एका गोष्टीचा आनंद आणि अभिमान वाटतो की, दिनांक 7 जानेवारी, 2006 रोजी मंठा येथे माननीय मुख्यमंत्री महोदय शेतकऱ्यांच्या मेळाव्याला आले असताना, त्यांनी पुढील खरीप हंगामापासून शेतकऱ्यांना 6 टक्के व्याज दराने कर्ज उपलब्ध करुन दिले जाईल अशा प्रकारची घोषणा केली होती. याबद्दल मी खरोखरच शासनाचे अभिनंदन करतो.

नंतर श्री.कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धोंडीराम राठोड ....

सभापती महोदय, पुढील खरीप हंगामामध्ये शेतकऱ्यांना कमी व्याज दराने कर्ज दिले जाईल, अशी घोषणा माननीय मुख्यमंत्र्यांनी माझ्या गावामध्ये केली होती. त्यावेळी शेतकऱ्यांना कमी व्याज दरामध्ये कर्ज सवलत देण्याबाबत मी प्रश्न उपस्थित केला होता. सभापती महोदय, मी भाग्यवान आहे की, या संदर्भातील निर्णय माझ्या मंठा या गावामध्ये झाला. त्या संदर्भातील अंमलबजावणी खरीप हंगामापासून करणार होते आणि ती अंमलबजावणी निश्चितपणाने झाली आहे. आताच सन्माननीय सदस्य श्री. यशवंतराव गडाख साहेबांनी सांगितले की, एकापेक्षा जास्त शेतकरी ठेकदार झालेला आहे आणि ही वस्तुस्थिती आहे. याचे कारण असे आहे की, अनेक योजना जाहीर होतात, परंतु त्यांची अंमलबजावणी काही होत नाही. सभापती महोदय, या ठिकाणी माननीय सहकार राज्यमंत्री देखील बसलेले आहेत. तरी, त्यांनी याकडे जरुर लक्ष द्यावे. सभापती महोदय, शेतकऱ्याला कर्जामध्ये सवलत दिली जाते, कर्जाचे रुपांतर केले जाते, त्यानंतर फेर रुपांतर केले जाते. सभापती महोदय, हे सर्व कागदावरच असते, शेतकऱ्याला त्याची काहीही माहिती नसते. सभापती महोदय, कर्ज किती होते, रुपांतर कितीचे झाले, फेर रुपांतर कितीचे झाले या संदर्भात फक्त गटसचिव, चेअरमन हेच सांगू शकतात. शेतकऱ्याला मात्र याबाबतची काहीएक कल्पना नसते. येथे माननीय मंत्रीमहोदय डॉ. राजेंद्र शिंगणे देखील बसले आहेत, ते देखील चेअरमन आहेत. त्यांनाही या गोष्टी माहिती आहेत. सभापती महोदय, या गोष्टी सगळ्यांनाच माहिती आहेत. परंतु या संदर्भातील योजना शेतकऱ्याला आजिबात माहिती नसतात. 30 टक्के शेतकरी असे आहेत की, ज्यांना माहिती असते की, त्यांच्यावर किती कर्ज आहे, त्याने किती भरले आहे व किती भरावयाचे आहे आणि 70 टक्के लोक असे आहेत की, त्यांना रुपांतर म्हणजे काय, फेर रुपांतर म्हणजे काय हे माहित नसते. त्या शेतकऱ्यांना आपल्या नावावर किती आकडे लावले आहेत, हे देखील माहित नसते आणि अशाप्रकारे त्यांच्या डोक्यावर कर्जाचे डोंगरच्या डोंगर तयार होतात. आपण फक्त योजना जाहीर करतो. सन्माननीय सदस्या श्रीमती कांता नलावडे यांनी देखील या ठिकाणी असे सांगितले आहे की, आपण या ठिकाणी प्रत्येक पिकाच्या नापिकीवर चर्चा करतो. आंब्याचे, मोसंबीचे, संत्र्यांचे, द्राक्षांचे, कांद्यांचे नुकसान झालेले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धोंडीराम राठोड ....

आहे. कापसावर देखील लाल्या रोग पडला आहे. अशा प्रत्येक विषयांवर आपण बोलत असतो. शेतकऱ्याला या अरिष्टातून बाहेर काढण्यासाठी शासनाला प्रभावी अशा योजना करणे अतिशय गरजेचे आहे. सभापती महोदय, त्या योजना फक्त कागदावरच राहू नयेत, प्रत्यक्षातही राबविल्या जाव्यात. सन्माननीय सदस्य श्री. यशवंतराव गडाख साहेबांनी या ठिकाणी असे सांगितले की, शेतकऱ्यांच्या मुलाला शिकण्यासाठी कर्ज मिळाले पाहिजे, मुलीच्या लग्नासाठी कर्ज मिळाले पाहिजे, वयोवृध्द शेतकऱ्याला पेन्शन मिळाली पाहिजे. सभापती महोदय, त्यांनी अत्यंत उपयुक्त अशा सूचना या ठिकाणी केल्या आहेत. या विषयावर इतर सन्माननीय सदस्यांनी देखील आपले मत व्यक्त केले आहेत. तरी, आपण या शेतकऱ्यांना तारणार आहात का ? त्यांना तारावयाचे असेल तर, त्या शेतकऱ्यांच्या मालाला रास्त किंमत मिळाली पाहिजे, त्याला वेळेवर जेवढे कर्ज पाहिजे असेल तेवढे मिळाले पाहिजे, तसेच त्याला कमी व्याज दराने देखील कर्ज मिळाले पाहिजे. या सर्व गोष्टींकडे शासनाने जास्त लक्ष देण्याची गरज आहे. सभापती महोदय, या प्रश्नांबरोबर शेतकऱ्यांचा आणखी एक महत्वाचा प्रश्न विजेसंदर्भात आहे. विजेच्या भारनियमनामुळे शेतकऱ्यांचे पीक घेण्यासंदर्भात मोठे नुकसान झाले आहे. अनेकांची पीके जळाली आहेत. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी सांगितले की, एक हजार झाडे तोडून टाकली आहेत. सभापती महोदय, अनेक शेतकऱ्यांना विजेच्या भारनियमनामुळे आपले बगीचे जळाले म्हणून झाडे तोडून टाकावी लागली आहेत आणि त्यामुळे शेतकऱ्यांचे बरेचसे नुकसान झाले आहे. तरी, याकडेही महाराष्ट्र शासनाने लक्ष दिले पाहिजे. सभापती महोदय, विजेचा आणि सिंचनाचा प्रश्न शेतकऱ्याला सतत भेडसावत आहे. तरी, शासनाने शेतकऱ्याला या संदर्भात दिलासा दिला पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री. शरद पाटील यांनी सांगितले की, कोटींमध्ये बुडविले तर चालते आणि शेकडा-हजारामध्ये शेतकऱ्यांनी बुडविले तर त्याच्या मालमत्तेवर जप्ती आणली जाते. परंतु मोठमोठे इंडिस्ट्रीअलीस्ट जेव्हा सबसिडी घेऊन कोटींच्या घरात कर्ज बुडवितात, त्यांच्यावर कारवाई होत नाही. सभापती महोदय, त्यांना कर्ज देण्यासाठी एका रात्रीमध्ये प्रपोजल मंजूर होते.

(यानंतर श्री. वि. खर्चे ..

अशुद्धीत प्रत / अशुद्धीसाठी नाही

श्री. धोंडीराम राठोड..

आमच्या शेतकऱ्यांना कर्ज देण्यास बँका तयार नसतात, शेतकऱ्यांना कर्ज द्यावेत अशा प्रकारचे निर्बंध शासनाने बँकावर घातलेले आहेत, शेतकऱ्यांना अमुक इतके टक्के कर्ज दिले पाहिजे असे बंधन बँकावर घालण्यात आलेले आहेत, तरी सुध्दा हया बँका शेतकऱ्यांना कर्ज देत नाहीत, कर्ज देण्यासंदर्भात काहीतरी अडचणी निर्माण करण्यात येतात, तुमच्या गावाची वसूली झालेली नाही. एखाद्या दुकानदाराची जर वसूली झालेली नसेल तर दुसऱ्या दुकानदाराला हया बँका कर्ज देत नाहीत काय ? एखाद्या उद्योजकाने जर कर्ज परत केले नाही तर दुसऱ्या उद्योजकाला कर्ज देण्यात येत नाही काय ? शेतकऱ्यांना कर्ज देण्यामध्ये या बँकाना काय अडचण आहे हे मला अजूनही कळलेले नाही. शेतकऱ्यांना पीक कर्ज दिले पाहिजे. बँकावर याबाबत काटोकोरपणे निर्बंध लादले पाहिजेत. शेती प्रधान देशामधील महाराष्ट्रातील आत्महत्या टाळावयाच्या असतील तर शासनाला कठोर अशा प्रकारची योजना अंमलात आणावी लागणार आहे. विशेषत: मला या निमित्ताने सांगावयाचे आहे की, कोरडवाहू शेतकऱ्यांकडे सहानुभूतीने पाहण्याचा दृष्टीकोन सरकारचा असावयास पाहिजे. कोरडवाहू शेतकऱ्यांना व्याजामध्ये सवलत दिली पाहिजे. कोरडवाहू शेतकऱ्यांना देखील हया सर्व सवलती मिळावयास पाहिजे, यासंदर्भातील धोरण शासनाने जाहीर करावयास पाहिजे, एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो..

.....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर्नल सुधीर सावंत (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री. यशवंतराव गडाख व इतर सदस्यांनी नियम 260 अन्वये जो प्रस्ताव आणलेला आहे, त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, अतिशय महत्वाच्या वेळी ही चर्चा या सभागृहात उपस्थित करण्यात आलेली आहे असे मला वाटते, आपला देश हा शेतीप्रधान देश आहे, शेतीप्रधान देशामध्ये सन 1991 पासून जागतिकीकरण व उदारीकरणाचे धोरण अवलंबविण्यात आलेले आहे. यामुळे उद्योग क्षेत्रामध्ये याचा वापर मोठया प्रमाणात झालेला आहे जगाच्या पाठीवर स्पर्धा करण्यासाठी आपले उद्योग सक्षम झाले पाहिजे, याकडे शासन लक्ष देत आहे, परंतु शेती क्षेत्रामध्ये असे झाल्याचे म्हणता येत नाही. शेतकऱ्यांची अवस्था दिवसेंदिवस सुधारण्याऐवजी ती बिकट होत चालली आहे. आणि म्हणून या सर्व मूळांशी जाऊन चर्चा करण्याची आवश्यकता आहे, यावर सखोल चर्चा करुन शेती क्षेत्राला प्राधान्य देऊन उद्योग व सेवा क्षेत्राप्रमाणेच शेती क्षेत्राला सक्षम बनविण्यासाठी जगामध्ये स्पर्धा करण्याची क्षमता शेतीमध्ये निर्माण करण्याची आवश्यकता आहे. आज डब्ल्यूटीओच्या युगामध्ये शेतीवर चर्चा होत आहे. जगात जी प्रगतीशील राष्ट्रे आहेत त्यांच्याकडे शेतीला प्राधान्य दिले जात आहे. अमेरिकेमध्ये शेतीला 300 टक्के सबसिडी दिली जात आहे, युरोपमध्ये 500 टक्के सबसिडी शेतीला देण्यात येत आहे. अमेरिका आणि युरोप या देशामध्ये सबसिडीची स्पर्धा निर्माण झालेली आहे. अमेरिका युरोपवर सबसिडी कमी करण्यासाठी दबाव आणीत आहे. हिंदुस्थानामध्ये किती टक्के शेतकऱ्यांना सबसिडी दिली जाते. शेतकऱ्यांना सबसिडी दिल्याशिवाय आपण त्यांना जागतिकीकरणाच्या स्पर्धेत आणू शकणार नाही, आज हिंदुस्थानामध्ये दुध, फळे असोत, हे बाहेरील देशातून येऊ लागली आहेत, यामुळे या देशातील शेतकऱ्याचा माल त्यांच्या बाजारपेठेमध्ये सुध्दा विकला जाणार नाही अशा प्रकारची परिस्थिती निर्माण झालेली आहे. यासंदर्भात जगामध्ये अनेक राष्ट्र पयत्न करीत आहेत. या प्रमाणात हिंदुस्थानात काय करण्यात येत आहे हे फार महत्वाचे आहे. अनेक देशांमध्ये शेतकऱ्यांना बिनव्याजी कर्ज दिले जात आहे. या देशामध्ये मात्र शेतकऱ्यांना कर्ज देण्यामध्ये अडचणी निर्माण केल्या जात आहेत.

यानंतर श्री. सुंबरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर्नल सावंत ...

शेतकरी ते कर्ज घेईपर्यंत आणि त्याचा उपयोग करून शेतात पीक घेईपर्यंत फार काळ गेलेला असतो. त्यामुळे त्यातून जे उत्पन्न त्याला होते ते कर्ज फेडण्याइतपत होत नाही त्यामुळे मग शेतकरी आत्महत्येकडे वळतो. सभापती महोदया, आपला देश स्वतंत्र झाला तेव्हा महात्मा गांधींनी राज्यकर्त्यांना संदेश दिला होता की, तुम्ही जे काही कराल ते करताना प्रथमत: गरीब माणसाचे अश्रू पुसण्याचे काम करा. पण आज स्वातंत्र्यानंतर इतक्या वर्षांनी देखील शेतकरी आहे त्याच अवस्थेत राहिला असेल आणि आत्महत्या करीत असेल तर ती एक शोकांतिकाच आहे आणि ते एक फार मोठे अपयश आपल्या पदरात पडलेले आहे. त्यासाठी आपल्याला तातडीने यावर उपाय योजना करायला लागतील. त्यातील एक म्हणजे जी प्रॉडक्शन कॉस्ट आहे ती कमी करण्यासाठी आपल्याला जे जे काही लागेल ते पुरविण्यासाठी सरकारने पुढे आले पाहिजे. त्यातील पहिली गोष्ट म्हणजे कर्ज, निधी आणि गुंतवणूक. ज्याप्रमाणे औद्योगिक क्षेत्रामध्ये आणि सेवा क्षेत्रामध्ये आज प्रचंड गुंतवणूक होत आहे, परदेशातून देखील आपल्याकडे प्रचंड गुंतवणूक होत आहे त्याप्रमाणे शेती क्षेत्रामध्ये देखील प्रचंड गुंतवणूक होणे आवश्यक आहे. त्यासाठी पाहिजे तेवढ्या सवलती देणे सरकारचे काम आहे, सरकारची ती एक जबाबदारी आहे. शेतकऱ्यांना 6 टक्के दराने कर्ज उपलब्ध करून द्यावे अशी मागणी या प्रस्तावामध्ये करण्यात आलेली आहे पण मी तर याही पुढे जाऊन म्हणेन की, सरकारने शेतकऱ्यांना प्रसंगी बिनव्याजी कर्ज देण्यासही पुढे मागे पाहू नये. इतकेच नव्हे तर शेतकऱ्यांना खते, कीटकनाशके पुरविली गेली पाहिजेत. कमी किमतींमध्ये त्याला ती उपलब्ध करून दिली गेली पाहिजेत. आज आपण पाहतो की, आंब्यावर कीड पडते आणि पीक शेतकऱ्याच्या हातून निघून जाते. पण तरीही पेस्ट मॅनेजमेंटचा कार्यक्रम नाहीच. या विषयाकडे संपूर्णपणे सरकारचे दुर्लक्ष झालेले आहे. त्यामुळे अनेकदा पीक हाती येण्याच्या काळामध्ये कीटक नाशके वेळच्या वेळी फवारली न गेल्यामुळे शेतकऱ्याच्या हातून ते पीक गेलेले असते. तेव्हा खते, कीटकनाशके असतील, वा इतरही अनुषंगिक गोष्टी असतील त्यांचा अभ्यास होण्याची गरज आहे. शेतीतील ही इम्पूटस् आणि त्याच्या किंमती याकडे सरकारने लक्ष देण्याची गरज आहे. गेल्या पन्नास वर्षांच्या काळामध्ये सरकार किंवा बँकांचे धोरण असेल वा विद्यापीठे असतील, रिसर्च इन्स्टिट्यूटस् असतील, आयसीआय असेल, त्यांनी आतापर्यंत केवळ एकाच गोष्टीकडे आपले सर्व लक्ष केंद्रित केले आहे आणि ते म्हणजे उत्पादन वाढविण्याकडे. अर्थात ही एक चांगली गोष्ट आहे.

..... 4आर 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर्नल सावंत .....

त्यामुळे देशात हरित क्रांती आली. त्यामुळे काही भागातील शेतकरी सधन झाले. हे आपल्याला केव्हाही नाकारता येणार नाही. आपल्या शेतकऱ्यांनी मनगटाच्या जोरावर हे सर्व केलेले आहे यात शंका नाही. हे सारे या देशाला पोषकच आहे. तरीही आता काळ बदलला आहे, बदलतो आहे हे आपण लक्षात घेतले पाहिजे. आता डब्ल्यूटीओच्या काळामध्ये आपण मार्केटिंगवर जास्त लक्ष दिले पाहिजे. त्या अनुषंगाने संशोधन करून, विद्यापीठांमध्ये त्या दृष्टीने अभ्यासक्रम आणून, त्यासाठी आवश्यक त्या शैक्षणिक सोयी-सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. आज 21 व्या शतकामध्ये सर्व जगभर मार्केटवर कब्जा करण्यामध्ये स्पर्धा सुरू आहे. त्यामुळे 'पणन' हे सर्वात मोठे सूत्र धरून आपण पुढे जाणे आवश्यक आहे असे मला वाटते आणि त्या दृष्टीने आपण अधिक कार्य केले पाहिजे. गेल्या 7-8 वर्षामध्ये प्रयत्न करूनही महाराष्ट्राचे पणन मंडळ हलत नाही. त्यामुळेच शेतकऱ्यांना कांदा फेकावा लागला. काही वेळा तर मार्केटमध्ये कांदाच नसतो. सभापती महोदया, मी अनेक सभा सम्मेलनांमधून भाषणे ऐकली आहेत. मोठमोठ्या नेत्यांनी उदाहरणे देऊन शेतकऱ्यांनी काय लागवड केली पाहिजे काय नाही याचे ज्ञान शेतकऱ्यांना देण्याची आवश्यकता आहे हे मी गेल्या 10-15 वर्षे ऐकत आहे. परंतु त्याप्रमाणे प्रत्यक्षात अमलबजावणी होत नाही. शेतकऱ्यांकडे कॉम्प्युटर आला पाहिजे, कॉम्प्युटरवरून त्याने माहिती मिळविली पाहिजे असे म्हटले जाते पण ते सर्व कागदावर राहते आणि शेतकऱ्यांपर्यंत प्रत्यक्षात ते काहीच येत नाही, पोहोचत नाही. ..

(यानंतर श्री. खंदारे ..... 4एस 1 ..

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

कर्नल सुधीर सावंत....

आणि म्हणून प्रकर्षाने गरज आहे ती म्हणजे आजच्या काळामध्ये किती टक्के पीक, कोणते पीक शेतक-याने करावे अशी शास्त्रशुध्द यंत्रणा सरकारने उभी करणे आवश्यक आहे. बाजारामध्ये दर काय आहेत त्याची माहिती ठेवणे आवश्यक आहे. गोडाऊन, कोल्ड स्टोरेज तो आपला माल ठेवू शकतो आणि नंतर योग्य भाव येईल तेव्हा विकू शकतो अशी व्यवस्था करणे आवश्यक आहे. आज आंब्याला मुंबईमध्ये 300 रुपये डझन असा भाव मिळतो, परंतु आंबा उत्पादक शेतक-यांना 50 रुपये सुध्दा भाव मिळत नाही. हे पणन महामंडळ आहे ते दलाल मंडळ आहे की काय हे मला कळत नाही. आम्ही अनेक वर्षापासून मागणी करुन सुध्दा शासनाकडून काही हालचाल होत नाही. गेल्या वर्षी आम्ही जपानच्या पंतप्रधानांना आणि भावी पंतप्रधानांना भेटलो होतो. त्यावेळी काय काय केले पाहिजे याबाबतची चर्चा झाली. आम्ही त्यांना म्हटले होते की, जपानमध्ये आंब्यावर जो बॅन आहे तो उठविला पाहिजे. त्यानंतर भावी पंतप्रधानांकडून मला पत्र आले की, आम्ही आंब्यावरील बॅन उठविला आहे. अमेरिकेने आंब्यावरील बॅन उठविला आहे. परंतु पणन मंडळाने हा बॅन उठविलेला नाही. आज उत्तर प्रदेशातील आंबा चीनमध्ये जातो, परंतु कोकणातील हापूस आंब्याला फळांचा राजा म्हणतो त्याला परेदशात पाठवू शकत नाही. आपण कोणत्या देशामध्ये हापूस आंबा पाठवितो तर बहरीन, यु.ए.इ. या देशामध्ये आंबा पाठवितो जेथे आपला आंबा बदनाम झाला आहे. परंतु अन्य देशांमध्ये हापूस आंबा पाठविण्यास निर्बंध आहेत. या पणन मंडळाने निर्यातीसाठी आतापर्यंत काय केले आहे ते सांगावे. जागतिक बाजारपेठेचा अभ्यास केला पाहिजे. आज आपल्या फळफळावळीला जगाच्या बाजारपेठेमध्ये स्थान नाही. कोकणातील हापूस आंब्याला मुंबईशिवाय बाजारपेठ नाही, हया पणन मंडळाने दलालीचे काम बंद करावे आणि शेतक-यांच्या हितासाठी काम करावे आणि तशी मानसिकता तयार करावी. हा प्रश्न बरेच दिवस मांडूनही काही होत नाही म्हणून मला खेदाने म्हणावे लागत आहे. आज जी शासकीय यंत्रणा आहे ती दलालांची मक्तेदारी चालू राहण्यासाठी मदत करीत आहे. ही मक्तेदारी बंद करण्यासाठी, शेतक-यांना न्याय देण्यासाठी कोणतेही काम करीत नाही. सिंधुदुर्ग व रत्नागिरी

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MAP/ KGS/

कर्नल सुधीर सावंत.....

जिल्हयात आंबा महोत्सवाच्या माध्यमातून आंबा डायरेक्ट मार्केटमध्ये गेला परंतु हा प्रयोगही पण मंडळाने मोडून काढला. ही परिस्थिती असेल तर आमच्या शेतक-यांना भवितव्य नाही आणि शेतक-यांना आत्महत्या करण्याशिवाय दुसरा पर्याय नाही अशी परिस्थिती निर्माण होत आहे. म्हणून इम्पूट कॉस्ट सुधारुन आणि बाजारपेठेमध्ये कोणत्या प्रकारचे पीक घेतले पाहिजे, कोणत्या बाजारपेठेमध्ये गेले पाहिजे अशाप्रकारची व्यवस्था निर्माण केली पाहिजे. शेतक-यांना स्वत:ला निर्णय घेऊ द्या. आंब्यासाठी एक बॅक वॉर्ड झोन जाहीर केला होता, पण त्या झोनमध्ये आंब्याची एक पेटीही शेतक-याची गेली नाही. आज कोणालाही विश्वासात घेण्याचा प्रयत्न केला जात नाही. महामँगो बंद आहे. काजूवर प्रक्रिया उद्योग सुरु होत नाहीत, त्यामुळे येथील काजू केरळ, गोवा व कर्नाटकात जात आहे. हे काजू खरेदी करण्यासाठी शेतक-यांकडे क्रय शक्ती नाही, हा काजू दोन महिन्यापूर्वी खरेदी करुन ठेवावा लागतो. पण एवढी वर्षे मागणी करुनही पणन मंडळाकडून व शासनाकडून प्रतिसाद मिळत नाही. म्हणून सरकारने पुढील काळामध्ये बाजारपेठेवर लक्ष केंद्रित केले पाहिजे, कोणता माल कोठे पाठवू शकतो याचा अभ्यास केला पाहिजे, बाजारपेठेसाठी लिंकेजिस निर्माण केल्या पाहिजेत, कोल्ड स्टोअरेज, गोडाऊन्स अशी चेन निर्माण केली पाहिजे. पॅकेजिंगवर शासनाने लक्ष देणे आवश्यक आहे, आज संत्रा, काजू, केळी यासारख्या फळांसाठी इंडियन इन्स्टिटयूट ऑफ पॅकेजिंग नावाची संस्था उभी आहे. या पणन मंडळाने एकदा तरी या संस्थेला पाचारण केले आहे काय ? आमच्या फळांसाठी पॅकेजिंगची व्यवस्था करावी तसे निर्देश दिले आहेत काय ?

नंतर श्री.किल्लेदार.....

अशुधारित प्रत / शोधनीसाठी नाही

कर्नल सुधीर सावंत (पुढे सुरु...

केंद्र सरकारची आफेडा नावाची एक संस्था आहे. ही संस्था फार्मिंग मॅनेजमेंटसाठी प्रचंड पैसे राज्य सरकारला देते. काजू मार्केट स्टडीकरिता व त्याची निर्यात वाढविण्यासाठी केरळ राज्याला 1 कोटी रुपये गेल्यावर्षी दिलेले आहेत. पण महाराष्ट्राला आफेडा संस्थेने मार्केट स्टडीसाठी शेतकऱ्यांच्या संघटनांना किती अनुदान मिळवून दिलेले आहे, हे पाहिले तर अजूनपर्यन्त एकही पैसा मिळवून दिलेला नाही, ही शोकांतिका मी मुद्दाम मांडलेली आहे. मार्केटचा पूर्ण अभ्यास केला पाहिजे. तसे महाराष्ट्रामध्ये घडत नाही. आपल्याकडील शेतकरी जगाच्या पाठीवर कोठेही जाऊन स्पर्धा करु शकतात, परंतु त्यांना पैसा व मार्गदर्शन नसल्याने यश येत नाही, अपयश येते. कापसाच्या प्रश्नाच्या बाबतीतील प्रश्न आहे. पणन महामंडळाने यामध्ये कोणत्या पध्दतीने लक्ष घातलेले आहे? कापूस उत्पादकांसाठी कापूस एकाधिकार खरेदी योजना आहे. पणन महामंडळ शेतकऱ्यांना कितपत मदत करुन शेतकऱ्यांना स्पर्धेमध्ये उतरण्यासाठी सक्षम करतात, हे पाहिले तर पणन महामंडळाने तसे काहीही केलेले नाही. दुसरी गोष्ट अशी की, राज्याच्या आणि केंद्राच्या योजना आहेत. त्यामध्ये समन्वय नाही. जिल्हापरिषदेमध्ये अणि कृषी खात्यामध्ये आणि आय.सी.आर. या कृषी क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या संस्थांचा कोणाचा मेळ कोणाला नाही. म्हणून माझी सूचना आहे की, जिल्हा स्तरावर आणि राज्याच्या स्तरावर समन्वय ठेवून सगळा कार्यक्रम एकत्र राबविणे गरजेचे आहे. महाराष्ट्रामध्ये अनेक संस्था आहेत. त्या पुढे येऊ शकतात. त्यांना काम देण्याची आवश्यकता आहे. लॅन्ड रिफॉर्मची पण आवश्यकता आहे. "कसेल त्याची जमीन", हे धोरण आपण राबविलेले आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्रामध्ये बरीच कामे झालेली आहेत. अपसेंटी लॅन्ड लॉर्ड इसमचे सत्र बंद केले पाहिजे. कोकणामधील, सिंधूदूर्ग जिल्ह्यातील 1 लाख हेक्टर जमीन लागवडीखाली नाही. त्याचे कारण सातबाराच्या उताऱ्यामध्ये 100 लोकांची नावे असतात. 99 लोक हे मुंबईमध्ये रहातात आणि एक माणूस कोकणामध्ये जमीन कसतो. त्यांच्या जमिनीची मालकी ही मुंबईतील लोकांची आहे, हे कोठेतरी बंद झाले पाहिजे. "कसेल त्याची जमीन" या तत्वावर नवीन कायदा यासाठी करावा किंवा कायदा बदलावा अशी माझी मागणी आहे.. कोकणामध्ये एखाद्याच्या नावावर 7 एकर जमीन असते पण ती 20 ठिकाणी विखुरलेली असते. पाणी त्या ठिकाणी असू शकते परंतु त्या पाण्याचा वापर शेती करण्याकरिता होत नाही. म्हणून लॅन्ड रिफॉर्म करण्याच्याबाबतीत शासनाने लक्ष धालण्याची गरज आहे. या संबंधाने मॉडेल ॲक्ट

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/

कर्नल सुधीर सावंत (पुढे सुरु...

बनवून त्याची अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. आजच्या या प्रस्तावरील सर्व गोष्टींचा विचार करुन शासनाने ॲग्रीकल्चर लॅन्डची मालकी रिफॉर्म करण्याची गरज आहे. त्यातील डब्ल्यूटीओ कार्यक्रमांचा अभ्यास करुन महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या मनगटातील ताकद वाढविली तर शेतकरी आत्महत्या करण्यास प्रवृत्त होणार नाही, आत्महत्या बंद होतील. एवढे बोलून माझे दोन शब्द संपवितो. धन्यवाद.

--

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/

श्री.जयप्रकाश दांडेगावकर (सहकार राज्यमंत्री) : सभापती महोदया, नियम 260 अन्वये सन्माननीय सदस्य श्री.रणजितसिंह मोहिते पाटील, सन्माननीय सदस्य श्री.यशवंतराव गडाख आणि इतर सन्माननीय सदस्यांनी शेतकऱ्यांच्या जिव्हाळयाच्या प्रश्नावर जो प्रस्ताव आज सभागृहात मांडलेला आहे, त्या प्रस्तावावर बोलतांना अनेक सन्माननी सदस्यांनी भाग घेऊन मौलिक मार्गदर्शन केले, त्याबद्दल सुरुवातीलाच मी सर्व सन्माननीय सदस्यांना धन्यवाद देतो.

ग्रामीण महाराष्ट्राचे अर्थकारण शेतीवर अवलंबून आहे. महाराष्ट्राचे राजकारण शेती आणि शेतकऱ्यांवर अवलंबून आहे. ही जाण ठेवून सरकार आपल्या पूर्ण शक्तीनिशी शेतकऱ्यांच्या पाठीशी आहे. दुर्दैवाने या सरकारने कारभार स्वीकारल्यापासून फेब्रुवारी आणि मार्च 2005 या महिन्यात राज्यामध्ये गारपिटी व अवेळी पाऊस झालेला आहे. त्याचप्रमाणे जुलै महिन्यामध्ये झालेल्या अतिवृष्टी आणि त्यानंतर पुन्हा आता झालेली गारपीटीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान झालेले आहे. त्यामुळे कापसावर रोग आला,परिणामी शेती मालाचे भाव कमी झालेले आहेत.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयप्रकाश दांडेगावकर .....

त्यानंतर जुलैमध्ये झालेली अतिवृष्टी आणि त्यानंतर पुन्हा आता झालेली गारपीट, कधी शेती मालाचे भाव कमी होणे, कधी कापसावर रोग येणे ही शेतकऱ्यांवरील आणि शेतीवरील संकटाची मालिका गेल्या वर्ष सव्वा वर्षात सुरु झालेली आहे. तरीही सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी संपूर्णपणे उभे राहून आपदग्रस्तांना पूर्णपणे मदत देऊन, नुकसानभरपाई देऊन त्यांना उभे करण्यासाठी गेल्या वर्ष सव्वावर्षापासून प्रयत्न करीत आहे. महाराष्ट्रामध्ये शेतकऱ्यांना सध्या सहकारी बँकांतून त्रिस्तरीय पध्दतीने कर्जपुरवठा केला जातो. राज्य बॅक, जिल्हा बँका आणि पतसंस्था यांच्या माध्यमातून कर्जपुरवठा केला जातो. या व्यतिरिक्त राष्ट्रीयकृत बँकांकडून कर्जपुरवठा केला जातो. पण या ठिकाणी असे नमूद करावेसे वाटते की, राष्ट्रीयकृत बँका दिलेल्या उद्दिष्टाइतका शेती पतपुरवठा करीत नाहीत. प्रसंगी काही दंड भरण्यास त्या बँका तयार होतात परंतु दिलेल्या उद्दिष्टाइतक्या प्रमाणामध्ये राष्ट्रीयकृत बँकांकडून पतपुरवठा होत नाही. त्याचबरोबर शेतकऱ्यांना सहाय्य व्हावे म्हणून नव्याने पतसंस्थांना सुध्दा शेती पतपुरवठा करण्याची परवानगी सरकारने दिली. सर्व सन्माननीय सदस्यांचा महत्वाचा मुद्दा शेतीचे कर्ज आणि त्यावरील व्याज हा होता. गेल्या चारपाच वर्षातील कर्जाची आकडेवारी पाहिली तर सन 2000-2001मध्ये 2843.14 कोटी रुपये एवढया रकमेचे शेतीचे कर्जवाटप महाराष्ट्रामध्ये झाले. त्यावेळी शेती कर्जाच्या बाबतीत 106 टक्के उद्दिष्ट प्राप्त केलेले आहे. सन 2001-02 मध्ये 3009.67 कोटी रुपयांचे एकूण कर्ज वाटप केलेले आहे. सन 2002-03 मध्ये 2633.91 कोटी रुपयांचे कर्ज वाटप झालेले आहे. सन 2003-04 मध्ये 2677.06 कोटी रुपयांचे कर्ज वाटप झालेले आहे. सन 2001-02 आणि 2003-04 या वर्षामध्ये ग्रामीण महाराष्ट्रामध्ये दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाल्यामुळे व्याजापोटी जवळजवळ 350 कोटी रुपये एवढया रकमेचा शेतकऱ्यांच्या व्याजाचा भरणा सरकारने केलेला आहे हे मला सभागृहाला सांगावेसे वाटते. पीक कर्ज वाटपामध्ये जिल्हा बँका आणि राष्ट्रीयकृत बँकांची आकडेवारी पाहिली तर त्यामध्ये जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचा मोठा वाटा आहे. एकूण सरासरी 60 टक्के कर्ज पतपुरवठा सहकारातून, जिल्हा बँकांकडून होतो हे या सभागृहाला सांगावेसे वाटते. सहकारी चळवळीमध्ये व्याजदर कमी करा अशी मागणी केली जाते. हे व्याज कमी करताना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयप्रकाश दांडेगावकर .....

ही त्रिस्तरीय पध्दत सुध्दा महाराष्ट्रामध्ये टिकली पाहिजे. ती पध्दत मोडून ग्रामीण भागापर्यंत कर्जपुरवठा होणार नाही. फक्त या त्रिस्तरीय पध्दतीमध्ये जे जादा स्लॅब होते ते कमी करण्याचा प्रयत्न शासन करीत आहे. सन्माननीय सदस्य श्री. यशवंतराव गडाख तसेच सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी त्यांच्या भाषणामध्ये उल्लेख केल्याप्रमाणे कमी व्याज दराने कर्ज पुरवठा करण्याच्या दृष्टीने दोन बैठका झाल्या. त्यामध्ये मूळ उद्देश हाच होता की, कमी व्याज दराने शेतकऱ्यांना कर्जपुरवठा कसा करता येईल आणि त्याचबरोबर....

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : माननीय उपमुख्यमंत्र्यांना एक निवेदन करावयाचे आहे. त्यांनी आपले निवेदन करावे.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ KGS/

पृ शी. : लॅक्मे फॅशन सप्ताहमधील वस्त्र घसरणीबाबत.

मु.शी. : लॅक्मे फॅशन सप्ताहमधील वस्त्र घसरणीबाबत माननीय उपमुख्यमंत्र्यांचे निवेदन.

श्री. आर. आर. पाटील (उपमुख्यमंत्री) : सभापती महोदया, काल माननीय सभापतींनी लॅक्मे फॅशन सप्ताहाच्या संदर्भात निवेदन करावयास सांगितले होते. त्याबाबत मी पुढील प्रमाणे निवेदन करीत आहे.

मुंबईमधील एन.सी.पी.ए. सभागृहामध्ये दिनांक 28.3.2006 ते दिनांक 1.4.2006 दरम्यान हिंदुस्थान लिव्हर लि. व इंटरनॅशनल मॅनेजमेंट ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने "लॅक्मे फॅशन" सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. सदर सप्ताहामध्ये 28 फॅशनेबल कपड्याच्या निर्मात्यांनी सहभागी होऊन एकूण 22 फॅशन शोमध्ये आपल्या निर्मित वस्त्रांचे 38 महिला मॉडेल व 6 पुरुष मॉडल यांच्याव्दारे प्रदर्शन केले. सदरच्या प्रदर्शनात मॉडेल श्रीमती कॅरॉल ग्रेशियस यांच्यासाठी बनविलेल्या ड्रेसचा वरील भाग घसरला व शरीराचा काही भाग उघडा पडला. तसेच आणखी एका शोमध्ये मॉडेल श्रीमती गौहर खान यांच्या ड्रेसच्या कमरेखालील मागील भागावरील चेन उघडली जाऊन शरीराचा काही भाग उघडा पडला. दोन्ही मॉडेल्सने प्रसंगावधान राखून कपडे अशा पध्दतीने सावरले की, शरीराचे उघडे पडलेले भाग झाकण्यात त्यांना यश आले.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. आर.आर.पाटील....)

याबाबत पोलिसांकडे कोणीही तक्रार केलेली नाही. तरीही विधिमंडळासमोर दिलेल्या आश्वासनाच्या आधारे घडलेल्या दुर्घटनेची प्राथमिक चौकशी मुंबई पोलीसचे गुन्हे शाखेतील पोलीस उप आयुक्त (अंमलबजावणी), डॉ. संजय अपरांती, यांनी केली आहे. या चौकशीमध्ये त्यांनी विविध अंगांनी विचारपूस करुन सत्य शोधन केले आहे त्यासाठी काही संबंधितांकडून प्राथमिक विचारपूस करण्यात आली आहे. काहींना प्रत्यक्ष बोलावून विचारपूस करण्यात आली. मॉडेल्स मुंबईत उपलब्ध नसल्याने त्यांच्याशी दूरध्वनीवरुन संभाषण करुन माहिती घेण्यात आली.

सक्षिप्त चौकशीचे प्राथमिक निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत :-

सदरच्या दुर्घटना जरी एका पाठोपाठ एक घडलेल्या असल्या तरी मॉडेल्स त्यांची वस्त्रे अत्यंत कमी वेळात, 40-45 सेकंदात घाईघाईने बदलतात त्यामुळे कधी कधी ड्रेस पूर्णपणे व्यवस्थित बसतही नाहीत असे चौकशीत निष्पन्न झाले असून घडलेल्या दुर्घटना हेतूपुरस्सर केलेल्या नसून ख-या अर्थाने ते अपघात आहेत कारण :-

अ) कॅरॉल ग्रेशियस या मॉडलचा जो ड्रेसचा वरील भाग घसरला तो सदरचे वस्त्र अंगावर खिळून राहाण्यासाठी पाठीकडील दोन हूक त्यांचे काजात व्यवस्थित न बसविल्या गेल्यामुळे व जॅकेट काढताना झालेल्या शरीराच्या हालचालीमुळे सटकले व वस्त्र घरंगळले. निव्वळ अपघात.

ब) मॉडल श्रीमती गौहर खान यांच्या ड्रेसच्या पार्श्वभागावरील चेन निघाल्याने तो उघडा पडला. हाही निव्वळ अपघातच होय.

या दोन्ही घटना चर्चा व संबंधितांच्या जाबजबाबांचा अभ्यास करुन उपायुक्तांनी निष्कर्षिल्या आहेत.

श्री. मधुकर चव्हाण : या सभागृहामध्ये यासंदर्भात मुद्दा उपस्थित झाल्यानंतर शासनाने याबाबत त्वरित चौकशी करुन निवेदन केले याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. परंतु विविध वाहिन्यांवरुन ते दृश्य पुन्हा पुन्हा दाखविले जात होते यासंदर्भात आपण इलेक्ट्रॉनिक्स मिडियाला जाणीव करुन देणार आहात काय ? इलेक्ट्रॉनिक्स मिडियाच्या अशा प्रकारच्या मानसिक विकृतीबद्दल शासनाने त्यांना लिहिले पाहिजे. हा सभ्य समाज आहे. याबाबतीत शासन काय करणार आहे ?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती : पुन्हा पुन्हा ते दृश्य दाखविले जात होते, ते योग्य नाही.

श्री. मधुकर चव्हाण : इलेक्ट्रानिक्स मिडियाने काय दाखवयाचे आणि काय दाखवायचे नाही याबाबत शासनाने त्यांना जाणीव करुन दिली पाहिजे.

श्री. आर.आर.पाटील : यासंदर्भात केन्द्र शासनाला अधिकार आहेत. अपघाताची दृश्ये दाखविण्याची आपल्याकडे प्रथा पडून गेलेली आहे.

श्री. मधुकर चव्हाण : या सभागृहाच्या काय भावना आहेत हे तरी त्यांना कळवावे.

श्री. आर.आर.पाटील : याबाबतीत केन्द्र शासनाच्या गाईड लाईन्स काय आहेत, त्यांना कोणते अधिकार आहेत हे मी पाहातो.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MAP/ KGS/ MHM/ पूर्वी श्री. बरवड

पृ.शी. : राज्यातील शेतकऱ्यांना शेतीसाठी 6 टक्के दराने कर्ज उपलब्ध करून देणे.

मु.शी. : राज्यातील शेतकऱ्यांना शेतीसाठी 6 टक्के दराने कर्ज उपलब्ध करून देण्याची आवश्यकता याबाबत सर्वश्री रणजितसिंह मोहिते-पाटील, यशवंतराव गडाख, डॉ.वसंत पवार, सर्वश्री जयंत प्र.पाटील, प्रतापसिंह मोहिते-पाटील, दिलीपराव देशमुख, नतिकोद्दिन खतीब, गुरूनाथ कुलकर्णी, सदाशिवराव पोळ, विलासराव शिंदे, प्रा.शरद पाटील, सर्वश्री धोंडीराम राठोड, संजय दत्त, श्रीमती सुधा जोशी, डॉ.एन.पी.हिराणी, सर्वश्री विनायकराव मेटे, चंद्रकांत रघुवंशी, सुरेशदादा देशमुख, वि.प.स. यांचा प्रस्ताव.

(चर्चा पुढे सुरु...)

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : राज्यातील शेतक-यांचा कर्जाचा बोजा कमी करण्यासाठी नाबार्डने त्यांच्या दिनांक 29.7.2004च्या परिपत्रकान्वयेक 4 योजना जाहीर केल्या होत्या. त्या योजनेमध्ये एकूण 14,32,335 शेतक-यांना 349354.89 लाख रु.चा लाभ मिळाला. त्याच प्रमाणे 2003-2004 च्या रब्बी हंगामात पीक कर्ज घेतलेल्या शेतक-यांना 372.47 कोटी एवढी व्याजाची भरपाई करुन दिलेली असून ही रक्कम त्या शेतक-यांच्या खात्यावर जमा करण्यात आलेली आहे. 2006-07 मध्ये ज्या शेतक-यांनी पीक कर्ज घेतले त्यांना कर्जावर 2 टक्के व्याजाची सवलत केन्द्रीय वित्त मंत्र्यांनी जाहीर केलेली आहे. त्याप्रमाणे शेतक-यांच्या पीक कर्जावर 2 टक्क्याप्रमाणे व्याजात सवलत देण्याच्या सूचना राज्य सरकारने जिल्हा सहकारी बँकांना दिलेल्या आहेत.

...नंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयप्रकाश दांडेगांवकर ...

त्याचप्रमाणे शेतकऱ्यांच्यावर असलेला पीक कर्जाचा बोजा कमी करण्यासाठी शासनाने 5.1.2006 पासून ओटीएस म्हणजे एक रकमी कर्जफेड योजनेला मान्यता दिलेली आहे. व्याजाच्या दराच्या बाबतीत माननीय सदस्य श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी अभ्यासपूर्वक विचार मांडलेले आहेत. हे व्याजदर कमी करताना वेगवेगळया विभागातील सगळया बॅकांशी विचार-विनिमय करणे आवश्यक आहे. दोन बँका सेक्शन 110 खाली आहेत 9 ते 20 बँका सेक्शन 11 खाली आहेत आणि काही बँका चांगल्या स्थितीत आहेत. एकरकमी व्याजाचा दर कमी करणारी योजना लागू केल्यावर बँका शेतकऱ्यांना कायमचा कर्ज पुरवठा बंद करतील अशी शक्यता आहे. म्हणून याबाबतीत योग्य पध्दतीने विचार करुन व्याजदर कशा प्रकारे कमी करता येईल याचा प्रयत्न करु. यासंदर्भात दोन बैठका घेतलेल्या आहेत अजूनही 1/2 बैठका घेऊन यावर तोडगा काढला जाईल. कमी व्याज दराने पतपुरवठा करण्यासाठी राज्य बँक,जिल्हा बँक आणि पतसंस्था या तीनही संस्थांशी विचार-विनिमय करुन त्यातून मार्ग काढला जाईल. बँकांचे प्रतिनिधी आणि शासन यांच्याबरोबर चर्चा करुन यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न करु. यासंदर्भात एक सबकमिटी सुध्दा नेमलेली आहे. दीर्घ मुदतीच्या कर्जाचे पुनरुज्जीवन करण्यासाठी केंद्र शासनाने वैद्यनाथन समिती नियुक्त केली होती त्या समितीच्या शिफारशी शासनाने स्वीकारल्या आहेत. या शिफारशी स्वीकारल्यानंतर पुन्हा एकदा प्रमुख संस्थांची बैठक घेऊन प्राथमिक संस्था सक्षम झाल्या पाहिजेत यादृष्टीने प्रयत्न करण्यात येतील. प्राथमिक संस्थांच्या ज्या अडचणी आहेत त्या दूर करण्यासाठी जिल्हा बॅका,राज्य सहकारी बँक आणि पतसंस्था यांच्या बरोबर चर्चा करुन निर्णय घेतला जाईल जेणेकरुन या संस्था चांगल्या प्रकारे कर्ज पुरवठा करु शकतील असा सरकारला विश्वास आहे. अनेकविध मुद्यांवर या चर्चेच्या अनुषंगाने उपाययोजना सुचविण्यात आल्या आहेत. माननीय सदस्य श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे ठेवी आणि शेअर यावरील व्याजदर आणि पीक कर्जावरील व्याजदर यासंदर्भात जे परिपत्रक काढले आहे ते चुकीचे आहे. ठेवी या पूर्वी ठेवून घेतलेल्या होत्या त्यावेळी व्याजाचा दर 11 ते 12 टक्के होता. पीक कर्जाप्रमाणे शेअर आणि ठेवी यावरील व्याजदर कमी करण्याचा सरकार जरुर विचार करील. आयकर हा विषय केंद्र शासनाच्या अखत्यारित आहे. परंतु मी माननीय सदस्यांच्या मताशी सहमत आहे. ज्या बँका नफा कमावत नाहीत आणि सेवाभावी वृत्तीने काम करतात त्यांच्यासाठी आयकराच्या जाचक अटी आहेत.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयप्रकाश दांडेगांवकर ...

याबाबतीत केंद्र शासनाशी राज्य शासन जरुर संपर्क साधून विचार करील. याबाबतीत सहकारी बँकांना काही सूट देता येते काय यादृष्टीने शासन प्रयत्न करणार आहे. ओटीएस या योजनेच्या बाबतीत 31.3.2000 पर्यंत मुदत आहे. अर्ज स्वीकारण्याची मुदत एक वषार्ची आहे. म्हणजे 2000 पर्यंत आहे. लास्ट कट ऑफ डेट 31.3.2000 पर्यंत आहे. ही मुदत पुढे वाढविण्यास काही हरकत नाही. परंतु बँकांशी विचार-विनिमय करुन निर्णय घ्यावा लागेल. त्याचा परिणाम बँकेच्या तोटयावर होऊ नये याची काळजी शासनाला घ्यावी लागणार आहे. राष्ट्रीयीकृत बँका त्यांच्या स्वत:च्या नफ्यातून ही योजना राबवीत आहेत. रिझर्व्ह बँकेच्या सहभागाने ही योजना सुरु आहे. जिल्हा मध्यवर्ती बँका आणि पतसंस्था यांना आपल्या नफ्त्यातून ॲडजेस्ट करणे अवघड आहे. मुदत पुढे वाढवून दिली तर केवळ घोषणा केल्यासारखे होईल. म्हणून बँका आणि पतसंस्था यांच्या अडचणींचा विचार करुन यातून मार्ग काढाणे सोईस्कर होईल. बँका अडचणीत येणार नसतील तर एखादे वर्ष या योजनेची मुदत वाढवून देण्यास सरकारला काही अडचण येणार नाही. बँकांशी विचार-विनिमय करुन याबाबतीत योग्य तो निर्णय घेतला जाईल.

यानंतर श्री. खर्चे पी.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयप्रकाश दांडेगांवकर .....

सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी देखील ओटीएसच्या मुद्दयाबाबत चर्चा केली विविध कार्यकारी सोसायटया सक्षम झाल्या पाहिजेत म्हणून मी आताच सांगितल्याप्रमाणे वैद्यनाथन् समितीच्या शिफारशी स्वीकारल्यानंतर हया सोसायटया सक्षम होतील यात शंका नाही. त्याचप्रमाणे आपल्या कामकाजामध्ये हया सोसायटयांनी सुधारणा करणेही अपेक्षित आहे. सन्माननीय सदस्य श्री. यशवंतराव गडाख यांनी 6 टक्के व्याज दराबाबत अंमलबजावणी झाली पाहिजे. शासन तसा धोरणात्मक निर्णय घेईल व येत्या 2006 च्या खरीप हंगामापासून हा निर्णय लागू करणार आहे व शेतकऱ्यांना सहा टक्के व्याजदराने कर्जाचा पुरवठा करण्यात येईल. वास्तविक यासंदर्भात केंद्रशासनाच्या गाईडलाईन्स येणे बाकी आहे तरी सुध्दा घोषणा केल्याप्रमाणे सन 2006 पासूनच हा निर्णय घेण्याबाबत शासन ठाम आहे. सन्माननीय सदस्यांनी यासंदर्भात ओटीएस. बाबती जी आकडेवारी दिली त्यामध्ये त्यांनी सांगितले की, फार कमी शेतकरी पात्र झाले. त्यानी सांगितले की, 2001 च्या योजनेमध्ये 26000 पैकी फक्त 496 शेतकरीच या योजनेसाठी पात्र ठरले तर सन 2003 मध्ये 23622 पैकी 28 शेतकरीच पात्र झाले. यासंदर्भात जे किचकट नियम आहे त्याबाबत नाबार्डबरोबर चर्चा करण्यात येईल व या चर्चेच्या वेळी नेहमी या विषयावर बोलणाऱ्या सन्माननीय सदस्यांना देखील बोलाविण्यात येईल व यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न केला जाईल. त्यानंतर सन्माननीय सदस्यांनी आर.बी.आय. च्या आदेशानुसार ओटीएसचे अधिकार जे मॅनेजमेंट बोर्डाला असतात ते आपण दिलेले नाहीत अथवा डी.डी.आर. ला दिलेले नाहीत यासंदर्भात मी मघाशी सांगितल्याप्रमाणे बँक अडचणीत जाऊ नये म्हणून हा निर्णय आपण घेतलेला नाही तसेच हे काम थांबू नये हा देखील यामागचा उद्देश आहे. जिराईत शेतकऱ्यांना पेन्शनच्या संदर्भात या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी मुद्दा उपस्थित केला त्याबाबतीत वित्तीय बोजा एकंदर किती येईल याबाबतची तपासणी करावी लागणार आहे. शेवटी शेतकऱ्याला आपण सांगितल्याप्रमाणे कुठल्याही प्रकारचे कव्हर नाही, सुरक्षितता नाही अथवा सुट्टी नाही म्हणून याबाबत सर्व संबंधितांबरोबर चर्चा करुन निर्णय घेण्यात येईल. सन्माननीय सदस्या डॉ. नीलम ताई यांनी चर्चेत भाग घेत असतांना राष्ट्रीयकृत बँका शेतीसाठी ठरवून दिलेल्या नॉर्म्सप्रमाणे कर्जपुरवठाकरीत नाहीत असा मुद्दा उपस्थित केला. त्याबाबत मला असे सांगावयाचे आहे की, रिझर्व्ह बँकेने जे उद्दिष्ट ठरवून दिलेले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयप्रकाश दांडेगांवकर .....

असते त्यापेक्षा जर कुठल्या राष्ट्रीयकृत बँका शेतीसाठी कर्जपुरवठा करीत नसतील तर त्याबाबत केंद्रशासनाकडे तक्रार करण्यात येईल व त्या तक्रारीचा पाठपुरावा सुध्दा करण्यात येईल. त्यानंतर प्रा. शरद पाटील यांनी थकबाकीचे प्रमूख कारण म्हणजे नैसर्गिक आपत्ती असा मुद्दा सांगितला. तसेच शेतीमालाचे भाव घसरणे हे देखील कारण आहे. कारण शेती ही अनेक गोष्टींशी निगडीत असते. थकबाकी केवळ व्याजाच्या दरामुळेच नव्हे तर अनेकविध कारणांमुळे राहते. त्यापैकी नैसर्गिक आपत्ती हे सुध्दा कारण असते. कारण सर्व करुन जर नैसर्गिक आपत्तीने फटका दिला तर उत्पन्नच येत नाही म्हणूनही थकबाकी राहू शकते. अशा वेळी शासनाने कर्जाचे पुनर्गठन करुन दिलेले आहे तर काही वेळा व्याजात माफी सुध्दा दिलेली आहे. विदर्भातील 6 जिल्हयांसाठी तर शासनाने आता पॅकेज दिले आहे. अशा प्रकारे वेळोवेळी जेवढी मदत करता येईल तेवढी मदत शेतकऱ्यांना शासनाने दिलेली आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती कांता नलावडे यांनी द्राक्ष निर्यातीच्या बाबतीत आणि कोकणामध्ये आंब्याला हेक्टरी 10 हजार रुपये जी मदत दिली ती सर्व शेतकऱ्यांना मिळालेली नाही, असे सांगितले. त्याबाबत मला असे सांगावयाचे आहे की, हेक्टरमधील सर्वच क्षेत्र बाधित असते असे नाही. अशा प्रकारे बाधित नसलेल्या क्षेत्राला मदत दिली नसेल म्हणून ती कमी मिळाली असे वाटले असावे.

महोदय, त्याचप्रमाणे सामूहिक विवाहाच्या बाबतीत एक चांगली सूचना या ठिकाणी करण्यात आलेली आहे.

यानंतर श्री. भारवि .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयप्रकाश दांडेगावकर...

विदर्भामध्ये सामुहिक विवाहाला प्रोत्साहन देण्यासाठी अर्थसंकल्पामध्ये तरतूद करण्यात आली आहे. सामुहिक विवाहाचा कार्यक्रम संपूर्ण महाराष्ट्रामध्ये लागू करण्याचा प्रयत्न करण्यात येईल. जो गरीब असतो त्याला विवाहाचा खर्च परवडत नाही अशांसाठी सामुहिक विवाहाचे आयोजन करण्यात येते. पण आता सामुहिक विवाह सोहळयाचा खर्च देखील प्रचंड प्रमाणावर वाढायला लागला आहे. लग्नाचे फोटो काढणे, व्हीडियो शुटींग करणे यामुळे खर्चामध्ये वाढ होत आहे. तेव्हा सार्वजनिक जीवनामध्ये काम करणाऱ्या लोकप्रतिनिधींनी याची नोंद घेतली पाहिजे. या योजनेचा जो मूळ उद्देश होता, त्यापासून आपण दूर जात आहोत काय याचा सुध्दा विचार केला पाहिजे. कोकणामध्ये काजू उद्योग सहकारी तत्त्वावर सुरू केल्यास त्यास शासन 1:9 याप्रमाणे भागभांडवल देईल. त्यामुळे कोकणातील काजू उत्पादकांची काळजी सरकारच्यावतीने घेतली जात आहे.

सन्माननीय सदस्य श्री.धोंडिराम राठोड यांनी 6 टक्के व्याज दराचा मुद्दा उपस्थित केला आहे. रुपांतर आणि फेर रुपांतर कागदावरच असते असे देखील त्यांनी सांगितले आहे. रुपांतर आणि फेर रुपांतर करतो त्यावेळी सभासदाची सही घेतलेली असते. गावातील सेक्रेटरी किंवा चेअरमान यांना 100-200 सभासद रुपांतर करायचे असतात. त्यांच्या विभागामध्ये तक्रार असेल तर जालना बँकेला आदेश देण्यात येतील. बँक कर्ज देत नाही असा देखील त्यांनी मुद्दा उपस्थित केला आहे. कुठली बँक कर्ज देत नाही असे जर स्पेसिफिकली सांगितले तर त्या बँकेवरसुध्दा शासनातर्फे कारवाई करण्यात येईल. कोरडवाहू शेतकऱ्यांचा प्रश्न अत्यंत गंभीर आहे, याची मला जाणीव आहे. कोरडवाहू शेतकऱ्यांना जलसंवर्धानाच्या माध्यमातून पाणी कसे उपलब्ध करून होईल, जिराईत शेतकऱ्याला पाणी कसे मिळेल यासाठी वॉटर मिशन अंतर्गत प्रयत्न करण्यात येत आहेत.

सन्माननीय सदस्य डॉ.वसंत पवार यांनी शेतीमालाला भाव कमी मिळत असल्याबद्दलचा मुद्दा उपस्थित केला आहे. मी मघाशी सांगितल्याप्रमाणे भाव पडणे हे प्रमुख कारण आहे. यासाठी आता पणन मंडळामार्फत कमोडिटी एक्सचेंज स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. यामुळे शेतकऱ्यांना सहा महिन्यातील भाव पहावयास मिळतील. त्याप्रमाणे मग त्याला पेरणी करता येईल. पणन मंडळाच्या पुढाकाराने ए.पी.एम.सी.मध्ये ही सोय उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयप्रकाश दांडेगावकर...

येथे अनेक सन्माननीय सदस्यांनी मौलिक सूचना केल्या आहेत. या सूचनांचा शासनस्तरावर जरूर विचार करण्यात येईल. अधिक काही न बोलता ज्या सन्माननीय सदस्यांनी या चर्चेमध्ये भाग घेतला आहे, त्यांचे मी आभार मानतो. येथे एका चांगल्या विषयावर चर्चा घडवून आणली आहे. शेतकऱ्यांचा मार्ग, जीवन सुकर व्हावे म्हणून ज्या चांगल्या सूचना सन्माननीय सदस्यांनी केलेल्या आहेत, त्या व्यवहारात आणण्याच्या दृष्टिकोनातून शासन जरून विचार करील. धन्यवाद.

तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी) : सभागृहाने प्रस्तावावर विचार केला आहे.

....

पृ.शी./मु.शी.: सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांची
अर्धा तास चर्चा पुढे ढकलण्याबाबत.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांची अर्धा-तास चर्चा कामकाज पत्रिकेवर पहिल्या क्रमांकावर दाखविण्यात आली आहे. सदर चर्चा पुढे ढकलण्यात यावी अशी मंत्रिमहोदयांनी माननीय सभापतींना विनंती केली होती. सदर विनंती माननीय सभापतींनी मान्य केल्यामुळे सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी आजची अर्धा तास चर्चा पुढे ढकलण्यात आलेली आहे. ती पुढील आठवडयात सोमवारच्या कामकाजामध्ये दाखविण्यात येईल. त्यामुळे आता सन्मानीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांची अर्धा-तास सूचना घेण्यात येईल.

यानंतर श्री.बोर्डे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अर्धा-तास चर्चा

पृ.शी.: राष्ट्रीय स्नेही शिक्षण संस्था, जुना सुभेदार, नागपूर द्वारा संचालित शाळेतील संचालक व व्यवस्थापनाने केलेला गैरव्यवहार.

मु.शी.: राष्ट्रीय स्नेही शिक्षण संस्था, जुना सुभेदार, नागपूर द्वारा संचालित शाळेतील संचालक व व्यवस्थापनाने केलेला गैरव्यवहार या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 12932 ला दिनांक 20 मार्च, 2006 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात श्री.रामनाथ मोते, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदया, "राष्ट्रीय स्नेही शिक्षण संस्था, जुना सुभेदार, नागपूर द्वारा संचालित शाळेतील संचालक व व्यवस्थापनाने केलेला गैरव्यवहार" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक 12932 ला दिनांक 20 मार्च, 2006 रोजी शासनाने दिलेल्या उत्तराच्या संदर्भात मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये ही अर्धा-तास चर्चा उपस्थित करीत आहे.

महोदया, हा प्रश्न सभागृहामध्ये चर्चेला न आल्यामुळे त्यावर चर्चा होऊ शकली नाही. या प्रश्नाला शासनाच्या वतीने जे उत्तर देण्यात आले होते ते समाधानकारक नव्हते. तसेच ते उत्तर दिशाभूल करणारे असल्यामुळे, ही अर्धा-तास चर्चा उपस्थित करावी लागलेली आहे.

महोदया, राष्ट्रीय स्नेही शिक्षण संस्थेच्या प्राथमिक आणि माध्यमिक शाळांच्या संदर्भातील हा प्रश्न आहे. या संस्थेच्या 3 प्राथमिक व दोन माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळा आहेत. या संस्थेच्या व्यवस्थापनाने प्रचंड प्रमाणावर गैरव्यवहार करुन, शासनाची फसवणूक व दिशाभूल केलेली आहे. या ठिकाणी केवळ इरेग्युलिटीच झालेली नसून, शासनाची फसवणूक सुध्दा करण्यात आलेली आहे. हा आरोप मी नव्हे तर शिक्षण खात्याच्या शिक्षण संचालकांनी केलेला आहे. शिक्षण संचालकांनी, उप संचालक आणि शिक्षणाधिकाऱ्यांच्या माध्यमातून या प्रकरणाची चौकशी केली व त्या आधारे त्यांनी निष्कर्ष काढलेले आहेत. त्यांनी जे विधान केलेले आहे आणि चौकशीअंती जे निष्कर्ष काढलेले आहेत ते मुद्दाम आपल्यालासमोर वाचून दाखवितो. प्राथमिक शाळांच्या संदर्भामध्ये संस्थेला दिनांक 1/11/1995 रोजी "कारणे दाखवा नोटीस" देण्यात आली

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

होती. संस्थेने त्या नोटीसीला दिनांक 14/11/1995 रोजी उत्तर दिले. दिनांक 13 सप्टेंबर, 1996 रोजी शिक्षण संचालकांनी आदेश काढले की, संस्थेने दिलेले उत्तर समाधानकारक नाही, अशी खात्री झालेली आहे. त्यांनी संस्थेवर पुढीलप्रमाणे आरोप केले आहेत :-

1. श्रीमती लीलाबाई धावडे आणि गजानन मेश्राम यांना खोटया प्रमाणपत्राच्या आधारे सेवेत घेऊन शासनाकडून वेतन अनुदान घेऊन शासनास फसविले आहे.
2. सौ.अलका पेठे या 1984-85, 85-86 मध्ये डी.एड.कॉलेजमध्ये शिकत होत्या. त्या शाळेत कार्यरत नसताना सुध्दा शाळेत कार्यरत असल्याचे दाखवून, शासनाकडून वेतन अनुदान घेतले व शासनाची फसवणूक केली आहे.
3. श्री.गंगाधर खोपे ही व्यक्ती स्वावलंबी बी.एड.कॉलेजमध्ये शिकत होती. सेवेत नसताना सुध्दा ते सेवेत असल्याचे दाखवून, शाळेकडून वेतन अनुदान घेऊन, शासनाची फसवणूक केली आहे.
4. श्री.निलय माकडे 1/7/1978 ते 1980 पर्यंत सेवेत नव्हता. त्याची खोटी स्वाक्षरी करुन, वेतन अनुदान घेतले व शासनास फसविले.
5. सौ.तिडके यांची जात बदलून, त्या मागासवर्गीय आहेत असे दाखवून मान्यता व वेतन घेतले आणि शासनाची फसवणूक केली आहे.

महोदय, हे सर्व आरोप प्राथमिक शाळांच्या बाबतीतील आहेत. अशाच प्रकारचे प्रकार माध्यमिक शाळांमध्ये सुध्दा आढळून आलेले आहेत. माध्यमिक शाळेला दिनांक 31/7/1995 रोजी "कारणे दाखवा नोटीस" बजावण्यात आली होती. संस्थेने दिनांक 16/8/1995 रोजी खुलासा केला. त्यानंतर दिनांक 29/12/1995 रोजी शिक्षण संचालकांनी तेथे प्रशासक नेमण्याबाबत आदेश काढले. त्यांनी संस्थेला असेही कळविले की, संस्थेकडून प्राप्त झालेला खुलासा समाधानकारक नसल्याची शासनाची खात्री झाल्याने हा आदेश काढण्यात आला आहे. या आदेशामध्ये शिक्षण संचालकांनी स्पष्ट म्हटले आहे की, सदर शाळेचे व्यवस्थापन जनहितास हानीकारक होईल अशा

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते.....

रितीने चालविले जात आहे. महोदय, हा शेरा माझा नव्हे तर शिक्षण संचालकांचा आहे. माध्यमिक शाळा संहितेतील व शिक्षण विभागाने वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार आवश्यक ती कर्तव्ये बजावण्यात संस्थेने दुर्लक्ष केले आहे.

नंतर श्री.कांबळे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ....

सभापती महोदय, हा गैरप्रकार नाही, शासनाची निव्वळ फसवणूक आहे. सभापती महोदय, राजेश धावडे नावाचा त्या संस्थाचालकाचा मुलगा नववीत अनुत्तीर्ण झालेला असताना त्याला दहावीच्या परीक्षेसाठी बसविण्यात आले आणि दहावीत पास झाल्यानंतर त्याच शाळेत त्या मुलाला लिपिक या पदावर नोकरीवर घेण्यात आले. सभापती महोदय, या संदर्भात चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करण्याबाबत शासनाने संस्थाचालकांना आदेश दिले होते. परंतु या संदर्भात संस्थाचालकांनी काहीही केले नाही. सभापती महोदय, त्याला अटकही झाली. संस्थेने शासनाच्या आदेशांचे पालन केले नाही. सभापती महोदय, हा माझा आरोप नसून शिक्षण संचालकांचा हा निष्कर्ष आहे. सभापती महोदय, शाळेचा दूरध्वनी शासनाकडून मिळत आहे, ते सक्तीने प्रवेश देतात, विनापावती परीक्षा शुल्क देखील घेण्यात येते आणि त्याचा कोणताही हिशेब ठेवण्यात येत नाही. सभापती महोदय, शासनाकडून या शाळांसाठी अनुदान व वेतनेतर अनुदान देखील मिळते. या अनुदानाचा उपायोग मुख्याध्यापक करत नाहीत तर संस्था त्याचा उपयोग करतात. त्याचा खाजगी वापर होतो. या संस्थेवर अशाप्रकारे वेगवेगळे आरोप करण्यात आले आहेत. या सर्व आरोपांचा विचार करता, शासनाची फसवणूक झाल्याचे सिध्द झाले आहे. आता या ठिकाणी शासन उत्तर देईल की, या संस्थेवर गंभीर स्वरुपाचे आरोप नाहीत, त्यामुळे कारवाई करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. सभापती महोदय, आमच्या मनात क्लेष निर्माण करणारे हे उत्तर असेल. आज या संस्था शासनाकडून शंभर टक्के अनुदान घेऊन शासनाची दिशाभूल करत आहेत, फसवणूक करीत आहेत. शासन मात्र या संस्थांना पाठीशी घालत असेल तर मला वाटते की, या संदर्भात शिक्षण क्षेत्रात वेगळा संदेश जाईल. सभापती महोदय, ही प्रकरणे इतकी गंभीर आहेत की, त्यांच्या संदर्भात वर्तमानपत्रामध्ये देखील चर्चा झाली आहे. आपण या संस्थांवर कोणती कारवाई केली ? सभापती महोदय, या संस्थांवर कोणत्याही प्रकारची कारवाई झालेली नाही. मला सांगा की, प्रशासक नेमून हा प्रश्न सुटणार आहे का ? अनियमितता असेल तर त्या ठिकाणी प्रशासक नेमला तर ठीक आहे. शासनाच्या फसवणुकीसंदर्भात प्रशासक काही करु शकत नाही. प्रशासक एक वर्षे, दोन वर्षे, मॅक्झिमम तीन वर्षे राहील. सभापती महोदय, आज नाही तर उद्या त्या शाळा ताब्यात घेऊन शासनास त्या संस्थेच्या ताब्यात द्याव्या लागतील. मग झालेल्या घटनांचे

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ....

पुढे काय ? महाराष्ट्रामध्ये ही काही एकच संस्था नाही. बऱ्याचशा अशा संस्था आहेत की, ज्यांनी अशाप्रकारे शासनाची फसवणूक केली आहे. रायगड येथील सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या पन्नास टक्के तक्रारी आहेत. अशाप्रकारे या संस्था शासनाची फसवणूक करीत आहेत. या संस्थाचालकांवर कारवाई झाली पाहिजे. सभापती महोदय, डोंबिवली शहरात एक शाळा आहे, गैरव्यवहारामुळे त्या शाळेची शासनाने मान्यता काढली. परंतु लगेच त्या शाळेला पुन्हा नव्याने मान्यता देण्यात आली. आपण कधीतरी या शाळांची नावे काळ्या यादीत टाकणार की नाही ? या संदर्भात काही ठोस निर्णय घेतल्याशिवाय संस्थाचालक वठणीवर येणार नाहीत. त्यांना असे वाटले पाहिजे की, आपण शासनाची फसवणूक केली तर आपल्या शाळा उद्या बंद पडतील, त्यावर पोलीस कारवाई होईल. सभापती महोदय, हे प्रकरण कित्येक वर्षांपासून सुरु आहे. परंतु शासनाचे त्याकडे दुर्लक्ष झालेले आहे. सभापती महोदय, शासन या संस्थांना पाठीशी घालत आहे, हा आरोप मी करत नाही तर शिक्षण संचालकांचा हा निष्कर्ष आहे. म्हणून या संदर्भात मी माननीय मंत्रीमहोदयांना प्रश्न विचारु इच्छितो की, आपण या संस्थांवर कोणती कारवाई करणार आहात ? त्या संस्थांची मान्यता आपण काढणार आहात का ?

अशुद्धीत प्रत / अशुद्धीसाठी नाही

प्रा. वसंत पुरके (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, अर्धा तास चर्चेच्या माध्यमातून या सदनाचे सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी शिक्षणसंस्थांनी केलेल्या गैरव्यवहारासंदर्भात काही महत्वपूर्ण मुद्दे निदर्शनास आणून दिले आहेत. प्राथमिक व माध्यमिक या दोन्ही शाळांच्या संदर्भात त्यांनी खंत व नाराजी व्यक्त केली आहे. ते असे देखील म्हणाले की, आता शासनाकडून उत्तर मिळेल की, कारवाई करण्याइतपत कोणतीही गंभीर बाब या संस्थेकडून झालेली नाही.

(यानंतर श्री. वि. खर्चे ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वसंत पुरके...

अफरातफर झालेली नाही, अनियमितता होती, शालेय शिक्षण खात्याचा कारभार मी हाती घेतल्यानंतर कोणालाही पाठीशी घालण्यात येणार नाही, याबाबत कोणीही तिळमात्र शंका घेऊ नये. शिक्षणाच्या संदर्भात अशी तडजोड करता येणार नाही. ठराविक पक्षाच्या व्यक्तींची शिक्षण संस्था असेल तर त्यांना पाठीशी घालण्यात येते, असा गैरसमज कृपया कोणीही करुन घेऊ नये. निधीच्या संदर्भात जर संस्थेमध्ये गैरव्यवहार झालेले असतील, क्वालिफाईड स्टाफ नियुक्त केला नसेल तर ती कितीही मोठी संस्था असली तरी त्या शाळेला कारणे दाखवा नोटीस देण्यात येईल. त्यानंतरही त्यांनी काही सुधारणा केली नाही, त्यासंदर्भातील माहिती उपलब्ध करुन दिली नाही तर त्या शाळेची मान्यता काढून घेण्याच्या संदर्भातील कार्यवाही करण्यात येईल. विदर्भातील माझ्या अमरावती जिल्हयामध्ये 13 शाळांची मान्यता काढून घेण्याचा प्रक्रिया सुरु केलेली आहे. आपण सांगितल्या प्रमाणे जर कोणी शिकविण्याचे काम न करता पगार घेत असतील, शाळेमध्ये उपस्थित राहत नसतील, अशा प्रकारची एखादी बाब निदर्शनास आल्यानंतर त्यांची गय केली जाणार नाही. श्री. निलय माकडे व श्री. राजेश धावडे यांनी जो काही गैरव्यवहार किंवा बोगस जातीचे प्रमाणपत्र देऊन शासनास फसविले आहे, याबाबत शासन निश्चितपणे गंभीर दखल घेईल. माझ्या विभागाने जरी याची चौकशी केली असली तरी मी स्वत: यामध्ये समाधानी नाही. सदर संस्थांची पुनर्तपासणी करण्यासाठी फेक्ट फाइण्डिग कमिटी नियुक्त करण्याचे आदेश काढलेले आहेत. यामध्ये जे दोषी आढळतील त्यांच्यावर निश्चितपणे कारवाई करण्यात येईल. कोणालाही येथे पाठीशी घालण्याचा प्रयत्न करण्यात येणार नाही. एका तेली समाजाच्या व्यक्तीने इंटरकॉस्ट मॅरेज करुन अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र देऊन त्यासंदर्भात फायदा घेण्याचा प्रयत्न केला. तसेच एका आदिवासी भागातील कलार जातीच्या व्यक्तीने कहार जातीचे प्रमाणपत्र देऊन आदिवासीच्या जागेवर भरती होण्याचा प्रयत्न केला होता. अशी गंभीर बाब निदर्शनास आलेली आहे. मी स्वत: याबाबत जातीने लक्ष देऊन काळजी घेईल, माझ्या अधिकाऱ्यांनी जर खोटया प्रमाणपत्राच्या आधारे काही नियुक्त्या केलेल्या असतील तर अशा प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश देऊन त्यामध्ये जर काही त्रुटी आढळून आल्या तर त्यांच्यावर निश्चितपणे कारवाई करण्यात येईल. गृह विभागाकडे तक्रार देऊन या संदर्भातील कार्यवाही करण्यात येईल.

.....2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री महोदयांनी सांगितल्या प्रमाणे शिक्षणाची गुणवत्ता वाढविणे, शाळांची गुणवत्ता वाढविणे अत्यंत आवश्यक आहे. माननीय मंत्री संस्थांची गुणवत्ता वाढविण्याचा जाणिवपूर्वक प्रयत्न करीत आहेत. या संदर्भातील त्यांनी आश्वासन दिलेले आहे. परंतु या संस्थेच्या गैरव्यवहाराबाबत कारवाई करण्याबाबतचा निर्णय 15 ते 20 दिवसांत घेणार आहात काय ? यासंदर्भात मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे.

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, गुणवत्तेच्या संदर्भात मेरीट ही सार्वभौम शक्ती आहे, गुणवत्तेला तोड नाही. शिक्षणाला गुणवत्तेची जोड असणे आवश्यक आहे. गुणवत्तेच्या संदर्भात कोणतीही तडजोड करण्यात येणार नाही. एक ते दीड महिन्यात यासंदर्भातील निर्णय घेण्याचा प्रयत्न केला जाईल.

तालिका सभापती : अर्धा तास चर्चा संपलेली आहे.

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या बुधवार दिनांक, 5 एप्रिल, 2006 रोजी सकाळी 10.00 वाजता पुन्हा भरेल.

दिनांक 5 एप्रिल,2006 रोजी सकाळी 10 ते 12.30 पर्यंत अशासकीय कामकाज घेण्यात येईल. त्यानंतर सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1.00 वाजता सुरु होईल.

(सभागृहाची बैठक रात्रौ 7 वाजून 59 मिनिटांनी बुधवार दिनांक 5 एप्रिल, 2006 च्या सकाळी 10.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

अशुधारित प्रत / शोधनेसाठी नाही